
जीवनाच्या प्रकाशवाटा दाखविणारी यशोगाथा




लाइफ विदाउट लिमिट्स

निक व्होयचिच

मेहता पब्लिशिंग हाउस

जीवनाच्या प्रकाशवाटा दाखविणारी यशोगाथा



लाइफ विदाउट लिमिट्स

निक व्होयचिच

मेहता पब्लिशिंग हाऊस



निक व्होयचिच हा प्रेरणादायी वक्ता व
'लाइफ विदाउट लिंब्स' या कल्याणकारी
संस्थेचा संचालक आहे. मूळ सर्बियन
(पूर्वाश्रमीचा युगोस्लाव्हिया) वंशाचा असलेला
निक ऑस्ट्रेलियन नागरिक होता व
सध्या तो दक्षिण कॅलिफोर्नियात राहतो.

NICK VUJICIC



लाइफ विदाउट लिमिट्स

जीवनाच्या प्रकाशवाटा दाखविणारी यशोगाथा.

लेखक
निक व्होयचिच

अनुवाद
प्रसाददत्त गाडगीळ

मेहता पब्लिशिंग हाऊस



All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder. Please contact us at **Mehta Publishing House** , 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411030. ☎ Phone +91 020-24476924 / 24460313

Email :info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com
Website :www.mehtapublishinghouse.com

◆ *या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

LIFE WITHOUT LIMITS by NICK VUJICIC

Copyright © 2010 by Nicholas James Vujicic
Translated into Marathi Language by Prasaddatta Gadgil

लाइफ विदाउट लिमिट्स / अनुवादित आत्मकथन

अनुवाद :प्रसाददत्त गाडगीळ, सी-१०४, सिताराम नारायण खेर संकुल, टिळकआळी, रत्नागिरी - ४१५६१२.

मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.

प्रकाशक :सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ३०.

ईबुक :नंदकुमार सुर्यवंशी, भ्रमणध्वनी ९८२०३६६३७९. (eBook developed by Nandkumar Suryawanshi)

मुखपृष्ठ :मेहता पब्लिशिंग हाऊस

प्रथमावृत्ती :सप्टेंबर, २०१८

P Book ISBN 9789353171209
E Book ISBN 9789353171278

देव, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा.
सोबतच कॅलिफोर्नियातील सॅन दिएगो कुटुंबाला
मी हे पुस्तक समर्पित करतो. फिलने माझ्या आयुष्यात जी
श्रद्धा आणि विश्वासाची पेरणी केली ती मी कधीच विसरू शकत नाही.
त्याच्या स्पर्शजन्य मूल्य ज्योतीने माझ्या प्रवासाची सुरुवात झाली.

अनुक्रमणिका

तुम्हाला चमत्कार लाभत नसेल, तर तुम्ही स्वत: चमत्कार बना
ना हात, ना पाय, ना मर्यादा
हृदयी पूर्ण दिलासा
स्वत:च्या परिपूर्ण अपूर्णत्वावर प्रेम करा
दृष्टिकोन म्हणजेच ध्येयसिद्धी
निर्बाहू, परंतु निरुपद्रवी नव्हे
अपयशाला तुमच्यात रुजू देऊ नका
झुडपांमध्ये नवा चेहरा
इतरांवर थोडाबहुत तरी विश्वास ठेवा
समान-संधी तत्त्वाला कवटाळणारा
मजेशीर नियमावली
दातृत्व ही तुमची मोहीम असू द्या

प्रस्तावना

'लाइफ विदाउट लिमिट्स' हे एका अद्वितीय इसमाचे प्रेरणादायी पुस्तक आहे. हाता-पायांविना अपंग म्हणून जन्मलेल्या निक व्होयचिच याने आपल्या व्यंगावर मात करत स्वावलंबी, संपन्न, परिपूर्ण जीवन जगण्यास प्रारंभ केला आणि खऱ्या आनंदाची ओढ असणाऱ्या कोणासाठीही तो आदर्श ठरला. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी प्रेरणादायी वक्ता असलेल्या निकच्या आयुष्याचा गाभाच मुळी जीवनाचे महत्त्व पटवून देण्याचा आहे. त्याचे ध्येय म्हणजेच स्वत: जीवनाचा हेतू शोधणे हे होय, मग ते करताना कोणतेही अडथळे येवोत वा अशक्य भासणारी परिस्थिती.

निक त्याच्या शारीरिक व्यंगांची आणि बालपणात, पौगंडावस्थेत व तारुण्यात उत्पन्न होणाऱ्या भावनिक कल्लोळाची कथा सांगतो. "प्रदीर्घ आणि एकाकी असताना माझ्या मनात यायचे की, या भूतलावर माझ्यासारखी एक तरी व्यक्ती असेल का? तसंच दु:ख आणि अपमान या व्यतिरिक्त अन्य काही माझ्या जीवनाचा हेतू असू शकतो?" परमेश्वरावरील त्याची श्रद्धा हीच त्याच्या मनोबलाची शक्ती कशी राहिली होती, हे तो सांगतो. तसचं हेही समजावून देतो की, त्याच्या जीवनाचा हेतू – स्वत:चं जीवन आणि जग सुधारण्यासाठी इतरांना प्रेरित करणे – गवसल्यानंतर संपन्न, निर्मितिक्षम असं अमर्याद जीवन जगण्याचा त्याला विश्वास लाभला.

इतरांविषयी विश्वास वाटणं, परस्परपूरक नाती निर्माण करणं आणि जीवनप्रवासासाठी उमेद मिळवणं या त्रिसूत्रीच्या बळावर परिपूर्ण आणि आनंदी जीवन जगण्यासाठी निक व्यवहारी उदाहरण पुढे ठेवतो. स्वत:चा ताबा नसलेल्या गोष्टी स्वीकारणं तसंच ज्या गोष्टींवर तो आहे त्यांवर लक्ष केंद्रित करणं तो कसं शिकला, हे दाखवून देत तो वाचकाला स्फूर्ती देतो.

परिचय

मी निक व्होयचिच, वय वर्षं सत्तावीस. मी हाता-पायांविना जन्माला आलो, परंतु माझ्या परिस्थितीमध्ये मी बद्ध नाहीये. मी जगभर प्रवास करतो आणि श्रद्धा, आशा, प्रेम, धाडस यांच्या साहाय्यानं प्रतिकूलतेवर मात करून आपली स्वप्नपूर्ती करण्यासाठी मी लक्षावधी लोकांना प्रेरणा देतो. प्रतिकूल परिस्थिती आणि अडथळ्यांशी मी कसे दोन हात (?) केले याचं अनुभवकथन मी या पुस्तकात केलं आहे, ज्यापैकी काही अनुभव केवळ माझे एकट्याचे आहेत, तर बहुसंख्य सार्वत्रिक! तुम्ही तुमच्या जीवनातली आव्हानं आणि कष्ट पार करावेत जेणेकरून तुम्हाला स्वत:चे ध्येय आणि गमतीदार चांगल्या जीवनाचा मार्ग सापडावा यासाठी तुम्हाला प्रेरित करावं हाच माझा उद्देश आहे.

आपल्याला बरेचदा असं वाटतं की, जीवन हे अन्यायकारक आहे. कठीण काळ आणि अवघड परिस्थिती आपल्या आत्मविश्वासाला तडा देतात आणि पदरीची निराशा वाढवतात. मी हे समजू शकतो, परंतु बायबल म्हणतं की, "जेव्हा-जेव्हा तुम्हाला कोणत्याही परीक्षेला सामोरं जावं लागेल तेव्हा त्यात तुम्ही निखळ आनंद माना." हा धडा आत्मसात करण्यासाठी माझी पुष्कळ वर्षं खर्ची पडली. अखेरीस मला ते उमजलं आणि माझ्या स्वानुभवातून मी तुम्हाला दाखवून देऊ शकतो की, आपण घेत असलेले बहुतेक कष्ट आपल्याला आपल्या अस्तित्वाचा हेतू, तसंच आपल्याला लाभलेल्या दैवी देणगीतून आपण इतरांसाठी काय करू शकतो, हे ओळखण्याच्या संधी देतात.

माझे आईवडील अत्यंत धार्मिक ख्रिश्चन आहेत, पण हाता-पायांविना जन्माला आलेल्या मला पाहताच त्यांना प्रश्न पडला की, मला निर्माण करण्यामागे परमेश्वराचा काय बरं हेतू असावा? प्रथम त्यांनी गृहीत धरले की माझ्यासारख्याला ना काही आशा होती, ना कोणते भविष्य आणि मी कदापि सामान्य निर्मितिक्षम जीवन जगूच शकणार नाही.

मात्र, आज माझं जीवन आपल्या कल्पनाशक्तीपलीकडचं आहे. दररोज फोन, ई-मेल, एसएमएस, ट्विटरसारख्या माध्यमातून अनेक अनोळखी लोक माझ्या संपर्कात असतात. एअरपोर्ट्स, हॉटेल्स आणि रेस्तराँमध्ये ते भेटतात आणि मला आलिंगन देत सांगतात की, कुठल्या ना कुठल्या प्रकारे मी त्यांच्या जीवनावर प्रभाव (चांगला) टाकला आहे. खरोखरच माझ्यावर परमेश्वराची कृपा आहे. मी आनंदी आहे.

मला आणि माझ्या कुटुंबाला आधी कल्पनाच नव्हती की माझं व्यंग माझं 'लोढणं' – हे वरदान ठरू शकतं की जे मला इतरांच्या संपर्कात जाण्यासाठी, त्यांना सहानुभूती देण्यासाठी, त्यांची दु:खं जाणून घेण्यासाठी, आणि त्यांना दिलासा देण्यासाठी अद्वितीय अशी संधी देऊ शकेल. होय, मला माझी विवक्षित आव्हानं पेलावी लागतात, पण त्याचबरोबर मला कुशाग्र बुद्धी आणि नितांत श्रद्धायुक्त प्रेमळ कुटुंबाचं वरदान लाभलंय. अत्यंत भयावह प्रसंगांना तोंड देतानाच माझी श्रद्धा आणि माझ्या सद्भावना अधिकाधिक

वृद्धिंगत होत गेल्या. याचा विश्वास मी तुम्हाला आता इथंच नव्हे, तर माझ्या संपूर्ण कथनामध्ये देऊ शकतो.

पौगंडावस्थेत प्रवेश केल्यावर आपण जेव्हा विचार करू लागतो की, या विश्वाच्या पसाऱ्यात माझं नेमकं स्थान काय आहे त्या वेळी मी माझ्या परिस्थितीमुळे निराश झालो. वाटू लागलं आपण कधीच 'सामान्य' होऊ शकणार नाही. माझा देह माझ्या इतर वर्गमित्रांसारखा नाही ही वस्तुस्थिती लपवण्यासारखी नव्हती. पोहणं किंवा स्केटबोर्डिंग करणं यांसारख्या सामान्य गोष्टी करण्याचा मी जसजसा प्रयत्न करू लागलो तसतशी माझी जाणीव दृढ होऊ लागली की काही गोष्टी अशा होत्या की त्या मी कधीच करू शकणार नाही.

काही निर्दयी मुलं मला 'फ्रीक' आणि 'एलियन' म्हणत माझी कुचेष्टा करायची. त्या वेळी मी काहीच करू शकत नव्हतो. अर्थात, मी मात्र मनुष्यच होतो आणि मी इतरांसारखेच असावे अशी माझी अपेक्षा होती, पण तशी शक्यता नसल्यातच जमा होती. मी स्वीकारला गेलो पाहिजे असं मला वाटायचं. पण मी स्वीकारला जात नसल्याची भावना माझ्या मनात घर करून बसली होती. मला सामावून जायचं होतं, पण तसं होत नव्हतं असं मला भासत होतं. माझ्यासमोर भिंत आडवी आली होती.

माझं हृदय पिळवटून जायचं. मी नैराश्यानं ग्रासलेला होतो. नकारात्मक विचारांनी माझ्या मनावर कब्जा केला होता, मला माझ्या जीवनात काही तथ्य दिसत नव्हतं. कुटुंबीय आणि मित्र-मंडळी यांच्या कोंडाळ्यातही मला एकाकी वाटायचं. मला कायम चिंता लागून राहिलेली असायची की मी माझ्या प्रियजनांसाठी एक लोढणं बनून राहिन.

पण मी केवढा चुकीचा होतो. त्या झाकोळलेल्या दिवसांमध्ये मला काय-काय ठाऊक नव्हतं याचा आढावा घ्यायचा म्हटलं तर त्याचं एक पुस्तक तयार होईल: खरं म्हणजे तेच जे तुमच्या हातांत आहे. अत्यंत कठीण प्रसंगी आणि मनस्ताप भोगत असतानाही आशा कशी जिवंत ठेवायची याच्या काही युक्त्या मी तुम्हाला पुढच्या पानांत सादर करेन. दु:खाच्या पलीकडल्या बाजूचा पथ मी प्रकाशमान करेन,जिथं तुम्ही अधिक सबळ, अधिक निश्चयी व्हाल आणि तुमची जीवन जगण्याची इच्छाशक्ती तुम्हाला लाभेल, किंवा कदाचित कल्पनेपलीकडलं जीवन तुम्हाला गवसेल.

तुमच्याजव्ाळ काही करण्याची प्रबळ इच्छा आणि ध्यास असेल आणि जर परमेश्वराची तशीच इच्छा असेल तर ते तुम्ही मिळवू शकाल हा एक मोठा दावा आहे. खरं सांगायचं तर माझा स्वत:चाही पूर्वी विश्वास नव्हता. तुम्ही जर इंटरनेटवरचा माझा एखादा कार्यक्रम पाहिला असेल तर त्यातून दर्शन घडत असलेला माझा आनंद हे माझ्या प्रवासाचंच फलित होय. प्रवासाच्या सुरुवातीला माझ्याकडे सगळीच साधनं नव्हती, काही मी वाटेत मिळवली. मर्यादा नसलेलं जीवन जगण्यासाठी पुढील साधनांची गरज असल्याचा मला शोध लागला.

आपल्या जीवनाचा काही हेतू असल्याची प्रबळ भावना
उरी अमर आशा
परमेश्वर आणि अनंत शक्यता यांवर श्रद्धा
प्रेम आणि आत्मस्वीकार
योग्य दृष्टिकोन
निधडे मन
मनाचा लवचीकपणा
विश्वासाने भरलेलं हृदय
संधींची तृष्णा
धोके जोखण्याची आणि जीवनावर हसण्याची क्षमता
इतरांना प्रथम सेवा देण्याची मोहीम

या पुस्तकातलं प्रत्येक प्रकरण वरीलपैकी एकेका साधनाशी निगडित आहे आणि त्यांचं उपयोजन अशा तऱ्हेनं समजावण्याचा मी प्रयत्न केला आहे की जेणेकरून त्यांचा वापर तुम्ही तुमच्या स्वत:च्या जीवनात करून ते परिपूर्ण आणि अर्थपूर्ण करू शकाल. ते मी तुम्हाला सादर केलं आहे कारण परमेश्वराचं तुमच्यावरील प्रेम माझ्याही वाट्याला आलंय. 'त्यानं' तुमच्यासाठी योजून ठेवलेला सारा आनंद आणि परिपूर्णता तुम्हाला अनुभवता यावी अशी माझी इच्छा आहे.

दररोज पराकाष्ठा करणाऱ्या लोकांपैकीच एक जर तुम्ही असाल तर हे ध्यानात घ्या की, माझ्या पराकाष्ठेच्या पलीकडेही माझ्या जीवनाचा हेतू माझी प्रतीक्षा करत होता आणि आता ते सिद्ध झालंय की, ते माझ्या कल्पनाशक्तीच्या फार, फार, फार पलीकडे होतं.

तुमच्यापुढे कठीण समय येतील. तुम्ही मोडून पडाल आणि तुम्हाला वाटेल की आता काही तुम्ही यातून पुन्हा उभे राहू शकणार नाही. मी ते समजू शकतो, दोस्तहो! आपण सर्वच जण समजू शकतो! जीवन काही नेहमीच सुरळीत नसते, पण जेव्हा आपण समर्थपणे आव्हानं पेलतो तेव्हा आपण अधिक कणखर बनतो आणि आपल्याला लाभलेल्या संधींच्या बाबतीतही अधिक कृतज्ञ! जीवनप्रवासात तुम्ही सहप्रवाशांच्या जीवनाला कसा स्पर्श करता आणि प्रवासाचा शेवट तुम्ही कसा करता याला सर्वाधिक महत्त्व आहे.

माझ्या जीवनावर माझं तेवढंच प्रेम आहे जेवढं तुमचं तुमच्या जीवनावर. एकत्रितपणे, आपल्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी केवळ मजेशीर आहेत. मग, तुमचं काय म्हणणं आहे? दोस्तहो, निघायचं प्रवासाला?

एक

तुम्हाला चमत्कार लाभत नसेल, तर तुम्ही स्वत: चमत्कार बना

यू- ट्यूबवरच्या माझ्या सर्वांत लोकप्रिय व्हिडिओजपैकी एकामध्ये मी स्केटबोर्डिंग तसेच सर्फिंग करताना, संगीत वाजवताना, गोल्फ खेळताना, पडताना, पुन्हा उभे राहताना, श्रोत्यांपुढे बोलताना आणि सगळ्यात भारी म्हणजे विविध प्रकारच्या महान व्यक्तींकडून आगन स्वीकारताना दाखवलंय.

थोडक्यात काय, त्या सर्व अशा नेहमीच्या क्रिया आहेत की, ज्या कोणीही सामान्य माणूस करू शकेल, बरोबर? मग तो व्हिडिओ लक्षावधी वेळा का पाहिला गेलाय असं तुम्हाला वाटतं? माझ्या कल्पनेप्रमाणे लोकांना तो पाहायला आवडतो कारण शारीरिकदृष्ट्या मी एवढा पंगू असूनही मी त्यात असा जगताना दिसतोय की, जणू मला कोणत्याही मर्यादाच नसाव्यात.

मोठी व्यंगं असलेल्या व्यक्ती या निष्क्रिय तसेच कोपिष्ट आणि अंतर्मुख असायला हव्यात, असा लोकांचा सर्वसाधारण समज असतो. परंतु अशा लोकांना माझं साहसप्रिय तसंच परिपूर्ण अस्तित्व दाखवून देऊन अचंबित करायला मला आवडतं.

व्हिडिओवरल्या शेकडो कॉमेंट्सपैकी एक सर्वसाधारण अशी : "अशा तऱ्हेच्या मनुष्याला एवढं आनंदी पाहून मला प्रश्न पडला की कधी-कधी मी स्वत:ची कीव का करतो... किंवा मी स्वत:ला पुरेसा आकर्षक किंवा विलक्षण का समजत नाही किंवा 'काहीही' का समजतो? हा इसम हात-पाय नसतानाही आनंदी राहत असेल, तर माझ्या मनात स्वत:बद्दल असे विचार तरी कसे येऊ शकतात?"

एकच प्रश्न मला बऱ्याचदा विचारला जातो, "निक, तू एवढा आनंदी कसा राहू शकतोस?" तुम्हीही तुमच्या समस्यांशी दोन हात करीत असाल, म्हणूनच मी तुम्हाला लगेच सरळ आणि स्पष्ट उत्तर देतो :

अपूर्ण असलो तरी मी परिपूर्ण निक व्होयचिच आहे याचा बोध झाल्यानंतर मला आनंद गवसला. मी परमेश्वराची निर्मिती आहे, 'त्यानं' माझ्यासाठी केलेल्या योजनेनुसारच माझी घडण आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की माझ्यात सुधारणेचा वाव शिल्लक नाही. अधिक सुधारणेसाठी मी सतत प्रयत्नशील असतो जेणेकरून मी 'त्याची' आणि जगाची अधिक उत्तम प्रकारे सेवा करू शकेन.

माझं जीवन मर्यादांनी बद्ध नाहीये, यावर माझा विश्वास आहे. तुम्हालाही तुमच्या जीवनाविषयी असाच विश्वास वाटावा असं मला वाटतं, मग तुमच्यापुढे कोणतीही

आव्हानं असोत. आपला सहप्रवास सुरू होण्यापूर्वी तुम्ही जरा विचार करा की, तुम्ही तुमच्या जीवनावर कोणत्या मर्यादा घातल्या आहेत अथवा इतरांना घालू दिल्या आहेत. आता असा विचार करा की, त्या मर्यादांपासून मुक्त असलेलं जीवन कसं असेल किंवा काहीही शक्य असल्यास तुमचं जीवन कसं असेल?

कायद्यानं मी अक्षम असलो तरी प्रत्यक्षात मात्र मी सक्षम आहे आणि त्याचं कारण म्हणजे मला हात-पाय नसणं. माझ्या दुर्मीळ आव्हानांमुळे माझ्यापुढे दुर्मीळ संधी उभ्या राहिल्या, गरजवंत असलेल्या असंख्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी. केवळ कल्पना करा की, तुमच्यासाठी काय शक्य आहे!

बरेचदा आपण स्वत:ला सांगत असतो की, आपली स्वप्नं प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण पुरेसे आकर्षक किंवा हुशार किंवा चलाख नाही आहोत. इतर आपल्याला जे काय समजतात तेच आपण स्वत:बद्दल स्वीकारतो किंवा आपण स्वत:वरच निर्बंध लादतो. सर्वांत वाईट बाब ही की जेव्हा तुम्ही स्वत:ला अपात्र समजू लागता तेव्हा अप्रत्यक्षरीत्या तुम्ही, परमेश्वर तुमच्याकरवी जे करू पाहतोय त्यावरच निर्बंध घालता!

तुम्ही तुमच्या स्वप्नांचा नाद सोडून देता तेव्हा तुम्ही परमेश्वरालाच बंदिस्त करता. शेवटी तुम्ही 'त्याची' निर्मिती आहात. त्यानं तुम्हाला निर्माण केलं ते काही विशिष्ट हेतूनं! म्हणूनच परमेश्वराचं प्रेम जसं बद्ध करता येणार नाही, त्याप्रमाणे तुमच्या जीवनावर तुम्हाला मर्यादा घालता येणार नाहीत.

माझ्याकडे पर्याय उपलब्ध आहेत. तुमच्याकडेही पर्याय उपलब्ध आहेत. निराशा आणि कमतरतांवर विचार करत राहण्याचा पर्याय खुला आहे. कटू, क्रुद्ध किंवा दु:खी राहण्याचा पर्याय खुला आहे किंवा कठीण समयाचा अथवा दु:ख देणाऱ्या व्यक्तींचा सामना करताना, अनुभवातून शिकून पुढे चालू राहण्याचा, आणि आपल्या स्वत:च्या आनंदाची जबाबदारी स्वत: पेलण्याचा पर्यायही खुला आहे.

परमेश्वराचं लेकरू असल्याकारणानं तुम्ही सुंदर आणि अनमोल आहात, जगातल्या साऱ्या हिऱ्यांहूनही किमती! तुम्ही आणि मीदेखील अगदी तसेच आहोत जसे आपण असायला हवे होतो. असं असूनही आपलं ध्येय हेच असायला हवं की, 'मी अधिक चांगली व्यक्ती बनेन आणि मोठी स्वप्नं पाहत मी माझ्या कक्षा रुंदावेन.' मार्गक्रमण करताना 'जुळवून घेणं' आवश्यक आहे, कारण जीवन कायम सुखद नसतं, मात्र ते जगण्याएवढं सुंदर निश्चितच असतं. हेच सांगण्यासाठी मी इथं आहे. तुमची परिस्थिती कशी का असेना, जोवर तुम्ही श्वास घेताय तोवर तुम्ही काही ना काही देऊ शकता.

तुम्हाला दिलासा देण्यासाठी मी तुमच्या खांद्यावर हात ठेवू शकत नाही, पण मी तुमच्याशी मनापासून बोलू शकतो. तुमचं जीवन कितीही निराशजनक असलं तरी त्यात आशेला नक्कीच वाव असतो. सध्या परिस्थिती केवढीही बिकट असली तरी पुढे चांगलेच दिवस येणार आहेत. कितीही वाईट अथवा भयानक परिस्थिती तुमच्यावर आली तरी तुम्ही

त्या परिस्थितीवर मात करू शकता. नुसती बदलाची आस धरून काही बदलणार नाही. आत्ता, या घडीला योग्य निर्णय घेऊन त्यावर कृती करण्याने सर्वकाही बदलेल!

'जीवनात घडत असलेल्या सर्व घटना या चांगल्यासाठीच एकत्र येत असतात' याविषयी मला खातरी आहे; कारण माझ्या जीवनात ते सत्यात उतरलं आहे. हाता-पायांविना असलेल्या जीवनाला कसलं चांगलं म्हणायचं? माझ्याकडे केवळ पाहून लोकांना कळतं की जीवनात येणाऱ्या अनेक अडथळ्यांना आणि कष्टांना तोंड देऊन मी त्यावर मात केली आहे. त्यामुळे माझं ऐकून त्यातून स्फूर्ती घेण्यास ते तयार होतात. माझ्या श्रद्धेत वाटेकरी होण्यास, त्यांच्यावरही प्रेम केलं जातं हे मी त्यांना सांगण्यास, आणि माझ्याकडून आशा घेण्यास ते राजी होतात.

हा झाला तुम्हाला काहीतरी देण्यातला माझा वाटा. आपलं स्वत:चं मोल ओळखणं फार महत्त्वाचं आहे. लक्षात घ्या, तुमच्याकडेही 'देण्यासारखं' काहीतरी नक्कीच आहे. सध्या जरी तुम्ही निराश असाल, तरी काही हरकत नाही. या निराशेचा अर्थच मुळी हा आहे की आत्ता तुमच्या जीवनात जे काही आहे त्याहून अधिक काहीतरी तुम्हाला हवं आहे. हे चांगलंच आहे. बरेचदा जीवनातली आव्हानंच तुम्हाला दाखवून देतात की तुम्ही प्रत्यक्षात कोण असायला हवे आहात.

मौल्यवान जीवन

मी ज्या परिस्थितीत जन्म घेतला होता तिचे लाभ समजायला मला पुष्कळ वेळ लागला. माझी आई पंचवीस वर्षांची होती जेव्हा तिला तिच्या पहिल्या अपत्याच्या वेळी म्हणजेच माझ्या वेळी दिवस गेले होते. ती हॉस्पिटलमध्ये सुईण होती आणि त्याचबरोबर बालरोग विभागात प्रमुख नर्स. अर्थातच, ती शेकडो बाळ-बाळंतिणींची काळजी घ्यायची. गर्भारपणात काय काळजी घ्यावी याची तिला पुरेपूर कल्पना होती, नव्हे जाण होती. ती संतुलित आहार घेत होती, औषधांच्या बाबतीत जागरूक होती, ती मद्यपान करीत नसे. एवढंच नव्हे, तर अॅस्पिरिन किंवा तत्सम वेदनाशामकंही ती घेत नव्हती. ती उत्तमोत्तम डॉक्टर्सकडून तपासून घेत होती आणि त्या सर्वांनी तिला आश्वस्त केलं होतं की सर्वकाही सुरळीत पार पडेल.

परंतु तरीही तिच्या मनातली धाकधूक दूर होत नव्हती. दिवस भरत आल्यावर, बरेचदा तिनं आपली काळजी माझ्या वडिलांना बोलून दाखवली होती, "मी आशा करते की आपलं बाळ व्यवस्थित असेल."

दोन वेळा सोनोग्राफी होऊनही डॉक्टर्सना त्यात काही वावगं दिसून आलं नव्हतं. होणारं बाळ हे 'मुलगा' असल्याचं त्यांनी माझ्या आई-वडिलांना सांगितलं होतं, पण हाता-पायांविषयी त्यांनी 'ब्र'ही काढला नव्हता! माझ्या जन्मदिवशी, म्हणजेच ४ डिसेंबर १९८२ रोजी, आई प्रथम मला पाहू शकत नव्हती, त्यामुळे तिनं डॉक्टरांना पहिला प्रश्न विचारला,

"बाळ व्यवस्थित आहे ना?" डॉक्टर्स शांत. काही सेकंद जाऊनही कोणीही तिला तिचं बाळ तिच्याकडे देत नसल्याचं जाणवून ती धास्तावली, काहीतरी गडबड होती. मला तिच्याकडे देण्याऐवजी त्यांनी मला एका बालरोगतज्ज्ञाकडे सोपवलं, पलीकडल्याच एका कोपऱ्यात. त्यांनी माझी तपासणी केली आणि त्यांची सल्लामसलत सुरू झाली. तेवढ्यात आईनं ठणठणीत आवाजातलं माझं 'ट्यॅहँ' ऐकलं आणि ती जरा आश्वस्त झाली. पण माझे वडील ज्यांनी पाहिलं होतं की मला एक हात नव्हता, ते अत्यंत दु:खी झाले होते. त्यांना ऑपरेशन थिएटरमधून बाहेर पाठवण्यात आलं.

मला पाहून धक्का बसलेले डॉक्टर्स आणि नर्सेस यांनी मला लगेच कापडात गुंडाळलं.

नर्स असलेल्या माझ्या आईनं शेकडो बाळंतपणांत साहाय्य केलेलं असल्यामुळे तिला कल्पना आली की काहीतरी विपरीत घडलं आहे आणि बाळंतपण करणाऱ्या कंपूचे चेहरे पाहताच तिची खातरीच पटली.

"काय झालंय? माझ्या बाळाला काय झालंय?" तिनं सरळ-सरळ विचारलं. प्रथम डॉक्टर काही बोलूच शकले नाहीत, पण जेव्हा आईनं फारच आग्रह धरला तेव्हा मात्र त्यांनी तिला एका शब्दात, वैद्यकीय परिभाषेत उत्तर दिलं.

"फोकामेलिया," ते म्हणाले.

वैद्यकीय पार्श्वभूमी असलेल्या माझ्या आईला तत्काळ त्याचा अर्थ समजला की, शारीरिक व्यंग अथवा हात-पाय नसलेलं बाळ जन्मणं. तिचा त्यावर विश्वासच बसेना.

दरम्यान, बाहेर चिंताग्रस्त असलेल्या माझ्या वडिलांना शंका वाटू लागली होती की त्यांनी जे पाहिलं होतं ते खरंच खरं होतं का, जे पाहिल्यासारखं वाटतं होतं तेच पाहिलं होतं का? जेव्हा बालरोगतज्ज्ञ त्यांना भेटायला गेले तेव्हा ते अक्षरश: ओरडलेच, "माझा मुलगा, त्याला हात नाहीत!"

"खरं तर," शक्य तेवढ्या संवेदनशील स्वरांत डॉक्टर म्हणाले, "तुमच्या मुलाला दोन्ही हात आणि दोन्ही पायही नाहीत."

हे ऐकून माझ्या वडिलांच्या हाता-पायातलं अवसानंच गळालं.

काही क्षण ते तसेच, निश्चल बसून राहिले. पण मग मात्र त्यांची संरक्षणात्मक अंत:प्रेरणा कार्यरत झाली. आईनं मला पाहण्यापूर्वीच तिला या गोष्टीची कल्पना द्यावी या हेतूनं त्यांनी तत्काळ तिच्याकडे धाव घेतली, पण तिथं पोहोचल्यानंतर पाहतात तो आडवं पडलेल्या स्थितीतच आई स्फुंदत होती. कंपूनं तिला आधीच ती बातमी दिली होती. त्यांनी तिला मला भेटण्याविषयी, जवळ घेण्याविषयी आग्रह केला. पण तिनं साफ नकार देऊन मला दूर घेऊन जाण्यास सांगितलं.

नर्सेस रडत होत्या. सुईण रडत होती. आणि अर्थातच मीही रडत होतोच! अखेरीस, गुंडाळलेल्या स्थितीतच त्यांनी मला तिच्यासमोर ठेवलं. तिनं जे पाहिलं ते तिला असह्य झालं; 'हात-पाय नसलेलं तिचं बाळ.'

"त्याला दूर घेऊन जा," ती म्हणाली, "मला त्याला स्पर्शही करायचा नाहीये आणि पाहायचंही नाहीये."

अगदी आजपर्यंत माझ्या वडिलांना या गोष्टीची खंत वाटत राहिली आहे की वैद्यकीय कंपूनं त्यांना आईच्या मनाची तयारी करू देण्यास पुरेसा अवधी दिला नाही. नंतर, तिला झोप लागल्यानंतर ते मला पाहायला आले. मग ते पुन्हा आईकडे गेले आणि त्यांनी तिला सांगितलं, "अगं, तो खूप सुंदर आहे." त्यांनी तिला विचारलं की आता ती त्याला पाहण्यास तयार होती का, पण तिनं पुन्हा नकारच दिला. त्यांनी तिला समजून घेतलं आणि तिच्या भावनांचा त्यांनी आदर केला.

माझा जन्म साजरा करण्याऐवजी माझ्या आई-वडिलांनी आणि त्यांच्या चर्चने सुतक पाळलं. 'परमेश्वर म्हणजेच परमेश्वराचं प्रेम असेल," साऱ्यांना प्रश्न पडला, "तर तो असं काहीतरी का घडू देतो?"

माझ्या आईचं दु:ख

मी माझ्या आई-वडिलांचं पहिलं अपत्य होतो. कोणत्याही कुटुंबासाठी हा प्रसंग अर्थातच अत्यंत आनंदाचा असेल, पण माझ्या जन्माच्या वेळी कुणीही माझ्या आईला फुलं पाठवली नाहीत. त्यानं ती दुखावली गेली आणि तिच्या नैराश्यात अजूनच भर पडली.

दु:खी चेहरा आणि डबडबलेल्या डोळ्यांनी तिनं माझ्या वडिलांना विचारलं, "फुलं मिळायला मी पात्र नाहीये?"

"सॉरी," माझे वडील म्हणाले, "अर्थातच, तू त्यासाठी पात्र आहेस." ते तडक तिथून निघाले आणि हॉस्पिटलमधल्या फुलांच्या दुकानातून त्यांनी तिच्यासाठी बुके आणला.

वयाच्या सुमारे तेराव्या वर्षापर्यंत म्हणजेच जेव्हा मी माझ्या आई-वडिलांना माझ्या जन्माच्या बाबतीत आणि मला हात-पाय नसल्यावर त्यांची पहिली प्रतिक्रिया काय होती याविषयी विचारलं, तोपर्यंत मला या कशाचीही कल्पना नव्हती. एकदा शाळेत माझा दिवस वाईट गेला होता आणि त्याविषयी मी माझ्या आईला सांगितलं तेव्हा माझ्या दु:खात सहभागी होऊन तीही माझ्याबरोबर रडू लागली. मी माझ्या आईला सांगितलं की, हात-पाय नसल्याच्या स्थितीचा मला वैताग आलाय, हे मला असह्य होतंय. तिनं माझे डोळे पुसले व ती मला म्हणाली की, तिच्या आणि माझ्या वडिलांच्या आता लक्षात यायला लागलंय की, माझ्याबाबतीत परमेश्वराची काहीतरी योजना होती आणि एके दिवशी तो ती उघड करेलच. माझे प्रश्न सतत चालू असायचे, कधी तिला, कधी त्यांना, तर कधी दोघांनाही. उत्तरांच्या शोधासाठीचा काही भाग हा माझ्या नैसर्गिक कुतूहलाचं फलित होता, तर उर्वरित हा माझ्या वर्गमित्रांनी माझ्यावर केलेल्या प्रश्नांच्या सरबत्तीचा प्रतिसाद.

सुरुवातीला, आई-वडील मला काय उत्तरं देतील, याबाबतीत मी धास्तावलेला असे. यातली काही उत्तरं ही त्यांच्यासाठीही अवघड असल्यामुळे मला त्यांना अडचणीत

टाकायचं नव्हतं. सुरुवातीच्या आमच्या चर्चांमध्ये आई-वडिलांचा प्रतिसाद सावध, काळजीपूर्वक असायचा. पण माझं वय जसजसं वाढत गेलं आणि मी त्यांना आणखी खोलात लोटू लागलो तसतसं ते त्यांच्या भावना आणि त्यांची भीती अधिक उघड करू लागले, कारण तोपर्यंत त्यांच्या लक्षात आलं होतं की मी ते पचवू शकेन. एवढं असूनही आईनं जेव्हा मला सांगितलं की, जन्म झाल्यावर माझी परिस्थिती तिला कळल्यावर तिला मला जवळही घ्यायचं नव्हतं, तेव्हा ते पचवणं मात्र मला खूपच कठीण गेलं. तशीही माझ्या मनात असुरक्षिततेची भावना होतीच, पण आपल्या स्वत:च्या आईलाही आपल्याकडे बघवत नव्हतं, आपल्याला जवळ घेण्याची तिची इच्छा नव्हती, हे ऐकल्यावर मला काय वाटलं असेल याची तुम्हीच कल्पना करा. मी खूप दुखावलो गेलो, मला एकाकी वाटू लागलं; पण पुढल्याच क्षणी त्यांनी त्या क्षणापासून आजपर्यंत माझ्याकरिता जे-जे काही केलं ते सगळं मला आठवलं. माझ्यावरचं त्यांचं प्रेम त्यांनी असंख्य वेळा सिद्ध करून दाखवलं होतं. आमच्या चर्चा व्हायला लागल्या त्यादरम्यान मी स्वत:ला तिच्या जागी पाहू शकत होतो. तिला वाटत राहिलेल्या शंकेव्यतिरिक्त अन्य कोणताही संकेत तिला तिच्या बाळंतपणात मिळाला नव्हता. तिला धक्का बसला होता, ती घाबरलेली होती. मी पालक असतो तर माझी प्रतिक्रिया काय असती? मला नाही वाटत की, ती परिस्थिती मी त्यांच्याएवढी चांगल्या तऱ्हेनं हाताळली असती आणि हे मी त्यांना सांगितलंही. त्यानंतर आम्ही तिघं याबाबतीत आणखी खोलात जायला लागलो.

मला समाधान वाटतं की मी सुरक्षित होईपर्यंत आम्ही थांबलो, त्यांचं माझ्यावर जिवापाड प्रेम असल्याची माझी खातरी पटेपर्यंत. आमच्या मनातल्या भावना आणि भीती अजूनही आम्ही एकमेकांपुढे त्याच मोकळ्या तऱ्हेनं व्यक्त करतो. माझ्या आई-वडिलांनी मला हे पटवून देण्यात मदत केली की, 'त्यांच्या श्रद्धेमुळेच त्यांना समजलं की परमेश्वराचा हेतू पुरा करण्यासाठीच मला हे दैवी देणं लाभलं होतं.' मी पक्का निश्चयी, आनंदी, उत्साही असा मुलगा होतो. माझी शिक्षक मंडळी, इतर मुलांचे पालक आणि अपरिचित व्यक्तीही बरेचदा माझ्या आई-वडिलांना सांगायचे की, माझा दृष्टिकोन त्यांना प्रेरणा देऊन जायचा. माझ्या बाजूनं बोलायचं झालं तर माझी आव्हानं जेवढी मोठी होती, त्यापेक्षा अशी अनेक माणसं होती ज्यांची आव्हानं माझ्याहूनही मोठी होती.

आज जगभरच्या माझ्या प्रवासामध्ये माझ्या अनुभवास येतं की, माझ्याहूनही कष्टप्रद जीवन जगणारी असंख्य माणसं आहेत. आणि मग मी विचार करतो की, माझ्याजवळ जे आहे त्यात मी धन्य आहे आणि जे काही नाही त्यावर विचार करणं व्यर्थ आहे. अपंग असणारी अनाथ मुलं मी पाहिली आहेत. बळजबरीनं वेश्याव्यवसायात लोटलेल्या तरुण मुली पाहिल्या आहेत. कर्जाची परतफेड करता न आल्यामुळे तुरुंग पाहावा लागणारी माणसं मी पाहिली आहेत.

‘भोग’ सार्वत्रिक असतात आणि अनेकदा अविश्वसनीय क्रूर, पण तरीही वाइटात वाईट. झोपडपट्ट्यांमधून तसेच महाभयंकर दु:खद घटनांनंतर लोक तगून राहिलेलेच नव्हे, तर प्रगतिपथावर गेलेले पाहून माझं मन सुखावतं. इजिप्तमधल्या कैरोच्या वेशीवर, ‘गार्बेज सिटी’ नावानं ओळखल्या जाणाऱ्या बकाल झोपडपट्टीत आनंदाची अपेक्षा माझ्याप्रमाणेच अन्य कोणीही करणार नाही. ही वस्ती डोंगरकड्याच्या आडोशाला विसावलेली आहे. दुर्दैवी पण चपखल बसणारं ‘वस्ती’ नाव असं का, तर वस्तीची पन्नास हजारांची लोकसंख्या कैरोच्या कचऱ्यावर पोसली जाते. दररोज ही माणसं एकशेऐंशी लाख वस्ती असलेल्या कैरोनं टाकून दिलेला कचरा गोळा करतात आणि त्यातून जे हाती लागेल ते विकून किंवा त्याचा कशान्कशा तऱ्हेनं वापर करून त्यावर गुजराण करतात.

वास्तविक पाहता भंगाराचे ढीग, झोपड्या, कचऱ्याचे ढीग यांनी सजलेल्या गल्लीबोळांमध्ये तुम्हाला केवळ दु:ख आणि नैराश्याच्या दर्शनाची अपेक्षा असेल, पण २००९मध्ये मी जेव्हा त्या वस्तीला भेट दिली तेव्हा मला तिथे बिलकूल उलटं चित्र दिसलं. तिथली माणसं अर्थातच कष्टप्रद जीवन जगतात यात काही शंका नाही, पण मी ज्यांना भेटलो ती माणसं प्रेमळ, आनंदी आणि श्रद्धाळू होती. इजिप्तची नव्वद टक्के लोकसंख्या मुस्लीम आहे. मात्र ‘गार्बेज सिटी’ ख्रिश्चनबहुल आहे. तिथली जवळ-जवळ अठ्ठ्याण्णव टक्के माणसं ‘कॉप्टिक ख्रिश्चन’ आहेत.

जगातल्या सर्व कोपऱ्यांमधल्या बकालातल्या बकाल झोपडपट्ट्या मी पाहिल्या आहेत. ही त्यापैकीच एक होती, पण ही मन सुखावणारीही होती. तिथल्या एका छोट्याशा चर्चमध्ये आम्ही सुमारे दीडशे माणसं ठासून भरलेलो होतो. मी बोलायला सुरुवात केल्याबरोबर, समोरच्या श्रोतृवृंदाचा आनंद मला जाणवू लागला. सर्वजण प्रसन्न मुद्रेनं माझ्याकडे पाहत होते. जीवनाचा असा अनुभव दुर्मीळच असतो. येशूनं माझं जीवन कसं बदलून टाकलं हे मी त्यांना सांगत असतानाच, त्यांच्या श्रद्धेनं त्यांना त्यांच्या परिस्थितीशी तोंड देण्यायोग्य बनवल्याबद्दल मी त्याचे आभार मानले.

परमेश्वराच्या शक्तीनं गावातल्या अनेकांचे जीवन कसे पालटले, यावर मी तिथल्या चर्चच्या प्रमुखाशी बोललो. या जगावर त्यांची श्रद्धा नव्हती, पण अनंतावर त्यांची आशा होती. दरम्यानच्या कालावधीत ते चमत्कारांवर विश्वास ठेवतील आणि परमेश्वर जसा आहे आणि त्यानं जे काही केलंय त्याबद्दल ते त्याचे ऋणी राहतील. तिथून निरोप घेण्यापूर्वी आम्ही काही कुटुंबांना तांदूळ, चहा आणि काही आठवडे पुरेल एवढे जिन्नस खरेदी करण्याइतपत रोख रक्कम दिली. तिथे आम्ही क्रीडासाहित्याचंही वाटप केलं. त्यांनी लगेच आम्हाला त्यांच्याबरोबर खेळण्यासाठी बोलावलं. सभोवती इतका गलिच्छपणा असतानाही आम्ही सगळे एकत्र खेळलो, नाचलो, हसलो, मजा केली. तिथली निरागस मुलं आणि त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य मी कधीच विसरणार नाही. या घटनेनं पुन्हा एकदा सिद्ध केलं

की, जर का आपण परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा आणि विश्वास ठेवला तर आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये आनंद मिळवू शकतो.

एवढी दरिद्री मुलं हसूच कशी शकतात? कैदी आनंदात गाऊच कसे शकतात? काही घटना या त्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात आणि त्या त्यांच्या आकलनाच्या बाहेरच्याही असतात हे स्वीकारून आपल्या आवाक्यात आणि आकलनात नसलेल्या गोष्टींवर आपली ऊर्जा केंद्रित करून ते परिस्थितीवर आरूढ होतात. माझ्या आई-वडिलांनीही अगदी तेच केलं. 'परमेश्वरावर श्रद्धा असणाऱ्यांच्या बाबतीत आणि परमेश्वरानं काही हेतूनं ज्यांना बोलवलेलं असतं त्यांच्या बाबतीत सारं चांगलंच घडतं.' या परमेश्वरी वचनावर श्रद्धा ठेवून पुढे जात राहण्याचं त्यांनी ठरवलं.

श्रद्धाळू कुटुंब

सध्या सर्बिया या नावानं ओळखल्या जाणाऱ्या पूर्वीच्या युगोस्लाव्हिया या देशातल्या कट्टर ख्रिश्चन कुटुंबामध्ये माझ्या आई-वडिलांचा जन्म झाला. कम्युनिस्टांच्या अत्याचारांच्या भीतीमुळे दोघांची कुटुंबं स्वतंत्रपणे ऑस्ट्रेलियात स्थलांतरित झाली. त्यांचे आई-वडील अॅपोस्टोलिक ख्रिश्चन होते आणि अहिंसा हा त्यांच्या श्रद्धेचा भाग होता. कम्युनिस्ट त्यांच्याशी भेदभाव करू लागले आणि त्यांच्या श्रद्धेच्या कारणास्तव त्यांना शासन करू लागले. त्यांना गुप्तपणे प्रार्थना कराव्या लागत. कम्युनिस्ट पार्टीचं सदस्यत्व त्यांनी नाकारल्यामुळे त्यांचं आर्थिक नुकसान होत होतं, कारण जीवनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांवर पार्टीचं अधिपत्य होतं. केवळ या कारणास्तव माझ्या वडिलांना त्यांच्या तरुणपणी अनेक वेळा उपाशी राहावं लागलं.

दुसऱ्या महायुद्धानंतर ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि कॅनडा येथे स्थलांतरित झालेल्या हजारो सर्बियन ख्रिश्चनांबरोबर माझ्या आई-वडिलांचे आई-वडीलही स्थलांतरित झाले. ते स्थलांतरित झाले ऑस्ट्रेलियामध्ये, जिथे ते आणि त्यांची मुलं त्यांचा धर्म पाळायला मुक्त होते. त्याच सुमारास त्यांचे अन्य नातेवाईक अमेरिकेत आणि कॅनडात स्थलांतरित झाले, त्यामुळे त्या देशांमध्येही माझे पुष्कळ नातेवाईक आहेत.

माझे आई-वडील मेलर्बनच्या चर्चमध्ये एकमेकांना भेटले. माझी आई डुश्का, व्हिक्टोरिया राज्यातल्या 'टॉयल चिल्ड्रन्स हॉस्पिटल'मध्ये नर्सिंगच्या दुसऱ्या वर्षाला होती; तर माझे वडील बोरिस, अॅडमिनिस्ट्रेशन आणि अकाउंटिंगची कामं करायचे आणि कालांतराने या कामाच्या जोडीने ते चर्चमधले मंत्री, म्हणजेच 'ले पॅस्टर' झाले. मी सुमारे सात वर्षांचा असताना माझे आई-वडील अमेरिकेत स्थलांतरित होण्याचा विचार करू लागले, माझ्या व्यंगांवर तिथं अधिक उपचार आणि साधनं उपलब्ध होऊ शकतील या आशेनं.

माझे काका बॅटा व्होयचिच यांचा लॉस एंजेलिसपासून केवळ पस्तीस मैलांवर अॅगुरा हिल्समध्ये बांधकामाचा व्यवसाय होता. माझे काका बाबांना नेहमी सांगायचे की, त्यांनी कामाचा व्हिसा मिळवला तर ते नक्कीच त्यांना काम मिळवून देतील. लॉस एंजेलिससभोवती मोठ्या प्रमाणात सर्बियन ख्रिश्चन समाज तसेच अनेक चर्चेस होती हेही माझ्या आई-वडिलांना एक प्रलोभन होतं. माझ्या वडिलांना कळलं की कामाचा व्हिसा मिळवणं हे एक दिव्य होतं. तरीही त्यांनी अर्ज भरण्याचं ठरवलं, पण दरम्यान माझं कुटुंब हजार मैल उत्तरेकडे ब्रिस्बेन, क्वीन्सलॅन्ड इथं स्थलांतरित झालं कारण तिथलं हवामान माझ्यासाठी पोषक होतं. कारण मला माझ्या व्यंगाबरोबर अनेक अॅलर्जीही जडल्या होत्या.

मी दहा वर्षांचा असेन तेव्हा प्राथमिक शाळेच्या चौथीत शिकत होतो आणि अखेरीस अमेरिकेला जाण्याच्या दृष्टीनं सर्व तयारी पुरी होत आली होती. माझ्या आई-वडिलांना वाटलं की मी आणि माझी धाकटी भावंडं– भाऊ आरोन आणि बहीण मिशेल– अमेरिकन शिक्षण पद्धतीत योग्य रीतीनं मिसळण्याजोग्या वयाचे झालो होतो. वडिलांना तीन वर्षांचा कामाचा व्हिसा हातात पडेपर्यंत, म्हणजेच साधारण अठरा महिने आमचं वास्तव्य क्वीन्सलॅन्डमध्ये होतं आणि अखेरीस १९९४मध्ये आम्ही अमेरिकेत दाखल झालो.

दुर्दैवानं कॅलिफोर्नियातलं वास्तव्य अनेक कारणांनी आमच्यासाठी प्रतिकूल ठरलं. आम्ही ऑस्ट्रेलिया सोडलं तेव्हा मी सहावीत शिकत होतो. अॅगुरा हिल्समधली माझी नवी शाळा खूपच भरलेली होती. त्यांनी मला वरच्या वर्गात घेतलं की जे माझ्यासाठी अवघड होतं; शिवाय तिथला अभ्यासक्रमही वेगळा होता. मी आत्तापर्यंत एक उत्तम विद्यार्थी राहिलो होतो, पण इथला बदल अंगवळणी पाडून घेणं मला जिकिरीचं जात होतं. शैक्षणिक कालावधीच्या फरकामुळे मी अभ्यासात मुळातच मागं पडत होतो. वर्गाबरोबर राहणं मला जड जात होतं. त्यातून दर तासाला विषयवार आम्हाला वर्ग बदलावा लागे, जे की ऑस्ट्रेलियात नव्हतं. हे सततचं हलणं तर माझ्यासाठी कठीणच होऊन बसलं होतं.

सुरुवातीला आम्ही माझ्या बॅटा काकाकडे राहायला गेलो. अॅगुरा हिल्समधलं त्यांचं घर मोठं होतं, पण तरी ते अडचणीचं ठरलं, कारण त्या घरात माझे काका, त्यांची पत्नी रिटा आणि त्यांची सहा अपत्यं राहत होती. लवकरात लवकर स्वत:च्या घरात राहायला जाण्याचा आमचा मानस होता, पण ऑस्ट्रेलियाच्या तुलनेत इथं घराच्या किमती फारच जास्त होत्या. माझे वडील काकांच्याच बांधकाम व्यवसायात काम करीत होते. माझ्या आईनं इथं नर्सिंगचं काम सुरू केलं नाही, कारण तिचं प्राधान्य होतं आम्हा मुलांना आमच्या नवीन शाळेत आणि नव्या वातावरणात रुळवणं. त्यामुळे तिनं कॅलिफोर्नियात नर्सिंग करण्याच्या परवान्यासाठी अर्जच केला नाही.

काकांबरोबर तीन महिने राहिल्यावर आई-वडिलांच्या लक्षात आलं की अमेरिकेत स्थलांतरित होणं मनासारखं झालं नव्हतं. मी शाळेत झगडत होतो आणि माझ्या आई-

वडिलांना माझा आरोग्य विमा उतरवणं अवघड जात होतं. तसंही कॅलिफोर्नियाच्या महागड्या जीवनमानाला तोंड देणं त्यांना अशक्य होऊन बसलं होतं. घोर लावणारी अजून एक गोष्ट होती. ती म्हणजे, 'आम्हाला अमेरिकेतलं कायमचं वास्तव्य नाकारलं जाण्याची शक्यता'. आमचा वकील आम्हाला सांगत होता की, माझ्या शारीरिक परिस्थितीमुळे आम्हाला नाकारलं जाण्याची शक्यता होती, कारण माझ्या तब्येतीवर होणारा खर्च पेलण्याच्या आई-वडिलांच्या क्षमतेविषयी शंका उपस्थित होऊ शकते.

या आणि अशा सर्व विवंचना पाहता अमेरिकेतल्या चार महिन्यांच्या वास्तव्यानंतर माझ्या आई-वडिलांनी ब्रिस्बेनला परतण्याचं ठरवलं. सुदैवानं, आम्ही पूर्वी राहत होतो त्याच्या जवळच त्यांना नवं घरही मिळालं. त्यामुळे आम्हा मुलांना आमची जुनी मित्रमंडळी आणि शाळा परत मिळाली. 'कॉलेज ऑफ टेक्निकल अॅन्ड फर्दर एज्युकेशन'मध्ये माझे वडील 'कॉम्प्युटिंग अॅन्ड मॅनेजमेंट' शिकवू लागले. आईनं तिचं जीवन माझ्या भावंडांसाठी, आणि खासकरून माझ्यासाठी समर्पित केलं.

आव्हानात्मक मूल

माझ्या जन्मानंतर लगेचच त्यांना वाटलेल्या भीतीबद्दल माझे आई-वडील गेल्या काही वर्षांत मोकळेपणाने बोलायला लागलेत. पण मी मोठा होत असताना, अर्थातच, मी त्यांच्या स्वप्नातल्या अपत्यासारखा नसल्याचा विचार ते करीत नव्हते. माझ्या जन्मानंतरच्या काही महिन्यांमध्ये माझ्या आईला एकच धास्ती लागून राहिलेली होती की, ती माझं योग्य प्रकारे संगोपन करू शकणार नाही. दुसऱ्या बाजूला माझ्या वडिलांना माझं भविष्य अंधकारमय दिसत होतं आणि माझं जीवन कसं असेल या विवंचनेत ते असायचे. मी जर असाहाय्य आणि जीवन अनुभवण्यास असमर्थ असेन तर मी 'परमेश्वराला प्रिय' झालेलाच बरा असं त्यांना वाटायचं. अगदी मला दत्तक देऊन टाकण्यापर्यंतच्या पर्यायांच्या विचारात ते होते. माझ्या आईच्याही आणि वडिलांच्याही आई-वडिलांनी माझं संगोपन करण्याचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला होता. अर्थातच, माझ्या आई-वडिलांना तो पर्याय मान्य नव्हता. शेवटी त्यांनी ठरवलं की, 'मी' त्यांची जबाबदारी होतो त्यामुळे त्यांच्या कुवतीप्रमाणे त्यांना जितक्या चांगल्या प्रकारे माझे संगोपन करता येईल तितक्या चांगल्या प्रकारे ते करतील.

सुरुवातीला त्यांनी शोक केला, पण मग मात्र त्यांच्या शारीरिक व्यंग असलेल्या मुलाला त्यांना जेवढे शक्य असेल तेवढे 'सामान्य' म्हणून वाढवण्याचं त्यांनी ठरवलं. माझे आई-वडील अतिशय श्रद्धाळू आहेत त्यामुळे ते असा विचार करू लागले की, त्यांच्या पदरी असं मूल देण्यामागं नक्कीच परमेश्वराचा काहीतरी उद्देश असावा.

काही दुखणी ही चलनवलनानं बरी होतात. जीवनातल्या चढ-उतारांबाबतही हाच नियम लागू होतो. कधी तुम्ही तुमची नोकरी गमावता, तर कधी नात्यांमध्ये दरी निर्माण होते. कधी तुम्ही कर्जाच्या ओझ्याखाली दबले जाता. जुनी दुखणी कुरवाळता यावीत यासाठी तुम्ही

तुमच्या जीवनाला अर्धविराम देऊ नका. त्याऐवजी पुढे सरकण्याच्या मार्गाचा शोध घ्या. कदाचित तुमच्यासाठी अधिक चांगली, सोईस्कर आणि अधिक मोबदल्याची नोकरी पुढे वाढून ठेवलेली असू शकते. तुमच्या नात्याला कदाचित परीक्षा देण्याची गरज भासली असावी किंवा कदाचित तुमच्यासाठी अधिक योग्य जोडीदार तुमची वाट पाहत उभा असावा. तुमची आर्थिक कुचंबणा कदाचित तुम्हाला अधिक उत्पन्नाच्या स्रोतांचे मार्ग दाखवेल.

तुमच्याबाबतीत जे घडेल ते नेहमीच तुमच्या काबूत असेलसं नाही. जीवनातल्या काही वाईट घटना हा तुमच्या दोषाचा परिणाम नसतो किंवा त्या थांबवणं हे तुमच्या हातातही नसतं. अशा वेळी तुमच्यापुढे दोनच पर्याय उपलब्ध असत; एक तर सपशेल हात टेकणं किंवा अधिक चांगल्या जीवनासाठी प्रयत्न करणं. माझा सल्ला हा राहील की, जे काही घडतं त्यामागं काही कारण असतं आणि अंतिमत: त्याचं फलित चांगलंच असतं.

लहान असताना स्वाभाविकपणे मी गृहीत धरलं होतं की, जगातल्या इतर कोणत्याही मुलाप्रमाणं मीही सर्वांना आवडण्याजोगा असा मुलगा होतो. त्या वयात माझं ते अतिसुखी असं अज्ञान माझ्यासाठी वरदान होतं. मला कल्पनाही नव्हती की मी वेगळा होतो आणि माझ्यापुढे अनेक आव्हानं उभी ठाकलेली होती. पण असं बघा, मला नाही वाटत की आपल्याला झेपणार नाही असं काही आपल्याला कधी मिळतं. मी खातरीनं तुम्हाला सांगू शकतो की, तुम्हाला लाभलेल्या प्रत्येक अक्षमतेच्याबरोबर तुम्हाला अशी सक्षमता लाभते की जी तुमची कमतरता भरून काढण्यास पुरेशी असते.

परमेश्वरानं माझ्या झोळीत दुर्दम्य मनोनिग्रहाचं अस्त्र टाकलंय, त्याबरोबर आणखीही काही क्षमतांचं दान दिलंय. मी अल्पावधीतच सिद्ध केलं की हात-पाय नसूनही मी शरीरानं सशक्त आणि सुसूत्रबद्ध होतो. मी धडधाकट असलो तरी छोटं बाळ होतो, खोडकर, मस्ती करणारं! कपाळानं भिंतीचा आधार घेऊन वर-वर सरकत उभ्या स्थितीत राहणं माझं मीच शिकलो. त्याहून अधिक सुखकर पद्धतीनं ती स्थिती लाभावी यासाठी माझ्या आई-वडिलांनी पुष्कळ प्रयत्न केले, पण माझ्या मार्गानंच जाण्याचा माझा नेहमी आग्रह असे. जमिनीवर उश्या ठेवून त्यांच्या आधारानं मी उभं राहावं यासाठी माझ्या आईनं प्रयत्न केला, पण भिंतीच्या आधारानं कपाळाचा वापर करून उभं राहणं मला सुलभ वाटायचं. एकंदरीतच कठीण असलं तरी माझ्या पद्धतीनं माझी कामं करण्याकडेच माझा कल असायचा.

त्या दिवसांमध्ये फक्त डोक्याचा वापर करणं, हा एकच पर्याय माझ्यापुढे होता. कदाचित माझ्या कुशाग्र बुद्धीचं रहस्य तेच असावं (विनोदाचा भाग), पण एक निश्चित की त्यामुळे माझी मान अधिक सबळ झाली आणि कपाळ कठीण. असं असलं तरी माझे आई-वडील सतत चिंताग्रस्तच होते. तसंही तंदुरुस्त बाळाचं संगोपन करणं हीसुद्धा काही खायची बाब नसते. नवे आई-वडील बरेचदा विनोदानं म्हणतात की, त्यांच्या पहिल्या अपत्यानं

स्वत:बरोबर 'मॅन्युअल' घेऊन यावं. डॉ. बेंजामिन मॅकलेन स्पॉक यांच्या १९४६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'दि कॉमनसेन्स बुक ऑफ बेबी अॅन्ड चाइल्ड केअर' या बालसंगोपनावरच्या अत्यंत लोकप्रिय पुस्तकातही माझ्यासाख्या बाळावर एकही प्रकरण नव्हतं. तरीही मी निग्रहानं धष्टपुष्ट आणि धाडसी बनत गेलो. 'टेरिबल टूज' या सार्थ नावानं ओळखल्या जाणाऱ्या वयाच्या दुसऱ्या वर्षी मी एवढा द्वाड होतो की, माझ्या आई-वडिलांना माझ्याऐवजी 'अष्टाळं' परवडलं असतं अशी स्थिती होती.

तो स्वत:च्या स्वत: खाईल-पिईल कसा? तो शाळेत कसा जाईल? आम्हाला काही झालं तर पुढे त्याची काळजी कोण घेईल? तो कधीतरी स्वतंत्रपणे जगू शकेल का?

आपली विचारशक्ती ही वरदानही ठरू शकते अगर शापही. माझ्या आई-वडिलांप्रमाणे तुम्हीही अनेकदा प्रक्षुब्ध होऊन भविष्याच्या बाबतीत काळजीत असाल, असुरक्षिततेच्या भावनेनं ग्रस्त असाल. परंतु बहुतेक वेळा तुम्हाला तुमच्या समस्येविषयी जेवढं भय वाटत असतं त्या तुलनेत समस्या काहीच नसते. दूरदृष्टी ठेवून भविष्याविषयी नियोजन करण्यात काही गैर नाही, पण ध्यानात ठेवा की तुमच्या मोठ्या भीती अचानकपणे मोठ्या आश्चर्यात रूपांतरित होण्याचीही शक्यता असते. बरेचदा, जीवनात जे घडतं ते तुमच्या भल्यासाठीच!

माझ्या बालपणातली सगळ्यात अद्भुत बाब म्हणजे माझ्या धडालाच लागून असलेल्या माझ्या छोट्या डाव्या पावलावरचं माझं नियंत्रण. लोळायला, लाथ मारायला, ढुशी द्यायला किंवा संतुलन राखायला मी त्याचा सहजतेनं वापर करायचो. माझ्या आई-वडिलांना आणि डॉक्टर्सना वाटायचं की ते पाऊल माझ्यासाठी अधिक उपयुक्त ठरू शकेल. त्यामुळे त्यांनी त्या पावलाची बोटं सुटी करण्यासाठी ऑपरेशन करण्याचं ठरवलं; जेणेकरून त्या बोटांनी पेन धरणं, पानं उलटणं अगर तत्सम कामं मी करू शकेन.

तेव्हा आम्ही मेलबर्न, ऑस्ट्रेलिया इथं राहत होतो, जिथं अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध होत्या. प्रशिक्षित आरोग्य व्यवसायिकांसाठी देखील मी एक आव्हानच होतो. माझ्या पावलाच्या ऑपरेशनच्या वेळी आई डॉक्टर्सना सातत्यानं सांगत होती की, बरेचदा माझं अंग गरम असतं त्यामुळे त्याचं तापमान वाढू नये याबाबतही त्यांनी काळजी घ्यावी. तिला एका लहान मुलाची दुर्घटना माहीत होती, ज्याला हात-पाय नव्हते आणि ऑपरेशनच्या वेळी त्याचं अंग खूप तापलं ज्यामुळे त्याचा मेंदू कायमस्वरूपी दुखावला.

माझ्या असामान्य तापमानावरून घरात बोललंही जाई की, 'निकचं अंग थंड असेल तर बदकं तर गारठलेलीच असतील.' पण खरं तर ही विनोदाची बाब नाहीये. अजूनही मी जर जास्त व्यायाम केला, माझ्या मनावर ताण पडला, अगर उष्ण दिव्यांमध्ये मी फार काळ थांबलो तर माझ्या देहाचं तापमान धोक्याच्या पातळीकडे सरकायला लागतं. तापमानाच्या बाबतीत मला सदासदैव सतर्क राहावं लागतं.

"त्याच्या तापमानावर बारीक नजर ठेवा," तिनं शेवटचं एकदा डॉक्टर्सना सांगितलं. माझी आई नर्स असल्याचं ठाऊक असूनही त्यांनी तिचं म्हणणं फार मनावर घेतलं नाही.

माझ्या पावलाची बोटं सुटी करण्याचं ऑपरेशन यशस्वी झालं, पण माझ्या आईची सूचना तशीच दुर्लक्षित राहिली. घामानं निथळतच मी ऑपरेशन थिएटरबाहेर आलो आणि हे निदर्शनास आल्यावर मात्र त्यांनी लगेचच माझ्या अंगावर ओली बेडशीट्स आणि ब्लँकेट्स पांघरली, त्यांची तारांबळ उडाली. माझ्या मेंदूवर परिणाम होऊ नये म्हणून त्यांनी त्यावरून बर्फाच्या पिशव्या ठेवल्या.

माझी आई संतापली. अर्थातच, डॉक्टर्स तिच्या तावडीतून सुटले नाहीत.

असो, पण सुदैवानं काही विपरीत घडलं नाही आणि माझ्या सुट्या झालेल्या बोटांमुळे माझ्या जीवनाला एक नवी ऊर्जा लाभली. डॉक्टर्सच्या अपेक्षेप्रमाणं ती बोटं काम करेनात, पण मी जुळवून घेऊ लागलो. दोन्ही हात-पाय नसलेल्या मनुष्याला जर एक पाऊल आणि त्यालाच दोन बोटं लाभली तर तो मनुष्य काय करू शकतो हे केवळ विस्मयकारकच आहे. ते ऑपरेशन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यामुळे मला नवं स्वातंत्र्य लाभलं. त्यामुळे मला माझी व्हीलचेअर, तसंच कॉम्प्युटर आणि सेलफोन वापरण्याचं नवं बळ प्राप्त झालं.

***

तुमच्या डोक्यावर कसलं ओझं आहे हे मला ठाऊक नाही. तसंच तुमच्यासारख्या संकटातून मीही गेलोय असंही मला भासवायचं नाहीये, पण माझ्या जन्माच्या वेळी माझे आई-वडील कोणत्या दिव्यातून गेलेत ते पाहा. माझे अंधारमय भविष्य पाहून त्यांना काय वाटलं असेल याचा विचार करा.

या क्षणी कदाचित तुम्हाला तुमच्या बोगद्याच्या दुसऱ्या टोकाला लख्ख प्रकाश दिसत नसेल, तसंच एक दिवस मीही सुंदर जीवन जगेन याची माझ्या आई-वडिलांनाही कल्पना नव्हती. त्यांना कधीच असं वाटलं नव्हतं की त्यांचा मुलगा केवळ स्वावलंबी आणि त्याच्या कारकिर्दीत व्यग्रच नसेल, तर त्याच्या जीवनाला आनंददायी हेतूही असेल आणि त्यामुळे तो आनंदी असेल.

माझ्या आई-वडिलांना सर्वाधिक वाटलेल्या धास्ती कधी खऱ्याच ठरल्या नाहीत. मला वाढवणं बिलकूल सोपं नव्हतं, पण मला वाटतं की ते तुम्हाला ग्वाही देतील की सगळी आव्हानं होती तरी त्याबरोबर आम्ही खूप हास्यविनोद आणि आनंददायी क्षणही अनुभवले. एकंदरीत, सगळं गृहीत धरता मी त्यामानानं सर्वसामान्य बाल्य जगलो, ज्यात मी माझ्या धाकट्या भावंडांवर- आरोन आणि मिशेल यांच्यावर- दादागिरीही केली! जीवन आत्ता तुम्हाला लाथाडत असेल, तुमच्या परिस्थितीत कधी सुधारणा होईल का, हाही तुम्हाला प्रश्न पडत असेल. पण तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा की शस्त्रं ठेवण्याचं, हात टेकण्याचं तुम्ही नाकारलंत तर तुम्हाला जीवनात जे चांगलं लाभेल त्याची तुम्ही कल्पनाही करू शकणार

नाही. शर्यतीत राहण्यासाठी जे-जे लागेल ते-ते करीत राहा. तुमची परिस्थिती बदलण्याचं बळ तुमच्यातच आहे. तुम्ही तुमच्या स्वप्नांमागं जाणं सोडू नका, चालत राहा.

माझं जीवन ही एक साहसयात्रा आहे, जी लिहिली जात आहे– आणि तुमचंही तसंच आहे. पहिलं प्रकरण आत्ताच लिहायला घ्या! साहस, प्रेम आणि आनंद यांनी ते भरून टाका. गोष्ट लिहीत असतानाच ती जगा!

अर्थबोधाची शोधयात्रा

मला ही गोष्ट मान्य करावी लागेल की, माझं स्वत:चं आयुष्य कशा प्रकारे घडत जाईल यावर माझं नियंत्रण असेल यावर माझा विश्वास बसायला फार वेळ लागला. जगात मी काय फरक पाडू शकेन किंवा मी कोणता मार्ग निवडावा हे समजून घेण्यासाठी मी झटत होतो. मोठा होत असताना माझ्या मनाची खातरी पटली होती की, माझ्या अपूर्ण देहात काहीच चांगलं नाहीये. अर्थात, जेवण झाल्यानंतर हात धुण्यासाठी मला कधीच जेवणावरून उठावं लागलं नाही, कारण माझ्याकडे धुण्यासाठी हातच नव्हते. पायाला ठेच लागण्याचं दु:खही मी कधी अनुभवलं नाही... पण अशा काही फायद्यांनी मला कधीच दिलासा दिला नाही.

माझ्या सख्ख्या अथवा चुलत भावंडांनी मला कधीच स्वत:ची कीव वाटू दिली नाही. त्यांनी कधीच माझे फाजील लाड अथवा माझी अतिकाळजी केली नाही. मी जसा आहे तसं त्यांनी मला स्वीकारलं. त्याचबरोबर ते मला चिडवत, माझी खिल्ली उडवत जेणेकरून माझ्या परिस्थितीबद्दल मला कटुता वाटण्याऐवजी मला त्यातच माझा आनंद गवसावा.

"तो व्हीलचेअरमधला मुलगा बघा! तो एलिअन आहे," माझ्याकडे बोट करून माझी भावंडं भर शॉपिंग मॉलमध्ये आरोळी ठोकायची. माझी कुचेष्टा करणारी पोरं ही खरं तर माझी सर्वांत प्रिय मित्रमंडळी होती याची कल्पना नसलेल्या लोकांच्या प्रतिक्रिया पाहून आम्ही पोट दुखेस्तोवर हसायचो.

माझं वय जसंजसं वाढतंय तशी मला अधिकाधिक जाणीव होतेय की असं निर्व्याज प्रेम मिळणं ही दैवी देणगीच आहे. तुम्हाला खूप एकाकी वाटत असेल तेव्हाही तुम्ही मनातला विश्वास ढळू देऊ नका की तुमच्यावरही प्रेम केलं जातं आणि जाणीव ठेवा की परमेश्वरानं तुम्हाला प्रेमापोटीच निर्माण केलंय. म्हणजेच तुम्ही कधीच एकटे नसता. त्याचं तुमच्यावरचं प्रेम निरपेक्ष असतं. त्याचं तुमच्यावर प्रेम असतं कारण... असं कधीच नसतं, त्याचं तुमच्यावरचं प्रेम कायमस्वरूपी असतं. एकाकीपण आणि नैराश्य यांनी तुम्ही ग्रस्त असाल तेव्हा तुम्ही याचं स्मरण ठेवा. लक्षात ठेवा, त्या केवळ भावना असतात. त्या खऱ्या नसतात, पण परमेश्वराचं प्रेम एवढं खरं असतं की ते सिद्ध करण्यासाठी त्यानं तुमची निर्मिती केलीये.

त्याचं प्रेम तुमच्या हृदयात साठवून ठेवणं खूप महत्त्वाचं आहे, कारण अशा खूप वेळा येतात जेव्हा तुम्ही अगतिक होता. माझा मोठा परिवार माझं रक्षण करण्यासाठी कायम

माझ्या पाठीमागं उभा असणार नाहीये. एकदा मी शाळेत गेलो की इतरांपेक्षा मी खूप वेगळा असल्याची वस्तुस्थिती कशानंही लपवण्यासारखी नसते. माझ्या वडिलांनी मला विश्वास दिला होता की परमेश्वर कधीच चुकत नाही, पण मला बरेचदा वाटून गेलंय की मी त्याच्या नियमांना अपवाद होतो.

"तू मला फक्त एकच हात का दिला नाहीस?" मी त्याला विचारायचो. "एका हातानं मी काय-काय करू शकेन, विचार कर."

मी खातरीनं सांगतो की, प्रार्थना करताना किंवा जीवनात आमूलाग्र बदलाची अपेक्षा करताना तुम्ही असंच काही अनुभवलं असेल. तुमचा चमत्कार किंवा तुमच्या अपेक्षांप्रमाणं फलित तुम्हाला या क्षणी लाभलं नाही तरी धास्तावून जाऊ नका. लक्षात ठेवा, जो स्वत:ची मदत करतो त्याचीच परमेश्वर मदत करतो. तुमच्या सभोवतालच्या जगातली तुमची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी तसंच तुमच्यातल्या गुणांच्या सर्वोच्च हेतूकरिता सतत झटत राहणं हे शेवटी केवळ तुमच्यावरच अवलंबून आहे.

फार मोठा काळ मी समजून चाललो होतो की माझा देह अधिक 'सामान्य' असता तर माझं जीवन खूप सुखकर असतं. मला याची कल्पना नव्हती की, मी 'सामान्य' असण्याची जरूरच नव्हती- मी केवळ 'मी' असणं आवश्यक होतं, माझ्या पित्याचं अपत्य, परमेश्वराची योजना वाहणारं. प्रथम मी बिलकूल मानायला तयार नव्हतो की खरी कमतरता ही 'देहात' नव्हे, तर 'माझ्यातच' होती. ती म्हणजे मीच माझ्यावर घालून घेतलेल्या सीमांची आणि माझ्या जीवनातल्या शक्यतांच्या मर्यादित दृष्टीची. तुम्ही जिथं असायला हवे आहात तिथं नसाल अगर तुम्हाला अपेक्षित ते सर्व तुम्ही मिळवलं नसेल, तर बहुतेक वेळा त्याची कारणं तुमच्या भोवती नव्हे, तर ती तुमच्यातच असतात. प्रथम जबाबदारी स्वीकारा आणि मग कृती करा. अर्थात, त्याच्याही अगोदर तुम्ही स्वत:वर आणि स्वत:च्या मूल्यांवर विश्वास ठेवा. तुमच्या लपण्याचं ठिकाण इतरांनी आधी शोधून काढावं ही अपेक्षा उचित नाही. त्या चमत्कारासाठी थांबणं किंवा 'योग्य संधीची' वाट पाहत राहणं योग्य नाही. उलट तुम्ही स्वत:ला पळी समजा आणि जगाला तुमच्या खिरीचं पात्र व तुम्ही ढवळत राहा.

लहानपणी अनेकदा मी माझ्या हाता-पायांसाठी परमेश्वरापुढे हात (?) पसरायचो. रडता रडताच मला झोप लागायची आणि स्वप्नात असं वाटायचं की मी जागा होईन तेव्हा मला हात-पाय फुटलेले असतील. अर्थातच, तसं कधी घडलं नाही, कारण मी स्वत:ला स्वीकारलंच नव्हतं. दुसऱ्या दिवशी मी शाळेत गेल्यावर मला उमगायचं की इतरही सहजासहजी माझा स्वीकार करत नव्हते.

अन्य बहुतेक मुलांप्रमाणेच, पौगंडावस्थेत प्रवेश केल्यानंतर माझी मन:स्थितीही नाजूक होती, मीही इतर मुलांप्रमाणेच चाचपडत होतो की मी कुठं सामावून जाईन, मी कोण आहे, माझ्या भविष्यात काय लिहून ठेवलंय. बहुतेक वेळा मला दुखावणारी मुलंही क्रूर नव्हती, तर केवळ फटकळ होती.

"तुला हात-पाय का नाहीयेत?" ते विचारायचे.

माझ्या वर्गमित्रांप्रमाणे मलाही मिसळून जायचं होतं. मी आनंदात असायचो तेव्हा माझ्या हुशारीनं, स्वत:वर विनोद करण्याच्या माझ्या स्वेच्छेनं किंवा मैदानावर लोळण्यानं मी त्यांना जिंकून घ्यायचो. पण मी दु:खात असायचो तेव्हा टर उडवून घेणं किंवा दुखावला जाणं टाळण्यासाठी मी झुडपांमागं किंवा रिकाम्या वर्गात लपून राहायचो. या समस्येचा एक भाग हा होता की, मी माझ्या समवयस्क मुलांपेक्षा माझ्यापेक्षा ज्येष्ठ भावंडांच्या किंवा प्रौढांच्या संगतीतच जास्त वेळ घालवायचो. माझा दृष्टिकोन अधिक प्रगल्भ असायचा आणि माझे गंभीर विचार कधी-कधी मला अंधाऱ्या जागांमध्ये लोटायचे.

माझ्यावर प्रेम करणारी मुलगी मला कधीच मिळणार नाही. प्रेयसीला मिठी मारण्यासाठी मला हातही नाहीयेत किंवा मला जर का मुलं झाली तर त्यांनाही मी कधी कवटाळू शकणार नाही. मला कधी मिळालीच तर कशा प्रकारची नोकरी मिळेल? मला कोण कामावर ठेवेल? बहुतेक सर्व नोकऱ्यांमध्ये, मी करायला हवं असलेल्या कामांसाठी मला मदत करायला त्यांना दुसऱ्या कुणालातरी कामावर ठेवावं लागेल. एका कामासाठी दोन पगार कोण खर्च करेल?

माझी आव्हानं वास्तविक शारीरिक होती, पण त्यांचे भावनिक दुष्परिणामही होतेच. लहान वयातील बराचसा भयानक काळ मी तणावाखाली असायचो. परंतु जेव्हा मी किशोरवयात पदार्पण केलं तेव्हा कायमस्वरूपी सुखद धक्क्यानं आणि कृतज्ञ भावनेनं मी स्वत:चा आणि त्यानंतर इतरांनी माझा स्वीकार केला. प्रत्येकाच्या जीवनात एक अशी वेळ येतेच ज्या वेळी आपल्याला असं वाटतं की, आपण एकटे पडले आहोत, कोणालाच आपली गरज नाही किंवा कोणालाच आपण आवडत नाही. आपणा सर्वांनाच आपापल्या असुरक्षिततेच्या भावना असतात. बऱ्याच मुलांच्या मनात भीती असते की, कदाचित मोठ्या असलेल्या नाकावरून किंवा कुरळ्या केसांवरून त्यांची थट्टा केली जाईल. तशीच मोठ्या माणसांना भीती असते की, कदाचित ते संसार व्यवस्थित चालवू शकतील की नाही? किंवा अपेक्षेप्रमाणे त्यांना सर्व सुखसोई मिळतील की नाही?

साशंकतेचे आणि भीतीचे क्षण तुम्ही सर्व जण अनुभवता, खरं तर आपण सगळेच अनुभवतो. अगतिक वाटणं अत्यंत स्वाभाविक आहे, किंबहुना आपल्या मानव असण्याचा तो एक भाग आहे. परंतु अशा भावना धोकादायक तेव्हाच ठरतात जेव्हा तुम्ही त्यांना तुमच्यावरून पलीकडं निघून जाऊ न देता त्यांना कवटाळून बसता.

इतरांबरोबर वाटून घेण्यासारखी वरदानं – कौशल्यं, ज्ञान, प्रेम – या क्षणी जरी उघड नसली तरी ती तुम्हाला लाभलेली असल्याचा विश्वास जर तुमच्या मनामध्ये असेल तरच तुम्ही स्वत:च्या स्वीकारार्हतेची यात्रा सुरू करू शकाल. आणि एकदा तुम्ही ती वाटचाल सुरू केलीत की इतरही तुमचा शोध घेतील आणि तुमच्या संगतीनं चालू लागतील.

संपर्क ठेवा, बोलत राहा

माझ्या वर्गमित्रांशी संबंध जोडण्याच्या प्रयत्नांतच मला माझ्या जीवनाच्या हेतूचा मार्ग सापडला. तुम्हाला जर कधी कोपऱ्यातलं एकाकीपणे डबा खाणारं एकटं पोर व्हावं लागलं असेल तर तुम्ही सहज कल्पना करू शकता की, व्हीलचेअरवरचं एकाकीपणे डबा खाणारं कोपऱ्यातलं एकटं पोर असणं हे त्याहूनही कठीण असणार. आमचं मेलबर्नहून ब्रिस्बेनला, मग अमेरिकेत आणि पुन्हा ब्रिस्बेनला हलणं याकरता मला काही जुळवाजुळव करावी लागली ज्यामुळे माझ्या आव्हानांमध्ये अजूनच भर पडली.

माझे नवे वर्गमित्र बरेचदा गृहीत धरायचे की मी शारीरिक, तसाच बौद्धिक अंगानंही अक्षम होतो. त्यामुळे जोपर्यंत मी स्वत: त्यांच्याशी बोलायला जात नाही तोपर्यंत ते माझ्याशी अंतर राखूनच असायचे! जसजसं मी त्यांच्या अधिकाधिक जवळ जायचो तसतसं ते मला अधिकाधिक स्वीकारायचे की मी त्यांच्यात येऊन पडलेला कोणी एलियन नव्हतो.

कधी-कधी तुमची कठीण ओझी वाहण्यासाठी परमेश्वर तुम्हाला हातभार लावतो. तुम्ही इच्छा बाळगू शकता. तुम्ही स्वप्नं पाहू शकता. तुम्ही आशा करू शकता. परंतु त्याचबरोबर त्या इच्छा, स्वप्नं आणि आशांसाठी तुम्ही कृती करणंही आवश्यक असतं. तुम्ही जिथं आहात तिथून तुम्हाला जिथं जायचं असतं तिथपर्यंतचं अंतर तुम्हालाच कापावं लागतं. आतून मी त्यांच्यासारखाच असल्याचं माझ्या शाळेतल्या लोकांना कळावं अशी माझी इच्छा होती, पण त्यासाठी मलाच पुढाकार घ्यावा लागला, प्रयत्न करावे लागले. अशा तऱ्हेनं माझ्या पुढाकार घेण्याचं उत्तम फलित मला मिळालं.

कालांतरानं, हाता-पायांसाठी बनलेल्या जगात माझ्यासारख्यानं जुळवून घेण्यावरच्या माझ्या वर्गमित्रांशी होणाऱ्या माझ्या चर्चांमधून मला विद्यार्थ्यांच्या गटांकडून, चर्चमधल्या युवकांच्या गटांकडून आणि अन्य संस्थांकडून या विषयावर बोलण्याकरिता निमंत्रणं येऊ लागली. जीवनाच्या केंद्रबिंदूशी एक विस्मयकारक सत्य आहे आणि ते शाळांमधून शिकवलं जात नाही याचं मला नवल वाटतं. ते अत्यावश्यक सत्य हे आहे : आपल्या प्रत्येकाला काही ना काही वरदान लाभलेलं असतं – एखादी विद्या, एखादं कौशल्य, एखादी कला, एखादे कसब जे आपल्याला आनंद देतं आणि गुंतवून ठेवतं, आणि बहुतेक वेळा आपल्या आनंदी जीवनाचा मार्ग त्यातूनच जात असतो.

अजूनही जर तुम्ही तुमच्या 'ठिकाणाच्या' किंवा तुम्हाला समाधानी करणाऱ्या गोष्टींच्या शोधात असाल तर मी तुम्हाला सुचवेन की, तुम्ही आत्मपरीक्षण करावं. कागद-पेन घ्या किंवा कॉम्प्युटरसमोर बसा आणि तुमच्या आवडीच्या कामांची यादी करा. काय करण्याकडे तुमचा कल असतो? काय करण्यासाठी तुम्ही तासन्तास खर्च करता, अशा कोणत्या गोष्टी आहेत की ज्या करताना तुम्हाला वेळेचं आणि ठिकाणाचं भान राहत नाही, आणि तरीही

तुम्ही ते पुन:पुन्हा करत राहता? इतर लोक तुमच्यात काय पाहतात? ते तुमच्या व्यवस्थापन कौशल्याचं कौतुक करतात की विश्लेषण कौशल्याचं? लोक तुमच्यात काय पाहतात याविषयी तुम्हाला खातरी वाटत नसेल तर तुम्ही तुमच्या मित्रांना, आप्तांना विचारा की तुम्ही कशात चांगले आहात असं त्यांना वाटतं.

तुमच्या जीवनाचा मार्ग शोधण्यासाठीच्या या काही युक्त्या आहेत, ज्या तुमच्यातच दडलेल्या आहेत. आपण सर्वजण या भूतलावर नग्नावस्थेत आणि पूर्ण विश्वासानं जन्म घेतो. आपल्याबरोबर आपण आपली वरदानं घेऊन येतो. तुमच्या जेव्हा असं लक्षात येईल की, तुम्ही जे करत आहात त्यात तुम्ही एवढे गुंतलेले आहात की ते तुम्ही दिवसभर, दररोज करत राहाल तेव्हा तुम्ही समजावं की तुम्ही योग्य मार्गावर आहात. तुम्ही जे करत आहात त्याकरता जर कोणी तुम्हाला पैसे देऊ करत असेल, तर कदाचित तोच तुमचा व्यवसाय ठरू शकेल.

सुरुवातीचे तरुणांबरोबरचे माझे अनौपचारिक संभाषण हे त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा एक मार्ग होता, मी त्यांच्यासारखाच एक असल्याचं त्यांना दाखवण्यासाठी. मी आत्मकेंद्रित होतो, माझं जग त्यांच्यासमोर उलगडून दाखवण्याच्या आणि त्यांच्याशी संबंध स्थापण्याच्या संधीबद्दल कृतज्ञ होतो. 'बोलणं' माझ्यासाठी काय करत होतं हे मला ठाऊक होतं, पण मी जे बोलत होतो त्याचा इतरांवरही परिणाम होऊ शकतो, याची जाणीव व्हायला मला थोडा वेळ लागला.

मार्ग शोधणं

एक दिवस जवळ-जवळ तीनशे विद्यार्थ्यांच्या एका मोठ्या समूहापुढे मी बोललो, कदाचित तो माझा तोपर्यंतचा सर्वांत मोठा श्रोतृवर्ग होता. मी माझ्या भावना आणि माझी श्रद्धा व्यक्त करत असताना एक विस्मयकारक घटना घडली. आत्ताही आणि त्या वेळीही मी बोलत असताना अनेक जण माझे कटू अनुभव ऐकून अश्रू ढाळायचे. परंतु खासकरून त्या संभाषणादरम्यान मात्र गर्दीतली एक मुलगी चक्क हुंदके देऊन रडायला लागली. काय घडलं होतं याची मला कल्पना नव्हती– मी बहुधा माझ्या बोलण्यातून तिच्या कटू स्मृती जाग्या केल्या असाव्यात. पण त्याच स्थितीत त्या मुलीनं हात उंचावून बोलण्याची परवानगी मागितली. हे पाहून मी चकितच झालो. आपले अश्रू, दु:ख याची पर्वा न करता तिनं धीटपणं विचारलं की, ती मला समोर येऊन आलिंगन देऊ शकेल का. व्वा! मला खूपच आनंद झाला.

मी तिला समोर बोलावलं. आपल्या जागेवरून उठून पुढे येताना तिनं तिचे डोळे पुसले आणि माझ्याजवळ येऊन सर्वांदेखत तिनं मला मिठी मारली. एव्हाना, माझ्यासह सर्वांचेच डोळे पाणावले होते. इतक्यात ती माझ्या कानात काही पुटपुटली आणि मी माझं भान हरवून गेलो.

“मी जशी आहे तशी सुंदर असल्याचं मला कुणीही अजूनपर्यंत सांगितलं नव्हतं. आत्तापर्यंत कोणीही मला हेदेखील सांगितलं नव्हतं की त्यांचं माझ्यावर प्रेम आहे,” ती पुटपुटली, “तुम्ही माझं जीवन बदललंत आणि तुम्हीही सुंदर आहात.”

त्या क्षणापर्यंत मीही सतत स्वत:च्या मूल्यांबाबतीत साशंक होतो. इतरांशी संपर्क साधण्याच्या नादात ‘बोलणारी’ एक व्यक्ती असंच मी स्वत:ला समजत होतो. प्रथम ती मला ‘सुंदर’ म्हणाली (जे दुखावणारं नव्हतं), पण त्याहून खूप मोठं होतं ते म्हणजे तिच्या कृतीमुळे प्रथमच मी विचार केला की माझ्या बोलण्यानं इतरांचा लाभ होऊ शकतो. त्या मुलीनं माझा दृष्टिकोन बदलला. माझ्या मनात आलं, मी देऊ शकेन असं खरोखरच काहीतरी माझ्यापाशी होतं.

अशा तऱ्हेच्या अनुभवांमधून मला जाणीव झाली की माझ्या ‘वेगळा’ असण्यानं जगाला काही विशेष असं देणं मला शक्य होईल. मला कळून आलं की माझं बोलणं ऐकायला लोक उत्सुक असतात, कारण माझ्याकडे केवळ पाहूनच ते समजू शकतात की मी अनेक आव्हानांना तोंड देऊन त्यांच्यावर विजय मिळवला होता. माझ्याकडे विश्वासार्हतेची कमतरता नव्हती. साहजिकच लोकांना वाटायचं की माझ्याकडे काहीतरी असं असेल जे मी त्यांना सांगितल्यानं त्यांच्या समस्या दूर व्हायला मदत होईल. असंख्य शाळा, चर्चेस, तुरुंग, अनाथालयं, हॉस्पिटल्स, स्टेडियम्स यांमधून लोकांशी संपर्क साधण्याकरता परमेश्वरानं माझा वापर केला. त्याहून महत्त्वाचं म्हणजे मी हजारो लोकांना प्रत्यक्ष आलिंगनं दिली आहेत, ज्यामुळे ते लोक केवढे अनमोल आहेत हे मी त्यांना सांगू शकलो. तसंच, परमेश्वराच्या मनात त्यांच्यासाठी काही योजना असल्याचा दिलासा देण्यातही मला आनंद वाटतो. परमेश्वरानं माझा असामान्य देह घेतला आणि हृदयं फुलवण्याच्या आणि मनं प्रेरित करण्याच्या क्षमतेनं मला गुंतवलं. बायबलमधल्या या त्याच्या उक्तीप्रमाणं, ‘कारण तुझ्यासाठीच्या योजना मला ठाऊक आहेत... तुला समृद्ध करणाऱ्या योजना, तुला दुखावणाऱ्या नव्हेत, तुला आशा आणि भविष्य देणाऱ्या योजना.’

स्वत: घडवणं

जीवन क्रूर वाटू शकतं, यात काही शंकाच नाही. कधी-कधी संकटं हातात हात घालून तुमच्यापुढे उभी ठाकतात आणि तुम्हाला पुढचा मार्ग दिसेनासा होतो. तुम्हाला हे आवडणार नाही, पण आत्ताही, या क्षणी ते तुमच्याबाबतीत घडू शकणार नाही, याविषयी तुम्हाला खातरी देता येणार नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की आपण नश्वर पामर असल्यानं, तुम्हाला आणि मला मर्यादित दृष्टी लाभली आहे. पुढे काय वाढून ठेवलंय हे बहुधा आपल्याला दिसत नाही. एका दृष्टीनं हे वाईट आहे, पण तसंच ते चांगलंही आहे. मी तुम्हाला उत्तेजन देतो की पुढे जे वाढून ठेवलंय

ते कदाचित तुमच्या कल्पनेपलीकडलं उत्तम काहीतरी असू शकतं. परंतु त्याच्यावर स्वार होणं, उभं राहणं, आणि स्वत:ला सिद्ध करणं हे केवळ तुमच्यावर अवलंबून आहे!

तुमचं जीवन चांगलं आहे आणि ते तुम्हाला अजून चांगलं करायचं असो किंवा ते एवढं निकामी आहे की तुम्हाला नुसतं गादीवर पडून राहायचं असो. वस्तुस्थिती ही आहे की या क्षणापासून काय घडणार आहे ते केवळ तुम्ही आणि तुमचा निर्माता यांच्यावर अवलंबून आहे. खरं आहे की सगळंच काही तुमच्या आवाक्यातलं नसतं. बरेचदा लोक कितीही चांगले का असेनात, पण तरीही त्यांच्या बाबतीत वाईट घडतं. तुम्हाला सुखकर जीवन लाभलं नसणं न्याय्य नसेल, पण तीच जर वस्तुस्थिती असेल तर ती तुम्ही स्वीकारायला हवी. तुम्ही धडपडाल. लोक तुमच्या बाबतीत साशंक होतील. एक 'वक्ता' म्हणून कारकीर्द घडवायची असं जेव्हा मी ठरवलं तेव्हा माझ्या आई-वडिलांनाही माझ्या निर्णयाविषयी शंका वाटली.

"तुझ्या स्वत:च्या परिस्थितीत, तुझी स्वत:ची अकाउंटिंग फर्म असणं हे योग्य आहे आणि त्यामुळे तुझं भविष्यही सुरक्षित होईल असं नाही का तुला वाटत?" वडिलांनी विचारलं.

होय, तसं पाहिलं तर बऱ्याचं दृष्टीनं माझी कारकीर्द अकाउंटिंगमध्येच असावी हे योग्य होतं, कारण आकड्यांच्या बाबतीत मी तरबेज आहे. पण लहान वयापासूनच माझी श्रद्धा आणि अधिक चांगल्या जीवनाविषयीची आशा लोकांपर्यंत पोहोचवणं ही माझी आवडती गोष्ट झालीय. तुम्हाला तुमचा खरा हेतू सापडला की त्याविषयीचं वेड आपोआपच निर्माण होतं. मग तुम्ही केवळ त्याच्या पाठपुराव्यासाठी जगता.

तुम्ही जर अजूनही तुमच्या जीवनाचा मार्ग शोधत असाल, तर त्याविषयी वाटणारी निराशा ठीकच आहे हे जाणून घ्या. ही शर्यत मोठ्या पल्ल्याची आहे. अधिक अर्थपूर्णतेसाठीची तुमची अतृप्ती हे तुम्ही फुलत असल्याचं, तुमच्या मर्यादा तुम्ही उल्लंघत असल्याचं आणि तुमचे गुण तुम्ही वृद्धिंगत करत असल्याचंच द्योतक आहे. तुम्ही कुठं उभे आहात याचा अधूनमधून अदमास घेणं, आणि तुमच्या कृती आणि प्राधान्यं तुमची हेतुपूर्तता करत आहेत का, याचा विचार करणं हे आवश्यकच आहे.

मार्ग प्रकाशित करणं

वयाच्या पंधराव्या वर्षी मी माझं जीवन परमेश्वराच्या साहाय्यानं सुधारलं, त्याच्याकडे क्षमायाचना करून आणि जीवनाला एक नवी दिशा मागून माझ्या हेतूचा मार्ग प्रकाशित करायला मी त्याला सांगितलं.

चार वर्षांनंतर माझा बाप्तिस्मा झाल्यावर मी इतरांशी माझ्या श्रद्धेबद्दल बोलू लागलो आणि मला जाणीव झाली की हेच माझं कार्यक्षेत्र होतं. वक्ता आणि समर्थक (शुभवार्ता उपदेशक) म्हणून माझ्या कारकिर्दीला जागतिक स्वरूप आलं. काही वर्षांपूर्वीच अगदी

अनपेक्षितपणे एक घटना घडली ज्यामुळे माझी श्रद्धा वाढली आणि पुन्हा एकदा माझी खातरी पटली की मी योग्य मार्गावर होतो. अशाच एका रविवारी कॅलिफोर्नियामधल्या एका चर्चमध्ये बोलायला जाण्यासाठी मी निघालो. बऱ्याच कालावधीनंतर जगभरात कुठंतरी बोलण्याऐवजी मी माझ्या घराजवळच बोलणार होतो. अॅनाहाईममधील नॉट अॅव्हेन्यू ख्रिश्चन चर्च माझ्या घराजवळच्याच गल्लीत होतं.

माझ्या व्हीलचेअरवरून मी चर्चमध्ये प्रवेश केला तेव्हा कॉयरचं पहिलं गीत सुरू होत होतं, म्हणजे प्रार्थना सुरू होण्याच्या बेतात होती. रांगेतल्या पहिल्या बाकावर मी बसलो आणि माझ्या होणाऱ्या भाषणाची मानसिकदृष्ट्या जुळवाजुळव करू लागलो. इथं मी पहिल्यांदाच बोलणार होतो त्यामुळे इथलं कोणी मला ओळखत असेल अशी माझी अपेक्षाच नव्हती, पण इतक्यात कोणीतरी "निक! निक!" अशी हाक मारत असलेलं ऐकून मी आश्चर्यचकित झालो.

मी तो आवाज ओळखला नाही आणि तो 'निक' मीच असेन असंसुद्धा मला वाटलं नाही. पण मी मागं वळून पाहिलं तर एक वयस्क व्यक्ती मलाच खुणावत होती.

"निक! इकडे पाहा," ती व्यक्ती पुन्हा ओरडली. आता मी त्या व्यक्तीकडे पाहतोय हे बघून त्या व्यक्तीनं शेजारच्या तरुण व्यक्तीकडे निर्देश केला ज्याच्या कडेवर एक मूल होतं. चर्चमध्ये एवढी गर्दी होती की ते मूल मला थोडसंच दिसत होतं; त्याचे केस, त्याचे तेजस्वी डोळे आणि तोंडाचं बोळकं.

या गर्दीमधून मला ते मूल नीट दिसावं म्हणून मग त्या तरुणानं ते अधिक उंचावलं. ते मूल मला पूर्ण दिसलं आणि ते पाहून मला धक्काच बसला, इतका जबरदस्त की मला पाय असते तर त्यातलं त्राणच गेलं असतं.

ते मूल माझ्यासारखं होतं. त्याला ना हात होते, ना पाय. एवढंच नव्हे, तर त्याच्या धडाला माझ्यासारखं तोकडं डावं पाऊल होतं. ते मूल दीड वर्षाचं होतं तरी 'अगदी माझ्यासारखं' होतं. मी त्या मुलाला पाहावं असं त्या दोन व्यक्तींना का वाटत होतं ते एव्हाना माझ्या लक्षात आलं. नंतर मला कळलं की तो मुलगा, ख्रिस आणि पॅटी यांचा मुलगा, डॅनिएल मार्टिनेझ होता.

वास्तविक मी भाषणाची तयारी करणार होतो, पण डॅनिएलला पाहून – मला स्वत:ला त्या मुलात पाहून – माझ्या भावना एवढ्या उचंबळून आल्या की मला सरळ विचार करताच येईना. प्रथम मला त्याच्याविषयी आणि त्याच्या कुटुंबाविषयी करुणा वाटली, पण मग माझ्यावर ठळक स्मृतींचा आणि कटू भावनांचा मारा होऊ लागला. कारण त्याच्या वयात मला काय वाटत होतं ते मला आठवू लागलं, आणि आत्ता तो काय अनुभवत असेल याची मला बोचरी जाणीव होऊ लागली.

त्याला काय वाटत असेल ते मला ठाऊक आहे, माझ्या मनात आलं. तो काय-काय अनुभवेल त्यातून मी आधीच गेलोय. त्याच्याकडे पाहून मी त्याच्याशी जोडला गेलो आणि

मला त्याच्याविषयी आत्यंतिक कणव वाटू लागली. असुरक्षितता, नैराश्य आणि एकाकीपणाच्या त्या जुन्या भावना माझ्या मनात परतल्या आणि मी घाबराघुबरा झालो. माझ्या अंगाचं तापमान वाढायला लागलं. माझं डोकं जड झालं. वास्तविक मी सैरभैर झालो नव्हतो, पण समोरच्या मुलाच्या दर्शनानं माझ्यातल्या मुलाशी संवाद साधला होता.

मग मला साक्षात्कार झाला आणि मी शांत होऊन मूळपदावर येऊ लागलो. *मी मोठा होत असताना माझ्या स्थितीतला कोणी जोडीदार माझ्याबरोबर नव्हता की जो मला मार्गदर्शन करू शकेल, पण आता डॅनिएलला कोणीतरी होतं. मी त्याला मदत करू शकतो. माझे आई-वडील त्याच्या आई-वडिलांना मदत करू शकतील.*

मला ज्या दिव्यांमधून जावं लागलं होतं त्यातून त्याला जावं लागणार नाही. त्यामुळे मी जी दु:खं अनुभवली त्यातली काही कदाचित त्याच्या वाट्याला येणार नाहीत. इथं मला स्पष्ट दिसू शकत होतं की हाता-पायांविना जगणं कितीही कठीण असलं तरी माझ्या जीवनाला काही मूल्य होतं, मी कोणासाठीतरी उपयुक्त ठरणार होतो. माझ्याकडे नाही असं काही नव्हतं जे मला जगात काही फरक पाडण्यापासून रोखणार होतं. इतरांना प्रोत्साहित करणं आणि प्रेरित करणं हाच माझा आनंद असेल. मला वाटत होतं तेवढ्या प्रमाणात जरी मी हा ग्रह बदलू शकलो नाही तरी माझी खातरी पटेल की माझं जीवन व्यर्थ जाणार नाही. जगाला काहीतरी देण्यासाठी मी कटिबद्ध होतो आणि आहे. तुम्हीदेखील आपापल्या कुवतीनुसार तसंच करण्यावर विश्वास ठेवा.

अर्थहीन जीवनाला आशा नसते. आशा नसलेल्या जीवनात श्रद्धा नसते. जगाला देण्याचा मार्ग तुम्हाला गवसला की तुम्हाला तुमचा अर्थ मिळेल आणि मग आशा आणि श्रद्धा आपसूक तुमची पाठ धरतील आणि तुमच्या भविष्यात तुमची पाठराखण करतील.

नॉट अॅव्हेन्यू चर्चमधली माझी भेट इतरांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यासाठी होती. प्रथम गर्दीतल्या त्या एका पोराच्या दर्शनानं मी हबकलो होतो तरी त्यानंच मला ग्वाही दिली की, अनेक लोकांच्या जीवनात मी चांगला बदल घडवू शकतो. विशेषत: मोठी आव्हानं पेलणारे लोक, डॅनिएल आणि त्याच्या आई-वडिलांसारखे.

डॅनिएलशी अचानक भेट होण्याचा अनुभव एवढा पकड घेणारा होता की त्या क्षणी मी जे अनुभवत होतो, ते मी माझ्या श्रोत्यांपुढे उघड केलं. मग डॅनिएलला माझ्याजवळ बोलावून घेतलं.

"जीवनात कधी योगायोग नसतात," मी म्हणालो, "प्रत्येक श्वास, प्रत्येक पाऊल परमेश्वराच्या आज्ञेनं पडत असतं. याच छताखाली, हात-पाय नसलेला आणखी एक मुलगा उपस्थित असणं हा बिलकूल योगायोग नाहीये."

मी हे बोलल्यावर डॅनिएल छान हसला आणि त्यानं समोरच्या गर्दीला आपलंसं केलं. त्याच्या वडिलांनी त्याला हवेत उंचावलं तशी गर्दी नि:शब्द झाली. आम्हा दोघांना, हात-पाय

नसलेल्या एका तरुणाला आणि एका लहानग्याला एकत्र पाहून गर्दीला हुंदके फुटले, ती मुसमुसू लागली.

मला सहसा रडायला येत नाही, पण गर्दीच्या डोळ्यांना एवढ्या धारा लागलेल्या पाहून माझ्या डोळ्यांतूनसुद्धा मुक्तपणे अश्रू वाहू लागले. त्या रात्री घरी मी एकही शब्द बोललो नसल्याचं मला पक्कं आठवतंय. मी त्या मुलाचा विचार करत होतो, मी त्याच्या वयाचा असताना मला जसं वाटत होतं तसंच त्याला वाटत असणार, याचा विचार करत होतो. पुढे त्याला कळू लागल्यावर, मी अनुभवलेले तसेच कटू, क्रौर्याचे आणि टाकल्याचे अनुभव तो कसे अनुभवेल याचा विचार करत होतो. त्याला अनुभवाव्या लागणाऱ्या दु:खामुळे मला त्याचं वाईट वाटलं, पण पुढल्याच क्षणी मला बरंही वाटलं. कारण मी आणि माझे आई-वडील त्याचं दु:ख हलकं करणार होतो आणि त्याच्या हृदयात आशेची ज्योत प्रज्वलित करणार होतो. हे सगळं माझ्या आई-वडिलांना सांगण्यासाठी मी अधीर झालो होतो, कारण मला कल्पना होती की, त्यांनाही त्याला भेटायला आणि त्याला आणि त्याच्या आई वडिलांना आशेचा मार्ग दाखवायला आवडेल. माझ्या आई-वडिलांना एवढ्या दिव्यांमधून जावं लागलं होतं, पण त्यांना मार्ग दाखवणारं तेव्हा कोणी नव्हतं. या कुटुंबाला मदत करण्याच्या संधीबद्दल त्यांना धन्यताच वाटेल याची मला खातरी होती.

अर्थबोधाचा क्षण

तो क्षण माझ्यासाठी अविश्वसनीय अद्भुत होता. मी नि:शब्द झालो होतो. खूप कमी वेळा असं घडतं आणि जेव्हा डॅनिएलनं माझ्याकडे पाहिलं तेव्हा मात्र मी विरघळून गेलो. मी स्वत: मूल होऊन गेलो आणि त्या वेळेपर्यंत मी माझ्यासारखं कोणी पाहिलं नसल्यामुळे, मी एकटा नसल्याची मला जाणीव झाली. या ग्रहावरच्या यच्चयावत व्यक्तींपेक्षा मी वेगळा नाहीये याची मला जाणीव झाली.

मला वाटून गेलं की त्या क्षणाच्या माझ्या भावना कोणालाच कळू शकणार नाहीत, माझं दु:ख, माझा एकाकीपणा कोणालाच समजू शकणार नाही. माझ्या बालपणाचा विचार करता, केवळ माझ्या वेगळेपणाच्या जाणिवेनं मी केवढा दु:खी असायचो ते मला आठवलं. कोणी मला चिडवायचं किंवा टाकायचं तेव्हा तर ती बोच अधिकच तीव्र व्हायची. परंतु डॅनिएलबरोबरच्या त्या क्षणामुळे मी परमेश्वराची असीम दया, त्याची कीर्ती, त्याचं सामर्थ्य अनुभवत होतो.

माझ्यासारखं पंगुत्व कोणालाही असू नये असं मला वाटत असल्यामुळे मला डॅनिएलचं वाईट वाटत होतं. पण मला कल्पना होती की, परमेश्वरानं हे पोर माझ्याकडे आणलं ते मी त्याचं दु:ख हलकं करावं या हेतूनं. जणूकाही परमेश्वर माझ्याकडे पाहून डोळे मिचकावत म्हणत होता, "पाहिलंस, तुझ्यासाठी माझ्याकडे योजना होती!"

उल्लसित होणं

अर्थातच, माझ्याकडे सगळी उत्तरं नाहीयेत. तुम्ही तोंड देत असलेली ती विशिष्ट दु:खं अथवा आव्हानं मला ठाऊक नाहीत. शारीरिकदृष्ट्या पंगू स्वरूपात मी या धरतीवर आलो, पण मला कधी छळाला किंवा उपेक्षेला तोंड द्यावं लागलं नाही. कौटुंबिक विघटनाला मला तोंड द्यावं लागलं नाही. मला कधी आई, वडील, भावंडं यापैकी कोणालाच गमवावं लागलेलं नाही. असंख्य दु:खांपासून मी दूर राहिलोय. मला कल्पना आहे की नक्कीच अन्य असंख्य लोकांपेक्षा माझी दु:खं सौम्य होती.

माझं जीवन पालटणाऱ्या त्या क्षणी, जेव्हा मी चर्चमधल्या गर्दीत वर धरलेल्या डॅनिएलला पाहिलं, तेव्हा मला जाणीव झाली की, मी परमेश्वराकडे मागत असलेला चमत्कार हा 'तोच' होता. परमेश्वरानं मला असा चमत्कार दाखवला नव्हता, पण त्याऐवजी त्यानं मला डॅनिएलसाठीचा चमत्कार केलं होतं.

डॅनिएलला जेव्हा मी पुन्हा भेटलो तेव्हा माझं वय होतं चोवीस. त्या दिवशी त्याच्या आईनं- पॅटीनं-मला मिठीत घेतलं आणि ती मला म्हणाली की, तिला भविष्यात गेल्यासारखं वाटत होतं; स्वत:च्या तरुण झालेल्या मुलाला मिठीत घेतल्यासारखं वाटत होतं.

"तुला कल्पना नाहीये मी सारखी परमेश्वराकडे प्रार्थना करत होते की, तो माझ्या मुलाला आणि मला विसरला नसल्याचा काही संकेत त्यानं द्यावा," ती म्हणाली, "तू चमत्कार आहेस, तू आमचा चमत्कार आहेस."

आमच्या भेटीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, मी अमेरिकेत येऊन दोन वर्षं झाल्यानंतर त्या दिवशी प्रथमच माझे आई-वडील माझ्याकडे येण्यासाठी ऑस्ट्रेलियातून निघाले होते. ते दोघे दोन दिवसांनी डॅनिएल आणि त्याच्या आई-वडिलांना भेटले. तुम्ही कल्पना करू शकता, त्यांच्याकडे एकमेकांशी बोलण्यासाठी किती आणि काय होतं.

ख्रिस आणि पॅटी मला डॅनिएलचं वरदान समजले असतील, पण माझे आई-वडील हे त्यांच्यासाठी आणखी मोठं वरदान होतं. हात-पाय नसलेल्या लहानग्याचं

संगोपन करण्याचं मार्गदर्शन त्यांना दुसरं कोण देऊ शकणार होतं? आम्ही त्यांना केवळ आशा देणार नव्हतो, तर डॅनिएल बऱ्यापैकी सामान्य जीवन जगू शकेल, तसंच त्यालाही जगासाठी काही करण्याकरता त्याचं वरदान लाभेल, याचा पक्का दाखला देणार होतो. आमचे अनुभव, आमचं प्रोत्साहन आम्ही त्यांना द्यावं हे भाग्य आम्हाला लाभलं, तसंच आम्ही त्यांना सज्जड दाखला देणार होतो की हाता-पायांविना जीवनाला कोणत्याही मर्यादा नसतात.

आणि त्याच वेळी, डॅनिएलची ऊर्जा हे माझ्यासाठीच वरदान होतं. मी त्याला जेवढं देऊ शकेन त्याहून अधिक तो मला देणार होता. त्याच्या आनंदातून, त्याच्या ऊर्जेतून, जणू तो माझ्यासाठी एक अनपेक्षित पुरस्कार होता.

जीवन समर्पण

स्वर्गीय हेलन केलर यांना वयाच्या दुसऱ्या वर्षी आजारपणामुळे दृष्टी आणि ऐकणं गमवावं लागलं, पण पुढे त्या जगद्विख्यात लेखिका, वक्त्या आणि सामाजिक कार्यकर्त्या बनल्या. त्या महान स्त्रीचं म्हणणं होतं की खरा आनंद हा चांगल्या हेतूच्या निष्ठेतून येतो. याचा अर्थ काय? माझ्यासाठी त्याचा अर्थ हा की, तुम्ही तुमच्या वरदानांशी, त्यांच्यात वृद्धी करण्याशी, ती इतरांबरोबर वाटण्याशी आणि त्यांच्यात आनंद अनुभवण्याशी निष्ठावंत राहणं. त्याचा अर्थ, आत्मसंतुष्टीच्या ध्यासापलीकडे जाऊन अर्थाचा आणि परिपूर्णतेचा अधिक परिपक्व शोध घेणं.

तुम्ही जेव्हा स्वत:ला समर्पित करता तेव्हाच तुम्हाला सर्वोत्तम पुरस्कार लाभतात. इतरांचं जीवन सुकर करणं, स्वत:पेक्षा अधिक मोठ्या कशाचा तरी भाग होणं आणि सकारात्मक बदल घडवणं यात ते साध्य होतं. हे सारं करण्यासाठी तुम्हाला मदर तेरेसा होण्याची गरज नाही. तुम्ही अक्षम व्यक्ती असलात तरी तुम्ही प्रभाव पाडू शकता. एका तरुणीनं आमच्या 'लाइफ विदाउट लिंब्स' या वेबसाइटवर खालची ई-मेल पाठवली तिला तुम्ही विचारा.

प्रिय निक,

बापरे! कोठून सुरू करू तेही मला सुचत नाहीये. मला वाटतं, स्वत:च्या परिचयानंच मी सुरुवात करते. मी १६ वर्षांची आहे. मी तुला लिहीत आहे, कारण 'नो आर्म्स, नो लिंब्स, नो वरीज,' ही तुझी डीव्हीडी मी पाहिली ज्यामुळे माझ्या

जीवनावर आणि माझ्या सुधारणेवर पुष्कळ प्रभाव पडला. मी 'सुधारणा' म्हणते कारण माझा रोग खाण्याशी संबंधित होता, अॅनोरेझिया. त्याच्या उपचारांसाठी गेल्या वर्षात अनेकदा मी उपचार केंद्रात भरती होऊन आले. तो काळ माझ्या जीवनातला सर्वांत वाईट काळ होता. नुकतीच मी कॅलिफोर्नियातल्या उपचार केंद्रातून बाहेर पडलेय. तिथंच मी तुझी डीव्हीडी पाहिली. माझ्या जीवनात कधीच मी एवढी प्रेरित आणि प्रोत्साहित झाले नव्हते. खरोखरच मला तुझं आश्चर्य वाटतं. तुझ्या बाबतीतलं सगळंच हे विलक्षण आणि सकारात्मक आहे. तुझ्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दानं माझ्यावर काही ना काही प्रभाव टाकला आहे. आयुष्यात कधीच मला एवढी धन्यता वाटली नव्हती. म्हणजे आयुष्यात अनेकदा मला असं वाटलंय की माझ्यासाठी आता सारं संपलंय, पण आता मला कळलंय की जीवनात प्रत्येकाला काहीतरी हेतू असतो, आणि प्रत्येकानं स्वत: जसे आहोत त्याचा सन्मान करावा. मनापासून सांगते की तुझ्या डीव्हीडीनं मला जे प्रोत्साहित केलंय त्यासाठी मी तुझे पुरेसे आभारही मानू शकणार नाही. मी आशा

करते की एक दिवस मी तुला प्रत्यक्ष भेटेन; मरण्यापूर्वी एकदा तरी मला तुला भेटायचंय. मानवाला लाभू शकणारं सर्वोत्तम व्यक्तिमत्त्व हे तुझं आहे – तू मला खूप हसवलंस. (उपचार चालू असताना जे कठीण असतं.) केवळ तुझ्यामुळेच आज मी अधिक सशक्त आहे आणि स्वत:ला अधिक ओळखू लागलेय. लोक मला काय समजत असतील याचा मी आता सतत विचार करत नाही, ना सतत मी निराश होते. माझ्या नकारात्मकतेला सकारात्मकतेमध्ये कसं रूपांतरित करायचं ते तू मला शिकवलंस. माझं आयुष्य वाचवून त्याला दिशा दिल्याबद्दल, धन्यवाद! मी तुझे जेवढे आभार मानेन तेवढे कमीच आहेत – तू माझा आदर्श आहेस!

माझा वापर करा

अशा प्रकारची अनेक पत्रं मला मिळतात. ती वाचून मला धन्यताच वाटते. इतरांना त्यांच्या आयुष्यात मदत करण्याचं सोडूनच द्या, पण स्वत:च्या जीवनाचा आनंद लुटण्याच्या बाबतीतही लहानपणी मी एवढा निराश असायचो हे पाहता ही पत्रं येणं थोडं विचित्र भासतं. अर्थबोधाचं तुमचं शोधकार्य अजून चालूच असू शकेल. पण मला नाही वाटत की इतरांची सेवा केल्याविना तुम्हाला परिपूर्णतेची खरी जाणीव होईल. आपणा प्रत्येकालाच वाटत असतं की, आपण आपली कौशल्यं आणि ज्ञान इतरांच्या लाभासाठी वापरावं.

आजच्या युगात, भौतिक समृद्धीच्या आत्मिक फोलपणाची आपल्याला पुरेपूर कल्पना असली तरीही आपल्याला नियमितपणे स्मरण ठेवावं लागतं की, परिपूर्णतेच्या भावनेचा भौतिक समृद्धीशी किंचितही संबंध नसतो. परिपूर्णता साध्य करण्यासाठी लोक कितीतरी विलक्षण मार्ग अवलंबतात. त्यासाठी ते दारूचा आधार घेतात. सौंदर्याच्या विक्षिप्त कल्पनेनं ते आपल्या देहात बदल घडवतात. ड्रग्जचा अवलंब करून ढगात वावरतात. यशाच्या अत्युच्च शिखरावर जाण्यासाठी ते जीवन समर्पित करतात आणि एका दुर्दैवी क्षणी ते यश त्यांच्याकडून क्रूरपणे हिरावलं जातं. परंतु सुज्ञ लोकांना कल्पना असते की आडमार्गानं किंवा सोप्या मार्गानं आपण कधीच दीर्घकालीन आनंदापर्यंत पोहोचू शकणार नाही. तुम्ही जर तात्पुरत्या सुखांसाठी स्वत:ची गुंतवणूक केलीत तर त्यातून लाभणारा आनंद तात्पुरताच असेल. तुम्ही स्वस्तात जे काही मिळवाल ते आज असेल उद्या नाही.

जीवनाचा खरा अर्थ हा तुमच्याकडे काही असण्यात नसतो, तर तो असतो तुमच्या असण्यात! पैशानं खरेदी करता येईल ते सारं काही तुमच्याकडे असलं तरीही तुम्ही अत्यंत दु:खी असू शकता. मला अशी अनेक माणसं ठाऊक आहेत ज्यांचे देह परिपूर्ण आहेत, पण त्यांना माझ्या निम्म्यानंही आनंद लाभलेला नाही. माझ्या दौऱ्यांमध्ये मी मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये किंवा आफ्रिकेतल्या बकाल वस्त्यांमध्ये जो आनंद पाहिलाय तो मला अनेक अब्जाधीशांच्या विस्तीर्ण मालमत्तेमध्येही पाहायला मिळालेला नाही.

हे असं का?

तुम्हाला तेव्हाच समाधान लाभेल जेव्हा तुम्ही तुमची कौशल्यं आणि तुमची इच्छाशक्ती सर्व ताकदीनं वापराल. क्षणभंगुर आत्मप्रौढी ओळखा. आलिशान घर, कपडालत्ता, लखलखत्या गाड्या यांसारख्या भौतिक चिजा मिळवण्याचा मोह टाळा. माझ्याकडे अमुक असतं तर मी केवढा सुखी झालो असतो हा सार्वत्रिक आभास आहे. तुम्ही तुमचा आनंद केवळ वस्तूंमध्ये शोधाल तर तुम्हाला तो कधीच पुरेसा ठरणार नाही.

भोवतालचं निरीक्षण करा. आत्मपरीक्षण करा.

❋❋❋

लहान असताना मी विचार केला होता की, परमेश्वरानं मला फक्त हात-पाय दिले तरी माझं उर्वरित आयुष्य सुखी होईल. आणि तो विचार मला स्वार्थाचा वाटला नाही, कारण हात-पाय सर्वांनाच असतात. तरीही, आता तुम्हाला कल्पना आल्याप्रमाणे हाता-पायांशिवायही मी आनंदी आणि परिपूर्ण असल्याचं मला वाटतं आणि हा माझा विचार डॅनिएलमुळे पक्का झाला. त्याच्याशी आणि त्याच्या कुटुंबाशी मी संपर्क साधल्यानं या जगातल्या माझ्या अस्तित्वाच्या हेतूचं मला स्मरण झालं.

माझे आई-वडील कॅलिफोर्नियात आल्यावर आम्ही त्या कुटुंबाला भेटलो आणि तो अनुभव आम्हा सर्वांसाठी, विशेषत: माझ्यासाठी फारच विशेष होता. डॅनिएलच्या आई-वडिलांशी गप्पा मारण्यात, परपस्परांचे अनुभव एकमेकांना सांगण्यात, त्यांच्यापुढे वाढून ठेवलेल्या माझ्यासारख्याच आव्हानांना आम्ही कसं तोंड दिलं हे कथन करण्यात आम्ही पुष्कळ वेळ घालवला. त्या काही तासांपासून आमच्यात जो काही भावबंध निर्माण झाला तो आजपर्यंत टिकून आहे.

आमच्या पहिल्या भेटीनंतर सुमारे वर्षभरानं आम्ही पुन्हा भेटलो तेव्हा डॅनिएलच्या आई-वडिलांनी आम्हाला सांगितलं की, त्याच्या डॉक्टर्सच्या मते तो स्वत:ची व्हीलचेअर वापरायला अजून तयार झाला नव्हता.

"का नाही?" मी प्रश्न केला. "मी माझी व्हीलचेअर चालवायला लागलो तेव्हा मी डॅनिएलच्याच वयाचा होतो."

माझा मुद्दा सिद्ध करण्यासाठी मी माझी व्हीलचेअर डॅनिएलसाठी रिकामी करून दिली. त्याचं पाऊल व्हीलचेअरच्या जॉयस्टिकला व्यवस्थित बसत होतं. त्याला व्हीलचेअर आवडली. ती त्यानं सफाईनं चालवली. आम्ही तिथं असल्यामुळे डॅनिएल त्याच्या आई-वडिलांना पटवून देऊ शकला की तो व्हीलचेअर उत्तमरीत्या हाताळू शकतो. हा अशा अनेक मार्गांपैकी एक होता ज्यायोगे मी माझ्या स्वानुभवावरून त्याच्यापुढचा मार्ग प्रज्वलित करू शकेन याची मला कल्पना होती. डॅनिएलचा मार्गदर्शक म्हणून त्याची मदत करण्याचा जो काही अनुभव आहे तो मी तुम्हाला शब्दांत सांगूच शकणार नाही.

त्या दिवशी डॅनिएलला आम्ही अनोखा नजराणा पेश केला, पण त्याच्या आनंदामुळे मला लाभलेली अतुलनीय परिपूर्णतेची भावना ही त्यानं मला दिलेली अधिक अनमोल भेट होती. ना आलिशान गाडी, ना मोठी गढी. आपल्या दैवाच्या पूर्ततेमधून त्याच्या योजनेशी जोडलं जाण्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही.

या अशा भेटींमधून दातृत्व वाढतच जातं. आमच्या पुढच्या भेटीत माझ्या आई-वडिलांनी त्याच्या आई-वडिलांना त्यांची एक भीती बोलून दाखवली की, मला हात-पाय नसल्यानं मी बाथटबमध्ये बुडेन असा धोका त्यांना सतत वाटत राहायचा. माझ्या बाल्यावस्थेत मला अंघोळ घालताना ती दोघं खूप काळजी घ्यायची. माझं वय जसं वाढू लागलं तसं माझ्या वडिलांनी अलगदपणे मला पाण्यावर आडवं केलं आणि दाखवलं की मी तरंगू शकतो. कालांतरानं माझा आत्मविश्वास आणि धिटाई वाढली आणि मी शिकलो की जोवर मी माझ्या फुप्फुसांमध्ये थोडी हवा भरून घेईन तोवर मी पाण्यावर तरंगू शकतो. पाण्यात असताना पुढे सरकण्यासाठी माझ्या छोट्या पावलाचा वल्ह्यासारखा वापर कसा करायचा हेही मी शिकलो. माझा पाण्याशी संबंध येण्याच्या बाबतीत माझ्या आई-वडिलांचं सार्थ भय पाहता, कोणत्याही स्वरूपाच्या पाण्यात निर्धोकपणे स्वत:ला झोकून देण्याइतपत मी पट्टीचा पोहणारा झालेला पाहून त्यांना केवढा अचंबा वाटला असेल याची कल्पना करा.

ही घटना डॅनिएलच्या आई-वडिलांना सांगितल्यावर कालांतरानं त्यांनी आम्हाला सांगितलेल्या गमतीशीर गोष्टीनं आम्ही सारेच आनंदी झालो. तो थोडंफार बोलायला लागल्यावर त्यानं पहिलं छोटं वाक्य उच्चारलं ते होतं : "स्विम लाइक निक!" आता तोही पट्टीचा पोहणारा झालाय. त्यामुळे मला किती अभिमान वाटतो ते मी तुम्हाला सांगू शकणार नाही. माझ्या अनुभवांमुळे डॅनिएलला होणारे लाभ पाहणं माझ्या जीवनाला अधिक खोल अर्थ प्राप्त करून देतात. माझ्या जीवनकथेचा एवढा प्रसार झाला नसता तरी माझ्यासारखं पोहता येण्याचा डॅनिएलचा निश्चय केवळ माझं जीवन आणि मी भोगलेले कष्ट सार्थ करण्यास पुरेसा ठरेल.

आपला हेतू ओळखणं हेच सर्वकाही आहे. मी तुम्हाला विश्वास देतो की देण्यासारखं काहीतरी तुमच्याकडेही आहे. आता कदाचित ते तुम्हाला दिसत नसेल, पण ते खरं नसतं तर तुम्ही या भूतलावर नसता. मला खातरी वाटते की परमेश्वर चुका करत नाही, पण तो चमत्कार करतो. त्यातला एक मी आहे. आणि तुम्हीही आहात.

दोन

ना हात, ना पाय, ना मर्यादा

मा झ्या जीवनात आणि माझ्या प्रवासांमध्ये अनेकदा मला मनुष्याच्या अविश्वसनीय आत्मिक बलाचा प्रत्यय आलाय. मला पक्कं ठाऊक आहे की चमत्कार घडतात, पण ते त्यांच्याच बाबतीत ज्यांच्या मनात आशेचा किरण असतो. आशा म्हणजे काय? आशा म्हणजे जिथं स्वप्नं निपजतात. आशा म्हणजे तुमच्या हेतूचा आवाज. तो आवाज तुमच्याशी संवाद साधतो आणि तुम्हाला आश्वस्त करतो की जे काही तुमच्या बाबतीत घडतं ते तुमच्यात वास करत नाही. तुमच्या बाबतीत जे काही घडतं त्यावर तुमचं नियंत्रण नसेलही कदाचित, पण त्यावरचा तुमचा प्रतिसाद कसा असेल तो तरी नक्कीच तुमच्या नियंत्रणात असू शकतो.

स्व. रेव्ह. मार्टिन लुथर किंग, ज्यु. यांचं एक वचन आहे : "जगात केली गेलेली प्रत्येक गोष्ट ही आशेनंच केली जाते." माझी पक्की खातरी आहे की जोवर तुमचा श्वास चालू आहे तोवर तुम्हाला आशा उपलब्ध आहे. तुम्ही आणि मी केवळ मानव आहोत. आपल्याला भविष्यात पाहता येणार नाही. त्याऐवजी आपण त्याची कल्पना करतो. केवळ परमेश्वरालाच ठाऊक आहे की, आपलं जीवन कसं उलगडत जाईल आशा ही त्यानं आपल्याला दिलेली भेट आहे, पलीकडचं पाहण्यासाठी एक खिडकी. त्यांनं आपल्यासाठी योजलेलं भविष्य आपल्याला कळू शकणार नाही. त्याच्यावर विश्वास ठेवा, हृदयात आशा बाळगा, आणि समोर कितीही विपरीत उभं ठाकलेलं असलं तरी चांगलं तेच घडेल हे गृहीत धरून त्याच्या तयारीसाठी शक्य ते करा.

अर्थात, कधी-कधी आपल्या प्रार्थनांना प्रतिसाद मिळत नाही. आपण प्रार्थना करीत असलो, आपण सश्रद्ध असलो तरी आपल्या बाबतीत दु:खद घटना घडतात. एवढंच नाही, तर अत्यंत सज्जन आणि निर्मळ मनाची माणसंदेखील कमालीची हानी आणि भयंकर दु:ख सोसतात. हैती, चिली, मेक्सिको आणि चीन इथले भूकंप ही ताजी उदाहरणं आपल्याला दाखवून देतात की दु:सह भोग आणि दुर्घटना दररोज घडतात. त्या नैसर्गिक आपत्तींमध्ये हजारो जीव गेले. त्यांच्या आशा आणि त्यांची स्वप्नं त्यांच्याबरोबरच मातीत मिळाली. असंख्य आयांनी आपली बाळं गमावली. असंख्य बाळांनी आपल्या आया गमावल्या.

अशा सगळ्या भोगांमध्ये तुमची आशा जिवंत कशी राहील? अशा तऱ्हेची संकटं ऐकल्यानंतरही माझी आशा शिल्लक राहते ती या ज्ञानामुळे की अशा घटना इतर माणसांच्या हृदयातल्या करुणेला पान्हा फोडतात. अशा निरर्थक भोगानंतर तुम्ही जेव्हा विचार करू लागता की हे असं का, लोकांनी आशा का बाळगावी, त्याच वेळी दाही दिशांनी

हजारो स्वयंसेवक नि:स्वार्थी सेवा देण्याकरता त्या ठिकाणी जमा होतात. विद्यार्थी, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, बचावतज्ज्ञ आदी मंडळी बचावलेल्या लोकांच्या सेवेसाठी, त्यांची दु:खं हलकी करण्यासाठी आपापली कौशल्यं, वेळ, सेवा समर्पित करतात.

परमेश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा देण्यासाठीच अत्यंत बिकट परिस्थितीतही 'आशा' जागी होते. मला भेटलेल्या अनेक लोकांनी एवढी दु:खं सोसली आहेत की, त्या तुलनेत माझं दु:ख हलकं वाटतं, पण मीसुद्धा एक जिवलग गमावल्याचं दु:ख अनुभवलंय. आमच्या कुटुंबाच्या, चर्चमधल्या आणि समाजातल्या साऱ्या सश्रद्ध ख्रिश्चन्सनी मनोभावे प्रार्थना करूनही माझा एक चुलत भाऊ 'रॉय' वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी कॅन्सरला बळी गेला. तुमच्या एवढ्या जवळच्या कोणाला गमावणं खूप हृदयद्रावक असतं, तसंच अनाकलनीयही, आणि म्हणूनच मला आशा अत्यंत महत्त्वाची वाटते. माझी आशा माझ्या भौतिक अस्तित्वापलीकडची आहे. अंतिम आशा स्वर्गात असते. रॉय, ज्याची येशू ख्रिस्तावर श्रद्धा होती, तो आता मृत्यूनंतर स्वर्गात त्याच्याबरोबर असून आता तो भोगमुक्त झालाय ही आशा माझ्या कुटुंबीयांसाठी कमी दिलासादायक नाहीये का?

आपल्या क्षमतेबाहेर वाटणाऱ्या अत्यंत बिकट प्रसंगाच्या बाबतीतही परमेश्वराला कल्पना असते की, आपण केवढं सोसू शकतो. अमरत्वाची तयारी करण्यासाठी आपण इथं तात्पुरता वास करतो, ही संकल्पना मला पटते. इथलं आपलं आयुष्य चांगलं असो वा वाईट, स्वर्गाची दारं आपली वाट पाहत असतात. अत्यंत कठीण प्रसंगांमध्येही माझ्या मनातला विश्वास ठाम असतो की त्यातून पार पडण्याची आणि दु:ख सोसण्याची शक्ती परमेश्वर मला देईल. तसंच पुढे चांगले दिवस येतील, इथं पृथ्वीवर नाही तरी स्वर्गाततरी निश्चितच.

आपल्या प्रार्थनेला फळ येत नसेल तरी तगून राहण्याचा एक उत्तम मार्ग मला सापडलाय तो म्हणजे इतरांशी संवाद साधणं. तुमचं दु:ख हलकं होत नसेल तर इतर कोणा व्यक्तीचं दु:ख हलकं करा आणि त्यांची आशा जागवा. त्यांना दिलासा द्या म्हणजे त्यांच्या मनात विश्वास निर्माण होईल की, त्यांच्या दु:खात ते एकटे नाहीत. तुम्हाला प्रेमाची गरज असेल तेव्हा तुम्ही ते देऊ करा. तुम्हाला मैत्री हवी असेल तेव्हा तुम्ही मित्र बना. तुमची आशा डळमळीत झाली असेल तेव्हा तुम्ही दुसऱ्यांची आशा जागवा.

मी तरुण आहे आणि सगळी उत्तरं माझ्याकडे असल्याचा मी आव आणत नाहीये, पण मला अधिकाधिकच जाणवू लागलंय की जेव्हा नैराश्य आपल्याला ग्रासून टाकतं, आपल्या प्रार्थनेला फळ येत नाही आणि जेव्हा आपली भीती खरी ठरते, तेव्हा आपली नाती, आपल्या भोवतीचे लोक हेच आपले मुक्तिदाते असतात. विशेषत: मी आणि माझ्या ख्रिश्चन बांधवांच्या बाबतीत ते साध्य होतं परमेश्वराशी असलेल्या आमच्या नात्यामुळे, त्याच्या प्रेमावर आणि त्याच्या सुज्ञपणावर असलेल्या आमच्या श्रद्धेमुळे.

प्रभावी नजराणा

नैराश्यावरच्या आशेच्या प्रभुत्वावरचा माझा विश्वास २००८ मधल्या माझ्या पहिल्या चीनभेटीदरम्यान अधिक दृढ झाला. मी चीनची भिंत पाहिली आणि जगातल्या आश्चर्यांपैकी एकाच्या वैभवानं मी प्रभावित झालो. पण या भेटीतला सगळ्यात विशेष क्षण मी अनुभवला तो एका चिनी मुलीच्या डोळ्यांत मला आनंदाच्या तेजाचं दर्शन झालं तेव्हा. ती मुलगी इतर मुलींबरोबर एक कार्यक्रम सादर करीत होती जो ऑलिम्पिकमध्ये सादर होण्याच्या पात्रतेचा होता. तिच्या चेहऱ्यावरच्या विजयी मुद्रेनं माझ्या दृष्टीची पकड घेतली जी मला सोडवता येईना. इतर मुलींबरोबर पदलालित्य करताना ती डोक्यावरच्या फिरत्या तबकडीचं अचूक संतुलन राखत होती. ती एवढी, म्हणजे कमालीची एकाग्रता साधत होती. इतर काही विचार तिच्या मनाला आव्हान देत असावेत, पण तरीही तिच्या नजरेत आनंदाचा तो लख्ख भाव पाहून माझ्या डोळ्यांत पाणी तरळलं.

ही मुलगी आणि कार्यक्रमामधली इतर सर्व मुलं ही काही महिन्यांपूर्वी तिथं झालेल्या भूकंपात चार हजारांवर अनाथ झालेल्या मुलांपैकी होती. मी, माझा गाइड आणि माझी देखभाल करणारा असे आम्ही तिघेजण त्या अनाथालयाला साहित्य पुरवण्यासाठी आलो होतो. त्या मुलांना उभारी देण्यासाठी मी बोलावं असं मला सांगण्यात आलं होतं.

त्या अनाथालयात जाण्याच्या वाटेवर आम्ही भूकंपानं माजवलेला उत्पात पाहिला आणि मी सर्दच झालो. ते सारं पाहून माझ्या मनात आलं की त्या मुलांपुढे मी काय बोलणार होतो. भूमीनं आ वासला होता आणि त्या मुलांचं सर्वस्व तिनं गिळंकृत केलं होतं, त्यांना ठाऊक असलेलं आणि त्यांचं प्रेम असलेलं सारंकाही. एवढं भयंकर काही मी कधी पाहिलं नव्हतं. मी त्यांना काय सांगू? त्यांना देण्यासाठी आम्ही कपडे आणले होते, पण मी त्यांच्या आशा कशा पल्लवित करणार होतो?

मी अनाथालयात प्रवेश केल्याबरोबर माझ्याभोवती गराडा पडला. एकापाठोपाठ एक मूल मला मिठी मारू लागलं. मला त्यांची भाषा येत नव्हती, पण त्याला फारसं महत्त्व नव्हतं. त्यांचे चेहरे सारंकाही बोलत होते. त्यांच्या त्या परिस्थितीतही ती मुलं उल्लसित होती. त्यांच्यापुढे मी काय बोलू हा प्रश्नच तिथं गैरलागू ठरला. त्या मुलांना मी प्रेरित करण्याची गरजच नव्हती. उलट, आपल्या कार्यक्रमाच्या सादरीकरणानं त्यांनीच मला प्रेरित केलं. त्यांनी त्यांचं सर्वस्व गमावलं होतं, त्यांचे आई-वडील, त्यांची घरं, त्यांच्या वस्तू, खेळणी; पण तरीही ती मुलं आनंदच व्यक्त करीत होती.

मी त्यांना सांगितलं की, मी त्यांच्या धैर्यापुढे नतमस्तक झालो होतो आणि त्यांनी आशावादी राहावं, चांगल्या दिवसांची इच्छा धरावी, आणि पूर्ण ताकदीनं आपल्या स्वप्नांचा ध्यास धरावा.

स्वप्नं पाहण्याचं धैर्य बाळगावं

आपली स्वप्नं सत्यात उतरवण्याचं धैर्य अंगी बाळगा आणि त्याच्या वाटेत आडव्या येणाऱ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्याच्या स्वत:च्या क्षमतेविषयी कधीच साशंक होऊ नका. परिस्थितीवर मात करण्याची लोकांची क्षमता मी केवळ चीनमधल्या अनाथालयातच नव्हे, तर मुंबईतल्या झोपडपट्टीत आणि रोमानियातल्या कारावासांमध्येही पाहिली आहे. नुकतीच मी दक्षिण कोरियातल्या एका सामाजिक कल्याणकारी संस्थेला भेट दिली, जिथं राहणाऱ्या व्यक्ती अपंग अथवा एकट्या माता होत्या. त्यांच्या आत्मबलानं मी स्तिमित झालो. दक्षिण आफ्रिकेतल्या एका तुरुंगाला मी भेट दिली. तिथल्या कुख्यात कैद्यांना आमच्याबरोबर चॅपेलमध्ये (छोटं ख्रिस्ती चर्च) येऊ दिलं नव्हतं. पण आमच्याबरोबर ते बाहेरचे कैदीही गात असल्याचं आम्हाला ऐकू येत होतं. असं वाटत होतं जणू पवित्र आत्म्यानं साऱ्या कैद्यांवर परमेश्वरी आनंदाचं गारूड घातलं होतं. त्यांच्या श्रद्धेमुळे आणि आस्थेमुळे ते जरी बाहेरून बंदिस्त असले तरी आतून पूर्ण मुक्त होते. त्या दिवशी त्या तुरुंगाच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडताना माझ्या मनात येऊन गेलं की, त्या तुरुंगाबाहेरच्या अनेक लोकांपेक्षा त्या तुरुंगातले कैदी अधिक मुक्त भासत होते. तुम्हीदेखील तुमच्या आशेला तुमच्या हृदयात वास करायला देऊ शकता.

लक्षात ठेवा की दु:खामागंही काही हेतू असतो. ही भावना अनुभवणं हे एकदम नैसर्गिक आहे, पण तिला तुम्ही दिवस-रात्र तुमच्यावर वर्चस्व गाजवू देऊ नये. त्या भावनेला तुमचा प्रतिसाद अधिक सकारात्मक विचारांकडे वळवून आणि तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टी करून तुम्ही नियंत्रित करू शकता.

मी आध्यात्मिक पार्श्वभूमी असलेला मनुष्य असल्यामुळे, दु:खाच्या प्रसंगी मी माझ्या श्रद्धेला शरण जातो. पण, आश्चर्य म्हणजे, वास्तविक माझ्या अकाउंटिंगच्या अभ्यासातून मला अधिक वास्तवादी दृष्टिकोन मिळाला. तुम्ही म्हणत असाल की तुमच्याकडे बिलकूल आशा उरली नाही, याचा अर्थ असा की तुमच्या जीवनात काही चांगलं घडण्याची शक्यता शून्य आहे.

शून्य? हा थोडा जास्त आहे असं नाही तुम्हाला वाटत? चांगल्या दिवसांवर विश्वास ठेवण्याची शक्ती एवढी निर्विवाद आहे की, मला वाटतं यामुळे तुमचे चांगले दिवस येण्याची शक्यताच अधिक असते. श्रद्धा आणि प्रेमाबरोबरच आशा हा आध्यात्मिकतेचा एक आधारस्तंभ आहे. तुमच्या कल्पना काही का असेनात, पण तुम्ही कधीच आशेविना राहू नये, कारण जीवनातली प्रत्येक गोष्ट तिच्यापासूनच सुरू होते. तुमच्याकडे आशा नसेल तर कुटुंब स्थापण्याचा विचार तुम्ही कधीतरी करू शकाल? आशेशिवाय तुम्ही काही नवं शिकण्याचा प्रयत्न कराल का? आणि हे पुस्तक लिहिण्याचा माझा उद्देश आहे की तुम्हाला अधिक चांगलं आयुष्य लाभावं, मर्यादा नसलेलं!

बायबलमध्ये म्हटलंय, 'परमेश्वरावर विश्वास असणाऱ्यांचं बळ हे वाढतच असतं. ते गरुडाप्रमाणे आकाशात भरारी घेतील, ते दौडत राहतील पण थकणार नाहीत, ते चालत राहतील पण कमजोर होणार नाहीत.' हे मी पहिल्यांदा वाचलं आणि त्या क्षणीच मला जाणीव झाली की मला हाता-पायांची गरज नाही. तुम्ही कधीच याचा विसर पडू देऊ नका की परमेश्वर कधीच तुमची साथ सोडणार नाही. पुढे जात राहा कारण कृतीनं गती प्राप्त होते, ज्यातून कल्पनातीत संधी निर्माण होतात.

तरंगांच्या लाटा होतात

२००९मध्ये हैती येथे झालेल्या भीषण भूकंपानं सारं जग दु:खी झालं. या भयंकर दुर्घटनेनं अगणित दु:खं दिली तरी लोकांचे सद्गुणही त्यामुळे उजेडात आले. जसे की बचावलेल्या लोकांपुढे डोंगराएवढी आव्हानं उभी ठाकलेली असतानाही त्यांनी हात टेकण्यास नकार देणं.

मारीचा मुलगा इमॅन्युएल एका कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली मरण पावल्याचं मानलं गेलं. भूकंप झाला त्या वेळी तो एकवीस वर्षांचा शिंपी त्याच्या आईबरोबर तिच्या अपार्टमेंटमध्ये होता. त्याची आई वेळेवर निसटली, पण त्याचा पत्ता नव्हता आणि इमारत आता जमीनदोस्त झालेली होती. आईनं बरीच शोधाशोध केली, पण बचावलेल्या लोकांमध्ये तिचा मुलगा दिसत नव्हता. कालांतरानं तो परतेल या आशेनं ती वाट पाहत राहिली.

काही दिवसांनंतर तिनं पुन्हा त्याला शोधण्यासाठी प्रयत्न सुरू केले. बचावकार्य चालू होतं. अवजड यंत्रांच्या मोठ्या आवाजामुळे नीटसं ऐकू येत नव्हतं तरीही तिला वाटून गेलं की तिनं इमॅन्युएलचा आवाज ऐकला, तो तिला हाका मारीत असल्यासारखा.

"त्या क्षणी," तिनं वार्ताहराला सांगितलं, "मला वाटतं की त्याला वाचवणं शक्य होतं."

तिथल्या सर्वांना तिनं सांगितलं की, तिचा मुलगा ढिगाऱ्याखालून तिला हाका मारत होता, पण कोणीच तिची मदत करू शकत नव्हतं. पण आंतरराष्ट्रीय बचाव पथक तिथं आल्यावर मात्र तिला अनुभवी इंजिनिअर्सची तुकडी सापडली. तिनं त्यांना पटवून दिलं की तिचा मुलगा अजून जिवंत होता. त्या तुकडीनं त्यांचं ज्ञान, अनुभव आणि साधनं वापरून त्याच जागी विवर तयार केलं जिथून तिनं आपल्या मुलाची हाक ऐकल्याचं तिनं त्यांना सांगितलं होतं.

खोदकाम चालू असताना त्यांना इमॅन्युएलचा हात सापडला. तो त्यांना धरण्याच्या प्रयत्नात होता. मग त्यांनी त्याचे खांदे मोकळे केले आणि सरतेशेवटी ते त्याला बाहेर काढू शकले. तो त्या ठिकाणी दहा दिवस गाडून पडलेला होता. त्याला निर्जलीभवन म्हणजे डीहायड्रेशन झालं होतं, त्याची उपासमार झाली होती, तो धुळीनं माखलेला होता, पण तरीही तो बचावला होता.

कधीतरी तुमच्याकडे केवळ विश्वास असेल की काहीही शक्य आहे, चमत्कार घडू शकतात. मारीच्या बाबतीत जसं घडलं. तसं तुमच्याभोवतीही हाहाकार असू द्या, पण तुम्ही नैराश्याला शरण जाता कामा नये. उलट, विश्वास बाळगा की जे तुमच्यापाशी नाही ते परमेश्वर पुरवेल! त्या विश्वासाच्या बळावरच मारीनं हात-पाय हलवले. तिच्या कृतीनं तिला तिच्या मुलाच्या हाकेच्या टप्प्यात नेलं. मारीच्या आशेनंच तिच्या इमॅन्युएलला जिवंत ठेवलं हे मानणं कठीण नाही, नाही का?

तुमचं जीवन आत्ता सुरळीत चालू नसेल, पण तुम्ही इथं आहात आणि जोवर तुम्ही जोर देत राहाल, तोवर काहीही शक्य आहे.

हृदयात आशा बाळगून जगणं

आशेला बिलगून राहून काहीही शक्य आहे या मताविषयी तुम्ही साशंक असाल किंवा कदाचित तुम्ही गर्तेत एवढ्या खोलवर गेला असाल की नैराश्यातून खुरडत बाहेर पडणं तुम्हाला अशक्य वाटत असेल. एक वेळ अशी होती की मला स्वत:ला अगदी तसंच वाटत होतं. माझ्या मनाची पक्की धारणा झाली होती की माझ्या जीवनाचं काही मोल नाही आणि माझं ज्यांच्यावर प्रेम आहे त्यांच्यासाठी मी केवळ एक लोढणं आहे. माझ्या जन्माच्या वेळी हात-पाय नसलेल्या अपत्याला सांभाळायची माझ्या आई-वडिलांच्या मनाची तयारी नव्हती आणि अर्थातच, ते अत्यंत निराश झाले. त्यांना कोण दोष देईल? प्रत्येक आई-वडील आपल्या पोटच्या गोळ्याचं भविष्य रंगवतात. परंतु माझ्यासारख्या प्रत्यक्षातल्या गोळ्याचं भविष्य काय असेल याची कल्पना करणं माझ्या आई-वडिलांना, आणि मी थोडा मोठा झाल्यावर मलाही शक्य नव्हतं.

आपण प्रत्येकानं केव्हाना केव्हा आपल्या जीवनाच्या कल्पनेचा चुराडा झालेला पाहिलाय. प्रत्येकाच्या तपशिलांमध्ये फरक जरूर असेल, पण नैराश्याची भावना मात्र खचितच मानवी असते. छळ आणि उपेक्षेनं उद्ध्वस्त झालेले अनेक तरुण त्यांच्या कुटुंबांच्या कहाण्या ई-मेल करून मला कळवतात. दारू, ड्रग्ज किंवा पोर्नोग्राफीनं पांगळं झालेल्या आपल्या जीवनाच्या कथा मला अनेक प्रौढांकडून कळतात. कधी-कधी वाटतं की माझ्या संपर्कातले जवळ-जवळ निम्मे लोक कॅन्सर अथवा तत्सम, जिवाला धोका असणाऱ्या रोगानं ग्रस्त असतात.

अशा परिस्थितीमध्ये तुम्ही आशावादी कसे राहाल? तुम्ही देवावर श्रद्धा ठेवा, तुमचं इथलं आयुष्य काही हेतूनं आहे याचा विसर पडू देऊ नका आणि त्या हेतुपूर्ततेसाठी स्वत:ला समर्पित करा. तुमच्यापुढे कोणतंही आव्हान उभं असलं तरी त्याला समर्थपणे तोंड देण्याची क्षमताही तुम्हाला लाभलेली आहे. माझ्या आई-वडिलांचा आणि एकेकाळी त्यांनी अनुभवलेल्या नैराश्याचा विचार करा.

सर्वोत्तमावर विश्वास ठेवणं

मानसिक तणावाखाली असताना सकारात्मक आणि प्रेरित राहणं निर्विवादपणे कठीण असतं. माझ्यापुढे वाट पाहत असलेली आव्हानं कळण्याएवढा मी मोठा झालो तेव्हा अनेकदा मी नैराश्यात बुडायचो आणि मला काहीच सकारात्मक दिसायचं नाही. माझ्या बालपणातल्या वाइटात वाईट दिवसांच्या माझ्या स्मृती धूसर आहेत. त्या वेळी मी अशा काळातून जात होतो जेव्हा वेगळं असणं हे खूपच कठीण होतं. मी खातरीनं सांगतो की तुम्हीही अशीच आत्मसाशंकता अनुभवली असणार. आपणा सर्वांनाच मिसळून जायचं असतं, पण कधी-कधी आपल्याला परकेपणाची जाणीव बोचत राहते.

माझी असुरक्षितता आणि साशंकता मुख्यत्वे मला हात-पाय नसल्यातून आल्या होत्या. तुमच्या अडचणी काय आहेत याची मला कल्पना नाही, पण आशेला बिलगून राहिल्यानं मला लाभ झाला. माझ्या आयुष्यात ते मला कसं उपयुक्त ठरलं त्याचा हा केवळ एक सुरुवातीचा नमुना :

मी नुकताच चालू लागलो होतो तेव्हा माझ्या डॉक्टर्सनी माझ्या आई-वडिलांना सल्ला दिला की, आता त्यांनी मला 'अपंगांच्या' खेळघरात (playgroup) दाखल करावं. तिथल्या 'अपंग' मुलांची आव्हानं ही हात/पाय नसणं, ते मेंदूचा विकार असणं इथपर्यंत कोणतीही होती. अशा तऱ्हेच्या, विशेष गरजा असणाऱ्या

मुलांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्याही बाबतीत माझ्या आई-वडिलांच्या मनात खूप प्रेम आणि सहानुभूती होती. पण त्यांचं मत असं होतं की, कोणत्याही मुलानं एका विशिष्ट गटात बंदिस्त राहू नये. माझ्या जीवनाला मर्यादा नसल्याच्या दुर्दम्य विश्वासाला ते धरून राहिले आणि ते स्वप्न जिवंत ठेवण्यासाठी ते झगडत राहिले.

माझ्या आईनं, परमेश्वराची तिच्यावर कृपा राहो, माझ्या जीवनाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. ''निकोलस, तू सामान्य मुलांबरोबरच खेळलं पाहिजेस कारण तूही सामान्यच आहेस. फरक एवढाच आहे की तुला शरीराचे काही भाग मिळाले नाहीत, बस्!'' ती मला म्हणाली आणि पुढल्या काही वर्षांसाठी तिनं माझी मनोधारणा पक्की केली. माझ्या मनात कमीपणाची भावना येऊ नये किंवा कशाही प्रकारे माझ्यावर मर्यादा पडू नयेत असं तिला वाटायचं. केवळ शारीरिक रचनेतल्या फरकांमुळे मी कुढा, बुजरा किंवा असुरक्षिततेच्या भावनेनं ग्रस्त व्हावा असं तिला वाटत नव्हतं.

माझे आई-वडील तेव्हाही माझ्या मनात विश्वास निर्माण करीत होते की मलादेखील इतरांप्रमाणंच लेबलविना आणि मर्यादांविना जीवन जगण्याचा हक्क आहे. याची मला सुतराम कल्पना नव्हती. तुम्हालाही तो अधिकार आहे. इतर लोक तुमच्यावर लादू पाहत असलेल्या वर्गीकरणापासून अथवा मर्यादांपासून मुक्त राहण्याची तुम्ही मागणी करायला हवी. मला न लाभलेल्या अवयवांमुळे मी अशा लोकांच्या बाबतीत संवेदनशील आहे जी

इतरांची त्यांच्याविषयीची मतं स्वीकारतात आणि स्वत:च्या नकळत स्वत:वर मर्यादा घालून घेतात. माझ्या बाबतीतही अशा अनेक वेळा आल्या जेव्हा मी एवढा थकलेलो असायचो की शाळेत अथवा डॉक्टरांकडे जाणं मला झेपणार नसल्याचं मी सांगायचो, पण अशा निमित्तांमागं लपण्यापासून मला माझ्या आईवडिलांनी रोखलं.

'लेबलं' तुम्हाला दडायला ठिकाणं पुरवातत. काही लोक त्यांचा वापर निमित्त म्हणून करतात. अन्य काही त्यांच्यावर कुरघोडी करतात. असे अनेक लोक आहेत ज्यांना पंगू असं नाव दिलं गेलंय. पण ते नाव ते खोटं ठरवतात, ते चैतन्यमय जीवन जगत पुष्कळ महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. मी तुम्हाला उत्तेजना देतो की तुम्हीही तुमच्यावर लादलेल्या मर्यादांवर कुरघोडी करा, तुम्हाला लाभलेल्या वरदानांचा शोध घ्या आणि ती विकसित करा.

परमेश्वराचं लेकरू या नात्यानं मला पक्की कल्पना आहे की, तो नेहमीच माझ्याबरोबर असतो, आणि आपण किती सोसू शकतो याची त्याला जाण असल्याच्या विश्वासानं मी आश्वस्त असतो. इतर लोक जेव्हा माझ्यापुढे त्यांच्या आव्हानांचा पाढा वाचतात तेव्हा माझे डोळे ओलावतात. भोग भोगत असलेल्या आणि दु:ख झेलत असलेल्या लोकांना मी स्मरण करून देत असतो की परमेश्वराचे बाहू आखूड नसतात. तो सर्वांपर्यंत पोहोचू शकतो.

त्यांच्यातून बळ प्राप्त करा. यत्न करण्याचं धाडस करा आणि तुमच्याकडून होईल तेवढी उंची गाठा. तुम्ही आव्हानांची अपेक्षा करू शकता. व्यक्तित्व घडवणारे अनुभव समजून त्यांचं तुम्ही स्वागत करा. त्यांच्यातून धडे घ्या आणि त्यांच्यावर आरूढ व्हा. तुम्हाला उत्तम स्वप्नं पडू द्या. केवळ एवढं ध्यानात ठेवा की, परमेश्वरानं कदाचित तुमच्यासाठी तुमच्या कल्पनेपलीकडला मार्ग ठरवून ठेवला असेल हे स्वीकारण्याएवढं तुम्ही तुमचं मन मोकळं ठेवा. तुमच्या स्वप्नाप्रत जाण्याचे मार्ग अनेक आहेत, त्यामुळे तुम्हाला तुमचा मार्ग अजून दिसत नसला तरी त्यामुळे तुम्ही कच खाऊ नका.

कृत्रिम अवयवांचा मुलगा

आशा उत्प्रेरक असते, म्हणजेच ती कार्यसिद्धीमध्ये मदत करते. दूर होऊ शकणार नाहीत असे अडथळे ती दूर करते. जेव्हा तुम्ही रेटा देत राहता, शरण जाणं नाकारता, तेव्हा तुम्ही गती निर्माण करता. तुमच्या कल्पनेतही नसणाऱ्या संधी आशेमुळे प्राप्त होतात. तुमच्या मदतीसाठी लोक आपणहून पुढाकार घेतात. दरवाजे उघडले जातात. मार्ग मोकळे होतात.

लक्षात ठेवा, क्रियेला प्रतिक्रिया असते. तुमच्या स्वप्नांचा नाद सोडण्याचा तुमचा मानस होईल, तेव्हा आणखी एक दिवस स्वत:ला ढकला, आणखी एक आठवडा, आणखी एक महिना, आणि आणखी एक वर्ष माघार घेण्यास नाकारणे यानं काय-काय घडू शकतं हे पाहून तुम्ही अचंबित व्हाल.

शाळेत जाण्याची माझी वेळ आली तेव्हा माझ्या आई-वडिलांनी मला समजावलं की मी सामान्य शाळेतच शिक्षण घ्यावं. त्यांच्या निर्धारामुळेच मी ऑस्ट्रेलियातला पहिला मुलगा

ठरलो जो अपंग असून मुख्य प्रवाहातल्या सामान्य शाळेत जाऊ लागला. शाळेत माझे निकाल एवढे चांगले राहिले की, स्थानिक वृत्तपत्रानं त्याची बातमी केली, 'एकोप्यानं अपंग मुलाचं जीवन फुलवलं.' माझी बहीण मिशेल माझ्याबरोबर व्हीलचेअरमध्ये बसलेली असल्याचा फोटो बातमीबरोबर छापला होता. ती बातमी देशभर गाजली आणि मला देशभरातून पत्रं, भेटी, निमंत्रणं आली. तसंच सरकारी अधिकारीही मला भेटायला येऊ लागले.

त्या बातमीचा परिणाम म्हणून यायला लागलेल्या देणग्यांमुळे, मला कृत्रिम हात-पाय बसवण्याच्या माझ्या आई-वडिलांच्या प्रयत्नांना चांगलीच मदत झाली. मी दीड वर्षाचा असल्यापासून ते त्या प्रयत्नात होते. सुरुवातीला माझ्यासाठी फक्त एक हात तयार करण्यात आला होता, पण तो मला चालला नाही, कारण तो हात आणि पंजा कळ्यांनी आणि कप्प्यांनी हाताळायचा होता आणि त्याचं वजन माझ्या स्वत:च्या वजनाच्या दुप्पट होतं.

तो हात बसवून मी स्वत:चा तोल सांभाळणं हेही एक आव्हान होतं. काही काळानं तो हाताळणं मला जमायला लागलं. एव्हाना मी माझ्या छोट्या हनुवटीनं आणि दातांनी वस्तू पकडायला लागलो होतो, त्यामुळे नवा हात माझ्यासाठी खरं तर लोढणंच झाला होता. त्यामुळे माझे आई-वडील प्रथम निराश झाले पण माझा आत्मविश्वास मात्र वाढला होता, कारण मी स्वत:च्या स्वत: बरंच काही करायला लागलो होतो. मी त्यांना उत्तेजन दिलं, धन्यवाद दिले आणि पुढे चालायला लागलो.

चिकाटीत एक विलक्षण ताकद आहे. माझ्या पहिल्या कृत्रिम हाताचा प्रयोग फसला, पण माझ्या जीवनात चांगलंच घडणार हा माझा विश्वास मात्र ढळला नाही. माझ्या सकारात्मकतेमुळे आणि उत्साहामुळे आमच्या इथल्या लायन्स क्लबने स्फूर्ती घेतली. माझ्या वैद्यकीय खर्चासाठी आणि नव्या व्हीलचेअरसाठी दोन लाख डॉलर्स उभे केले. त्यातल्या काही रकमेतून आम्ही कॅनडात टोरोन्टोमधल्या एका बालरुग्णालयात त्यांनी तयार केलेले हात बसवून पाहायलाही जाऊन येऊ शकलो.

परंतु, अखेरीस वैद्यकीय तज्ज्ञांनीही निर्णय घेतला की, कृत्रिम हाता-पायांऐवजी त्यांच्याविनाच मी अधिक सफाईनं काम करू शकत होतो. माझ्यासाठी नवे हात-पाय तयार करण्यास काही शास्त्रज्ञ आणि संशोधक तयार असल्याचं पाहून मी थरारलो होतो. पण त्याचा उलटा परिणाम असाही झाला की, मी अधिक जिद्दीला पेटलो. माझं जीवन सुकर होण्यासाठी कोणीतरी माझ्याकरता काहीतरी करण्याची वाट पाहत राहण्याऐवजी मला जे जे शक्य होईल ते ते मी स्वत:च करेन- माझी उत्तरं मलाच शोधून काढायला हवीत. आजही कोणी माझ्याकरता काही करू पाहत असेल तर मी त्याचं स्वागतच करतो, मग ते माझ्या व्हीलचेअरसाठी कोणी दार उघडून देत असो अथवा कोणी मला पाण्याचा ग्लास देत असो. आपण स्वत:च्या आनंदाची आणि यशाची जबाबदारी पेलली पाहिजे. गरज असेल तेव्हा

तुमचे कुंटुबीय आणि मित्र तुमच्यासाठी असतातच. त्यांच्या सहकार्याचं स्वागतच करा, पण तुम्ही स्वत:ला पुढं ढकलत राहा. त्यात तुम्ही जेवढे अधिक प्रयत्न कराल तेवढ्या अधिक संधी तुम्ही निर्माण कराल.

कधीतरी तुम्हाला असा अनुभव येईल की तुमचं उद्दिष्ट तुमच्या टप्प्यात आलेलं असताना तुम्ही कुठंतरी कमी पडता. पण माघार घेण्यासाठी हे कारण पुरेसं होत नाही. पराभव त्यांचाच होतो जे पुन्हा प्रयत्न करण्याचं टाळतात. मला अजूनही विश्वास वाटतो की सामान्य माणसाप्रमाणे मीही चालू शकेन, आणि पेला उचलू वा धरू शकेन. जे घडेल तो एक चमत्कारच असेल, मग तो स्वत: परमेश्वर घडवेल, अथवा पृथ्वीवरचा त्याचा प्रतिनिधी घडवेल. कृत्रिम अवयवांचं तंत्रज्ञान अत्यंत वेगानं सुधारतंय. एक दिवस मीही सफाईनं कृत्रिम हात-पाय वापरू शकेन, पण ते घडेपर्यंत, मी जसा आहे त्यात आनंदी आहे.

बरेचदा, जी आव्हानं आपल्याला रोखत आहेत असं आपण समजत असतो, ती प्रत्यक्षात आपल्याला अधिक प्रबळ करीत असतात. आजचं पंगुत्व हे कदाचित उद्याचा लाभ ठरण्याची शक्यता असल्याच्या विचारासाठी तुम्ही मनानं मोकळं असायला पाहिजे. मला हात-पाय नसणं हीच माझी समृद्धी आहे असं आता मला वाटायला लागलंय. माझी भाषा न येणाऱ्या स्त्रिया, पुरुष आणि मुलांनी केवळ मला पाहिलं तरी त्यांना कळेल की मी माझ्या आव्हानांवर मात केली आहे. त्यांना कल्पना आहे की माझे धडे मला सहजासहजी आत्मसात झालेले नाहीत.

अनुभवातून आलेलं शहाणपण

मी जेव्हा माझ्या श्रोतृवर्गाला सांगतो की बऱ्या दिवसांची वाट पाहा तेव्हा ते माझे अनुभवाचे बोल असतात. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही, कारण मी स्वत: त्यातून गेलोय. माझ्या आयुष्यात असा एक क्षण आला होता जेव्हा मी आशा सोडून दिली होती. वयाच्या दहाव्या वर्षी माझ्या आनंदी जीवनात हा कटू क्षण आला. जेव्हा मी नकारात्मक विचारांनी ग्रासला गेलो होतो. मी कितीही सकारात्मक, निश्चयी आणि कल्पक होण्याचा प्रयत्न केला तरी काही कामं अशी होती जी मी करूच शकायचो नाही. त्यातली काही एकदम साधी होती, दैनंदिन. त्यामुळे मी फार बेचैन झालो होतो. उदाहरणार्थ इतर मुलांप्रमाणं फ्रिजमधून बाटली काढणं मला जमत नव्हतं, मी स्वत:चं स्वत: जेवू शकत नव्हतो, आणि इतरांनी भरवणं मला बिलकूल आवडत नव्हतं. मला वाईट वाटायचं की मला भरवण्यासाठी त्यांना त्यांच्या जेवणातून उठावं लागायचं.

इतरही मोठे मुद्दे याच कालावधीत मला छळत होते. माझ्यावर प्रेम करणारी पत्नी मला कधी मिळेल का? तिचं आणि आमच्या मुलांची पोटं मी कशी भरेन? त्यांना काही धोका निर्माण झाला तर मी त्यांचं संरक्षण कसं करेन?

बऱ्याच जणांच्या मनात असे विचार येतात. कधीतरी तुमच्याही मनात प्रश्न उपस्थित झाले असतील की आमचं वैवाहिक जीवन कधीतरी चांगलं होईल का, माझी नोकरी सुखकर होईल का, मला चांगलं घर लाभेल का? भविष्यात अधूनमधून डोकावणं कधीही चांगलंच, कारण त्यातूनच आपला जीवनविषयक दृष्टिकोन प्रगल्भ होत असतो. अडचण तेव्हा निर्माण होते जेव्हा नकारात्मक विचार तुमची दृष्टी झाकोळून टाकतात आणि तुमच्या मनाची पकड घेतात. मी प्रार्थना करतो आणि स्वत:ला परमेश्वराच्या शब्दांचं स्मरण करून देतो की तो सदैव माझ्याबरोबर असेल. तो कधीच माझी साथ सोडणार नाही. तो मला विसरलेला नाही. वाइटातल्या वाईट गोष्टी एकत्र आणूनही तो त्यातून चांगलंच माझ्या पदरात टाकेल. परमेश्वरानं दिलेल्या शब्दावर भरवसा ठेवण्याचं मी स्वत:ला स्मरण करून देतो, मग बाहेरून मला काही का दिसेना. मला पक्कं ठाऊक आहे की परमेश्वर चांगला आहे. तो काही वाईट घडू देत असेल तर मला त्याचं आकलन होणार नाही, पण मी त्याच्या चांगुलपणावर विश्वास ठेवू शकतो.

विचारांवर नजर ठेवा

माझा अकरावा वाढदिवस जवळ येऊ लागला तेव्हाच मला पौगंडावस्थेची चाहूल लागली, ज्या वयात आपल्या मेंदूची पुनर्रचना होऊ लागते आणि शरीरातून नवखी रसायनं फिरू लागतात. माझ्याबरोबरची इतर मुलं, मुली जोड्या करू लागली, आणि त्यामुळे माझी एकाकीपणाची भावना वाढू लागली. *कोणत्यातरी मुलीला तिचा प्रियकर असा असावा असं वाटेल का, जो कधीही तिचा हात हातात घेऊ शकणार नाही किंवा तिच्याबरोबर कधीच नृत्य करू शकणार नाही?*

मला कल्पनाही नसताना त्या कुविचारांना आणि नकारात्मक भावनांना मी माझ्या मनाची कवाडं उघडी करून दिली. बरेचदा, रात्री झोप लागत नसताना किंवा कधी खूप थकवा आल्यावर ते विचार माझ्या मनात प्रवेश करायचे. तुम्हाला कल्पना असेलच, तुम्ही एवढे थकलेले असता की साऱ्या जगाचं ओझं जणू तुमच्याच खांद्यावर आल्याचं तुम्हाला भासू लागतं. जागरणामुळे, आजारपणामुळे किंवा अन्य तत्सम कारणांमुळे जेव्हा आपण कमजोर झालेले असतो तेव्हा आपण सारेच निराशा अनुभवतो.

जगात कोणीच असा नसतो जो सर्वकाळ आनंदी असतो. थोडी दु:खी मन:स्थिती नैसर्गिक असते. ती लाभदायकही असते. अलीकडच्या मानसशास्त्रीय अभ्यासातून असं निदर्शनास आलंय की दु:खी मन:स्थिती तुम्हाला तुमच्या कामाकडे अधिक चिकित्सेनं पाहायला लावते. हिशेबासारखी किंवा संपादनासारखी कामं करताना हा दृष्टिकोन उपयुक्त ठरू शकतो. भावनांची कल्पना असेल आणि तुमचं त्यांच्यावर नियंत्रण असेल तोवर नकारात्मक विचार सकारात्मक परिणाम देऊ शकतात. मात्र, तुम्ही जर भावनांना तुमच्यावर

आरूढ होऊ दिलंत तर तुम्ही नैराश्याच्या गर्तेत अडकू शकता किंवा स्वत:चं बरंवाईट होईल असं काही करू शकता.

त्याच्यावरचा उपाय म्हणजे नैराश्याच्या नकारात्मक विचारांबरोबर स्वत: वाहून न जाणं अथवा त्यांना तुमच्यावर नियंत्रण मिळवू न देणं. सुदैवानं आपली वृत्ती बदलण्याची क्षमता तुमच्यापाशी असते. नकारात्मक विचार मेंदूत निर्माण होऊ लागल्याचं समजताच तुम्ही 'ऑफ'चं बटण दाबू शकता. समस्या आणि त्यांचे स्रोत समजून घ्या, परंतु स्वत:चं ध्यान मात्र त्या समस्यांवर न ठेवता त्यांच्या उकलीवर ठेवा. बायबलच्या क्लासमधलं, परमेश्वराच्या पूर्ण चिलखताचं चित्र मला आठवतंय– सदाचाराचं कवच, सत्याचा कंबरपट्टा, श्रद्धेची ढाल, आत्मबळाची तलवार आणि मोक्षाचं शिरस्त्राण. त्या वेळी मी शिकलो होतो की एखाद्या ख्रिश्चन मुलासाठी तेवढी आयुधं पुरेशी होती. परमेश्वराचा शब्द हा माझ्यासाठी नकारात्मक विचारांचा संहार करणारी तलवार आहे. आणि ती तलवार म्हणजेच बायबल. तसंच, स्वत:चं रक्षण करण्यासाठी तुम्ही श्रद्धेची ढालही धारण करा.

निराशेचं आवर्त

जेव्हा स्वाभिमान आणि स्वत:ची प्रतिमा त्या पौगंडावस्थेच्या काळात फार महत्त्वाची असते तेव्हा मी माझ्या चिंता आणि भीतीला माझ्यावर आरूढ होऊ दिलं. माझ्या बाबतीत जे काही वाईट घडत होतं त्याला मी माझ्या बाबतीत घडणाऱ्या चांगल्यावर शिरजोरी करू दिली.

मी चुकीची निवड केली. नोकरी, पत्नी किंवा मुलं असणारं सामान्य जीवन मी कधी जगू शकेन? मी कायमच माझ्याबरोबरच्यांच्या गळ्यातलं लोढणं बनून राहीन.

माझी आशा हरवेपर्यंत मी कधीच अपंग नव्हतो. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा. हाता-पायांच्या हानीपेक्षा आशेची हानी अधिक नुकसानकारक असते. तुम्ही जर कधी दु:ख किंवा नैराश्य अनुभवलं असेल तर तुम्हालाही त्याची कल्पना असेलच. त्यापूर्वी कधी नव्हे एवढा संताप, दु:ख आणि मनाचा गोंधळ मी अनुभवला.

मी त्याच्यापुढे हात जोडून त्याला विचारलं की, त्यानं मला ते का नाही दिलं जे त्यानं इतर प्रत्येकाला दिलं होतं. *मी काही चूक केली होती? माझ्या हाता-पायांसाठीची माझी याचना तू त्या कारणास्तव ऐकून घेत नाहीस? तू मला का मदत करीत नाहीस? तू मला का भोग भोगायला लावतोस?*

ना परमेश्वर, ना माझे डॉक्टर्स मला समजावू शकले की मी हाता-पायांविना का जन्माला आलो. कारणाच्या अभावानं, मग ते वैज्ञानिक का असेना, मी अधिक हताश झालो. मी विचार करायचो की, त्यामागं जर कोणतं कारण असेल, आध्यात्मिक, वैद्यकीय, किंवा अन्य कोणतंही, तर परिस्थिती हाताळणं अधिक सुकर होईल. त्यानं दु:ख थोडं हलकं होईल.

अनेकदा मी एवढा निराश व्हायचो की शाळेत जायला नकार द्यायचो. यापूर्वी मी स्वत:ची कीव करायचो नाही. मी सतत माझ्यातल्या व्यंगावर मात करण्याच्या प्रयत्नात असायचो, सामान्य कृती करायचो, इतर मुलांसारखाच खेळायचो. बहुतेक वेळा मी माझ्या निश्चयी स्वभावानं आणि आत्मनिर्भरतेनं माझ्या आई-वडिलांवर, शिक्षकांवर आणि वर्गमित्रांवर छाप पाडायचो. तरीही आतून मी दुखावलेलाच होतो.

आई-वडिलांनी माझा पिंड हा आध्यात्मिक घडवला होता. मी नियमितपणे चर्चमध्ये जायचो, प्रार्थना आणि परमेश्वराच्या शक्तीवर माझा विश्वास होता. येशूनं माझ्या मनाची एवढी पकड घेतली होती की आम्ही जेवायला बसलेले असताना, मला हसायला यायचं. मला वाटायचं की तोही आमच्याच पंगतीत बसलेला आहे. हाता-पायांसाठी मी त्याची प्रार्थना करायचो, असा काही काळ गेला जेव्हा मी अपेक्षा करायचो की सकाळी मी जागा होईन तेव्हा मला हात-पाय फुटलेले असतील. एका वेळी केवळ एक हात आणि एक पाय मिळण्यावरही संतुष्ट राहण्याची माझी तयारी होती. परंतु जेव्हा मला तेही मिळायचं नाही तेव्हा मी परमेश्वरावर रागवायचो.

मला वाटायचं की मला निर्माण करण्यामागचा परमेश्वराचा हेतू मला कळलाय, जो की त्याच्या चमत्कारात मी त्याचा साथीदार व्हावं जेणेकरून लोकांना कळेल की तो खरोखरच आहे. मी प्रार्थना करायचो, "हे परमेश्वरा, तू जर मला हात-पाय दिलेस तर 'ते' दाखवत मी जगभर फिरेन आणि तुझा चमत्कार सगळ्यांना कळेल. मी टीव्हीवरून सगळ्यांना घडलेल्याची कल्पना देईन, मग साऱ्या जगाला परमेश्वराच्या शक्तीची कल्पना येईल." मी त्याला सांगत होतो की मला सारं कळलं होतं आणि माझ्या बाजूनं साऱ्याची पूर्तता करण्याची माझी तयारी होती. मला ती प्रार्थना आठवतेय, *"परमेश्वरा, मला कल्पना आहे की तू मला असा निर्माण केलंस, कारण मग तू मला हात-पाय देऊ शकशील आणि तो चमत्कार लोकांपुढे तुझी ताकद आणि तुझं प्रेम सिद्ध करेल."*

बालपणी मी शिकलो की परमेश्वर आपल्याशी वेगवेगळ्या प्रकारे संवाद साधत असतो. मला वाटलं की माझ्या हृदयात भावना निर्माण करून तो मला उत्तर देईल, पण तसं काही झालं नाही. मला काहीच जाणवलं नाही.

माझे आई-वडील मला सांगायचे, "केवळ परमेश्वर जाणतो की तू असा जन्माला का आलास?" मग मी परमेश्वराला विचारायचो, आणि तो उत्तर द्यायचा नाही. ती निष्फळ आवाहनं आणि ते अनुत्तरित प्रश्न यामुळे मी दुखावला जायचो, कारण तेव्हा मी स्वत:ला परमेश्वराच्या खूप निकट समजायचो.

मला इतर आव्हानांनाही तोंड द्यायचं होतं. आम्ही आमच्या एकत्र कुटुंबांपासून हजारो मैल दूर क्वीन्सलॅन्डला स्थलांतरित होणार होतो. माझ्या काका-काकूंचा आणि सव्वीस चुलत भावंडांचा माझ्याभोवतीचा मायेचा कोश माझ्यापासून हिरावला जाणार होता. स्थलांतराचा ताण माझ्या आई-वडिलांनाही जाणवत होता. त्यांचे दिलासे, त्यांचं प्रेम आणि

त्यांचा आधार मला लाभत असला, तरी मी त्यांच्यावर प्रचंड बोजा टाकत असल्याची माझ्या मनातली बोच काही दूर होत नव्हती.

जणूकाही मी माझ्या डोळ्यांवर काळी पट्टी बांधलेली असल्यामुळे माझ्या जीवनातला उजेड मला दिसत नसावा असं काहीतरी झालं होतं. मी कधी कोणाच्या उपयोगी पडू शकेन असं मला बिलकूल वाटत नव्हतं. मी, परमेश्वराची विचित्र अशी एक 'चूक' होतो, तसंच त्यानं लक्ष देण्यास विसरलेलं लेकरू होतो असंच मला वाटायचं. याविरुद्ध माझं मन वळवण्यासाठी माझे आई-वडील खूप प्रयत्न करायचे.

ते मला बायबल वाचून दाखवायचे, चर्चमध्ये घेऊन जायचे. रविवारच्या शाळेतले शिक्षक मला शिकवायचे की परमेश्वर सगळ्यांवर प्रेम करतो; परंतु माझं पाऊल मात्र माझ्या दु:खाच्या आणि संतापाच्या पलीकडे पडत नव्हतं.

काही बरे अनुभव यायचे, नाही म्हणायला रविवारच्या शाळेत इतर मुलांबरोबर, 'लहान मुलांवर येशू प्रेम करतो, जगातल्या साऱ्या मुलांवर, लाल आणि पिवळ्या, काळ्या आणि गोऱ्या, त्याच्या नजरेत ती अनमोल आहेत, आणि जगातल्या साऱ्या लहान मुलांवर येशू प्रेम करतो,' हे गाणं गाताना मला आनंद वाटायचा. मला आधार देणाऱ्या, माझ्यावर प्रेम करणाऱ्या लोकांच्या सहवासात मला ते गाणं आवडायचं. त्यानं मला दिलासा मिळायचा. त्याला माझी खूप काळजी होती यावर मला विश्वास असायचा, पण जेव्हा मी थकलेला असायचो तेव्हा कभिन्न विचार माझ्या मनात चंचुप्रवेश घेऊ लागायचे. मैदानावर, माझ्या व्हीलचेअरमध्ये बसून मी विचार करायचो; 'परमेश्वर इतर मुलांवर प्रेम करतो तसंच माझ्यावर करीत असेल तर त्यानं मला हात-पाय का दिले नाहीत? त्यानं मला त्याच्या इतर लेकरांपेक्षा एवढं वेगळं का घडवलं?'

तसे विचार नंतर नंतर दिवसाही किंवा आनंदी वातावरणातही माझ्या मनाला ग्रासू लागले. हताश विचार आणि माझं जीवन कायमस्वरूपी कठीणच जाणार ही जाणीव यांच्याशी मी झुंजत होतो. माझ्या प्रार्थनांना परमेश्वर प्रतिसाद देण्याची लक्षणं दिसत नव्हती. एकदा मी ओट्यावर बसून आई स्वयंपाक करताना पाहत होतो, जे मला नेहमी आवडायचं. त्या वेळी अचानक माझं मन निराशेच्या विचारांनी ग्रासलं गेलं. माझ्या मनात विचार आला की, तिथं राहून मी तिच्यावरचं ओझं होणं योग्य नव्हतं. मी ओट्यावरून खाली पाहिलं. कोणत्या कोनात झेपावल्यावर माझी मान मोडून मला मृत्यू येईल याचा मी अंदाज घेऊ लागलो. पण ते करण्यापासून मी स्वत:ला अडवलं, त्याचं प्रमुख कारण हे होतं की त्या प्रयत्नात जर का मला मृत्यू आला नाही, तर मला माझ्या नैराश्याचं कारण द्यावं लागलं असतं. आत्महत्येला प्रवृत्त करण्याएवढी निराशा असल्याच्या वस्तुस्थितीनं मी घाबरून गेलो. माझे विचार मी आईला बोलून दाखवायला हवे होते, पण मला लाज वाटत होती. मला तिला घाबरवायचं नव्हतं.

मी तरुण होता आणि त्यापेक्षाही माझ्यावर जिवापाड प्रेम करणारे लोक माझ्या भोवती होते तरीही मी त्यांना माझ्या मनातले विचार सांगत नव्हतो. म्हणजे माझ्याकडे साधनं होती, जी मी वापरत नव्हतो आणि तीच माझी चूक होती.

तुम्ही जर निराश होत असाल तर त्या निराशेचा सामना तुम्ही एकट्यानं करावा असं नाही. तुमच्यावर प्रेम करणाऱ्यांवर त्याचा ताण पडणार नाही. त्यांना तुम्हाला मदत करायची असते. तुम्ही त्यांच्याशी मोकळं होऊ शकत नसाल तर शाळेतल्या किंवा समाजातल्या व्यावसायिक समुपदेशकाची मदत घ्या. तुम्ही एकटे नाही आहात. मीही एकटा नव्हतो. पण मला ते आता कळलंय आणि तुमच्या बाबतीत तसं कधी होऊ नये असं मला वाटतं.

पण त्या वेळी मात्र मी निराशेच्या गर्तेत बुडालो होतो. मी निर्णय घेतला होता की माझ्या दु:खांचा शेवट करण्यासाठी मी माझ्या जीवनाचा शेवट करावा.

काळ आला होता.....

एका दुपारी शाळेतून आल्यावर मी माझ्या आईला मला बाथटबमध्ये ठेवायला सांगितलं; तसंच जाताना तिनं बाथरूमचं दार लोटून जावं असंही सांगितलं. ती बाहेर गेल्यानंतर मी माझे कान पाण्यात घातले. त्या शांततेत माझ्या मनात पुष्कळ विचार येऊ लागले. मला जे करायचं होतं त्याची योजना माझ्या मनात तयार होती.

परमेश्वर जर माझं दु:ख दूर करणार नसेल, आणि माझ्या जीवनाला काही हेतू नसेल... केवळ उपेक्षा आणि एकाकीपणा अनुभवण्यासाठी मी इथं असणार असेन... सगळ्यांसाठी मी लोढणं असेन आणि मला भविष्य नसेल... तर मी ते सगळं थांबवलं पाहिजे.

मी उल्लेख केल्याप्रमाणं, फुप्फुसात हवा साठवून घेऊन मी पाण्यावर तरंगत असे. आता मी अंदाज घेत होतो की पालथं पडण्यापूर्वी मी केवळ हवा फुप्फुसात भरून घ्यावी. पलटण्यापूर्वी मी श्वास रोखून धरावा? *मी खोल श्वास घ्यावा की अर्धवट? की मी माझी फुप्फुसं मोकळी करून मग पलटी मारावी?*

शेवटी, काही न करताच मी पलटी मारली. तोंड पाण्यात बुडाल्याबरोबर प्रतिक्षिप्त क्रियेनं मी श्वास रोखला. माझी फुप्फुसं मजबूत असल्यामुळे मी बराच वेळ तरंगत राहिलो.

मला श्वास लागल्यावर मी पुन्हा पलटी खाल्ली.

मी हे करू शकत नाही.

पण हताशतेचे विचार तसेच होते; मला इथून बाहेर पडायचंय. मला अदृश्य व्हायचंय. मी फुप्फुसातली बहुतेक हवा काढून टाकली आणि पुन्हा पलटी खाल्ली.

मला कल्पना होती की मी दहा सेकंद श्वास रोखून धरू शकतो, म्हणून मी मोजू लागलो... १०... ९... ८... ७... ६... ५... ४... ३...

मोजत असताना माझ्या मनात एक प्रतिमा साकारली. माझ्या थडग्यापुढ्यात आसवं ढाळणारे माझे आई-वडील. सात वर्षांचा माझा भाऊ आरोनही मला रडताना दिसला. ते

सर्व जण रडत होते, तो त्यांचा दोष असल्याचं म्हणत होते की, त्यांनी माझ्याकरिता आणखी करायला हवं होतं.

उर्वरित आयुष्यभर त्यांनी माझ्या मृत्यूसाठी स्वत:ला जबाबदार धरण्याचा विचार मला सहन झाला नसता.

मी स्वार्थी होत होतो.

मी पुन्हा पलटी खाल्ली आणि खोल श्वास घेतला. मी ते करू शकलो नाही. माझ्या कुटुंबावर एवढ्या हानीचा आणि अपराधीपणाचा बोजा टाकून मी निघून जाऊ शकलो नाही. पण माझी पीडा असह्य होती. त्या रात्री झोपताना मी आरोनला सांगितलं, "एकविसाव्या वर्षी आत्महत्या करण्याची माझी योजना आहे."

मी विचार केला की शाळा आणि कॉलेजपर्यंत मी निभावून नेऊ शकेन, पण त्यापुढची मला शाश्वती वाटत नव्हती. मला वाटत नव्हतं की इतर पुरुषांप्रमाणे मला नोकरी मिळेल किंवा माझं लग्न होईल. कोणा मुलीला माझ्याशी लग्न करावंसं वाटेल? म्हणजेच, एकविसावं वर्ष हाच माझ्या सफरीचा जणू अंत होता. अर्थात, त्या वेळच्या माझ्या वयासाठी तो काळही पुष्कळ वाटत होता.

"हे मी डॅडना सांगणार आहे," आरोन म्हणाला.

हे त्यानं कुणाला सांगायचं नाही असं बजावून, झोपण्यासाठी मी डोळे मिटून घेतले. त्यानंतर माझी जाणीव म्हणजे, 'डॅड' माझ्या बिछान्यावर बसल्याची होती.

"हे आत्महत्येचं खूळ काय आहे?" त्यांनी थेट विचारलं.

मृदू आणि आश्वासक स्वरात त्यांनी मला त्या सगळ्या गोष्टी सांगितल्या ज्या माझ्यापुढे वाढून ठेवलेल्या होत्या. बोलत असताना त्यांची बोटं माझ्या केसांतून फिरत होती, ते मला नेहमीच फार आवडायचं.

"आम्ही कायम तुझ्याबरोबर असू," त्यांनी मला दिलासा दिला. "सगळं काही ठीक होईल. मी तुला शब्द देतो की आम्ही कायम तुझ्यासाठी असू. तुझं सगळं उत्तम होईल, पोरा."

बरेचदा केवळ मायेचा स्पर्श आणि करुणामय दृष्टी, लहान मुलाच्या दु:खी हृदयाला आणि गोंधळलेल्या मनाला दिलासा देण्यासाठी पुरेशी असते. सगळं काही ठीक होईल हा माझ्या वडिलांचा दिलासा त्या क्षणासाठी पुरेसा होता. त्यांच्या दिलासादायक स्वरानं आणि स्पर्शानं त्यांनी मला पटवलं की आम्ही माझ्यासाठी काही मार्ग काढू यावर त्यांचा विश्वास होता. प्रत्येक मुलालाच आपल्या पित्यावर विश्वास ठेवायचा असतो, आणि त्या दिवशी त्यांनी मला तग धरण्याजोगं काहीतरी दिलं होतं. एका मुलाकरिता, त्याच्या वडिलांच्या दिलाशासारखा दुसरा दिलासा कोणता नसतो. अशा बाबतींमध्ये माझे डॅड दिलदार होते. आम्हा सर्वांसाठी प्रेम आणि आधार व्यक्त करण्यात कुशल होते. माझ्यासाठी सगळं

यथोचित कसं होईल याचं आकलन मला अजूनही झालं नव्हतं, पण माझ्या वडिलांनी मला तसं सांगितलं होतं, म्हणून माझा त्यावर विश्वास होता.

आमच्या संभाषणानंतर मला शांत झोप लागली. नंतरही मला नैराश्य येत राहिलं. माझं जीवन कसं उलगडत जाईल याची काही दृष्टी लाभण्यापूर्वी फार आधी मी माझ्या आई-वडिलांवर विश्वास ठेवला आणि आशेला बिलगून राहिलो. साशंकतेचे आणि भयाचे आणखीही अनेक अनुभव मी घेतले, पण त्यातला हाच सर्वांत वाईट होता. आत्ताही, इतरांप्रमाणेच मलाही कधी-कधी निराशा डाचते, पण त्या एका प्रसंगानंतर मी पुन्हा कधीच आत्महत्येचा विचारही केला नाही. मी जेव्हा मागं वळून त्या क्षणाकडे पाहतो आणि त्यानंतरच्या माझ्या जीवनाचा विचार करतो, तेव्हा मला माझ्या नैराश्यातून बाहेर काढल्याबद्दल मी केवळ परमेश्वराचे आभार मानतो.

आशेला बिलगून राहणं

चोवीस देशांमधली माझी भाषणं, माझ्या डीव्हीडीज आणि यू-ट्यूबवरले अब्जावधी व्ह्यूज यांच्या माध्यमातून असंख्य लोकांपर्यंत आशेचा संदेश देण्याचं दैवी भाग्य मला लाभलं. विचार करा, दहाव्या वर्षी मी आत्महत्या केली असती तर केवढ्या आनंदाला मी मुकलो असतो. भारतातल्या १,२०,०००, कोलंबियातल्या १८,००० आणि युक्रेनमधल्या ९,००० लोकांपुढे माझी जीवनकहाणी आणि मी जे त्यातून शिकलो ते सांगण्यास मी मुकलो असतो. कालांतरानं माझ्या हे लक्षात आलं की, त्या काळ्या दिवशी मी माझा जीव घेऊ शकलो नाही. (आत्महत्या करू शकलो नाही!) पण परमेश्वरानं मात्र 'तो' आपलासा केला. (संरक्षित केला!)

परमेश्वरानं माझा जीव घेतला आणि त्याला अधिक अर्थ, अधिक हेतू आणि अधिक आनंद बहाल केला, एवढा की ज्याचं कोणा दहा वर्षांच्या मुलाला आकलनही कधी होऊ शकणार नाही. जी चूक करण्याच्या उंबरठ्यावर मी पोहोचलो होतो ती तुम्ही करू नका.

१९९३ मधल्या त्या दिवशी मी सहाइंची पाण्यात पालथा पडून राहिलो असतो तर माझं तात्पुरतं दु:ख दूर झालं असतं, पण केवढा मोबदला देऊन? त्या निराश पोराला भविष्यातला तो आनंदी पुरुष दिसू शकणार नव्हता, जो हवाईमध्ये सी टर्टल्सबरोबर पोहतोय, कॅलिफोर्नियात सर्फिंग करतोय, किंवा कोलंबियात स्कुबा डायव्हिंग करतोय आणि त्या साहसांहूनही महत्त्वाचे ते जीव आहेत ज्यांना मी स्पर्शू शकलो नसतो.

मी केवळ एक छोटं उदाहरण आहे. पण कोणतीही महान व्यक्ती घ्या, मदर तेरेसा, महात्मा गांधी, रेव्हरंड मार्टिन लुथर किंग; पण त्यांनी काही ना काही भोगलंय– कारावास, हिंसा, अगदी खुनाची धमकीदेखील– पण त्याचबरोबर त्यांनी मनोमन विश्वास बाळगला होता की त्यांची स्वप्नं पूर्णत्वास जातील. तुम्ही जेव्हा निराश व्हाल, त्या वेळी ध्यानात ठेवा की तुमच्यासाठी पर्याय उपलब्ध असतो. तुम्हाला मदत हवी असेल तर ती मागून घ्या. तुम्ही

एकटे नाही आहात. तुम्ही चांगल्या दिवसांची कल्पना करू शकता आणि ते खरे करण्यासाठी पावलं उचलायला सुरुवात करू शकता.

लहान असताना मला कशाकशाला तोंड द्यावं लागत होतं याचा विचार करा आणि आता माझं जीवन कसं आहे ते पाहा. कोणाला ठाऊक असतं की भविष्यात तुमच्यासाठी केवढे उत्तम दिवस अथवा केवढं विस्मयकारक यश वाढून ठेवलेलं आहे? कोणाला ठाऊक असतं की कोणा दुसऱ्याच्या चमत्कारातून आपण किती जणांचं जीवन सुखी करू शकतो? म्हणूनच माझ्याबरोबर चला, हात-पाय नसलेल्या मनुष्याबरोबर... आशेनं भरलेल्या भविष्यात!

तीन

हृदयी पूर्ण दिलासा

बा यबलमध्ये श्रद्धेची व्याख्या आहे, 'ज्या गोष्टींची आशा आहे त्यांचं मूलतत्त्व, न दिसणाऱ्या गोष्टींचा पुरावा.' तुम्ही आणि मी श्रद्धेशिवाय जगू शकणार नाही, ज्याचा पुरावा नाही अशा कशावरतरी विश्वास ठेवल्याशिवाय. बरेचदा आपण श्रद्धेविषयी बोलतो ते धार्मिक दृष्टिकोनातून, पण आपल्या दैनंदिन जीवनात अनेक इतर प्रकारच्या श्रद्धा आहेत. एक ख्रिश्चन असल्यामुळे, मी माझ्या परमेश्वरावरल्या विश्वासानुसार जगतो. मी त्याला पाहू अगर स्पर्शू शकत नसलो तरी माझा त्याच्या अस्तित्वावर विश्वास आहे, आणि मी माझं भविष्य त्याच्या हातात सुपुर्द केलंय. उद्यामध्ये काय दडलंय याची मला कल्पना नाहीये. पण माझा त्याच्यावर विश्वास असल्यामुळे, उद्या कोणाच्या हातात आहे याची मला कल्पना आहे.

श्रद्धेचा झाला हा एक प्रकार. माझ्या जीवनातल्या बऱ्याच भागांवर माझी श्रद्धा आहे. अशा अनेक गोष्टी आहेत ज्या मला दिसत नाहीत, त्यांना मी स्पर्श करू शकत नाही किंवा ज्यांची मला संवेदना होत नाही, पण तरी त्यांच्या अस्तित्वावर माझा विश्वास आहे. ऑक्सिजनच्या अस्तित्वावर माझा विश्वास आहे, आणि आपल्या अस्तित्वासाठी त्याची आवश्यकता असल्याच्या विज्ञानाच्या म्हणण्यावरही माझा विश्वास आहे. ते असल्याचं मला माहीत आहे कारण मी आहे. मी जिवंत आहे, म्हणजे मी त्याचं श्वसन करतोय, म्हणजेच ते आहे, बरोबर?

जगण्यासाठी आपल्याला जशी ऑक्सिजनची आवश्यकता आहे, तशीच इतर काही न दिसणाऱ्या गोष्टींचीही गरज असते का? कारण आपण सर्व जण आव्हानांना सामोरे जातो. ती तुम्हाला आहेत. ती मलाही आहेत. आपल्या जीवनात अनेकदा असे प्रसंग उपस्थित होतात ज्यांच्यातून सुटण्याचा मार्ग आपल्याला दिसत नाही, आणि तिथंच श्रद्धेचा प्रवेश होतो.

केटी नावाच्या एका स्त्रीचा नुकताच मला एक मेल मिळाला, जिला तिच्या वैद्यकीय तक्रारींवरून कामावरून काढून टाकण्यात आलं होतं आणि अडचण म्हणजे तिला वीस शस्त्रक्रिया कराव्या लागणार होत्या. तिच्या एका पायात जन्मत:च एक हाड नव्हतं ज्यामुळे ती चालायला लागल्याबरोबर तिचा पाय कापावा लागला होता. आता विवाहित आणि तिशीत असलेल्या केटीनं मला लिहिलं होतं की ती सतत 'मीच का?' या प्रश्नावर विचार करीत राहते.

माझा एक व्हिडिओ पाहिल्यावर तिला जाणीव झाली की कधी-कधी आपल्याला 'मीच का?' याचं उत्तर मिळत नाही. आपण विश्वास बाळगायला हवा की, परमेश्वराची योजना योग्य वेळी आपल्याला उमजेल तोपर्यंत आपण श्रद्धेनं चालत राहावं.

"मी तुला मनापासून धन्यवाद देते. मला आता विश्वास वाटतो की, मीही, तुझ्याप्रमाणेच परमेश्वरानं निवड केलेली आहे," तिनं लिहिलं, "मी आशा करते की एक दिवस मी तुला प्रत्यक्ष भेटू शकेन, तुला मिठीत घेईन, आणि समोरचा उजेड दिसण्याकरिता तू माझे डोळे उघडलेस याबद्दल तुझे आभार मानेन."

केटीला शक्ती आणि आशा तेव्हाच प्राप्त झाली जेव्हा तिनं न दिसणाऱ्या अगर न समजणाऱ्यावर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतला. श्रद्धा याच तऱ्हेनं कार्य करते. तुमच्यापुढे अशी संकटं उभी राहतील ज्यांचं निवारण करणं शक्य नाही असं तुम्हाला सुरुवातीला वाटेल. अशा गोष्टींच्या उपायासाठी आपण वाट पाहत असू तेव्हा आपल्यापाशी केवळ श्रद्धा असेल आणि कधी-कधी, उपाय असेल, यावर केवळ विश्वास ठेवण्यानंच तुम्ही त्या संकटापलीकडे जाल.

म्हणूनच मी FAITH (श्रद्धा) या शब्दाला Full Assurance In The Heart याचा आद्याक्षरी शब्द म्हणतो. ज्या सगळ्यावर माझा विश्वास आहे त्याचा पुरावा मी कदाचित देऊ शकणार नाही, पण माझ्या मनात पूर्ण दिलासा असतो की नैराश्यात जीवन जगण्यापेक्षा श्रद्धेनं जीवन जगत असताना मी सत्याच्या अधिक निकट असतो. दर वर्षी हजारो विद्यार्थ्यांशी बोलत असताना, आपल्याला जे दिसत नाही त्यावर विश्वास ठेवण्याच्या कल्पनेचा मला प्रत्यय येतो. (सुरुवातीला ती लहानगी मला भितात. तसं का याची मला कल्पना नाही, कारण मी खरं तर त्यांच्याच उंचीचा असतो. मी त्यांना सांगतो की वयाच्या मानानं मी बुटका आहे.)

त्यांना आपलंसं करून घेण्यासाठी मी त्यांच्याबरोबर हास्यविनोद करतो. एकदा त्यांना माझ्या व्यंगाची सवय झाली की त्यांना माझ्या छोट्या पावलाबद्दल कुतूहल वाटू लागतं. ती त्याच्याकडे रोखून पाहताना किंवा दाखवताना मला दिसल्यावर मी त्यांना हलवून दाखवतो, त्यांना सांगतो की ती माझी चिकन ड्रमस्टिक आहे. मग त्यावर ती हसायला लागतात.

माझी बहीण मिशेल, जी माझ्यापेक्षा सहा वर्षांनी लहान आहे, तिनंच प्रथम माझ्या पावलाचं नामकरण केलं. आमचं कुटुंब अनेकदा लांबच्या सहलीवर जात असे. गाडीत आई-वडील पुढे बसत आणि आमचं भावंडांचं त्रिकूट मागच्या सीटवर. प्रवासाला एकदा सुरुवात झाली की इतर वडिलांप्रमाणंच आमच्या वडिलांनाही गाडी मध्ये थांबवायला आवडत नाही : आमच्या पोटात कावळे ओरडू लागल्यावर आम्ही पुढच्या सीटवर तसे संकेत द्यायचो.

शेवटी कहर झाल्यावर आम्ही थोडा वेडेपणा करायचो, आम्ही एकमेकांना चावण्याचा आव आणायचो. अशाच एका सहलीदरम्यान माझं पाऊल चोखण्याची इच्छा मिशेलनं

व्यक्त केली कारण ते 'चिकन ड्रमस्टिकसारखं' दिसतं म्हणे. त्यावर आम्ही हसलो आणि ते विसरूनही गेलो. त्यानंतर काही वर्षांनी मिशेलनं कुत्र्याचं पिल्लू घरी आणलं. मी जेव्हा जेव्हा त्याच्या टप्प्यात यायचो तेव्हा तेव्हा ते माझं पाऊल चोखायचं. मी त्याला दूर लोटायचो, पण ते पुन:पुन्हा चोखायला परत यायचं.

"पाहिलंस, माझ्या पपीलाही ते चिकन ड्रमस्टिकसारखं दिसतं," मिशेल म्हणाली.

मला ते आवडलं! तेव्हापासून मी शाळेतल्या मुलांपुढच्या माझ्या भाषणात ही गोष्ट सांगतोच. मग माझं डावं पाऊल त्यांना दाखवल्यावर मी त्यांना विचारतो की, मला एकच पाऊल आहे का. त्यांना प्रश्न पडतो, कारण त्यांना तर एकच पाऊल दिसतं, पण ती दोन असणं त्यांना स्वाभाविक वाटतं.

परंतु, बहुतेक मुलं काही दिसल्यावरच त्यावर विश्वास ठेवतात. बहुतेक वेळा ते मला सांगतात की, त्यांना वाटतं मला एकच पाय आहे. मग मी त्यांना माझा दुसरा त्याहूनही लहान असा उजवा पाय दाखवतो, छोटं डावं पाऊल, जे नेहमी झाकलेलंच असतं. कधी-कधी मी ते अचानक बाहेर काढून त्यांच्या पुढ्यात हलवतो. ती एकदमच घाबरून किंचाळतात. हे मजेशीर असतं कारण मुलं सडेतोड असतात. ती कबुली देतात की विश्वास ठेवण्यासाठी त्यांना ते दिसावं लागतं.

मग त्यांना मी उत्तेजन देतो, जसं मी आत्ता तुम्हाला देतोय की तुमच्या जीवनातही शक्यता आहेत यावर विश्वास ठेवा. कठीण समयीदेखील जीवनात पुढे सरकण्याची ती गुरुकिल्ली आहे. तुमच्या जीवनाच्या दृष्टीचं मार्गदर्शन हे तुम्हाला काय दिसतंय यावरून नव्हे, तर तुम्ही काय कल्पना करू शकता यावरून मिळवा. याला म्हणतात श्रद्धा!

उड्डाणप्रसंगी विश्वास ठेवा

माझी कल्पनाशक्ती परमेश्वराच्या डोळ्यांतून पाझरते. माझा त्याच्यावर विश्वास आहे. माझ्या हृदयात पूर्ण विश्वास आहे की हात-पाय नसूनदेखील मी विस्मयकारक जीवन साकारू शकेन. त्याचप्रमाणं, तुम्हालाही असंच वाटायला हवं की काहीही तुमच्या आवाक्याबाहेर नाही. तुम्ही श्रद्धा बाळगा की तुमच्या स्वप्नांची पूर्तता होण्यासाठी शक्य ते सर्व तुम्ही केलंत तर तुमच्या कष्टांचं चीज होईल.

कधी-कधी आपल्या विश्वासाची परीक्षा कष्टाचं चीज होण्यापूर्वीच घेतली जाते. २००९ मधल्या कोलंबियातल्या माझ्या भाषणांच्या दौऱ्यांदरम्यान मला त्याचं स्मरण झालं. दहा दिवसांमध्ये मला नऊ शहरांमध्ये भाषणं द्यायची होती. अल्प वेळेमध्ये पुष्कळ अंतर कापायचं असल्यामुळे माझ्या संयोजकांनी मला शहरा-शहरांतून फिरवण्यासाठी विमानाचा बंदोबस्त केला होता. या विमानप्रवासात आम्ही एकंदर आठ माणसं होतो. पैकी दोघे वैमानिक, दोघांचीही नावं मिग्वेल होती आणि त्यांना फारसं इंग्लिश बोलता येत नव्हतं.

अशाच एका प्रवासात अचानक विमानाचा कॉम्प्युटर ओरडू लागला, 'पुल अप! पुल अप!' आणि पॅसेंजर केबिनमधले सर्व जण दचकले.

आमच्या विमानाची उंची जसजशी कमी होत होती तसतसा कॉम्प्युटर अधीरपणे ओरडू लागला, "सिक्स हंड्रेड फीट!" "फाइव्ह हंड्रेड फीट!" "फोर हंड्रेड फीट!" त्याचबरोबर "पुल अप!" "पुल अप!" हा घोषाही चालू होता.

पण प्रवाशांपैकी कोणीही धास्तावलं नव्हतं. मी माझ्या मदतनिसाला विचारलं की, कॉम्प्युटरचं म्हणणं आपण दोघा मिग्वेलांना भाषांतर करून सांगावं का?

"आपली उंची कमी होतेय हे त्यांना कळलं नसेल असं तुम्हाला खरंच वाटतंय?" त्यानं उलट विचारलं.

त्यावर काय बोलावं मला सुचेना, पण कोणीच घाबरत नसल्याचं पाहून मीही स्वस्थ होण्याचा निर्णय घेतला. लवकरच विमान सुखरूप उतरल्यावर मला सुटल्यासारखं झालं. नंतर आमच्यापैकी एका दुभाष्यानं पायलट्सना सारं सांगितल्यावर दोघेही खो-खो हसले.

"कॉम्प्युटर काय सांगत होता ते आम्हाला कळत होतं, पण विमान उतरवत असताना आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करतो," मिग्वेल दोनने दुभाष्याकरवी सांगितलं. "निक, तुझ्या पायलट्सवर तुझी अधिक श्रद्धा असायला हवी."

ठीक आहे, मी कबूल करतो की क्षणभर का होईना, पण त्या उडणाऱ्या मिग्वेल द्वयीवरच्या माझ्या श्रद्धेबाबत मी शंका घेतली. पण बहुतेक प्रसंगी मी निश्चिंत असतो की परमेश्वर माझ्यावर आणि माझ्या जीवनावर लक्ष ठेवून आहे. माझ्या श्रद्धेच्या ताकदीचा एक पुरावा मी तुमच्यापुढे सादर करतो : माझ्या कपाटात मी बुटांचा एक जोड ठेवून दिलाय! मला खरोखरच विश्वास वाटतो की, एकना एक दिवस मी ते पायात घालून चालू शकेन. ते घडेल अथवा घडणारही नाही. पण त्या शक्यतेवर माझा विश्वास आहे. अधिक चांगल्या भविष्याची कल्पना तुम्ही करू शकलात तर त्यावर तुम्ही विश्वास ठेवू शकाल आणि तुमचा त्यावर विश्वास असेल तर तुम्ही ते प्राप्त करू शकाल.

अमर्याद दृष्टी

वयाच्या दहाव्या वर्षी मी मानसिक तणावाच्या फेऱ्यात सापडलो होतो तेव्हा मला कोणतंही शारीरिक दु:ख नव्हतं. तेव्हाही मला हात-पाय नव्हते, पण आत्ता मी जगतोय तसं परिपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक ते सर्वकाही त्या वेळीही माझ्यापाशी होतं – एक अपवाद वगळता. तेव्हा जे मला दिसायचं, केवळ त्याच्यावरच मी विसंबून असायचो. त्यामुळे माझं लक्ष केवळ माझ्या मर्यादांवर केंद्रित असायचं, शक्यतांवर नाही.

आपणा सर्वांनाच मर्यादा असतात. मी कधीच एनबीए स्टार होऊ शकणार नाही, पण ते ठीक आहे, कारण मी लोकांना त्यांच्या जीवनाचे स्टार होण्यासाठी प्रेरित करू शकतो. तुम्ही कधीच तुमच्या कमतरतांनुसार जगू नये. उलट, असं जगावं जसं की तुम्ही ते काहीही करू

शकाल ज्यांची तुम्ही स्वप्नं पाहाल. तुमची पीछेहाट झाली अथवा काही दु:खद प्रसंग घडला तरीही अनेकदा एखादा अनपेक्षित, अशक्यप्राय भासणारा कोणतातरी लाभ तुम्हाला प्राप्त होतो. ते कदाचित त्वरित घडणार नाही. तुम्ही असाही विचार कराल की त्यातून काय चांगलं निष्पन्न होईल. पण विश्वास ठेवा की जे घडतं ते भल्यासाठी – दु:खद घटनाही विजयात रूपांतरित होऊ शकतात, इष्टापत्ती घडू शकते.

अनुकूल समय

२००८मध्ये भाषणासाठी मी हवाईमध्ये गेलो असताना तिथं मला जगद्विख्यात सर्फर बेथनी हॅमिल्टन भेटली. तुम्हाला आठवत असेल की २००३मध्ये टायगर शार्कच्या हल्ल्यात तिला तिचा डावा हात गमवावा लागला होता. ते घडलं तेव्हा ती केवळ तेरा वर्षांची होती. या अपघातापूर्वी स्थानिक सर्फर्समध्ये तिनं आपलं नाव कमावलं होतं. पण त्या दुर्घटनेतून सावरून तिनं परमेश्वराचं कौतुक करून आणि त्याच्या वरदानाबद्दल त्याचे आभार मानून ती पुन्हा आपल्या क्रीडाप्रकाराकडे वळली. तेव्हा तिच्या धाडसामुळे आणि अचंबित करणाऱ्या तिच्या श्रद्धेमुळे तिचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलं. आता तीदेखील माझ्याप्रमाणेच, जगभर भ्रमण करीत लोकांना प्रेरणा देते आणि तिची श्रद्धा अवगत करवते.

तिचं ध्येय, ती म्हणाली होती, "लोकांना परमेश्वराविषयीच्या माझ्या श्रद्धेची कल्पना देणं आणि लोकांना कळू देणं की तो सर्वांवर प्रेम करतो आणि त्या दिवशी त्यानं माझी कशी काळजी घेतली हे सांगणं. मी इथं वास्तविक असायलाच नको होते, कारण त्या सकाळी मी माझं सत्तर टक्के रक्त गमावलं होतं."

त्या दिवशी नक्की काय घडलं होतं ते मला ती प्रत्यक्ष भेटेपर्यंत ठाऊक नव्हतं आणि मला कल्पना नव्हती की ती तरुणी तेव्हा मरणाच्या दारात पोहोचली होती. तिनं मला सांगितलं की, पाऊण तासाच्या अंतरावर असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये तिला नेलं जात असताना ती कशी प्रार्थना करीत होती आणि तिचे डॉक्टरही तिच्या श्रद्धेला बळ देण्यासाठी कसे तिच्या कानात पुटपुटत होते, "परमेश्वर कधीच तुझी साथ सोडणार नाही किंवा तुझ्याकडे पाठ फिरवणार नाही."

परिस्थिती अत्यंत बिकट होती. शेवटी ते हॉस्पिटलमध्ये पोहोचून तिच्या सर्जरीची तयारी करू लागले, तेव्हा कळलं की सगळी ऑपरेशन थिएटर्स व्यस्त होती. बेथनीची शुद्ध हरपत चालली होती. परंतु गुडघ्याचं ऑपरेशन असलेल्या एका पेशंटनं बेथनीच्या ऑपरेशनसाठी आपलं ऑपरेशन पुढे ढकललं, ज्यामुळे बेथनीवर त्वरित ऑपरेशन होऊ शकलं. गुडघ्याचं ऑपरेशन असणारा पेशंट कोण असेल, अंदाज करा.

बेथनीचे वडील.

हा चमत्कार नव्हे काय? त्यांच्या ऑपरेशनची तयारी झालेलीच होती. त्यामुळे डॉक्टरांनी केवळ बापलेकीची अदलाबदल केली. त्या ऑपरेशननं तिचा जीव वाचला.

बेथनी मुळात उत्तम तब्येतीची, त्यातून क्रीडापटू आणि विस्मयकारक सकारात्मक दृष्टिकोन असणारी असल्यामुळे तिच्या कोणत्याही डॉक्टर्सच्या अपेक्षेपेक्षा फारच अल्पावधीत ती ठणठणीत झाली. त्या हल्ल्यानंतर तीनच आठवड्यांमध्ये ती पुन्हा सर्फिंग करू लागली.

आमच्या भेटीदरम्यान तिनं मला सांगितलं की, परमेश्वरावरच्या तिच्या श्रद्धेमुळे तिनं निष्कर्ष काढला की तिचा एक हात गमावणं हे तिच्या आयुष्याच्या त्याच्या योजनेचा एक भाग होता. स्वत:बद्दल वाईट वाटण्याऐवजी तिनं ते स्वीकारलं आणि ती पुढे सरकली. ख्यातनाम सर्फर्सबरोबरच्या तिच्या पहिल्या स्पर्धेत तिनं तिसरं स्थान पटकावलं – केवळ एक हात असताना! ती म्हणते की, तिचा एक हात गमावणं हे बऱ्याच अंगांनी तिच्यासाठी वरदान ठरलं, कारण आता कोणत्याही स्पर्धेत ती जेव्हा चांगलं यश मिळवते, तेव्हा त्यामुळे अन्य लोकांना प्रेरणा मिळते की त्यांच्या जीवनालाही मर्यादा नाहायेत.

"माझा वापर करून घेण्याच्या प्रार्थनेला परमेश्वरानं नक्कीच प्रतिसाद दिलाय, लोक जेव्हा माझी हकिगत ऐकतात तेव्हा तोच त्यांच्याशी बोलतो," ती म्हणते, "लोक मला सांगतात की ते परमेश्वराच्या अधिक निकट पोहोचलेत, परमेश्वरावर विश्वास ठेवू लागलेत, आपल्या जीवनात त्यांना आशा दिसू लागली आहे, किंवा कठीण समय पार करण्यासाठी त्यांना प्रेरणा लाभली आहे. हे मी ऐकते तेव्हा मी केवळ त्याचं कौतुक करते, कारण त्यांच्यासाठी काही करणारी मी नसते – परमेश्वरच त्यांना मदत करीत असतो. मला एवढा आनंद वाटतो की परमेश्वरानं त्याच्या योजनेत मला सहभागी करून घेतलंय."

बेथनीच्या अद्भुत आत्मबलानं आनंदित होण्यावाचून तुम्हाला पर्याय उरत नाही. त्या दुर्घटनेनंतर तिनं सर्फिंग सोडून दिलं असतं तर कोणीच तिला बोललं नसतं. सर्फबोर्डवर संतुलन राखणं तिला पुन्हा पहिल्यापासून शिकावं लागलं, पण त्यातही तिनं कच खाल्ली नाही. तिनं केवळ विश्वास ठेवला की तिच्या बाबतीत एवढं वाईट घडूनही, त्यातूनही काही चांगलं निपजू शकेल.

लाटांवर स्वार

तुमचं आयुष्य जेव्हा जेव्हा तुमच्या योजनांचा आणि स्वप्नांचा ध्यास घेईल तेव्हा या विस्मयकारक मुलीच्या श्रद्धेचं स्मरण करा. ते घडेल. आपणा सर्वांनाच केव्हाना केव्हा अनपेक्षित लाटांचा सपकारा मिळतो. शक्यता हीच असेल की तुमची समस्या शार्क नसेल, पण कशामुळेही तुम्ही पडलात तरी या निश्चयी तरुण मुलीचा विचार करा जी जगातल्या सर्वांत हिंस्र शिकाऱ्यांपैकी एकाच्या हल्ल्यातून केवळ बचावलीच नाही, तर कधी नव्हे ते एवढ्या नव्या उमेदीनं तिनं आपल्या विस्मयकारक जीवनाची पुन्हा सुरुवात केली.

बेथनीनं मला एवढं प्रोत्साहित केलं की मला जे लहानपणापासून करायचं होत ते करण्यात तिनं मला मदत करावी, अशी मी तिला विनंती केली. ती मला सर्फिंग शिकवेल?

आणि आश्चर्य हे की मला वायकिकी बीचवर नेण्यास ती त्वरित तयार झाली.

ज्या ऐतिहासिक स्थळी हवाई राजे-राण्या पहिल्यांदा लाटांवर स्वार झाले होते तिथं सर्फिंग शिकण्याच्या कल्पनेनं मला स्फुरण चढलं होतं. परंतु आतून मी थोडा धास्तावलेला होतो. बेथनी माझ्यासाठी लाँगबोर्ड तयार करीत असताना तिनं टोनी मोनीझ आणि लान्स हूकानो या दोघा प्रख्यात सर्फर्सशी माझी ओळख करून दिली. ते दोघेही आमच्याबरोबर पाण्यात जाणार होते.

मी मागं उल्लेख केल्यानुसार, जीवनातली ध्येयं प्राप्त करताना स्वत:च्या क्षमतेविषयी तुम्ही विचार करीत असाल तर त्या कामात तुम्हाला हातभार लावणाऱ्यांवर आणि तुम्हाला मार्गदर्शन करणाऱ्यांवर तुम्ही विश्वास ठेवा. माझ्या या ध्येयाच्या बाबतीतही मी तेच केलं. सर्फिंगसाठी याहून चांगले साथीदार मला लाभले नसते. गवतावर बोर्ड ठेवून त्यांनी मला संतुलन शिकवायला सुरुवात केली.

ते आळीपाळीनं माझ्याबरोबर राहत होते, मला सूचना देत होते, मला उत्तेजन देत होते. बेथनीबरोबर समुद्रात घुसताना माझ्या मनात भयावह विचार आला की, आम्हा दोघांमध्ये मिळून आम्हाला तीनच हात-पाय होते आणि तेही बेथनीचे! सर्फर होण्याची कल्पना मला आवडली होती आणि मी पट्टीचा पोहणारा असल्यामुळे मला पाण्याची भीती वाटत नव्हती, पण एवढी वाकबगार मंडळी साथीला असूनही लाटांवरच्या बोर्डवर मी राहू शकेन याबाबत मी साशंक होतो. एका फेरीत एक मार्गदर्शक माझ्या बोर्डवर असताना मी ३६० अंशांची गिरकी घेतली. दुसऱ्या एका फेरीत मी माझ्या बोर्डवरून बेथनीच्या बोर्डवर उड्डाण केलं!

शेवटी माझा मलाच प्रयत्न करायचा होता. मला राहवत नव्हतं; पण मी थोटा होतो. नाइलाजानं सर्व जण तयार झाले. लाटेवर स्वार होताना माझं मला उडता यावं याकरिता त्यांनी बोर्डच्या पुढच्या बाजूला टॉवेल्स बांधून उंचवटा तयार केला, जे मला उपयुक्त वाटलं. मग लाटांमध्ये बोर्डनं गती पकडल्यावर मी माझे खांदे त्या उंचवट्यावर चढवून हळूहळू उभ्या स्थितीत येऊ शकत होतो. जिथं इच्छा आणि लाट असेल तिथं मार्ग आहे!

त्या दिवशी वायकिकीवर सर्फिंग कॉम्पिटिशन होती, त्यामुळे बीचवर पुष्कळ गर्दी होती आणि लोक कुतूहलानं आमच्याकडेच बघत होते. मी धास्तावलो होतो तरी तज्ज्ञांकडून मला पुष्कळ सल्ले मिळत होते.

"दोस्ता, तू खरंच पाण्यावर सर्फिंग करणारेस?"

"हात-पाय नसताना तू संतुलन कसं राखशील कोण जाणे, दोस्ता!"

"तुला पोहता येतं? तू शार्कपेक्षा वेगानं पोहू शकतोस का, दोस्ता?"

शेवटी एकदा पाण्यात गेल्यावर मला बरं वाटायला लागलं, तरंगणं आणि पोहणं माझ्यासाठी डाव्या हाताचा (?) मळ आहे. मी भरकटतसुद्धा जातो. त्यामुळे कुठं जाऊन ठेपेन याची मला कल्पना नसते. तरंगत-तरंगत ऑस्ट्रेलियातल्या माझ्या आई-वडिलांच्या परसात पोहोचल्याची कल्पनाही मी करून पाहिली.

तो दिवस सर्फिंगसाठी उत्तम होता. पाण्यात बेथनी माझ्या शेजारी होती, ती मला प्रोत्साहन देत होती. पण जेव्हा लाट पकडून उभा राहण्याचा मी प्रयत्न करे, तेव्हा मी बोर्डवरून कोसळे. मी सहा प्रयत्न केले, दर वेळी तेच.

मी हार मानणाऱ्यातला नाही. असंख्य लोक पाहत होते. असंख्य लोक व्हिडिओ शूटिंग घेत होते. माझ्या अपयशाचा व्हिडिओ मला यू-ट्यूबवर पाहायचा नव्हता. लहानपणी मी पुष्कळ स्केटबोर्डिंग केल्यामुळे मला ते आवडत होतं. शेवटी सातव्या प्रयत्नात मी लाट पकडली आणि मी उभा राहू शकलो. मला एवढा थरार वाटला, मला तुम्हाला सांगायला बिलकूल संकोच वाटत नाहीये की लाटांवर स्वार होत किनाऱ्यावर येताना मी एखाद्या शाळकरी मुलीसारखा किंचाळत होतो.

मी किनारा गाठत असताना असंख्य प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून, शिट्ट्या मारून माझं कौतुक केलं. मी अत्यंत आनंदी झालो होतो.

पुढचे दोन तास आम्ही लाटांशी खेळत होतो, जवळ-जवळ वीस फेऱ्या झाल्या. कॉम्पिटिशन असल्यामुळे तिथं बरेच फोटोग्राफर्स होते. त्यामुळे 'सर्फर'च्या मुखपृष्ठावर झळकणारी पहिली अननुभवी व्यक्ती होण्याचा मान मी मिळवला.

नंतर एका मुलाखतीत लान्स हूकानो म्हणाला : "या बीचवर मी माझं आयुष्य घालवलंय, आणि असं काही मी आत्तापर्यंत कधीच पाहिलं नाहीये. निकसारखा अत्युत्तेजित माणूस मी अजूनपर्यंत पाहिलेला नाही. त्याला ते आवडतं. त्याच्या धमन्यांतून बहुधा खारं पाणी वाहतं. हे सर्व पाहून मला असं वाटतं की काहीही शक्य आहे."

तो विचार पकडून ठेवा : 'काहीही शक्य आहे'. एखाद्या बलाढ्य आव्हानामुळे तुम्हाला पराभवाची जाणीव व्हायला लागत असेल तर विश्वास ठेवा की काहीही शक्य आहे. कदाचित त्या क्षणी तुम्हाला सुटकेचा मार्ग दिसत नसेल. तुम्हाला वाटत असेल की, जणू सारं जग तुमच्या विरोधात उभं ठाकलंय. पण विश्वास ठेवा की परिस्थिती बदलू शकते, उपाय सापडू शकतात, आणि अनपेक्षित ठिकाणांहून तुम्हाला साहाय्य लाभू शकतं. मग काहीही शक्य होऊ शकतं!

जर हात-पाय नसलेला इसम जगातल्या एका मोठ्या बीचवर सर्फिंग करू शकत असेल, तर तुमच्यासाठी तर काहीही आणि प्रत्येक गोष्ट शक्य आहे!

श्रद्धेला मूळ धरतं

बायबलमधल्या अनेक उपदेशपर गोष्टींपैकी एक सुपरिचित कथा आहे ती बी पेरणाऱ्या शेतकऱ्याची. एक शेतकरी सगळीकडे बिया पेरतो. त्यातल्या काही रस्त्यावर पडतात ज्या पक्षी खाऊन टाकतात. काही खडकांवर पडतात ज्यामुळे त्यांना कधीच मूळ धरत नाही. इतर काही काटेरी झुडपांमध्ये पडतात ज्यामुळे त्यांची वाढ खुंटते. परंतु केवळ सुपीक

मातीवर पडलेल्या बियांनाच कोंब फुटतात, ते वाढतात, त्यांची पिकं होतात आणि मुळात पेरलेल्या बियांपेक्षा अधिक बिया त्या निर्माण करतात.

आपल्या आयुष्यात आपल्याला बिया केवळ मिळत नाहीत, तर त्या आपण आपल्या हृदयाच्या सुपीक मातीत धारण करून ठेवतो. आव्हानं जेव्हा आपल्याला दबवून ठेवतात, तेव्हा आपण आपल्या चांगल्या जीवनाच्या स्वप्नांकडे पाहू शकतो. ही स्वप्नं जीवनात येणाऱ्या वस्तुस्थितींच्या बियांचं काम करतात. आपली श्रद्धा म्हणजे त्या बियांमध्ये जीव ओतणारी सुपीक माती होय!

जे कोणी माझ्यावर प्रेम करतात ते नेहमीच मला प्रोत्साहन देत असतात. त्यांनी माझ्या हृदयात बिया रुजवल्या. त्यांनी मला दिलासा दिला की माझ्याकडे अशी वरदानं आहेत जी इतरांना लाभ देतील. कधी-कधी मी त्यांच्यावर विश्वास ठेवला, परंतु कधी-कधी नाही. पण त्यांनी कधीच माझी साथ सोडली नाही. त्यांना कल्पना होती की कधी-कधी ते दगडांवर किंवा झुडपांच्या गर्दीत पेरणी करीत होते, तरीही त्यांना विश्वास वाटत होता की त्यांच्या बियांना मुळं धरतील.

दररोज मी शाळेत जात असताना माझे आई-वडील बिया पेरायचे : 'तुझा दिवस चांगला जाऊ दे, निकोलस! तू तुझे पूर्ण प्रयत्न कर आणि बाकी सारं परमेश्वर पाहून घेईल!''

कधी-कधी माझ्या मनात यायचं की, होय, होय परमेश्वराची विनोदबुद्धी फारच विचित्र आहे, कारण मला कल्पना आहे की आज शाळेत मुलं माझी टर उडवणार आहेत. आणि अगदी तसंच व्हायचं, मी शाळेत पोहोचल्या-पोहोचल्या कोणीतरी मला उगाच सांगायचं की माझ्या व्हीलचेअरचा टायर पंक्चर आहे किंवा दुसरा कोणी मुलगा म्हणायचा की, त्याला माझा वापर पायपुसणं म्हणून करायचाय, गमतीदारच नाही का?

अशा निराशापूर्ण दिवसांना माझ्या आई-वडिलांचे दिलासादायक शब्द फोल ठरायचे. त्यांचं पोषण करणारं काहीच उपलब्ध नसायचं. ज्या परिस्थितीत माझा जन्म झाला होता त्याविषयी माझ्या मनात अत्यंत कटू भावना उत्पन्न व्हायची.

परंतु, आत्महत्या करण्याच्या माझ्या प्रयत्नानंतरच्या महिन्यांमध्ये आणि वर्षांमध्ये त्यांचं प्रोत्साहन हे सुपीक मातीवरच पडलं. त्याचा एक भाग म्हणजे माझ्या निश्चयानं आणि माझ्या मोकळ्या स्वभावानं मी माझ्या शाळकरी मित्रांना आपलंसं केलं. अजूनही मी नैराश्याचे दिवस अनुभवीत होतो, पण त्यांची संख्या मात्र आता रोडावली होती. महान प्रेरणादायी लेखक नॉर्मन व्हिन्सेन्ट पिली एकदा म्हणाले होते, "तुमचे जीवन तुम्हाला केवढेही कभिन्न का वाटेना, पण पॉसिबिलिटेरियन व्हा. तुमची दृष्टी उंचवा आणि शक्यता पाहा. त्या कायम पडताळत राहा, कारण त्या नेहमीच तिथं असतात."

तुम्ही कायम प्रेसबायटेरियन किंवा रोटरियन असालच असं नाही, पण तुम्ही नेहमी नोंदणीकृत *पॉसिबिलिटेरियन* असलंच पाहिजे. तुमच्या जीवनासाठीच्या शक्यतांविना तुम्ही

कुठं असाल? आपल्यापैकी कोणीही कुठं असेल? आपल्या भविष्याविषयीच्या आपल्या आशाच आपल्याला गती देतात. अटळ कठीण प्रसंगांमधून आणि निराशेतून पुढे सरकवण्यासाठी त्याच आपल्याला चालना देतात.

माझा पॉसिबिलिटेरियन दृष्टिकोन माझ्या जीवनात सुरुवातीलाच दृग्गोचर होऊ लागला. मी सहा-सात वर्षांचा असतानाच मी माझं पहिलं पुस्तक लिहिलं आणि चित्रित केलं. त्याचं शीर्षक होतं, 'युनिकॉर्न, ज्याला पंख नव्हते'. ती कल्पना कोठून आली हे काही रहस्य नव्हतं, परंतु मला म्हणावंसं वाटतं की, माझी ती छोटी नीतिकथा, जी माझ्या स्वत:च्या जीवनावर बेतलेली होती, ती श्रद्धेविषयी चांगला संदेश देऊन जाते.

एक एकशृंगी आई असते आणि तिला एक बाळ असतं. ते बाळ मोठं होतं तेव्हा त्याला पंखच नसतात.

आईला प्रश्न पडतो, 'त्याच्या पंखांचं काय झालं?'

जेव्हा ते बाळ फिरायला जातं तेव्हा त्याला दिसतं की, बाकीचे एकशृंगी आकाशात उडत होते. तेवढ्यात एक मुलगा त्याच्यापाशी येतो आणि त्याला विचारतो, "तुझ्या पंखांना काय झालं?"

एकशृंगी उत्तर देतो, "मला पंख फुटलेच नाहीत."

तो मुलगा म्हणतो, "तुझ्यासाठी प्लॅस्टिकचे पंख तयार करण्याचा मी प्रयत्न करतो."

तसे पंख तयार करायला त्याला एक तास लागतो.

पंख तयार झाल्यावर तो एकशृंगीला विचारतो की, त्याला त्याच्यावर स्वार होऊ दे का? एकशृंगी त्याला होकार देतो.

तो मुलगा त्याच्यावर स्वार झाल्यावर एकशृंगी दौडू लागतो आणि नंतर हवेत उडू लागतो. तो आनंदानं ओरडू लागतो, "मी उडायला लागलो! मी उडायला लागलो!"

एकशृंगीनं उडणं थांबवल्यावर तो मुलगा त्याच्या पाठीवरून उतरतो. मग एकशृंगी पुन्हा आकाशात उडायला लागतो.

तो लहान मुलगा ओरडून एकशृंगीला म्हणतो, "एकशृंगी, तुझं अभिनंदन!"

तो लहान मुलगा घरी परततो. तो आपल्या आईला, दोन बहिणींना आणि एका भावाला एकशृंगीची सारी कथा सांगतो.

तो एकशृंगी नंतर आनंदानं आपलं जीवन जगू लागतो.

समाप्त!

आपणा सर्वांनाच शेवटपर्यंत आनंदी जीवन जगायचं असतं. आपण कठीण प्रसंगांवर मात करू शकू किंवा चांगल्या काळाचा उपभोग घेऊ शकू याचा तुम्हाला विश्वास वाटत असला तरी निराशेचे प्रसंग हटकून येतातच. परंतु आपलं ध्येय हवं, ते आनंदी शेवटाचं. मग त्यासाठी प्रयत्न का नाही करायचे?

धीराचं फळ

चौदा देशांना भेटी देण्याच्या ध्येयानं 'लाइफ विदउट लिंब्स'च्या माझ्या चमूनं २००८मध्ये माझ्यासाठी 'वर्ल्ड आउटरीच टूर'चं नियोजन केलं. नियोजनाच्या पहिल्या टप्प्यात आम्ही खर्चाचं अंदाजपत्रक तयार केलं आणि पैसा उभा करण्यासाठीची मोहीम उघडली. त्या वेळी असल्या मोहिमेच्या कामाचा अनुभव असणारी माणसं आमच्याकडे नव्हती, ज्यामुळे अर्थातच पैसा उभा करण्यात आम्हाला अपयश आलं. मिळालेली रक्कम आमच्या आवश्यकतेपेक्षा फारच कमी भरली, केवळ एक तृतीयांश. पण तरीही मी परमेश्वराला स्मरून दौऱ्याचा प्रारंभ केला आणि कोलंबिया, युक्रेन, सर्बिया आणि रोमानिया या देशांना भेटी देऊन आलो. मी घरी परतलो आणि माझ्या सल्लागारांनी मला सांगितलं की, उर्वरित दौऱ्यासाठी आता आमच्याकडे पैसे शिल्लक नव्हते.

माझे काका बाटा, हे कॅलिफोर्नियातले यशस्वी उद्योजक, आमच्या समितीवर होते. त्यांनी निर्णय घेतला की पुढचे दोन मुक्काम मी रद्द करावेत. आणि त्याचं कारण केवळ अपुरा पैसा हे नव्हतं.

"आपल्याला सतत संदेश मिळत आहेत की, भारतातल्या अस्थैर्यामुळे, विशेषत: मुंबईतल्या आणि तसंच इंडोनेशियातल्यादेखील, तिथं प्रवास करणं सुरक्षित असणार नाही," ते म्हणाले, "तसंही आपल्याकडे पैसा अपुरा असल्यामुळे, या दोन्ही ठिकाणी जाण्याचं पुन्हा केव्हातरी बघू."

माझे काका सुज्ञ आहेत. त्यामुळे माझं त्यांच्याशी दुमत झालं नाही. माझा त्यांच्यावर विश्वास असल्याचं मी त्यांना सांगितलं. मग मी फ्लोरिडातल्या माझ्या भाषणासाठी रवाना झालो, जिथं केवळ गर्दी आवरण्यासाठी ४५० स्वयंसेवक हजर होते. गर्दीला स्फूर्ती देण्यासाठी मी गेलो होतो, पण गर्दीनंच मला प्रोत्साहन दिलं. कॅलिफोर्नियाला परतताना, फ्लोरिडातल्या गर्दीनं मला एवढं उत्तेजित केलं की नियोजनाप्रमाणं 'वर्ल्ड टूर' करण्याचं मी ठरवून टाकलं.

मार्गदर्शनासाठी मी प्रार्थना करीत राहिलो. भारत आणि इंडोनेशिया या दोन देशांना भेटी देण्यासाठी आवश्यक पैसा नव्हता आणि सुरक्षेची हमी नव्हती तरी तिथं जाण्याची माझी ओढ कायम होती. मला मनातून वाटत होतं की, मी माझं सेवेचं कामं चालू ठेवावं, बाकी सगळं आपोआप नीट जुळून येईल. द्रव्याऐवजी श्रद्धेवर विसंबून दौरा पूर्ण करण्याच्या माझ्या कल्पनेवर विचारविनिमय करण्यासाठी बाटा काकांनी मला त्यांच्या घरी जेवायला बोलावलं.

जेवता-जेवता चर्चा चालू असताना, परिस्थितीविषयी मी खूप भावुक झालो. हे मी केलंच पाहिजे असं मला राहून राहून वाटत होतं. माझा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यामागचं माझं वेड बाटाकाका समजू शकतात.

“पाहू, पुढच्या काही आठवड्यांमध्ये प्रभू आपल्याला कोणत्या मार्गानं नेतो ते,” ते शांतपणे उद्गारले.

आव्हानांना सामोरं जाताना तुम्ही कधी हात टेकू नका. तुम्ही त्यांच्यापासून पळूनही जाऊ नका. तुम्ही परिस्थितीचं आकलन करून घ्या, उत्तरांचा शोध घ्या आणि श्रद्धा बाळगा की जे काही घडेल त्यातून चांगलंच काहीतरी निष्पन्न होईल. धीर धरणं अत्यावश्यक आहे. तुम्ही बिया पेरा. तुम्ही वादळांना तोंड द्या. तुम्ही पिकाची वाट पाहा. तुम्ही अडथळ्यांना सामोरे जाल तेव्हा बहुधा खुळ्यासारखं काही करू नका. तुम्ही अडथळ्यावर डोकं आपटत राहू नका. तुम्ही पराभव स्वीकारू नका. प्रत्येक अडथळ्याला काही अर्थ असतो असं समजून सर्वोत्तम उत्तराचा शोध घेत राहा.

दौरा पूर्ण करण्यासाठी आवश्यक पैसा आमच्याकडे नव्हता; त्यामुळे अट्टाहासानं दौरा पूर्ण करून आमच्याजवळ आधीच उपलब्ध नसलेला पैसा आम्ही खर्च करू शकत नव्हतो. आम्ही स्वत:ला प्रार्थनेत गुंतवून घेतलं. आम्ही उत्तरं शोधीत राहिलो. आम्ही विश्वास बाळगला की आज जे दार बंद आहे ते उद्या, नाहीतर परवा, कुठल्या दुसऱ्या संधीसाठी नक्कीच उघडेल. लक्षात ठेवण्यासारखा एक महत्त्वाचा मुद्दा असा की, तुम्हाला मार्ग जरूर सापडेल जोवर तुम्ही त्याचा शोध घेत राहाल. तुम्हाला तुमची ध्येयं परिस्थितीनुरूप फिरवावी, वळवावी लागतील. परंतु जोवर तुमचा श्वास चालू असेल, तोवर तुम्ही लक्षात ठेवावं की संधी अजून उपलब्ध आहेत.

हे सांगितल्यावर मला तुम्हाला हेही सांगायचंय की, आमच्या प्रार्थनांना प्रतिसाद म्हणून आम्हाला एक सेंटही मिळाला नाही. पण नंतर मात्र अद्भुत घटनांची मालिकाच उलगडत गेली.

बाटाकाकांबरोबर झालेल्या जेवणानंतर काही दिवसांनी, ब्रायन हार्ट नावाच्या व्यक्तीनं, ज्यानं माझं फ्लोरिडातलं भाषण ऐकलं होतं, आम्हाला फोन केला आणि कळवलं की त्याला आमच्या संस्थेला मोठी देणगी द्यायची होती.

त्यानंतर इंडोनेशियातल्या आमच्या माणसांनी कळवलं की त्यांनी हाँगकाँगमध्ये दोन स्टेडियम्स भाड्यानं मिळवली होती. त्यांनी असाही शब्द दिला की जर आम्ही तिथं गेलो तर सर्व खर्च उचलण्यासाठी ते तयार होते.

त्यानंतर दोनच दिवसांनी कॅलिफोर्नियातल्या एका संस्थेनं एवढी मोठी रक्कम आम्हाला दिली की दौऱ्याचा उर्वरित खर्च त्यातून भागणार होता.

थोड्या दिवसांच्या अवधीतच, पैशाचा आमचा प्रश्न निकालात निघाला. आम्ही जाणार असलेल्या काही ठिकाणी सुरक्षेचा प्रश्न तसाच होता, परंतु आम्ही परमेश्वरावर हवाला ठेवला.

परमेश्वरी वरदहस्त

जे होतं ते भल्याकरिता, असं मी म्हटलेलं आठवतंय? पैशांच्या अभावी आम्ही आमच्या भारतभेटीचं वेळापत्रक बदललं आणि पैसे मिळाल्याबरोबर आम्ही तिकडं गेलोही, पण वेळेत फरक झाला तो एका आठवड्यानं.

या एका आठवड्यानं बहुधा आमचे जीव वाचवले. आम्ही मुंबई सोडल्यानंतर दोनच दिवसांनी, आम्ही भेटी दिलेल्या तीन ठिकाणांवर अतिरेकी हल्ले झाले. ताज हॉटेल, विमानतळ आणि रेल्वे स्टेशन. या तीन ठिकाणी झालेल्या हल्ल्यात १८० लोक दगावले, तर ३०० जखमी झाले.

आमच्या मूळ वेळापत्रकानुसार त्या हल्ल्याच्या वेळीच आम्ही मुंबईत असणार होतो, त्याच ठिकाणांवर. तुम्ही म्हणाल की, आम्ही नशीबवान होतो, पण माझी श्रद्धा आहे की आम्हाला न दिसलेली योजना परमेश्वराच्या डोक्यात होती म्हणूनच भविष्यावर श्रद्धा ठेवणं आणि आपल्या ध्येयाप्रत जाण्याचं काम सुरू ठेवणं, वाटेतल्या अडथळ्यांवर मात करीत राहणं हे अत्यंत महत्त्वाचं आहे.

जीवनात अग्रेसर

या प्रकरणाची सुरुवात मी माझ्या छोट्या डाव्या पावलानं केली जे माझ्यासाठी एक उपयुक्त साधन आहे. मला हे छोटं पाऊल असल्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवंत समजतो, कारण त्याच्याशी जुळवून घेण्यासारखी लहान-मोठी यंत्रं तयार करण्यात संशोधक मग्न आहेत. त्यातूनच मला पायानं वापरण्याजोगी जॉयस्टिक आणि टच-स्क्रीनसारखी साधनं मिळाली. हात-पाय नसूनदेखील मी अनेक अंगांनी समृद्ध जीवन जगू शकेन ज्याची कल्पना मी अथवा माझ्या आई-वडिलांनी माझ्या लहानपणी करणं शक्यही नव्हतं. त्या वेळी माझ्या जीवनातल्या चांगल्या शक्यता धूसर होत्या. पण आधुनिक तंत्रज्ञान तसंच श्रद्धा बाळगण्याच्या शक्तीनं मी माझ्या मर्यादांवरही विजय मिळवला.

तुमचं जीवन कितीही कठीण असो, केवढंही क्रूर अथवा निर्दयी असो, तुम्ही तिथं पाय रोवून उभं राहिलं पाहिजे. मी या जगात अवतरलो तेव्हाची माझी स्थिती फारच वाईट होती, पण तरीही त्यातून मी माझ्यासाठी परिपूर्ण जीवन कोरून काढू शकलो आणि तुम्ही जर का मला अपवाद समजणार असाल, तर माझ्यासाठी आदर्श असणाऱ्या स्व. ख्रिस्टी ब्राउन यांच्या जीवनाच्या कमाईचा विचार करा.

ख्रिस्टी यांचा जन्म १९३२ मध्ये डब्लिन, आयर्लन्ड इथं झाला. ते २२ भावंडांमध्ये दहावे होते आणि २२ पैकी फक्त १३ भावंडांनीच बालपणापलीकडलं जीवन पाहिलं. ख्रिस्टी यांना हात-पाय होते, पण ते अशा तऱ्हेनं पंगू होते की त्यांना हालचाल करता यायची नाही आणि तोंडानं केवळ आवाजच करता यायचं, बोलता यायचं नाही. त्या वेळी डॉक्टर्सना कल्पना

नव्हती की त्यांच्यात काय गडबड होती. काही वर्षांनंतर त्यांचं निदान झालं की त्यांना जन्मतानाच मेंदूला इजा झालेली होती.

ख्रिस्टी नीट बोलू शकत नसल्यामुळे, अनेक वर्षं डॉक्टर्सचं मत होतं की ते बौद्धिकदृष्ट्याही अपंग होते. त्यांची आई आग्रहानं सांगायची की, त्यांना बौद्धिक समस्या नव्हती – ते केवळ संवाद साधू शकत नव्हते. ती आणि कुटुंबातले अन्य सदस्य त्यांच्यावर खूप परिश्रम घ्यायचे. त्यानंतर कधीतरी एक दिवस ख्रिस्टी आपल्या बहिणीकडून काहीतरी घेत असताना त्यांनी त्यांच्या डाव्या पावलानं खडूचा तुकडा उचलला. त्यांच्या शारीरिक व्यंगामुळे त्यांचा तो एकच अवयव असा होता ज्यावर त्यांचं नियंत्रण होतं.

त्यांच्या त्या डाव्या पावलानं ते लिहायला, चित्र काढायला आणि रंगवायला शिकले. त्यांच्या कुटुंबीयांनाही, माझ्या कुटुंबीयांप्रमाणंच, त्यांना शक्य तेवढं सामान्य जीवन जगू द्यायचं होतं. त्यामुळे ते त्यांना सुरुवातीला ढकलगाडीतून आणि त्यानंतर स्वयंचलित गाडीतून फिरवायला न्यायचे. माझ्याप्रमाणेच तेही पट्टीचे पोहणारे झाले. त्यानंतर त्यांची आई एका डॉक्टरांना भेटली ज्यांनी त्यांना जॉन हॉपकिन्स हॉस्पिटलमध्ये भरती करून घेतलं. कालांतरानं त्या डॉक्टरांनी ख्रिस्टी आणि त्यांच्याप्रमाणेच जन्मताना मेंदूला इजा झालेल्यांसाठी खास हॉस्पिटल उभं केलं.

त्यांनीच ख्रिस्टींना वाङ्मयाशी ओळख करून दिली आणि काही प्रसिद्ध आयरिश लेखकांनी त्यांना कवीच्या आणि लेखकाच्या स्वरूपात स्वत:ला व्यक्त करण्यासाठी प्रेरित केलं. त्यांचं पहिलं पुस्तक 'माय लेफ्ट फूट' ही त्यांची स्मृतिचित्रं होती, जे पुढे वाढवून 'डाउन ऑल दि डेज' झालं. ज्याचा विक्रमी खप झाला आणि ज्यावर चित्रपटही निघाला, ज्यात डॅनिएल डे-लेविसनं त्यांची भूमिका साकारली. योगायोग असा की, डॅनिएल डे-लेविस हा ख्रिस्टींचा लेखक मित्र सेसिल यांचा मुलगा होता. डॅनिएल डे-लेविस याला त्या भूमिकेसाठी बेस्ट अॅक्टरचा ऑस्कर पुरस्कार मिळाला. ख्रिस्टींनी एकंदरीत सहा पुस्तकं प्रकाशित केली आणि ते एक उत्तम चित्रकारही होते.

ख्रिस्टी ब्राउन आणि त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या भविष्याच्या चिंतेत घालवलेल्या कभिन्न काळाचा विचार करा. ते त्यांच्या संत्रस्त देहाचा केवळ एक छोटासा अवयव हलवू शकत होते. तोंडानं ते केवळ काही आवाज काढू शकायचे. एवढं असूनही ते उत्तम लेखक, कवी आणि चित्रकार झाले आणि ते विस्मयकारक जीवन जगले ज्यावर एक पुरस्कारप्राप्त चित्रपटही निघाला.

तुमच्यासाठी पुढे काय वाढून ठेवलेलं असेल? तुमची कथा कशी उलगडत जाईल हे पाहण्यासाठी तुम्ही घट्ट पाय रोवून का उभे राहणार नाही?

पूर्ण दृष्टी

बालपणात अनेकदा माझा दृष्टिकोन मर्यादित असायचा. माझ्या जीवनाविषयीचा माझा दृष्टिकोन एवढा आत्मकेंद्री होता की, माझ्यापेक्षा वाईट परिस्थितीत जगणारे आणखीही अनेक लोक होते, ख्रिस्ती ब्राउन यांच्यासारखे, याची मला कल्पनाही नव्हती. त्यानंतर वयाच्या तेराव्या वर्षी एका ऑस्ट्रेलियन माणसाच्या अपघाताविषयीची बातमी मी वाचली. माझ्या आठवणीप्रमाणे तो लकव्यानं ग्रस्त झाला होता ज्यामुळे तो चालू-बोलू शकत नव्हता आणि उर्वरित आयुष्य त्याला बिछान्यात आडवं पडून व्यतीत करावं लागणार होतं. मी कल्पनाच करू शकत नव्हतो की ते केवढं भयंकर असेल.

त्या बातमीनं माझे डोळे उघडले आणि माझा दृष्टिकोन विस्तारला. मला जाणीव झाली की हात-पाय नसूनदेखील, कृतज्ञ भावानं मी जगावं असं बरंच काही माझ्या जीवनात होतं, माझ्या जीवनात पुष्कळ शक्यता होत्या.

आपल्या प्राक्तनावर विश्वास ठेवण्यात बरीच शक्ती असते. तुम्ही पर्वत इकडचे तिकडे करू शकता. शक्यतांच्या परिपूर्णतेविषयीची माझी जागृती ही धिमी प्रक्रिया होती. वयाच्या पंधराव्या वर्षी मी जॉनच्या उपदेशातली एका आंधळ्याची कथा वाचली. तो जन्मापासून आंधळा होता, आणि येशूच्या अनुयायांनी त्याला पाहिल्यावर आपल्या नेत्याला प्रश्न केला, "पाप कोणी केलं, त्यानं की त्याच्या माता-पित्यानं, ज्यामुळे तो आंधळा जन्माला आला?"

हा प्रश्न तोच होता जो मी स्वत:ला विचारला होता. माझ्या आई-वडिलांनी काही चूक केली होती? मी काही चुकीचं वागलो होतो? मग त्याशिवाय का मी हाता-पायांविना जन्माला आलो होतो?

येशूचं उत्तर होतं, "ना त्यानं, ना त्याच्या माता-पित्यानं पाप केलं होतं, परंतु परमेश्वराचं कार्य त्याच्याकरवी उघड व्हावं हा त्यामागचा त्याचा हेतू होता."

आंधळ्यानं जेव्हा त्यांच हे उत्तर ऐकलं तेव्हा स्वत:च्या आयुष्याबद्दलचा त्याचा दृष्टिकोन बदलला आणि त्याचबरोबर त्याच्या आयुष्याच्या शक्यताही. आता तुम्ही विचार करा की, माझ्या वेगळेपणाची, पंगुत्वाची, इतरांवरच्या अवलंबनाची तीव्र जाणीव असणाऱ्या, पौगंडावस्थेतील माझ्यासारख्या मुलावर त्या कथेचा काय परिणाम झाला असेल. अचानक मला नवी शक्यता दिसली. मी कोणावर ओझं नव्हतो. मी अपूर्ण नव्हतो. मला ती शिक्षा नव्हती. परमेश्वरानं मला तसं घडवलं होतं, माझ्याकरवी त्याचं कार्य उघड करण्यासाठी.

वयाच्या पंधराव्या वर्षी मी बायबलमधला तो भाग वाचला आणि कधी अनुभवली नव्हती अशी मनाची शांती मी अनुभवली. मी स्वत:ला सातत्यानं प्रश्न करायचो की मी हाता-पायांविना का जन्माला आलो होतो, पण आता मी कळून चुकलो होतो की त्यामागचं कारण त्याच्याविना कोणालाच कळणार नव्हतं. मी ती वस्तुस्थिती केवळ स्वीकारायची होती आणि तो माझ्यासाठी सादर करेल त्या शक्यतांवर श्रद्धा ठेवायची होती.

त्या शब्दांनी मला आनंदाच्या जोडीनं प्रचंड बळ दिलं. मला प्रथमच जाणीव झाली की, मी हाता-पायांविना जन्माला का आलो याचं आकलन न होणं याचा अर्थ असा नव्हता की माझ्या विधात्यानं मला टाकलं होतं. त्याच्या हेतूच्या पूर्ततेसाठी आंधळा बरा झाला. मी बरा झालो नव्हतो, पण माझा हेतूही अल्पावधीत उघड होईल.

तुम्ही समजून घेतलं पाहिजे की जीवनात अनेकदा तुम्ही शोधत असलेली उत्तरं तुम्हाला चुटकीसरशी मिळत नाहीत. तुम्हाला श्रद्धेच्या बळावर चालत राहावं लागतं. माझ्या जीवनातल्या शक्यतांवर श्रद्धा ठेवायला मला शिकायला लागलं. मला ती श्रद्धा लाभली तर तुम्हालाही ती लाभू शकते.

याचा विचार करा : लहान मुलगा असताना, मी कल्पनाही करू शकत नव्हतो की माझ्या हाता-पायांच्या अभावाच्या बळावरच (?) मी अनेक देशांमध्ये माझा आशेचा संदेश देईन, आणि तोही विविध प्रकारच्या लोकांसमोर. कठीण समय आणि निराशा या मजेच्या बाबी नसतात. त्यांचा आनंद घेत असल्याचं नाटक करणं आवश्यक नसतं. परंतु पुढच्या चांगल्या काळाच्या, परिपूर्ण आणि हेतुपूर्ण जीवनाच्या शक्यतेवर मात्र श्रद्धा ठेवा.

आदर्श व्यक्तित्व

आपल्या प्राक्तनावरच्या श्रद्धेचं बळ मी सर्वप्रथम अनुभवलं ते माझ्या शाळेतल्या एका कार्यक्रमात जेव्हा मी माझ्या पहिल्या प्रेरणादायक वक्त्याला ऐकलं. त्या अमेरिकन वक्त्याचं नाव होतं 'रेगी डॅब्ज'. त्या वेळी त्याला जवळ-जवळ चौदाशे मुलांपुढे बोलायचं होतं. त्या वेळचं वातावरण उष्ण आणि दमट होतं. त्यातून साउंड सिस्टम सदोष होती. हे सारं त्याच्यासाठी आव्हानात्मकच होतं.

श्रोतृवर्ग अस्वस्थ होता, पण वक्त्यानं आपल्या वाणीनं सर्वांना खिळवून ठेवलं. त्या वेळी त्यानं आम्हाला एक कहाणी सांगितली की, त्याचा जन्म एका नुकत्याच वयात आलेल्या, अविवाहित वेश्येच्या पोटी झाला होता. जेव्हा ती वेश्या गरोदर होती तेव्हा तिनं आपली 'छोटी समस्या' सोडवण्यासाठी गर्भपाताचा विचार केला होता. परंतु सुदैवानं तिनं तो विचार सोडला आणि मुलाला जन्म द्यायचा विचार केला. पण त्या वेळी तिला ना कुटुंब होतं ना छत, त्यामुळे ती अक्षरश: कोंबड्यांच्या खुराड्यात राहिली.

परंतु, तिला एका स्त्रीची आठवण झाली जिनं तिला सांगितलं होतं की, काही अडचण असल्यास तिनं तिच्याशी संपर्क साधावा. ती प्रेमळ स्त्री माजी शिक्षिका होती आणि तिचं नाव होतं डॅब्ज्. रेगीच्या आईला भेटण्यासाठी ती टेनेसी ते लुइसियाना प्रवास करून गेली. तिनं रेगीच्या आईला घेतलं आणि ती तिला घेऊन आपल्या घरी आली, पती आणि सहा मुलांच्या संसारात. डॅब्ज् दाम्पत्यानं रेगीला दत्तक घेतलं आणि त्याला आपलं 'डॅब्ज्' हे आडनाव दिलं.

रेगी सांगत होता की, त्या दाम्पत्यानं त्याच्यावर चांगले नैतिक संस्कार केले. त्यांनी त्याला दिलेल्या पहिल्या काही प्राथमिक धड्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा हा होता की, कोणत्याही परिस्थितीत प्रतिसाद देण्यासाठी त्याच्याकडे नेहमी दोन मार्ग असतील, एक सकारात्मक तर दुसरा नकारात्मक, आणि त्यापैकी कोणता निवडायचा याचं स्वातंत्र्यही त्याला असेल.

रेगीनं आम्हाला सांगितलं की, त्याचे बहुतेक निर्णय हे योग्य असत, कारण जीवनातल्या शक्यतांवर त्याची श्रद्धा होती. त्याला वाईट वागायचं नव्हतं, कारण त्याला माहीत होतं की बरंच काही चांगलं त्याची वाट पाहत होतं. त्यानं आग्रहानं आणखी एक असं काही सांगितलं की ज्यानं माझ्या मनाचा ठाव घेतला. 'तुम्ही तुमचा भूतकाळ कधीच बदलू शकत नाही, पण तुम्ही तुमचा भविष्यकाळ बदलू शकता!'

मी त्याचे शब्द मनात साठवले. त्यानं आम्हा सर्वांवरच प्रभाव टाकला होता. वक्ता होण्याचं बीज त्यानंच प्रथम माझ्या मनात रुजवलं. या साध्या माणसानं आम्हा एवढ्या जणांवर अवघ्या काही वेळात गारूड घातलं हे मला आवडलं. तसंच केवळ लोकांशी बोलण्यासाठी तो जगभर फिरत होता आणि त्यांच्यामध्ये आशा जागवण्यासाठी त्याला आर्थिक मोबदला मिळत होता, हेदेखील गमतीशीर होतं!

त्या दिवशी शाळेतून बाहेर पडताना माझ्या मनात विचार येऊन गेला की, रेगीप्रमाणे माझ्याकडेही एक दिवस लोकांना सांगण्यासारखी गोष्ट असेल. मी तुम्हाला विश्वास देऊ इच्छितो की, तुम्ही हे स्वीकारा की आत्ता तुम्हाला तुमचा मार्ग दिसत नसेल, पण त्याचा अर्थ असा नव्हे की तो तिथं नाहीये. श्रद्धा ठेवा की तुमची कथा उलगडण्याच्या बेतात आहे, आणि मला कल्पना आहे की ती अभूतपूर्व असेल!

चार

स्वत:च्या परिपूर्ण अपूर्णत्वावर प्रेम करा

पूर्व आशियाई दौऱ्यात एक दिवस मी सिंगापूरमधल्या तीनशेहून अधिक उच्चपदस्थ व्यावसायिकांशी बोलत होतो. माझं भाषण झाल्यावर हॉल रिकामा होऊ लागला तेवढ्यात समोरच्या गर्दीतला एक इसम माझ्याकडे आला. इतरांप्रमाणेच तोही यशस्वी आणि आत्मविश्वासपूर्ण दिसत होता, ज्यामुळे त्यानं उच्चारलेल्या पहिल्याच काही शब्दांमुळे मला आश्चर्य वाटलं.

"निक, मला मदत कर," तो म्हणाला.

तो इसम तीन बँकांचा मालक होता, परंतु त्याची तक्रार ही होती की तो ज्या दु:खातून जात होता ते आर्थिक सधनतेनं दूर होणारं नव्हतं.

"मला चौदा वर्षांची एक सुंदर मुलगी आहे आणि हल्ली ती म्हणायला लागलीय की, जेव्हा जेव्हा ती आरशात पाहते तेव्हा तेव्हा ती स्वत:ला कुरूप समजते!" तो म्हणाला, "मला अत्यंत दु:ख होतं की ती एवढी सुंदर असल्याचं तिला दिसू शकत नाही. जे मला दिसतं ते तिला दिसावं यासाठी मी काय करू ते सांग."

त्या इसमाचा मनस्ताप समजण्यासारखा होता, कारण कोणाही पालकासाठी सहन करायला सर्वांत कठीण गोष्ट असते ती म्हणजे आपल्या अपत्याला होणारी पीडा. तो तिला आत्मघृणेतून सोडवू इच्छित होता. ते महत्त्वाचं होतं, कारण आपण एवढे तरुण आणि सुदृढ असताना जर का स्वत:ला स्वीकारू शकत नसू, तर वाढत्या वयात येणाऱ्या वैद्यकीय समस्यांना आपण कसं तोंड देऊ शकू? आणि कुठल्यातरी खुळचट कारणास्तव आपण जर आत्मघृणा करीत असू, तर ते कारण दूर करून त्याची जागा दुसऱ्या कुठल्या कारणानं घेणंही शक्य आहे. आपल्या शक्तीऐवजी आपल्या कमतरतांवर जर तुम्ही लक्ष केंद्रित केलं, तर तारुण्यसुलभ असुरक्षितता तुम्हाला सहजासहजी गर्तेत लोटू शकतात.

बायबल आपल्याला सांगतं की, आपण भय आणि विस्मय यातून निर्माण झालोय. तसं असेल तर मग आपण जसे आहोत त्यावर प्रेम करणं एवढं कठीण का असावं? अनेकदा आपल्याला असं का वाटतं की आपण पुरेसे सुंदर, पुरेसे उंच, पुरेसे सडपातळ किंवा पुरेसे चांगले नाही आहोत? मला पक्की खातरी आहे की, हा सिंगापुरी पिता आपल्या लेकीचं मनोबल आणि गौरव उंचावण्यासाठी तिच्यावर प्रेमाचा आणि कौतुकाचा वर्षाव करीत असेल. आपल्याला वाढवण्यासाठी आपले पालक आणि आपले जिवलग खूप मेहनत घेत असले तरी वर्गातल्या एखाद्या मुला-मुलीच्या किंवा एखाद्या सहकाऱ्याच्या केवळ एका प्रतिक्रियेनं त्यांची सारी मेहनत पाण्यात जाऊ शकते.

आपल्याला स्वत:विषयी काय वाटतं हे जर आपण इतरांच्या मतांवरून किंवा स्वत:ची इतरांशी तुलना करून ठरवू लागलो, तर आपण कमजोर होतो, तसंच आपली मानसिकता पीडिताची होते. तुम्ही जर स्वत:ला स्वीकारू शकत नसाल तर इतरांना स्वीकारणंही तुम्हाला कठीण जाणार, ज्यातून तुम्हाला एकाकीपण येणार. एकदा मी पौगंडावस्थेतील मुलांपुढे बोलत असताना त्यांना सांगत होतो की, प्रसिद्ध होण्याच्या इच्छेपायी लोक कसे बरेचदा कमी आकर्षक किंवा क्रियाशील लोकांपासून दोन हात राखून राहतात. माझा मुद्दा पटवण्यासाठी मी त्यांना विचारलं, "तुमच्यापैकी किती जणांना माझ्याशी मैत्री करायला आवडेल?"

दिलाशाची गोष्ट ही की खोलीतल्या बहुसंख्य मुलांनी हात उंचावले होते. मग मी त्यांना अडचणीत टाकणारा प्रश्न विचारला, "म्हणजे मी कसा दिसतो हे महत्त्वाचं नाही, बरोबर?"

माझा मुद्दा त्यांच्या मनात झिरपायला मी त्यांना वेळ दिला. मुलं कशी नको तेवढा वेळ योग्य कपडे निवडण्यात, केशरचनेत, एकंदरीतच समवयस्कांमध्ये जुळवून घेण्यासाठी आवश्यक ते करण्यात घालवतात यावरच आम्ही थोड्या वेळापूर्वी बोलत होतो.

"एका बाजूला तुम्ही काही वर्गमित्रांना स्वीकारत नाही, कारण त्यांच्यापैकी काही जण योग्य पेहराव करीत नाहीत, कोणाचा वर्ण स्वच्छ नसतो किंवा कोणी बेढब असतो. असं असताना तुम्हाला माझ्याशी मैत्री करावी असं का वाटतं, ज्याला हात-पाय नाहीयेत किंवा त्याच्यासारखी एकही व्यक्ती तुम्ही अजूनपर्यंत पाहिलेली नाहीत?"

तुम्ही जेव्हा अत्यंत कठोरपणे स्वत:चं मूल्यमापन करता किंवा स्वत:वर अतिरिक्त ताण टाकता तेव्हा तुम्ही इतरांविषयी प्रतिकूल मत देता. उलट परमेश्वर जसा तुमच्यावर प्रेम करतो तसंच तुम्ही जर स्वत:वर प्रेम केलंत आणि स्वत:ला स्वीकारलंत तर वरच्या दर्जाच्या शांतीची आणि परिपूर्णतेची दारं तुमच्यासाठी खुली होतील.

पौगंडावस्थेतील आणि तारुण्यावस्थेतील मुलं ज्या तणावांखाली असतात ते सार्वत्रिक असतात. चीन आणि दक्षिण कोरियातल्या मुलांसमोर बोलण्यासाठी मला बोलावलं होतं, कारण त्या दोन्ही विकसनशील आणि कष्टकरी देशांमध्ये तरुणांवरचे वाढते ताण आणि आत्महत्यांचं वाढतं प्रमाण ही मोठी समस्या होऊन बसली होती.

मी दक्षिण कोरियात उतरलो त्या वेळी व्हॅन्कुव्हरमध्ये २०१०च्या 'विंटर ऑलिम्पिक गेम्स' चालू होत्या. जेव्हा दक्षिण कोरियाची फिगर स्केटिंग 'क्वीन' किम यु-ना हिनं त्या वर्षीचं आणि त्यांच्या देशाचं पहिलं फिगर स्केटिंगचं सुवर्णपदक पटकावलं तेव्हा मला सेऊलमध्ये राष्ट्राभिमानाचं आणि लोकांच्या उत्साहाचं दर्शन झालं. त्या घटनेतला जनतेचा उत्साह एवढा दांडगा होता की, त्या दिवशी, तिच्या शेवटच्या फेरीच्या वेळी 'स्टॉक मार्केटची' पातळी निम्म्यावर उतरली होती.

माझ्यावरचा एक माहितीपट तिथल्या मोठ्या ख्रिश्चन समुदायासमोर प्रदर्शित केला गेला ज्यामुळे मला व्याख्यानाची पुष्कळ निमंत्रणं आली. तिथला श्रद्धाळूपणा विस्मयकारक

आहे. ओन्नुही चर्चमधल्या माझ्या यजमानांनी मला सांगितलं की, दक्षिण कोरियाई ख्रिश्चनांना मिशनरी कार्याविषयी खूप आस्था आहे. त्यांचा अंदाज असा आहे की, एक-दोन दशकांमध्ये दक्षिण कोरियाई मिशनरीजची संख्या अमेरिकी मिशनरीजना मागं टाकेल, जे विस्मयकारक असेल; कारण तो देश अमेरिकेहून खूप छोटा आहे.

सेऊलमधून फिरताना मला पुष्कळ चर्चेस दिसली. जगातल्या सर्वांत मोठी तीन चर्चेस त्याच राजधानीच्या शहरात असल्याचं सांगितलं जातं. केवळ शंभर वर्षांपूर्वी दक्षिण कोरियात ख्रिश्चन मूठभर असले तरी आता तिच्या ४८ कोटी जनतेतला तिसरा हिस्सा स्वत:ला ख्रिश्चन म्हणवतो. मी व्याख्यान दिलं त्या योईडो फुल गॉस्पेल चर्चची सदस्यसंख्या ८ लाख असून ते सदस्य एकवीस चर्चेसमधून प्रार्थनेसाठी जातात.

माझे मित्र केवळ चर्चेसना भेटी देण्यासाठी दक्षिण कोरियाचा दौरा करतात. त्यांच्यातल्या प्रार्थना अविश्वसनीय असतात आणि बदलणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी घंटानाद होतो. एवढ्या उच्च पातळीचं आध्यात्मिक वातावरण तिथं असूनही तिथल्या दैनंदिन जीवनमानामुळे लोकांच्या मनावरील ताण वाढतच चाललाय. शालेय जीवनातल्या चढाओढीनंही मुलांवर प्रचंड ताण असतो. बहुसंख्य तरुणांवर ताण असतो तो त्यांच्या चुकीच्या धारणेनं की पहिला क्रमांक हाच एकमेव असतो. ते ठिकाण लाभलं नाही तर तो त्यांना पराभव वाटतो. मी त्यांना उत्तेजन देतो की परीक्षेत नापास होण्यानं ते अपयशी ठरत नाहीत. परमेश्वराच्या नजरेत आपण सारेच अनमोल असतो. आणि तो जसा, आपण जसं आहोत त्यावर प्रेम करतो तसंच आपण स्वत:वर जसं आहोत त्यावरच प्रेम करावं.

मी ज्याप्रकारे आत्मप्रेम आणि आत्मस्वीकृती सांगत आहे ते आत्ममग्नतेच्या, स्वत:च्या फसवणुकीच्या स्वरूपाचं नाहीये. या प्रकारचं आत्मप्रेम हे आत्महीन असावं, म्हणजे नि:स्वार्थी. तुम्ही घ्याल त्यापेक्षा अधिक द्या. विचारल्याविना तुम्ही देऊ करा. तुमच्याकडे फारसं नसताना तुम्ही देऊ करा. इतरांच्या ओठांवर स्मित आणून तुम्ही आनंद मिळवा. तुम्ही स्वत:वर प्रेम करा, कारण तुम्ही केवळ स्वत: नाही आहात. तुम्ही ज्यांच्याबरोबर आहात त्यांच्याबरोबर आनंदी आहात, कारण तुमच्याभोवती राहू पाहणाऱ्यांना तुम्ही आनंदी करता.

पण काय, तुमच्यावर कोणी प्रेम करीत नसल्यानं तुम्ही स्वत:वर प्रेम करीत नाही आहात? मला वाटतं ते अशक्य आहे. हे पाहा, तुम्ही आणि मी परमेश्वराची अपत्यं आहोत. त्याच्या निर्व्याज प्रेमावर, त्याच्या कारुण्यावर आणि त्याच्या क्षमाशीलतेवर आपण डोळे झाकून विश्वास ठेवू शकतो. आपण स्वत:वर प्रेम केलं पाहिजे, आपल्यातल्या कमतरता समजून घेतल्या पाहिजेत, आणि आपल्या चुकांसाठी स्वत:ला माफ करायला पाहिजे, कारण स्वत: परमेश्वर आपल्या बाबतीत हेच सारं करतो.

दक्षिण अमेरिकेच्या दौऱ्यात कोलंबियातल्या एका पुनर्वसन केंद्रात मी व्याख्यान दिलं. तिथल्या आजी-माजी व्यसनाधीन लोकांना आपल्या जीवनाची एवढी फिकीर नव्हती की, त्यांनी ड्रग्जच्या सेवनानं आपापलं जीवन जवळ-जवळ उद्ध्वस्त करून टाकलं होतं. मी

त्यांना सांगितलं की, ते केवढाही काळ व्यसनी असले तरीही परमेश्वराचं त्यांच्यावरचं प्रेम अबाधित आहे. दुभाष्याकरवी त्यांना मी जेव्हा सांगितलं की, परमेश्वराचं त्यांच्यावरलं प्रेम बिनशर्त होतं तेव्हा त्यांचे चेहरे खुलले. खुद्द परमेश्वर जर आपल्या पापांमधून आपल्याला मुक्त करीत असेल आणि आपण जसं आहोत त्यावर प्रेम करीत असेल, तर मग आपण का नाही स्वत:ला माफ करून स्वीकारू शकत? सिंगापुरी बँकवाल्याच्या लेकीप्रमाणेच या ड्रग अॅडिक्ट्सनीही, काही ना काही कारणानं, आपला मार्ग गमावला होता, कारण त्यांना आपल्या जीवनाचं मूल्य करता आलं नव्हतं. त्यांनी ग्रह करून घेतला होता की जीवन जे सर्वोत्तम देऊ करीत होतं त्याला ते पात्र नव्हते. मी त्यांना सांगितलं की, आपण सारेच परमेश्वराच्या प्रेमासाठी पात्र असतो. तो जर आपल्याला माफ करीत असेल आणि आपल्यावर प्रेम करीत असेल, तर आपणही स्वत:ला माफ करून स्वत:वर प्रेम केलं पाहिजे आणि त्यानंतर शक्य त्या सर्वोत्तम जीवनासाठी मार्गक्रमण केलं पाहिजे.

येशूला जेव्हा विचारलं गेलं की, त्याच्या मते त्याच्या सर्वांत महत्त्वाच्या आज्ञा कोणत्या होत्या तेव्हा त्यानं सांगितलं की, पहिली होती ती परमेश्वरावर मनापासून, आत्म्यापासून, हृदयातून आणि पूर्ण शक्तिनिशी प्रेम करणं आणि दुसरी म्हणजे स्वत:प्रमाणे शेजाऱ्यावर प्रेम करणं. स्वत:वर प्रेम करणं म्हणजे स्वार्थी, आत्मसंतुष्ट किंवा आत्मकेंद्री होणं नव्हे, तर स्वत:चं जीवन ही एक अनमोल भेट आहे असं समजून ते इतरांसाठी असलेलं वरदान म्हणून वाटणं.

स्वत:मधील कमतरता, स्वत:चं अपयश किंवा स्वत:च्या चुका यांच्यावर विचार करीत बसण्यापेक्षा तुम्हाला लाभलेल्या वरदानांवर आणि तुम्ही इतरांना काय देऊ शकाल यावर लक्ष केंद्रित करा. मग ते तुमचं एखादं कौशल्य असेल किंवा ज्ञान, विद्वत्ता, क्रियाशीलता, मेहनत किंवा सहृदयता. तुम्हाला इतरांच्या अपेक्षेबरहुकूम जगायला हवं असं नाही. परिपूर्णतेची तुमची स्वत:ची व्याख्या करा.

आतमधून चमका

मानसोपचारतज्ज्ञ आणि लेखिका असलेल्या एलिसाबेथ क्युबलर- रॉस लोकांना खिडकीच्या काचा म्हणतात. सूर्य बाहेर असताना त्या लखलखतात आणि चमकतात; पण बाहेर अंधार पडू लागतो तेव्हा आतमधून त्या काचांवर उजेड पडतो तेव्हाच त्यांचं खरं सौदर्य उघडकीस येऊ शकतं. मर्यादांविना जीवन जगण्यासाठी आणि विशेषत: ताण, व्यसनाधीनता किंवा अन्य कोणत्या आव्हानांच्या अंधारात तरून राहण्याकरिता तुम्ही तो आतमधला दिवा प्रज्वलित करायला पाहिजे. आपण कोणीतरी आहोत असं समजून तुम्ही स्वत:च्या सौंदर्यावर विश्वास ठेवायला हवा.

मर्यादांविना जीवन जगण्याची पहिली पायरी आहे स्वत:च्या जीवनाचा उद्देश शोधणं. भविष्यासाठी आशा अबाधित ठेवण्यानं आणि कठीण प्रसंगांमध्येही शक्यतांवर श्रद्धा

ठेवण्यानं तुम्ही त्या ध्येयाप्रत जात राहू शकाल. परंतु यश मिळवण्यासाठी मात्र तुमच्या मनात त्या यशासाठी आणि आनंदासाठी तुम्ही पात्र आहात याबद्दलचा विश्वास असायला हवा. तुम्ही स्वत:वर त्याचप्रमाणं प्रेम करावं ज्याप्रमाणे परमेश्वर साऱ्या श्रद्धाळूंवर करतो.

माझा एक मित्र स्वत:च्या बाबतीत खूप सुस्थितीत आहे. त्यामुळे त्याला लाभलेल्या वरदानांना विकसित करण्याच्या बाबतीत तो एवढा शांत आणि उत्साही असतो की, तो जणू चांगल्या भावना निर्माणच करतो. त्याचा सहवास मला आवडतो. सर्वांनाच त्याचा सहवास आवडतो. का? कारण तो आतमधून चमकतो. तो स्वत:वर प्रेम करतो, पण 'तुझ्यात काही अर्थ नाही', या दृष्टीनं नव्हे; तो स्वत:ला वरदान लाभलेला समजतो, सगळं त्याच्या मनाप्रमाणं होत नसेल तरीही, तोही तुमच्या-माझ्याप्रमाणंच झगडत असला तरीही.

मला खातरी आहे की, तुम्हालाही अशी माणसं माहीत असतील जी प्रसन्नता दर्शवतात; तसंच विरुद्ध माणसंही माहीत असतील जी आपल्या कटुतेनं आणि आत्मनिर्भर्त्सनेनं लोकांना आपल्यापासून दूर लोटतात. तुम्ही स्वत:ला स्वीकारलं नाहीत तर त्यानं तुम्ही नुसतं उद्ध्वस्त होत नाही तर एकटंही पडता.

तुम्ही आतमधून चमकत नसाल तर ते कदाचित यामुळे असू शकेल की तुम्ही इतरांच्या मूल्यांकनावर, त्यांच्या दिलाशावर आणि त्यांच्या स्तुतीवर अवलंबून राहत असाल. पण तो तर निराशेचा खातरीचा मार्ग आहे, कारण तुम्ही स्वत:च प्रथम स्वत:ला स्वीकारणं आवश्यक आहे. तुमच्या सौंदर्याचं आणि मूल्यांचं एकमेव महत्त्वाचं मोजमाप तेच असेल, असू शकतं जे तुमच्या आतमधून येईल.

मला कल्पना आहे की, हे कारण तेवढंच कठीण आहे जेवढं बोलणं सोपं. मीसुद्धा यासाठी झगडलोय. ख्रिश्चन पालकांचं मूल असल्यामुळे मला लहानपणापासून शिकवलं गेलंय की येशूचं माझ्यावर प्रेम आहे. अर्थात, माझ्या आई-वडिलांची बायबलची शिकवण तसेच माझ्या कुटुंबीयांचे मला उभारी देण्याचे सारे कष्ट एका क्षणात धुळीस मिळाले जेव्हा एक शेंबडं पोर माझ्या पुढ्यात येऊन मला म्हणालं, "तू विचित्र (फ्रीक) आहेस!"

जीवन क्रुर असू शकतं. लोक अविचारी किंवा हलकट असू शकतात. म्हणून तुम्ही बळासाठी आपल्या आतमध्ये शोध घ्यायला हवा. जेव्हा ते आतमधलं बळ अपयशी ठरेल तेव्हा तुम्ही वर पाहू शकता; परमेश्वराकडे, बळ आणि प्रेम यांच्या अंतिम स्रोताकडे.

आत्मस्वीकृती आणि आत्मप्रेम महत्त्वाचं असतं, पण आजच्या काळात या संकल्पनांचं विकृतीकरण झालंय. तुम्ही स्वत:वर प्रेम करावं ते परमेश्वराच्या प्रेमाचं प्रतिबिंब म्हणून आणि तुमचं काही देणं देण्यासाठी तुम्ही इथं आहात या भावनेतून. असंख्य लोक वरवरच्या अर्थावर भागवताना अहंमन्यतेच्या, कायासुखाच्या आणि आत्मसुखाच्या अधीन होतात. आणि हे सगळं घडण्यामागचं एक प्रमुख कारण आहे ते विविध कार्यक्रमांतून आणि चित्रपटांमधून घडवलं जाणारं सौंदर्याचं आणि प्रसिद्धीचं बेगडी रूप. कोणी जेव्हा ते कार्यक्रम किंवा चित्रपट पाहतात तेव्हा ते विसरून जातात की चांगलं दिसणं, सुखलोलुप

होणं आणि खिळून राहणं या पलीकडेही जीवनाचा काही उद्देश आहे. मग त्यात आश्चर्याची बाब काय जेव्हा चर्चमध्ये जाणाऱ्या प्रसिद्ध लोकांपेक्षा पुनर्वसन केंद्रांमध्ये जाणाऱ्या प्रसिद्ध लोकांची संख्या अधिक असते? त्यातली बहुसंख्य माणसं सौंदर्य, अहंमन्यता आणि लालसेच्या परमेश्वरांच्या पायांशी लोळण घेत असतात.

मी अशी कल्पना करू शकत नाही की आजच्या पिढीएवढं खोटं या आधीच्या कोणत्याही पिढीपुढे सांगितलं गेलं असेल. आपल्यावर सततच मारा केला जातो की अमुक प्रकारे दिसणं, तमुक गाडी असणं, अमकं राहणीमान असणं यामुळेच आपल्याला प्रेम, परिपूर्णता, सन्मान, यश आदी लाभू शकतं. आपल्या संस्कृतीमध्ये आज आपण एका अत्यंत धोक्याच्या बिंदूपाशी येऊन ठेपलो आहोत जिथं लैगिंक चित्रफितींमध्ये काम करणं हा प्रसिद्धी, पैसा आणि परिपूर्णतेचा मार्ग समजला जातो.

तुम्हाला असं वाटत नाही का की, टीव्ही चॅनल्सचे कॅमेरामन पुनर्वसन केंद्रातून बाहेर पडलेल्यांना गराडा घालण्याऐवजी उच्चशिक्षित तरुणांभोवती किंवा गरीब आणि गरजूंना औषधं आणि आशा पुरवण्याऱ्या मिशनरीजभोवती जमा होतील तर हे जग अधिक बरं होईल? पण सारंच काही हरवलेलं नाहीये. मी लोकांचे असंख्य समूह पाहिलेत जे धार्मिक कार्यक्रमांमध्ये सामील होतात आणि शेजाऱ्यावर प्रेम करायला शिकून समाधानाची अपेक्षा करतात. मी तरुणांचे घोळकेही पाहिलेत जे आपल्या सुट्यांचा कालावधी तिसऱ्या जगातल्या लोकांसाठी घरं बांधण्यात किंवा उत्तर अमेरिकेतल्या गरजूंची सेवा करण्यात व्यतीत करतात. शेवटी प्रत्येक जणच प्लॅस्टिक सर्जरी, लिपोसक्शन आणि लुई व्हिटनच्या बॅगजची लालसा धरून नसतो.

जेव्हा तुम्ही भौतिक वस्तूंमध्ये आणि बेगडी सौंदर्यामध्ये गुरफटता आणि जेव्हा तुम्ही तुमचं मूल्य लोकांच्या निर्णयावर सोपवता तेव्हा तुम्ही स्वत:ला गमावता आणि तुमची वरदानं व्यर्थ घालवण्याचा धोका पत्करता. माझी डीव्हीडी पाहिल्यानंतर क्रिस्टीनं मला लिहिलं : "तूच मला जाणीव करून दिलीस की, तुम्ही स्वत:च जर स्वत:वर प्रेम करीत नसाल तर दुसऱ्या कोणी तुमच्यावर प्रेम करण्यात काय अर्थ आहे? मी तुला वर्षभरापूर्वी आणि पुन्हा आज पाहिलं. मग मला जाणीव झाली की, तू माझ्यासाठी काय केलं आहेस ते मी तुला सांगायला हवं. स्वत:साठी उभं ठाकण्याचं, मी जशी आहे तिच्यावर प्रेम करायला तसंच माझ्या मर्जीप्रमाणं माझं जीवन जगायला तू मला शिकवलंस... आणि हो, आता माझे स्वत:बाबतीतले विचार बदलल्यानंतर माझ्या बॉयफ्रेंडला माझ्यात पुष्कळ बदल जाणवतोय आणि त्यासाठी तो तुझा कृतज्ञ आहे. त्याला माझ्याबाबतीत कायम धास्ती वाटायची की, एक दिवस मी स्वत:चं काही बरंवाईट करून स्वत:चा शेवट करेन. पण आता मी बदललेय आणि आता मी खूप आनंदात असते!"

आत्मस्वीकृती

माझ्या संदेशाचा आशय क्रिस्टीच्या ध्यानात आला, कारण ती जिथं होती तिथं मीही होतो. मी सात वर्षांचा होता तेव्हा एके दिवशी बहिष्कृती आणि नैराश्यानं ठासून मी अनेक तास आरशासमोर बसून काढले. पौगंडावस्थेतल्या बहुसंख्य मुलांना त्यांच्या तारुण्यपिटिकांची आणि केशरचनेची चिंता असते. मला स्वत:लाही त्या समस्या होत्याच, पण माझ्या डोक्यावर त्यांच्याहून मोठी समस्या होती ती हात-पाय नसणं ही.

मी खरोखरच विचित्र इसम आहे, मी विचार केला.

मी खूप दु:खी झालो. तब्बल पाच मिनिटं मी स्वत:चं सांत्वन करीत होतो. पण मग माझ्या आतमधून एक धीरगंभीर स्वर उमटला आणि तो म्हणाला, "ठीक आहे. तुझ्यात थोड्या कमतरता आहेत, पण आई म्हणते त्याप्रमाणे तुझ्याकडे काही चांगल्या गोष्टी आहेत."

माझ्या मनात आलं, 'एकीचं नाव सांग, मी तुला आव्हान देतो. केवळ एक प्रसंग सांग, मला तेवढं पुरेल.'

पुढे काही वेळ मी माझं प्रतिबिंब न्याहाळलं आणि शेवटी काहीतरी सकारात्मक मला गवसलं.

माझे डोळे छान आहेत. तसं मला बऱ्याच मुलींनी सांगितलंय. काही नाही तर निदान ते तरी माझ्याकडे चांगलं आहे. माझे डोळे कधीच बदलणार नाहीत, म्हणजे मला कायमच सुंदर डोळे असतील.

जेव्हा दुखावले गेल्यामुळे, कोणाच्या दादागिरीमुळे किंवा तुमचं खच्चीकरण झाल्यामुळे तुम्ही निराश झाला असाल, तर तुम्ही आरशापुढे उभं राहा आणि तुम्हाला स्वत:मधलं जे आवडतं त्याचं निरीक्षण करा. अर्थात ते शारीरिक वैशिष्ट्य असायला पाहिजे असं नाही. ते एखादं कौशल्य, एखादा स्वभावविशेष असू शकतो जे तुम्हाला स्वत:बद्दलचं आवडतं. काही क्षण त्या गोष्टीचा विचार करा. त्याबद्दल धन्यता माना आणि विश्वास बाळगा की, तुमचं सौंदर्य आणि तुमचं मूल्य तुमच्या एकमेवाद्वितीयत्वातून प्राप्त होतं.

हात गाळून दावा करू नका की 'तुमच्यात काहीच चांगलं नाहीये.' आपण स्वत:च्या बाबतीत एवढं कठोर बनतो, विशेषत: जेव्हा आपण स्वत:ची दुसऱ्याशी निष्पक्षपणे तुलना करतो तेव्हा. विशेषत: तरुणांशी संवाद साधताना ही गोष्ट माझ्या निदर्शनास येते. त्यांच्यापैकी कितीतरी अपूर्णतेच्या भावनेनं किंवा कोणीच त्यांच्यावर कधी प्रेम करणार नाही या विचारानं ग्रासलेले असतात.

म्हणूनच मी त्यांना मुद्दाम सांगतो, तुम्ही जसे आहात तसे मला प्रिय आहात, माझ्यासाठी तुम्ही सुंदर आहात.

ते माझे शब्द अत्यंत साधे आहेत, माझ्यासारख्या विचित्र दिसणाऱ्याकडून येणारे. शाळांमध्ये किंवा तरुणांशी बोलताना मी ते नेहमीच वापरतो. माझे ते साधे शब्दच

समोरच्याच्या हृदयाला भिडतात; किंबहुना त्या शब्दांना लाभणारा प्रतिसाद अभूतपूर्व असतो.

प्रतिसादाची सुरुवात कुजबुज आणि खसखशीनं होते. मग मला एखादी मुलगी मान खाली घातलेल्या अवस्थेत दिसते किंवा मुलानं चेहरा हातांनी झाकलेला दिसतो. त्यानंतर त्या तीव्र भावना संसर्गाप्रमाणे खोलीभर पसरत जातात. कोवळ्या गालांवरून धारा वाहू लागतात. दबक्या हुंदक्यांनी खांदे हिंदकळतात. मुलींचे घोळके तयार होतात, तर मुले खोलीबाहेर जाऊन चेहरे लपवतात.

सुरुवातीला काही वेळा असं घडलं तेव्हा मी चकित झालो होतो. हे काय चाललंय? त्यांच्या भावना एवढ्या तीव्र का आहेत?

पण त्यांच्यापैकीच काहींनी नंतर मला माझ्या प्रश्नांची उत्तरं पुरवली. माझ्या व्याख्यानानंतर त्यातली बरीच मुलं-मुली मला भेटतात, मला मिठी मारतात. हा प्रतिसाददेखील तसाच तीव्र. मला भेटण्यासाठी ती तासन्तास ताटकळतात.

ठीक आहे, मी देखणा जरूर आहे; पण त्यामुळे काही कोणी तासन्तास ताटकळत राहत नाही. त्यामागचं खरं कारण हे आहे की, माझ्या बोलण्यानं मी त्यांच्यातल्या दोन शक्तींचा त्यांना परिचय करून देतो : बिनशर्त प्रेम आणि आत्मस्वीकृती.

क्रिस्टीचं पत्र हा केवळ एक नमुना आहे, मला येणाऱ्या पत्रांमधला किंवा व्यक्तिगत संभाषणांमधला, ज्याचा विषय हा असतो की असंख्य लोकांनी आपल्या जीवनाचा शेवट करण्याचा विचार केलेला असतो तो केवळ यामुळे की ते स्वत:वर प्रेम करू शकत नाहीत. तुम्ही दुखावले जाता तेव्हा पुन्हा तसं घडू नये यासाठी तुम्ही स्वत:भोवती तटबंदी उभारता, पण तुम्ही स्वत:च्या हृदयाभोवती भिंत थोडीच बांधू शकता? आणि तुम्ही तुमच्या आतल्या आणि बाहेरच्या सौंदर्याचा स्वीकार करून जसे आहात तसे स्वत:ला प्रिय असलात तर लोकही तुमच्याशी जोडले जातील आणि त्यांनाही तुमचं सौंदर्य दिसेल.

स्वत:वर हसण्याएवढे स्वत:वर प्रेम करा

आपली मित्रमंडळी आणि आपले प्रियजन दिवसातून शंभर वेळा आपल्याला सांगतील की, तुम्ही सुंदर आहात, आमचं तुमच्यावर प्रेम आहे, आणि हे दिवसही जातील वगैरे... पण बहुतेक वेळा आपण त्या दिलासादायक शब्दांकडे दुर्लक्ष करतो आणि दु:ख कवटाळत बसतो. असं करीत मी पुष्कळ काळ व्यर्थ घालवलाय. शाळेतल्या एखाद-दुसऱ्या मुलाकडून दुखावला गेलेल्या माझी समजूत घालण्यात माझे आई-वडील दोन-तीन आठवडे खर्च करायचे. पण माझ्याच वयाच्या कोणीतरी मला दिलासा दिला की मग माझ्यात त्वरित बदल घडायचा. माझ्या एका वर्गमैत्रिणीनं एकदा मला सांगितलं की, मी छान दिसतो. तेव्हा आठवडाभर मी ढगात वावरत होतो.

अर्थात, त्यानंतर थोड्या कालावधीनंतर, वयाच्या तेराव्या वर्षी एका सकाळी मी उठलो तर माझ्या नाकावरती एक टपोरी तारुण्यपिटिका होती.

"आई, हे बघ, ती किती घाणेरडी आहे," मी तक्रार केली.

"त्यावर खाजवू नकोस," आई म्हणाली.

मी मनातल्या मनात म्हणालो, 'मी ती कशी आणि कशानं खाजवू?'

मी शाळेत गेलो तो आत्मघृणा साथीला घेऊनच. शाळेतल्या प्रत्येक खिडकीच्या काचेतून तिचं प्रतिबिंब मला खिजवत होतं. मला शाळेतून पळून जावंसं वाटत होतं. जो तो तिच्याकडे रोखून पाहत होता. ती जाईल अशी आशा करीत असतानाच आणखी दोन दिवसांनी बेटीनं बाळसं धरलं. बहुधा ती अख्ख्या विश्वातली सर्वांत मोठी आणि सर्वांत किळसवाणी तारुण्यपिटिका असावी. मला वाटायला लागलं की, एक दिवस तिचं वजन माझ्या वजनाला मागं टाकणार.

ते व्यंग काही हटायला तयार नव्हतं! तिनं बस्तान मांडल्याला आठ महिने झाले. शेवटी आईनं मला त्वचारोगतज्ज्ञाकडे नेलं. मी त्याला सांगितलं की, मोठं ऑपरेशन करायला लागलं तरी चालेल, पण ती माझ्या नाकावरून चालती झाली पाहिजे. त्यानं ती भिंगातून पाहिली, जशी काही ती त्याला दिसतच नव्हती. मग तो मला म्हणाला, "ही तारुण्यपिटिका नाहीये."

'काही का असेना, उपटून टाका, झालं,' मी मनातल्या मनात म्हणालो.

"ती सुजलेली तेलग्रंथी आहे," तो म्हणाला. "मी ती कापून टाकू शकतो किंवा जाळूनही टाकू शकतो, पण काहीही केलं तरी तुझ्या नाकावर त्याचा छोटा व्रण राहील."

"छोटा?"

"ती एवढी मोठी आहे की ती माझ्या दृष्टिआड येते," मी तक्रार केली.

"मग जन्मभर व्रण बाळगण्याची तुझी तयारी आहे?"

मग काय, ती माझ्या नाकावर तश्शीच टिच्चून बसून राहिली. त्यानंतर बराच काळ मी वैतागात घालवला आणि एक दिवस विचार केला की, मला हात-पाय नसण्यानं जर माझं फारसं काही अडत नव्हतं, तर तिच्या असण्यानं मला का फरक पडावा? तिच्या अस्तित्वामुळे लोक जर माझ्याशी बोलणार नसतील तर त्यात त्यांचंच नुकसान असेल. माझा निर्णय ठरला होता.

तिच्याकडे पाहताना मला कोणी दिसलं तर त्यावर मी विनोद करायचो. मी म्हणायचो की मी दुसरं नाक उगवतोय, काळ्या बाजारात विकण्यासाठी. लोकांना जेव्हा कळायचं की मी स्वत:वरच हसू शकतो तेव्हा तेही माझ्याबरोबर हसायचे आणि सहानुभूती दर्शवायचे. शेवटी तारुण्यपिटिका कोणाला चुकल्यात? ब्रॅड पिटलाही त्या आहेत.

बरेचदा आपण आपल्या स्वत:च्या हातांनी छोट्या अडचणींचे रूपांतर मोठ्या समस्यांमध्ये करतो. तारुण्यपिटिका असणं हा प्रत्येकाच्या सामान्य जीवनाचा भाग आहे.

आपण प्रत्येक जणच परिपूर्ण मानव नाही आहोत, पैकी काही जण इतरांपेक्षा थोडे अधिक असतील, पण आपणा प्रत्येकातच काही त्रुटी, काही कमतरता असतातच. महत्त्वाचं हे की प्रत्येक मस, प्रत्येक सुरकुती फार गांभीर्यानं न घेणं. कारण एक दिवस असा येईल की खरोखरच एखादा गंभीर प्रसंग उद्भवेल आणि मग तेव्हा तुम्ही काय कराल? तर, तात्पर्य हे की नाकावर आपटी खाण्यासाठी किंवा डोक्यावर पडण्यासाठी तुम्ही तुमचं मन तयार ठेवावं.

विज्ञाननं सिद्ध केलंय की, हास्यानं शरीरातले एन्डॉर्फिन हॉर्मोन्स सुटतात ज्यामुळे ताण कमी होतो, तुमची प्रतिकारशक्ती वाढते तसंच मेंदूचा ऑक्सिजन पुरवठाही वाढतो. वाईट नाही, नाही का? संशोधनानं असंही दाखवलयं की, हास्यानं तुम्ही अधिक आकर्षक होता. आहे की नाही फायदाच फायदा!

सौंदर्य आंधळं असतं

खरोखर हास्यास्पद असं काय आहे ते तुम्हाला ठाऊक आहे? पोकळपणा हास्यास्पद असतो, कारण जेव्हा तुम्हाला वाटायला लागतं की तुम्ही 'पीपल मॅगझिन'च्या मुखपृष्ठावर झळकण्याएवढे सुंदर आहात. त्याच वेळी तुम्हाला जाणीव करून देणारा जीवनाचा असा धडा मिळतो की सौंदर्य हे बघणाऱ्याच्या दृष्टीत असतं. तसंच वरून जे दिसतं ते तेवढं महत्त्वाचं नसतं जेवढं आतमधलं असतं.

गरज असलेल्या मुलांना वैद्यकीय साधनं पुरवण्यासाठी, आम्ही आमच्या 'फन रन' मोहिमेअंतर्गत मदत उभी करीत होतो. तेव्हा मी एका ऑस्ट्रेलियन मुलीला भेटलो की जी आंधळी होती. ती मुलगी साधारण पाच वर्षांची होती. कार्यक्रमानंतर तिच्या आईनं तिला माझी ओळखी करून दिली.

बरेचदा आंधळ्या व्यक्तींना मला स्पर्श करायचा असतो, कारण हात-पाय नसलेली व्यक्ती कशी असते हे त्यांना समजून घ्यायचं असतं. माझी त्याला हरकत नसते. त्या मुलीच्या आईनं तिला जेव्हा सांगितलं की, मी हाता-पायांविना जन्माला आलोय तेव्हा तिनंही मला स्पर्श करून पाहण्याची विनंती केली जी मी अर्थातच मान्य केली. तिच्या आईनं तिचा हात माझ्या खांद्यावरून आणि छोट्या पावलावरून फिरवला, मग त्या मुलीची प्रतिक्रिया भलतीच विचित्र होती. माझ्या खांद्यावरून आणि पावलावरून हात फिरवताना ती जी शांत होती ती माझ्या चेहऱ्यावरून हात फिरवताना एकदम किंचाळली.

"हे काय, माझ्या सुंदर चेहऱ्याची तुला भीती वाटली?" मी तिला मस्करीत विचारलं.

"नाही! तुमच्या अंगावर केस आहेत! तुम्ही लांडगा आहात!"

यापूर्वी तिनं कधी दाढीला स्पर्श केला नव्हता त्यामुळे केसांचा स्पर्श होताच ती घाबरली. मी 'केसाळ' असल्याबद्दल तिनं आईकडे दु:ख व्यक्त केलं. त्या मुलीच्या सौंदर्याच्या स्वत:च्या कल्पना होत्या आणि अर्थात, त्या यादीत दाढीचं नाव नव्हतं. मी दुखावलो गेलो

नाही. उलट मला बरंच वाटलं की त्या प्रसंगानं मला पुन्हा स्मरण करून दिलं की सौंदर्य हे बघणाऱ्याच्या डोळ्यांत- किंवा स्पर्शात – असतं.

तुमचं अद्वितीयत्व साजरं करा

आपण मानव म्हणजे खुळ्यांचा समूह आहोत. आपण आपला अर्धा वेळ इतरांशी जुळवून घेण्यात घालवतो आणि उर्वरित अर्धा वेळ त्यांच्यापासून वेगळं राहण्यात. हे असं का? माझ्यात हा दोष आहे आणि तो तुमच्यातही असणारचं कारण तो सार्वत्रिक आहे, आपल्या मानवी गुणधर्माचा भाग. आपण परमेश्वराची निर्मिती आहोत आणि त्याच्या भव्यतेचं प्रतीक म्हणूनच आपली निर्मिती झाली आहे हे ठाऊक असूनही आपण स्वत:बाबत निर्धास्त का राहू शकत नाही?

शाळकरी वयात, इतर मुलांप्रमाणेच मीही सर्वांमध्ये मिसळण्यासाठी आतुर असायचो. तुम्ही कधी निरीक्षण केलं आहे का की ज्या मुलांना 'वेगळं' राहायचं असतं तीही त्यांच्याप्रमाणेच बोलणाऱ्या-चालणाऱ्या मुलांमध्येच असतात? हे काय म्हणायचं? तुमच्याप्रमाणेच राहणाऱ्या मुलांमध्ये राहून तुम्ही 'बाहेरचे' कसे समजले जाल? उलट, तुम्ही 'त्यांच्यातलेच' नाही का गणले जात?

'टॅटूज' आणि 'पिअर्सिंग्ज' म्हणजे अद्वितीयत्वाची क्रांतिकारी प्रतीकं. आता मुलांच्या आयाही ही फॅडं करताना दिसू लागल्या आहेत. आपल्या व्यक्तित्वाचं अद्वितीयत्व साजरं करायचं तर इतरांप्रमाणे काहीतरी करण्यापेक्षा काही वेगळं, बरं करता येऊ शकतं.

त्या बाबतीत मी एक दृष्टिकोन स्वीकारलाय जो कदाचित तुम्हालाही राबवता येईल. मी ठरवलं की माझं सौंदर्य हे माझ्या निराळेपणात आहे, जी वस्तुस्थिती आहे की मी इतर कोणासारखाच नाहीये. मी अद्वितीय आहे. मला कोणीच, कधीच 'सामान्य' म्हणू शकणार नाही किंवा 'सर्वसाधारण'. गर्दीत मी उठून दिसणार नाही, पण वेगळा मात्र दिसेन.

माझ्या दृष्टिकोनाचा मला लाभच झालाय, कारण कोणीही, लहान मुलं असोत अगर मध्यमवयीन माणसं, मला पाहिल्यानंतर त्यांच्या प्रतिक्रिया पाहण्यासारख्या असतात. मुलं मला परग्रहवासी किंवा राक्षस समजतात. पौगंडावस्थेतली मुलं माझ्या या अवस्थेमागच्या कल्पना लढवू लागतात. हे ठीक, पण मोठी माणसंही चित्रविचित्र निष्कर्ष काढतात. अनेकांना मी कपड्याच्या दुकानातला पुतळा वाटतो.

एकदा मी माझ्या नातेवाइकांकडे कॅनडात गेलो असताना त्यांनी मला 'ट्रिक ऑर ट्रीट' या खेळासाठी घरोघर फिरवलं. त्यांनी मला मुखवट्यासह भीतिदायक म्हाताऱ्याचा पेहराव चढवला. पहिल्या काही घरांमध्ये विशेष प्रतिक्रिया मिळाल्या नाहीत. आमच्या लक्षात आलं की, या कपड्यांमध्ये कोणीच नसल्याचा असा त्यांचा समज होत असावा. मग पुढच्या घरात एका स्त्रीनं माझ्या पिशवीत लॉलिपॉप टाकल्यावर मी म्हणालो, "थँक्यू! ट्रिक ऑर

ट्रीट!" ती स्त्री किंचाळून उडाली. "त्या कपड्यांमध्ये मुलगा आहे?" ती ओरडली. "मला वाटलं हा बाहुला आहे."

'हं, मी छान दिसतो तर,' माझ्या मनात आलं.

माझ्यातला खट्याळपणा जागा झाला की मी माझ्या अद्वितीयत्वाचा पुरेपूर फायदा उठवतो. माझ्या भावंडांबरोबर, मित्रांबरोबर मॉल्समधून फिरायला मला आवडतं. असंच एकदा आम्ही मॉलमधून फिरत असताना एका स्टोअरच्या डिस्प्लेमध्ये आम्हाला एक पुतळा दिसला, माझ्यासारखाच. त्याला डोकं आणि धड होतं, पण हात-पाय नव्हते. त्या पुतळ्यानं केवळ अंडरवेअर चढवलेली होती, त्या अंडरवेअरची तो केवळ जाहिरात करीत होता. माझ्या डोक्यात एक कल्पना आली जी माझ्या सहकाऱ्यांनी उचलून धरली. मीसुद्धा माझी ड्रॉवर सोडून अन्य कपडे उतरवले आणि बाकीच्यांनी मला त्या पुतळ्याशेजारी स्थानापन्न केलं. बराच वेळ मी त्या डिस्प्लेची शोभा वाढवली. आम्हा 'भावंडांचं' कोणी निरीक्षण करू लागलं तर मी डोळा मारायचो, अदबीनं मान लववायचो किंवा अचानक हलायचो. लोक दचकायचे, काही जण तर चक्क घाबरलेही. रस्त्याच्या पलीकडे उभं राहून ही गंमत पाहणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांची हसून-हसून मुरकुंडी वळली होती. या प्रकारानंतर असंही ठरलं की, व्याख्यानाचा माझा व्यवसाय ठीक चालला नाही तर उदरनिर्वाहासाठी या उद्योगाचाही मी विचार करावा.

प्रज्वलित करा

माझ्या व्यंगावर आणि त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या विचित्र प्रतिसादांवर हसायला मी शिकलोय. परंतु स्वत:च्या मूल्याविषयीची शंका फेडण्याचा किंवा स्वत: असाल त्या स्थितीत स्वत:वर प्रेम करायला शिकण्याचा आणखी एक चांगला मार्ग आहे. आपल्या अंतरातल्या वेदनेवर व्यर्थ विचार करीत राहण्याऐवजी दुसऱ्यांच्या पीडा हलक्या करण्यासाठी पुढे या. दुसऱ्यांच्या गरजा पुऱ्या करण्यावर तुमचं लक्ष केंद्रित करा.

सार्वजनिक अन्नछत्रात स्वयंसेवा करा. अनाथांसाठी अर्थसाहाय्य जमवा. भूकंपपीडितांसाठी निधी उभारण्याकरिता आयोजन करा. मोठ्या लोकांकडून गरजूंसाठी देणग्या मिळवा. उठा आणि आपला हातभार लावा.

मी असं काही करतो तेव्हा मला जाणवतं की, आपल्या अंतरात्म्यामधील प्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्यात ज्याला अपयश आलंय त्याच्यासाठी हा सर्वोत्तम उपाय असू शकेल.

तुम्ही स्वत:च्या समस्या सोडवू शकत नसाल तर इतरांच्या सोडवण्यात वाटा उचला. शेवटी, घेण्यापेक्षा देणं केव्हाही चांगलंच नाही का? तुम्ही स्वत:वर प्रेम करू शकत नसाल तर स्वत:चा त्याग करा, स्वत:ला समर्पित करा. आणि तुम्ही जर तसं कराल तर तुमच्या नजरेत तुमचं मोल केवढं वाढलंय हे पाहून तुम्ही अचंबित व्हाल.

हे मला कसं कळलं? बाबा रे, माझ्याकडे पाहा. माझ्या आयुष्यावर नजर टाक. मी तुला आनंदी आणि परिपूर्ण व्यक्ती वाटतोय का?

नाकाच्या प्लॅस्टिक सर्जरीनं तुम्हाला जीवनाचा आनंद लाभणार नाही. 'फरारी' खरेदी केल्यानं तुम्ही लक्षावधी लोकांच्या गळ्यातले ताईत होणार नाही. तुमच्यावर कोणी प्रेम करावं किंवा कोणी तुम्हाला आदर द्यावा यासाठी लागणारं जे काही आवश्यक असेल ते तुमच्याकडे मुळातच आहे; अवकाश आहे केवळ ते जाणून घेऊन त्याला वाढवण्याचा. तुम्ही नेहमीच अचूक असणार नाही, पण ते ठीक आहे. कल्पनाच मुळात ही आहे की, तुमच्या जीवनकालात तुम्ही परिपूर्णता प्राप्त करायची नाहीये, तर तिचा पाठपुरावा करायचाय.

तुम्ही प्रयत्नशील असावं, तुम्ही मोठं होत जावं, आणि तुम्ही तुमच्याकडील शक्य ते सारं देत राहावं, म्हणजे अखेरीस तुम्ही मागं वळून पाहाल आणि म्हणू शकाल, 'शक्य ते सारं मी केलं, हातचं काही राखून न ठेवता.'

या क्षणी आरशात पाहा आणि म्हणा, "मी हा आहे असा आहे, आणि माझ्याकडून शक्य तेवढं सर्वोत्तम होण्याचं आव्हान मी स्वीकारतो." तुम्ही सुंदर आहात, कारण परमेश्वरानं त्याच्या हेतूसाठी तुम्हाला निर्मिलं आहे. तुमचं आव्हान आहे ते तो हेतू शोधण्याचं, त्याला आशेचं इंधन पुरवण्याचं, श्रद्धेवर त्याचं संचालन करण्याचं आणि स्वत:चं अद्वितीयत्व त्याच्या कामी लावण्याचं.

आत्मघृणा आणि पीडा टाळण्यासाठी स्वत:वर प्रेम करणं आणि स्वत:ला स्वीकारणं हाच एकमेव रामबाण उपाय आहे. व्यसनांनी तुम्हाला तात्कालिक मुक्तता लाभते, परंतु अंतत: ती तुमची पीडाच वाढवतात. मी जेव्हा स्वत:कडे परमेश्वराचं अपत्य आणि त्याच्या हेतूचा भाग या नजरेनं पाहू लागलो तेव्हा माझं जीवन पूर्ण पालटून गेलं. तुमची कदाचित येशूवर श्रद्धा नसेल, परंतु तुम्ही तुमच्या मोलावर आणि या भूतलावरील तुमच्या हेतूवर श्रद्धा ठेवू शकता.

मित्र व्हा आणि आनंदी राहा

आतला आनंद शोधण्यासाठी तुम्हाला माझा सर्वोत्तम सल्ला असेल की, तुम्ही स्वत:बाहेर पडून पुढाकार घ्यावा आणि तुम्ही तुमची कौशल्यं, बुद्धिमत्ता आणि तुमचं व्यक्तिमत्त्व दुसऱ्याचं जीवन सुधारण्यासाठी वापरा. या बाबतीत मी घेणारा होतो, याचक होतो, आणि मी जेव्हा तुम्हाला सांगतोय की त्यानं माझं जीवन पालटलं तेव्हा मी अतिशयोक्ती करीत नाहीये.

मी सोळा वर्षांचा असताना क्वीन्सलॅन्डमधल्या रनकॉर्न स्टेट हायस्कूलमध्ये शिकत होतो. शाळा सुटल्यावर घरी जाण्यासाठी मला तासभरतरी ताटकळत राहावं लागायचं. बहुतेक वेळा तो वेळ मी मित्रांशी किंवा अरनॉल्ड नावाच्या एका गृहस्थाशी गप्पा मारण्यात घालवायचो. ते शाळेचे ना प्रिन्सिपॉल होते ना शिक्षक, तर ते शाळेची देखभाल

करणाऱ्यांपैकी एक होते. पण तरीही ते अशा लोकांपैकी होते की जे आतल्या प्रकाशानं लखलखतात. ते स्वत:च्या बाबतीत निर्धास्त होते. आपल्या गणवेशात ते एवढे स्वस्थ असत की कोणालाही त्यांची संगत सुखावह वाटायची.

अरनॉल्ड कोणत्याही विषयावर बोलू शकायचे. ते आध्यात्मिक आणि सुज्ञ होते. अधूनमधून मधल्या सुटीत ते मुलांमध्ये ख्रिश्चन धर्मावर चर्चा घडवून आणायचे. त्यांनी मलाही बोलावलं होतं, मी धार्मिक प्रवृत्तीचा नसल्याचं त्यांना सांगितलं होतं तरीही. पण मला ते आवडायचे म्हणून मी त्या चर्चांमध्ये सहभागी व्हायचो.

या चर्चांमध्ये ते मुलांना त्यांच्या आयुष्याची कहाणी सांगायला सांगायचे. तसं ते मलाही म्हणायचे, "चल, निक, आम्हाला तुझी गोष्ट ऐकायचीय. आम्हाला तुझ्याविषयी आणि तुझ्या विचारांविषयी आणखी जाणून घ्यायचंय."

सतत तीन महिने मी त्यांना टोलवत होतो, "माझ्याकडे सांगण्यासारखी कोणतीच गोष्ट नाहीये," असं म्हणून.

अखेरीस अरनॉल्ड महाशयांची सरशी झाली. इतर मुलं प्रांजळपणे आपापली मनं मोकळी करताना मी पाहत होतो, त्यामुळे शेवटी मीही पुढच्या भेटीमध्ये तोंड उघडायचं ठरवलं. पण मी एवढा गोंधळलो, भेदरलो होतो की मी कागदावर टिपणं आणि मुद्दे लिहून काढले.

कोणावर छाप पाडण्याचा माझा मानस नव्हता. मला एकदाचं ते उरकून टाकून तिथून बाहेर पडायचं होतं, म्हणजे मी स्वत:ला तरी तसं सांगत होतो. पण माझं दुसरं मन मला खुणावत होतं की, मी इतर मुलांना सांगावं की माझ्या भावना, माझी दु:खं आणि माझी भीतीही त्यांच्यासारखीच होती.

हाता-पायांविना जीवन जगणं म्हणजे कसं असतं यावर मी त्यांच्याशी दहा मिनिटं बोललो. मी त्यांना दु:खाच्या गोष्टी सांगितल्या तशाच मजेशीरही. मला स्वत:ला 'पीडित' भासवायचं नव्हतं, म्हणून मी त्यांना माझ्या यशांविषयी सांगितलं. आम्ही सारे ख्रिश्चन असल्यामुळे मी त्यांना हेही सांगितलं की, अनेकदा मला वाटायचं की परमेश्वराला बहुधा माझं विस्मरण झालंय किंवा मी त्याची एक अपवादात्मक चूक होतो. मग पुढे मी त्यांना सांगितलं की, कालांतरानं कसं मला उमजायला लागलं की माझं तसं असणं कदाचित त्यांच्या योजनेचा भाग होता की जी मला अजूनपर्यंत समजली नव्हती.

"मी त्याची चूक नसल्याच्या विचारावर श्रद्धा वाढवायला आता मी शिकतोय," ओठांवर स्मित आणण्याचा प्रयत्न करीत मी माझं बोलणं संपवलं. वास्तविक बोलण्याचं दिव्य पार केल्यामुळे मला एवढं हुश्श वाटत होतं की मी रडण्याच्याच बेतात होतो. पण परिस्थिती उलटच होती, खोलीतल्याच बहुतेक सर्वांचे डोळे पाणावलेले होते.

"सगळ्यांनी रडावं एवढा का मी वाईट बोललो," अरनॉल्ड महाशयांना मी विचारलं.

"नाही, निक," ते म्हणाले, "उलट, तू खूपच चांगला बोललास."

प्रथम मला वाटलं की ते तोंडदेखलं बोलत होते आणि बाकीचे तोंडदेखलं रडत होते. शेवटी ते ख्रिश्चन होते, त्यांनी उपचार पाळणं स्वाभाविकच होतं.

पण समोरच्या मुलांपैकी एकानं मला त्यांच्या चर्चमधल्या मुलांपुढे बोलायला येण्याची विनंती केली. दुसऱ्या एकानं त्याच्या रविवारच्या क्लासमध्ये बोलायला यायला सांगितलं. पुढल्या दोन वर्षांमध्ये चर्चेसमध्ये, युवा गटांमध्ये, संस्थांमध्ये वगैरे बोलण्यासाठी मला डझनावारी निमंत्रणं मिळाली.

शाळेत असताना मी ख्रिश्चन गटांशी संपर्क टाळायचो, कारण मला तो धार्मिक शिक्का स्वत:ला लावून घ्यायचा नव्हता. म्हणून सामान्य इसम असल्याची प्रतिमा उभी करण्यासाठी मी आखडून राहायचो किंवा मधूनच शिवीगाळही करायचो. पण वस्तुस्थिती ही होती की तोपर्यंत मी स्वत:ला स्वीकारलेलंच नव्हतं.

अर्थात, परमेश्वराची विनोदबुद्धी चांगली आहे. त्यानं अशी व्यवस्था केली की, मी ज्या गटांना टाळत होतो त्यांच्यातच बोलण्याची मला निमंत्रणं मिळू लागली, आणि तिथंच त्यानं माझ्या जीवनाच्या उद्देशाचं मला दर्शन घडवलं. त्यानं मला दाखवून दिलं की, मी परिपूर्ण नसलो तरी लुटण्यासारखी संपदा माझ्यापाशी होती आणि इतरांची दु:खं हलकी करण्यासाठी आशीर्वादही.

हे सारं तुमच्या बाबतीतही लागू होतं. आपली अपूर्णत्वं सारखी आहेत. आपल्याला मिळालेली वरदानं आपण आपापसात वाटून घेतली पाहिजेत. स्वत:च्या आतमध्ये पाहा. तुमच्या अंतरातला दिवा प्रज्वलित होण्यासाठी प्रतीक्षा करतोय.

पाच

दृष्टिकोन म्हणजेच ध्येयसिद्धी

मा झी व्याख्यानं नियोजित करण्यासाठी मी जेव्हा कंपनी स्थापन केली तेव्हा मी तिचं नाव ठेवलं, 'अॅटिट्यूड इज अॅल्टिट्यूड', कारण मी सकारात्मक दृष्टिकोनाचा अवलंब केला नसता, तर माझ्या कमतरतांवर कुरघोडी करून असंख्य लोकांपर्यंत पोहोचणं मला शक्य झालं नसतं.

दृष्टिकोनाच्या संचालनाच्या कल्पनेनं तुमच्या कपाळाला आठ्या पडल्या असतील किंवा तुम्ही उपहासानं हसालही, कारण ऊठसूट कोणीही यावर बोलतं, उपदेश देतं. पण मी मनापासून सांगतोय की, तुमच्या दृष्टिकोनावर नियंत्रण ठेवण्यात, तुमच्या मन:स्थितीचं संतुलन राखण्यात, त्याचा उपयोग करण्यात तसंच अमर्याद जीवन जगण्याची तुमची क्षमता खुंटवणाऱ्या तुमच्या दोषांना लगाम घालण्यात दृष्टिकोनाची खरी शक्ती निदर्शनास येते. हार्वर्ड युनिव्हर्सिटीत शिकवणारे मानसोपचारतज्ज्ञ आणि तत्त्वज्ञ विल्यम जेम्स म्हणतात की, आपले दृष्टिकोन बदलून आपण आपलं जीवन बदलू शकतो ही जाणीव त्यांच्या पिढीच्या सर्वांत मोठ्या संशोधनांपैकी एक आहे.

तुम्हाला त्याची जाणीव असेल किंवा नसेलही, पण तुम्ही तुमच्या दृष्टिकोनातून जगाकडे पाहता आणि ते दृष्टिकोन तुमच्या स्वत:च्या चांगल्या-वाइटाच्या, चूक-बरोबरच्या आणि योग्यायोग्यतेच्या कल्पनांवर आधारलेले असतात. तसंच तुमचे निर्णय आणि तुमच्या कृती त्या दृष्टिकोनावर बेतलेल्या असतात, त्यामुळे तुम्ही जे कराल त्यात यश लाभलं नाही, तर तुमचा दृष्टिकोन बदलून जीवनात बदल घडवण्याची शक्ती तुमच्याकडे असते.

तुमचा दृष्टिकोन म्हणजे टीव्हीचा रिमोट कन्ट्रोल आहे अशी कल्पना करा. तुम्ही पाहत असलेला कार्यक्रम तुम्हाला आनंद देत नसेल, तर तुम्ही त्वरित रिमोट कन्ट्रोलचं बटण दाबता. अगदी तसंच, तुम्हाला अपेक्षित फळ मिळत नसेल तर समोरची सारी आव्हानं अंगावर घ्या, पण तुमचा दृष्टिकोन बदला.

लिंडा नावाच्या एका संगीत शिक्षिकेनं पत्र लिहून मला कळवलं की, तिच्या विस्मयकारक दृष्टिकोनानं तिनं कशी तिच्या बालपणाच्या अपघातावर कुरघोडी केली, नाहीतर त्या अपघातामुळे तिचं आयुष्य उद्ध्वस्त झालं असतं. ती शाळेत असताना कार अपघातात ती जबर जखमी झाली होती. अडीच दिवस ती कोमात होती आणि शुद्धीवर आल्यावर तिला चालता, बोलता वा खाता येईना.

डॉक्टर्सचा अंदाज होता की, तिच्या बुद्धीवर परिणाम होईल आणि भविष्यात कधीच ती व्यवस्थित चालू-बोलू शकणार नाही. परंतु सुदैवानं तिचा मेंदू, वाणी आणि शरीर सुधारलं.

एव्हाना अपघातामुळे लिंडामध्ये एकच दोष उरला होता, तो म्हणजे तिचा उजवा डोळा दुखावला होता ज्यामुळे तिला त्या डोळ्यानं नीट दिसायचं नाही.

या महिलेनं त्या डोळ्यामुळे पुष्कळ वेदना सहन केल्या. खूप ऑपरेशन्सही झाली, पण तिच्या दृष्टीत मात्र काही फरक पडला नाही. अशात तिच्यात सहज कटुता आली असती आणि आपण बळी ठरल्याची भावनाही. जीवनानं तिच्याशी अन्याय केल्याचा दृष्टिकोन तिनं बाळगला असता, तर कोणीच तिला दोष दिला नसता. पण तिनं तसं केलं नाही, तिनं काय केलं ते पाहा.

"कधी-कधी मी निराश होते की माझे दोन्ही डोळे एकीनं काम करीत नाहीत," तिनं मला लिहिलं होतं. "पण त्यानंतर मला स्मरण होतं की मी कुठून कुठे आले आहे आणि मला जाणीव होते की, परमेश्वरानं मला कुठल्याशा कारणानं वाचवलं आहे– माझ्या जीवनातल्या त्याच्या कार्याची साक्षीदार म्हणून. माझा डोळा ही त्याची मला जाणीव आहे की मी परिपूर्ण नाहीये, पण ते ठीक आहे; माझ्या बळासाठी मी पूर्णपणे 'त्याच्या'वर अवलंबून राहायला हवं. परमेश्वराला माझ्या डोळ्याच्या कमतरतेमधून स्वत:ची शक्ती दाखवून द्यायची होती– मी कमकुवत असले तरी 'तो' सशक्त आहे."

लिंडानं स्वीकारलं की तिच्या दृष्टीची अपूर्णता ही तिच्या जीवनासाठी परमेश्वराच्या परिपूर्ण योजनेचा भाग होता. तिनं लिहिलं होतं, "त्यानं माझा जीवनविषयक दृष्टिकोन बदलला– मला कल्पना आली की माझं जीवन कधीही संपू शकतं, त्यामुळे मी सतत 'त्या'च्यासाठी जगण्याचा यत्न करते. तसंच मी सतत सकारात्मक राहण्याचा, माझं सर्वस्व 'त्या'च्यासाठी व इतरांसाठी खर्च करण्याचा आणि माझ्या आवतीभोवतीच्या लोकांची काळजी घेण्याचा प्रयत्न करते."

एका डोळ्यातल्या दोषावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी लिंडा कृतज्ञभाव राखते की, ती विचार करू शकते, बोलू- चालू शकते आणि जवळ-जवळ सर्व बाबतीत सामान्य जीवन जगू शकते. तिनं जसा तिचा दृष्टिकोन निवडला तसाच मला आणि तुम्हालाही स्वत:चा दृष्टिकोन निवडण्याचं स्वातंत्र्य असतं.

आणि त्यासाठी तुम्हाला साधुसंत असावं लागत नाही. तुम्ही जेव्हा कोणत्या व्यक्तिगत दु:खातून अथवा अपघातातून जात असाल तेव्हा भीती, राग आणि दु:ख या साऱ्या भावना तुम्ही अनुभवणं एकदम सामान्य आणि स्वाभाविक आहे, परंतु एक वेळ अशी यायला हवी जेव्हा आपण म्हटलं पाहिजे : "मी अजूनही इथं शिल्लक आहे. माझं उर्वरित जीवन मला अश्रू ढाळत घालवायचं की माझ्या कटू अनुभवापलीकडे जाऊन मला माझ्या स्वप्नपूर्तीच्या दिशेनं मार्गक्रमण करायचं?"

हे करणं सोपं आहे? बिलकूल नाही. त्यासाठी प्रचंड निग्रहाची गरज आहे आणि त्याचबरोबर त्याला जोड हवी हेतूची, आशेची, श्रद्धेची आणि विश्वासाची जी लुटण्यासाठी माझ्याकडे कौशल्यं आणि गुण आहेत. पण लिंडा ही अशा अनेक लोकांपैकी एक आहे

ज्यांनी दाखवून दिलंय की सकारात्मक दृष्टिकोनानं तुम्ही काहीही उल्लंघू शकता. कालातीत आणि निर्विवाद सत्य हे आहे की काय घडेल यावर तुमचं आणि माझं जराही नियंत्रण असणार नाही, पण आपला प्रतिसाद कसा असेल यावर मात्र आपलं नियंत्रण असू शकतं. आपण जर योग्य दृष्टिकोन ठेवला तर आपण कोणत्याही आव्हानांशी समर्थपणे सामना करू शकतो.

तुमच्या जीवनातल्या पुढच्या मोठ्या अडथळ्यावर तुमचं बिलकूल नियंत्रण नसेल. तुमच्या घराला चक्रावाताचा आघात होतो; कोणी दारुडा तुमच्या कारवर त्याची कार आदळतो, तुमचा मालक तुम्हाला कामावरून कमी करतो, तुमचा जीवनसाथी अधिक स्वातंत्र्याची मागणी करतो. आपण अधूनमधून फटके खातो. दु:खी व्हा, निराश व्हा, पण धीर बाळगा आणि स्वत:ला विचारा, "पुढे काय?" थोडी चडफड झाली, दोन टिपं गाळून झाली की मग आत्मबळाचा वापर करा आणि दृष्टिकोनात थोडा बदल साधा.

बळ वाढवा

औषधाची एकही गोळी घेतल्याविना, मानसोपचारतज्ज्ञाविना किंवा पर्वतरांगांमधून गुरूच्या चरणी गेल्याविना तुम्ही स्वत:चा दृष्टिकोन बदलून आपलं जीवन पालटू शकता. या पुस्तकात इथवर मी तुम्हाला प्रेरित करीत राहिलो आहे की, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या जीवनाचा हेतू गवसावा. मनात भविष्याविषयी आशा बाळगावी, आपल्या जीवनातल्या शक्यतांविषयी हृदयात श्रद्धा धारण करावी आणि स्वत: जसं असाल त्यावर प्रेम करावं. ही साधनं तुम्हाला सकारात्मकतेसाठी पाया आणि कारणं उपलब्ध करून देतील. ही सकारात्मकता तुम्हाला तुमचा दृष्टिकोन साधण्यास साहाय्यभूत ठरेल, अगदी तशीच जशा तुमच्या रिमोट कन्ट्रोलमधल्या बॅटरीज.

तुम्हाला अशी व्यक्ती ठाऊक आहे जी यशस्वी, परिपूर्ण आणि आनंदी आहे, पण तरीही नकारात्मक? मला तरी नाही. असं असतं कारण सकारात्मकता शक्तिदायी असते – ती तुम्हाला तुमच्या भावनांवर नियंत्रण देते. याउलट नकारात्मकता तुमच्या इच्छाशक्तीला दुर्बल करते आणि तुमच्या मन:स्थितीला तुमच्या कृतींवर नियंत्रण देते. सकारात्मकतेमुळे तुम्ही तुमचा दृष्टिकोन साधू शकता. यालाच म्हणतात 'पुनर्जुळवणूक' कारण तुम्ही नेहमीच परिस्थिती नियंत्रित करू शकत नसलात तरी तिच्याकडे बघण्याची दृष्टी तुम्ही नक्कीच बदलू शकता.

सुरुवातीला तुम्हाला हे जाणीवपूर्वक करावं लागेल, पण एकदा ते तुमच्या अंगवळणी पडलं की ते आपोआप घडत जातं. मी सतत माझा मदतनिसांबरोबर फिरतीवर असतो आणि व्याख्यानांच्या माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीला माझी फ्लाइट चुकल्यावर किंवा रद्द झाल्यावर मी खूप चिडत असे, निराश होत असे. शेवटी मला ही वस्तुस्थिती स्वीकारावी लागली की, आम्ही ज्या प्रमाणात फिरत असतो त्यात अशा समस्या या येणारच. तसंच

अकांडतांडव करण्याचं माझं वयही सरलं होतं आणि त्यातून पाय आपटल्याशिवाय तसे अकांडतांडव परिणामकारकही ठरत नाही.

प्रवासातल्या व्यत्ययाबद्दलचे माझे दृष्टिकोन मला बदलायला लागले. आता जेव्हा अशा परिस्थितीत आम्हाला विमानतळावर किंवा अन्य ठिकाणी तासन्तास ताटकळत राहावं लागतं तेव्हा मी त्या नकारात्मक घटनेचा सकारात्मक अर्थ काढण्याचा प्रयत्न करतो आणि माझा तणाव, नैराश्य आणि संताप टाळतो. त्या वेळी मी सकारात्मक विचार करतो. *खराब हवामानामुळे आमची फ्लाइट रद्द झाली असेल. आणि ते योग्यच झालं कारण वादळानंतरची आमची फ्लाइट निश्चितच अधिक सुरक्षित असेल.*

काही तांत्रिक समस्येमुळे त्यांनी आमची फ्लाइट रद्द केली असेल. तेही उत्तमच असेल कारण वाईट विमानात प्रवास करण्यापेक्षा चांगलं विमान उपलब्ध होईपर्यंत इथं जमिनीवर सुरक्षित राहणं मला निश्चितच पसंत असेल.

अर्थातच, मला निर्विघ्न प्रवास निश्चितच आवडेल. पण माझा दृष्टिकोन बदलण्याला पर्याय असेल तो नकारात्मक विचारांचा आणि जे निश्चितच लाभदायी नसेल. जेव्हा तुम्ही तुमच्या नियंत्रणाबाहेरच्या परिस्थितींना तुमचा दृष्टिकोन आणि तुमच्या कृतींवर नियंत्रण देता तेव्हा तुम्ही घाईघाईचे निर्णय आणि चुकीचे निष्कर्ष घेण्याचा, एकांगी प्रतिक्रियांचा, अल्पावधीत हात टेकण्याचा तसंच अगदी आयत्या वेळी संधीला मुकण्याचा, त्याच वेळी जेव्हा तुम्हाला खातरीनं वाटू लागतं की तुमच्या जीवनात आता काही बरं घडू शकणार नाही तेव्हा समोर आलेल्या संधीला मुकण्याचा धोका पत्करता.

नकारात्मकता निश्चित करते की तुम्ही कधीच परिस्थितीवर विजय मिळवू शकणार नाही. तुम्हाला जेव्हा जाणवू लागेल की नकारात्मक विचारांनी तुमचं रक्त तापायला लागलंय तेव्हा तुम्ही तुमचे विचार पडताळा आणि त्यांच्या जागी सकारात्मक विचार पेरा. आपल्या आतल्या आवाजाचा कानोसा घेण्यास साहाय्यभूत ठरणारा सकारात्मक विरुद्ध नकारात्मक विचारांचा हा तक्ता पाहा :

नकारात्मकता	**सकारात्मकता**
मी हे कधीच उल्लंघू शकणार नाही.	हेही निघून जाईल.
आता मी हे सहन करू शकणार नाही.	मी इथवर आलोय. पुढे चांगलेच दिवस आहेत.
या एवढं वाईट मी कधी अनुभवलं नाहीये.	काही दिवस इतरांपेक्षा कठीण असतात.
मला कधीच दुसरं काम मिळणार नाही.	एक दार बंद झालंय, पण दुसरं उघडेल.

दिलासादायक दृष्टिकोन

चाळीस वयाचा माझा मित्र 'चक' याला शोध लागला की, त्याच्या विशीत त्यानं ज्या कर्करोगाला दोनदा पिटाळून लावलं होतं तो पुन्हा उद्भवला होता. मात्र, या वेळी तो ट्यूमर त्याच्या नाजूक अवयवांभोवती असल्यामुळे डॉक्टर्सना त्यावर रेडिएशनचा मारा करता येण्यासारखा नव्हता. थोडक्यात, भवितव्य ठीक नव्हतं, किंबहुना त्याची गच्छंतीच होती ती जणू. एक पती, एक पिता तसेच भोवती मित्रपरिवार आणि नातलगांचा गोतावळा असलेल्या चकला जीवनाचा उद्देश होता. त्याच्याबरोबर आशा, श्रद्धा आणि आत्मप्रेम ही त्रिसूत्रीही त्याच्या बाजूची होती. यामुळे त्यानं दृष्टिकोन ठेवला की तो त्यात मरणार नव्हता. उलट, त्यानं असाच पवित्रा घेतला की आजार त्याच्या देहात होता, पण तो स्वत: मात्र आजारी नव्हता. उत्साह राखणं, सकारात्मक राहणं आणि जीवनाची वाटचाल पूर्ववत चालू ठेवणं हा त्याचा निग्रह होता.

या परिस्थितीत कोणीही चकला नशीबवान ठरवणार नाही, बरोबर? पण गंमत अशी झाली की रेडिएशनवर काट मारली जाणं हे त्याच्या बलवत्तर नशिबाचा भाग होतं. सेंट लुईसमधले चकचे डॉक्टर्स कर्करोगाच्या नव्या औषधावर प्रयोग करीत होते जे रेडिएशनरहित होतं. हे औषध स्वतंत्रपणे कर्करोगाच्या पेशींवर हल्ला करून त्यांना मारणारं होतं. पारंपरिक औषधोपचार चकला लागू पडणार नसल्यानं तो या प्रायोगिक औषधांसाठी पात्र ठरला, पण त्याहीपेक्षा, त्याच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे डॉक्टर्सना तो योग्य उमेदवार वाटला. त्यांना वाटत होतं की, तो या संधीचं सोनं करेल आणि त्यानं ते केलंही.

त्याच्यावर या नव्या औषधांनी उपचार चालू असताना, बिछान्यात आडवं पडून राहण्याऐवजी तो व्यायाम करू लागला. त्याचा दृष्टिकोन एवढा सकारात्मक होता आणि चैतन्य एवढ्या उंचीचं की, त्याला अनेकांना पटवावं लागे की तो तिथं कर्करोगावर उपचार घेत होता. लोक त्याला सांगायचे की तो बिलकूल कर्करोगी वाटत नव्हता.

उपचार झाल्यानंतर काही आठवड्यांनी चकनं डॉक्टरची भेट घेतली. डॉक्टर त्याला अचंब्यानं म्हणाले, "मि. चक, तुमच्या ट्यूमरचा मागमूसही दिसत नाहीये. तो गेला."

डॉक्टर्स सांगू शकत नव्हते की त्या कर्करोगाचा अंत चकच्या दृष्टिकोनाने केला की प्रायोगिक औषधानं केला, की तो चमत्कार होता, की तिन्हीचा संयोग त्याला कारणीभूत होता. मी तुम्हाला एवढंच सांगू शकतो की, चक इस्पितळातून बाहेर पडला तो कर्करोगाविना आणि बैलाची शक्ती घेऊन. तो मृत्यूला सामोरा जात असल्याची सारी लक्षणं असताना, चकनं सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारला तसंच त्यानं आजारपणावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्याच्या हेतूवर, आशेवर, श्रद्धेवर आणि तो इतरांच्या उपयोगी पडेल या विश्वासावर ते केंद्रित केलं.

दृष्टिकोन निवडा

लिंडा आणि चक दोघांनी असे दृष्टिकोन निवडले ज्यामुळे त्यांनी त्यांच्या मोठ्या समस्यांवर मात केली, पण त्यांनी निवडलेले दृष्टिकोन वेगळे होते. लिंडानं कटुतेऐवजी कृतज्ञता निवडली. चकनं निष्क्रियतेऐवजी कृती निवडली. निवड करण्याजोगे पुष्कळ दृष्टिकोन आहेत, पण माझ्या मते त्यातले प्रमुख आहेत :

१) कृतज्ञतेचा दृष्टिकोन
२) कृतीचा दृष्टिकोन
३) करुणेचा दृष्टिकोन
४) क्षमाशीलतेचा दृष्टिकोन

१. कृतज्ञेचा दृष्टिकोन

लिंडानं तिच्या अपघातानंतर याच दृष्टिकोनाचा अवलंब केला. जे काही तिला गमवावं लागलं त्याबद्दल शोक करीत राहण्याऐवजी जे काही तिचं बचावलं गेलं त्याबद्दल आणि तिनं जीवनात जी पुन्हा उभारी घेतली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. माझा स्वत:चा कृतज्ञतेच्या दृष्टिकोनावर नितांत विश्वास आहे. माझ्या भाषणांमध्ये अनेकदा मी माझ्या छोट्या डाव्या पावलाचा उल्लेख करतो. मुळात मी तो उल्लेख करतो, कारण श्रोत्यांना तो दिसत असतो आणि त्यानं ते विचलित होतात. ती त्यांची अस्वस्थता दूर करण्यासाठी मी तसं करतो. मी त्यावर विनोदही करतो, पण त्याच्या अस्तित्वाबद्दल माझ्या मनात कृतज्ञतेचाच भाव असतो. माझ्या व्हीलचेअरच्या नियंत्रणासाठी, कॉम्प्युटरवर मिनिटाला चाळीस शब्द या गतीनं टाइप करण्यासाठी, माझा की-बोर्ड आणि ड्रम सेट वाजवण्यासाठी, माझा सेलफोन वापरण्यासाठी वगैरे मी त्याचा वापर करतो.

तुमच्यासारखीच उत्साही माणसं आणि तुमच्या स्वप्नांना आधार देणारी मंडळीही कृतज्ञतेच्या दृष्टिकोनाकडे आकर्षित होतात. कधी-कधी ही माणसं विस्मयकारक मार्गांनी तुम्हाला प्रेरणा देतात आणि तुमचं जीवन बदलण्यास साहाय्यभूत ठरतात. लहानपणी माझी आई मला पुस्तकं वाचून दाखवायची, त्यातलं माझं एक आवडतं पुस्तक होतं, 'दि गॉड आय लव्ह'. तिनं ते मला पहिल्यांदा वाचून दाखवलं तेव्हा मी सहा वर्षांचा होतो. त्या वेळी मला एकही अशी व्यक्ती ठाऊक नव्हती जी हाता-पायांविना जन्माला आली होती. माझ्यासमोर असा एकही आदर्श नव्हता जो दिसायला माझ्यासारखा होता आणि त्याच्यापुढची आव्हानंही माझ्यासारखीच होती. ते पुस्तक त्या वेळी आणि आताही मला कृतज्ञतेच्या दृष्टिकोनाचा पाया रचण्यात प्रेरित करतं, कारण ते लिहिलंय जॉनी एरिकसन टेडा हिनं.

जॉनी, मेरीलॅन्डमधली उत्तम जलतरणपटू आणि घोडेस्वार होती. वयाच्या सतराव्या वर्षी पाण्यात सूर मारताना तिची मान मोडली. १९६७ सालच्या त्या अपघातात ती मानेच्या

खाली पूर्णपणे लुळी पडली. त्या पुस्तकात तिनं अपघातानंतरच्या तिच्या नैराश्याबद्दल तसंच आत्महत्येच्या विचारांबद्दल लिहिलंय, पण कालांतरानंतर तिचा विश्वास बळावला की, ती घटना कुठल्या जुगारअड्ड्यावरच्या नाणेफेकीनं घडली नव्हती, तर परमेश्वराच्या तिच्याविषयीच्या योजनेचा तो भाग होता.

मला ते पुस्तक आवडायचं. नंतर कधीतरी आईनं जॉनीच्या गाण्याच्या सीडीज आणल्या. मी अशी गाणी प्रथमच ऐकत होतो ज्याचे शब्द होते, 'आपणा सर्वांनाच चाकं लावलेली आहेत', किंवा 'कोणीच परिपूर्ण नसतं'. त्यांचा आशय असा होता की व्हीलचेअरमध्येही तुम्ही जीवनाचा केवढा आनंद घेऊ शकता. मी पुष्कळदा ती गाणी ऐकायचो. बालपणी आणि आताही मी मधूनमधून ती गुणगुणतो. तुम्ही कल्पना करा की, त्याच जॉनीनं जेव्हा भेटण्यासाठी मला निमंत्रण पाठवलं तेव्हा मला काय वाटलं असेल.

२००३मध्ये मी कॅलिफोर्नियातल्या एका चर्चमध्ये व्याख्यान देत होतो. व्याख्यानानंतर एक स्त्री मला भेटली आणि तिनं मला जॉनीसाठी काम करणाऱ्या त्यांच्या ऑगुरा हिल्समधल्या 'जॉनी अॅन्ड फ्रेन्ड्स' या संस्थेच्या मुख्यालयाला भेट देण्याचं निमंत्रण दिलं. माझ्या पहिल्या भेटीत, जॉनीच्या प्रथमदर्शनानं मी स्तंभित झालो. तिनं लगेचच मला मिठी मारली. तो क्षण माझ्यासाठी फार मोठा होता. तिच्या लकव्यामुळे तिच्या अंगात फार शक्ती नाहीये. त्यामुळे मला मिठी मारल्यानंतर व्हीलचेअरवर पुन्हा पाठ टेकायला तिला खूप प्रयास पडले. प्रतिक्षिप्त क्रियेनं माझं शरीर पुढे झुकवून मी तिला मदत केली.

"तू खूप शक्तिशाली आहेस!" तिनं माझी स्तुती केली.

अर्थातच, मी सुखावलो. ही स्त्री, जिनं मला माझ्या लहानपणी बळ, आशा आणि श्रद्धा दिली होती, ती मला सांगत होती की मी बलिष्ठ आहे. तिनं मला सांगितलं की, सुरुवातीला तीही माझ्याप्रमाणेच स्वत:च्या व्यंगांशी झगडली होती. तिनं पुलावरून स्वत:ला झोकून देऊन आत्महत्या करण्याचाही विचार केला होता, पण मग तिच्या मनात विचार आला की, तसं केल्यानं मृत्यू न येता केवळ तिच्या मेंदूला मोठी इजा झाली तर पहिली अवस्था खूप चांगली होती असं म्हणण्याची वेळ येईल. शेवटी तिनं परमेश्वराकडे प्रार्थना केली, "हे परमेश्वरा, मी मरू शकत नसेन तर मी जगावं कसं ते मला दाखवं!"

अपघातानंतर काही दिवसांनी तिच्या मैत्रिणीनं तिला बायबलमधल्या एका वचनाचा एक कागद दिला. 'सर्व बाबतीत धन्यवाद द्या, कारण तुमच्या बाबतीत परमेश्वराची आणि येशूची हीच इच्छा आहे.' जॉनी तेव्हा फारशी धार्मिक वृत्तीची नव्हती. आपल्या अपघाताविषयीच्या रागाची आणि निराशेची तिची भावना अजून तीव्रच होती. तेव्हा त्या संदेशात तिला काही अर्थ वाटत नव्हता.

"याला काय अर्थ आहे," जॉनी मैत्रिणीला म्हणाली, "याबद्दल मला कृतज्ञता वाटत नाहीये, शक्यच नाही."

मैत्रिणीनं तिला समजावलं की तिच्या लकव्याबद्दल तिनं कृतज्ञ राहूच नये. तिनं एवढंच करावं की श्रद्धेची झेप घ्यावी आणि येऊ घातलेल्या वरदानांसाठी धन्यवाद द्यावेत.

ती कल्पना स्वीकारणं जॉनीसाठी अर्थातच कठीण होतं. त्या वेळी ती स्वत:ला बळी समजत होती, अपघाताची बळी. सुरुवातीला तिनं तिच्या लकव्यासाठी स्वत: सोडून सर्वांना दोषी ठरवलं आणि सर्वांनी त्याची भरपाई करावी असं तिला वाटत होतं. तिनं कोर्टात केस घातली. तिनं तिच्या पालकांनाही सोडलं नाही, अपघात होऊ शकतो अशा जगात तिला आणल्याबद्दल तिनं त्यांनाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं.

जॉनीच्या मनानं घेतलं की तिनं हाता-पायांचा उपयोग गमावल्यामुळे जग तिला काहीतरी देऊ लागत होतं. यथावकाश तिला जाणीव झाली की बळी ठरल्याची भावना तोंड लपवण्यासाठी एकदम सोपं ठिकाण होतं. आपण सर्व जणच कोणत्याना कोणत्या संकटाचे बळी असल्याचा दावा करू शकतो. काही जण स्वत:ला बळी समजतात, कारण त्यांनी गरिबीत जन्म घेतला असतो. अन्य काही जण तसं समजतात; कारण त्यांच्या आई-वडिलांनी घटस्फोट घेतलेला असतो; ते आजारी असतात; त्यांच्या नोकऱ्या चांगल्या नसतात; ते त्यांच्या कल्पनेप्रमाणे सडपातळ, अंगानं भरलेले किंवा सुंदर नसतात.

आपल्याला जेव्हा चांगल्या जीवनावर स्वत:चा अधिकार जाणवू लागतो तेव्हा आपल्या जीवनात काही त्रासदायक घडलं की आपल्या मनात नुकसानीची भावना निर्माण होते. मग आपण आरोपीच्या शोधात राहतो आणि आपल्याला जे सहन करावं लागलेलं असतं त्यासाठी त्यांच्याकडून आपण भरपाईची मागणी करतो. आत्मकेंद्रित मन:स्थितीत आपण सराईत बळी बनतो. तरीही करुणेची भावना अत्यंत वांझ असते. स्वत:ची केवढीही कीव करा, पण त्यातून निष्पन्न शून्यच.

जॉनीप्रमाणेच तुम्हीही बळीची भूमिका सोडावी, कारण तीत भविष्य नसतं. ती म्हणते की, सोसणं तुम्हाला दुबळं बनवतं आणि तिथं तुम्ही खाली जाणारा नैराश्याचा मार्ग निवडू शकता किंवा कृतज्ञतेच्या दृष्टिकोनाचा अवलंब करून चढावाचा आशादायी मार्ग निवडू शकता. कृतज्ञ वाटणं सुरुवातीला तुम्हाला जड जाईल, पण तुम्ही जर स्वत:ला बळी समजणं दिवसागणीक टाळू लागाल, तर तुम्हाला बळ प्राप्त होईल. तुमच्या सांप्रत स्थितीत तुम्हाला असं काही सापडत नसेल ज्याबद्दल तुम्हाला कृतज्ञ वाटेल, तर पुढे येऊ घातलेल्या चांगल्या दिवसांसाठी आगाऊ कृतज्ञता व्यक्त करा. यामुळे तुमच्यात सकारात्मकता येईल तसंच भूतकाळावरून तुमची नजर हटेल आणि तुमची दृष्टी भविष्यावर खिळून राहील.

"मला जाणवलं की बायबलमध्ये कुठल्यातरी पानांवर आत्मघातापासून दूर जाणाऱ्या मार्गाचा उल्लेख आहे आणि ते निर्विवाद सत्य शोधायला फार वेळ लागला नाही. परमेश्वराच्या शक्तीत तुम्ही एकेक दिवस घालवा आणि तुमचं रूपांतर विजयी वीरांच्या वरच्या पातळीवर झालेलं असेल," जॉनीनं मला सांगितलं.

जॉनीला कळलं की बळीची भूमिका साकारून ती एवढी खाली चालली होती जेवढी ती लकव्यामुळेही गेली नव्हती, तसंच तुमच्यापाशी असलेल्या चांगल्या गोष्टींसाठी मनात कृतज्ञतेचा भाव जोपासण्यानं तुम्ही उंचीवर जाता. या दृष्टिकोनानं तिचं जीवन बदललं आणि तिच्यामुळे माझंही, तसंच तिच्या पुस्तकांमुळे आणि डीव्हीडीजमुळे इतरही असंख्य लोकांचं जीवन बदललं आहे. तिची संस्था 'जॉनी अॅन्ड फ्रेन्ड्स', 'व्हील्स फॉर दि वर्ल्ड' नावाचा कार्यक्रम राबवते ज्याद्वारे त्या संस्थेनं साठ हजार व्हीलचेअर्स आणि हजारो कुबड्या, काठ्या आणि वॉकर्सचं वाटप जगातल्या १०२ देशांमधल्या अपंग बंधू-भगिनींसाठी केलंय.

जॉनीचा पुरा देह लुळा आहे. मला हात-पाय नाहीत. तरीही आम्ही दोघांनीही हेतू शोधला आणि त्याचा पाठपुरावा केला. आम्ही नैराश्याऐवजी आशेला कवटाळलं. परमेश्वरावर आणि भविष्यावर आम्ही श्रद्धा ठेवली. आम्ही स्वीकारलं की आम्ही अशी अपूर्ण माणसं आहोत ज्यांना मौल्यवान वरदानं लाभली आहेत. आमच्या सकारात्मक दृष्टिकोनांना आम्ही कृतज्ञतेची जोड दिली आणि त्यांच्या साहाय्यानं आम्ही स्वत:चं तसंच इतरांचंही जीवन बदलण्याच्या कार्याला लागलो.

आणि हा ना देखावा आहे, ना जाहिरात– हे सत्य आहे. बळी असल्याच्या भावनेऐवजी किंवा कटुतेऐवजी, आणि निराशेऐवजी कृतज्ञतेच्या दृष्टिकोनाची साथ घेऊन तुम्हीही आव्हानांचे केवढेही डोंगर पार करू शकाल. पण तुम्हाला जर कृतज्ञता प्राप्त करणं जड जात असेल, तर अन्यही काही मार्ग उपलब्ध आहेत.

२. कृतीचा दृष्टिकोन

ताबिथा माझ्याप्रमाणेच विना हाता-पायांची आहे. तरीही म्हणते की, तिला कायमचं वरदान लाभल्याचं वाटतं आणि म्हणून तिला विश्वाला परतफेड करावीशी वाटते. तिच्या कृतीच्या दृष्टिकोनामुळे तिनं आणि तिच्या कुटुंबीयांनी मोठे आजार आणि अपंगत्व असणाऱ्या आणि अनाथालयात राहणाऱ्या मुलांसाठी 'गूडी बॅग्ज'ची मोहीम हाती घेतली.

कधी-कधी, तुमचं अडकून पडलेलं जीवन सुरळीत करण्यासाठी किंवा त्याला अडथळ्यापार नेण्यासाठी सर्वोत्तम मार्ग असतो तुमचं स्वत:चं किंवा इतरांचं जीवन सुधारणं. साक्रेटिस म्हणतो त्याप्रमाणे, 'त्याला जगाला पुढे घेऊन जायचं असेल तर प्रथम त्यानं स्वत:ला पुढे न्यावं.' तुम्हाला जर अनुकूल स्थिती लाभत नसेल तर ती तुम्ही स्वत: निर्माण करा. तुमच्यावर जर नुकसानाचा किंवा दु:खाचा डोंगर कोसळला असेल तर शोक करण्यासाठी स्वत:ला वेळ द्या, पण त्यानंतर मात्र वाइटातून चांगलं निर्माण करण्यासाठी हात पुढे करा.

कृतीचा दृष्टिकोन अंगीकारण्यानं सकारात्मक गती लाभते. पहिली पावलं नि:संशयपणे जड पडतात. बिछान्यात उठून उभं राहिल्यावर तुम्हाला गती मिळते आणि एकदा पावलं

पडायला लागली की तुम्ही अशा मार्गावर असता जो भूतकाळापासून दूर भविष्याच्या दिशेनं जाणारा असतो. तुम्ही चालत राहा. एकापुढे दुसरं पाऊल टाकत राहा. तुम्ही काही किंवा कोणाला गमावलं असाल तर दुसऱ्याला मदत करा किंवा वेगळं काहीतरी निर्माण करा जे तुमच्याकडून स्मृतिस्थळ आणि आदरांजली असेल.

सर्वांत दु:खदायक अनुभव असतो आपल्या प्रिय माणसाला गमावण्याचा. कुटुंबातील सदस्याला किंवा मित्राला गमावण्याचा अनुभव आपल्याला पांगळं करू शकतो. अशा परिस्थितीमध्ये, त्याच्यावर प्रेम केल्याबद्दल, त्याचा परिचय असल्याबद्दल किंवा त्यांचा सहवास असल्याबद्दल धन्य वाटण्याखेरीज त्यात कृतज्ञता वाटण्यासारखं काही नसतं तरीही काही लोक त्यातूनच उचल खातात, ज्यामुळे त्यांचं प्रचंड नुकसान हे त्यांच्या भल्याकरिताचं त्यांचं बळ होतं. याचं एक सर्वज्ञात उदाहरण आहे कॅन्डी लायटनरचं, जिनं आपल्या तेरा वर्षांचा मुलगा दारुड्या ड्रायव्हरमुळे गमावला. तिनं 'मदर्स अगेन्स्ट ड्रंक ड्रायव्हिंग (MADD)' नावाची संस्था स्थापन केली जिच्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे आणि चळवळीमुळे नि:संशयपणे असंख्य जीव वाचले आहेत.

जेव्हा आपल्यावर किंवा आपल्या कोणा जिवलगावर दु:ख कोसळतं तेव्हा कालांतरानं ते हलकं होईल या आशेतून आपण शोक करीत राहतो. परंतु ताबिथा, जॉनी एरिकसन टेडा आणि कॅन्डी लाइटनरसारखी माणसं कृतीचा दृष्टिकोन चोखाळतात. त्यांना विश्वास वाटतो की, त्यांच्या जीवनातली सर्वाधिक दु:खदायक घटनाही त्यांना सत्कार्यासाठी संधी उपलब्ध करून देऊ शकते. अशा तऱ्हेच्या माणसांपैकी एक अविश्वसनीय उदाहरण आहे डॅलासमधल्या कार्सन लेस्ली याचं. मी त्याला भेटलो तेव्हा तो सोळा वर्षांचा होता. मला भेटायच्या आधी दोन वर्षांपासून तो कर्करोगाशी लढा देत होता. हा तरुण उत्तम खेळाडू न्यू यॉर्क यांकीजकडून खेळण्याचं स्वप्न उरी बाळगून होता, त्यासाठी तो प्रयत्नरत होता. परंतु चौदाव्या वर्षी निदान झालं की त्याच्या मेंदूत कर्करोगाची गाठ होती आणि ती त्याच्या कण्यात पसरत होती. त्याच्यावर ऑपरेशन्स, रेडिएशन्स आणि केमोथेरपीचे उपचार झाले. त्याचा कर्करोग कमी झाला, पण पुन्हा उद्भवला.

या साऱ्यात कार्सननं सामान्य मुलगा राहण्याचा, सामान्य जीवन जगण्याचा प्रयत्न केला. अधूनमधून तो बायबलमधल्या एका वचनाचा उल्लेख करायचा : जोशुआ १:९: 'मी तुला आदेश दिलाय ना? बलिष्ठ आणि धैर्यशील राहा. ना तू भीती बाळग, ना तू कच खा, कारण तुझा परमेश्वर सदैव तुझी साथ करेल, तू कुठेही गेलास तरी.'

कार्सननं पटकन स्पष्ट केलं की, बायबलमधलं हे वचन त्याच्या 'कॅन्सरचं वचन' नव्हतं, तर त्याच्या 'जीवनाचं वचन' होतं. कार्सननं त्याचं पुस्तक 'कॅरी मी'मध्ये लिहिलंय, 'मी कितीही काळ जीवित राहिलो तरी हे वचन माझ्या थडग्यावर असायला हवं. माझी अशी इच्छा आहे की, लोक जेव्हा माझ्या थडग्याचं दर्शन घेतील तेव्हा त्यांनी ते वचन वाचून

त्यावर विचार करावा की त्या वचनानं मला माझ्या जीवनातल्या झगड्यांमध्ये कसा आधार दिला. मी आशा करतो की, हे वचन इतरांनाही माझ्याप्रमाणेच दिलासा देईल.'

या अद्भुत धाडसी मुलानं त्याच्या इंग्लिशच्या शिक्षकाच्या मदतीनं हे पुस्तक लिहिलं त्यामागचा त्याचा हेतू होता, कर्करोगानं पीडित मुलं जी आपल्या या भयंकर आजारामुळे आपल्या व्यक्तिगत, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक जीवनावर होणारे दुष्परिणाम व्यक्त करू शकत नाहीत त्यांना आवाज देणं. त्याचं पुस्तक प्रकाशित होत असतानाच, १२ जानेवारी २०१० रोजी कार्सनचं देहावसान झालं. सदर पुस्तकातून येणारं उत्पन्न 'कार्सन लेस्ली फाउंडेशनला' जातं जे लहान मुलांच्या कर्करोगावर संशोधन करतं

हा मुलगा केवळ नि:स्वार्थी होता. तो स्वत: आजारी आणि चिंताग्रस्त असताना त्यानं त्याचे अंतिम दिवस इतरांना प्रेरणा आणि लाभ देण्यासाठी पुस्तक लिहिण्यात व्यतीत केले. त्याच्या पुस्तकातले शेवटचे शब्द मला अत्यंत आवडतात : 'आपल्याला कोणालाच कल्पना नसते की आपल्या जीवनात काय वाढून ठेवलेलं आहे..., पण आपण बळ एकटवणं सोपं असतं जेव्हा आपल्याला कल्पना असते की बळ परमेश्वराकडून येत असतं.'

डॅलासमधला एक हिरे व्यापारी, बिल नोबेल, जो धार्मिक प्रवृत्तीचा असून त्यानं बरेचदा मला त्याच्या चर्चमध्ये बोलायला बोलावलंय, त्याच्याकरवी मी कार्सनला भेटलो. बिलची मुलं कार्सनच्या शाळेतली. त्यातून त्यांचा परिचय झाला. बिल आम्हा दोघांना 'परमेश्वराच्या राज्याचे सेनानी' असं संबोधायचा.

माझ्या थोटेपणावर बिल विनोदही करायचा, पण त्याचबरोबर एवढ्या कोवळ्या वयातही कार्सननं आपला सारा वेळ योग्य ठिकाणी वापरल्याबद्दल त्याला त्याच्याबद्दल नितांत आदर होता. बिल अनेकदा मला जे वचन ऐकवायचा ते तो कार्सनलाही ऐकवायचा. परमेश्वर मनुष्याची व्याख्या त्याच्या नश्वर देहावरून करत नाही. बायबलमध्ये ते असं मांडलंय : जॉन ६:६३: 'आत्म्यातून जीवनाची निर्मिती होते; मासांला किंमत नसते. मी तुझ्यासाठी उच्चारलेले शब्द हेच आत्मा आहेत आणि तेच जीवन आहेत.'

३. करुणेचा दृष्टिकोन

कृतीचा दृष्टिकोन तुमच्या आवाक्यापलीकडला असेल तर दुसऱ्या पर्यायाचाही उगम याच हृदयातून होतो. मी अधिक परिपक्व झालो आणि माझ्या अनुभवांचा परीघ जसा विस्तारत गेला तसं मला जाणवलं की मी लहान असताना जे आत्महत्येचे विचार केले त्यामागचं एक प्रमुख कारण होतं ते हे की मी आत्मकेंद्रित होतो. मला खरोखरचं वाटायचं की मी जे भावनिक दु:ख आणि शारीरिक नैराश्य भोगत होतो ते दुसरं कोणीच भोगत नाहीये. माझं लक्ष केवळ माझ्या परिस्थितीवर होतं.

माझ्या वयाबरोबर माझा दृष्टिकोन सुधारला आणि मला जाणवलं की, माझ्याएवढी किंवा माझ्याहून अधिक आव्हानं असलेली माणसं माझ्या सभोवताली होती. एकदा ही

जाणीव झाल्यानंतर मी इतरांशी अधिक सहानुभूतीनं वागू लागलो. २००९ मधल्या माझ्या ऑस्ट्रेलिया भेटीत आमच्या कुटुंबाच्या परिचयातल्या एका मुलीनं मला करुणेचं हृदयद्रावक दर्शन घडवलं. त्या अडीच वर्षांच्या मुलीला मी प्रथमच भेटत होतो. आम्ही पार्टीत एकत्र होतो आणि कोणाही लहान मुलाप्रमाणंच तीही दुरून माझं निरीक्षण करीत होती. तिच्या पालकांची निघण्याची वेळ झाली तेव्हा त्या छोटीला मी विचारलं की, तिला माझ्याजवळ यायचं होतं का?

तिनं होकार दिला आणि सावधपणे माझ्या दिशेनं पाऊल टाकलं. ती माझ्या अगदी निकट आल्यावर तिनं माझ्या डोळ्यात पाहिलं आणि माझ्या हात-पाय नसण्याला सहानुभूती व्यक्त करण्याच्या हेतूनं जणू तिनं आपले हात आपल्या पाठीमागं नेले. त्यानंतर ती आणखी पुढे सरकली आणि तिनं तिचं डोकं माझ्या खांद्यावर टेकवलं. मी जसं इतरांना मानेनं मिठी मारत होतो, हे तिनं पाहिलं होतं. तिनं माझ्या शारीरिक व्यंगाला दाखवलेल्या सहानुभूतीनं भोवतालचे सारे जण हेलावले. मला अनेक लोकांनी आलिंगनं दिली आहेत, पण त्या पोरीनं दिलेलं आलिंगन मी कधीच विसरू शकणार नाही, कारण या छोटीला इतरांच्या भावनांशी जोडलं जाण्याचं विस्मयकारक वरदान लाभलंय. करुणा हे मोठं वरदान आहे. मी तुम्हाला विश्वासानं, स्वानुभवातून सांगू इच्छितो की, तुम्ही सहानुभूती बाळगा आणि व्यक्तही करा. कारण ती देणाऱ्याबरोबर घेणाऱ्यालाही लाभ पोहोचवते. तुम्ही कठीण परिस्थितीतून किंवा दु:खद प्रसंगातून जात असाल तर अंतर्मुख न होता बहिर्मुख व्हा.

तुमच्या सभोवती निरीक्षण करा. दु:ख आळवत बसण्यापेक्षा, सहानुभूतीची अपेक्षा करण्यापेक्षा तुमच्याहून अधिक दु:ख सोसणाऱ्याला मदत करा. समजून घ्या की तुमचं दु:ख किंवा वेदना खरीच आहे, पण सोसणं हा जीवनाचा एक भाग आहे आणि दुसऱ्याचं दु:ख निवारणं हा स्वत:च्या वेदना कमी करण्याचा एक नामी मार्ग आहे.

मला माहीत आहे की इतरांपेक्षा माझा मित्र गेब मर्फिट हे उत्तम रीतीनं जाणतो. २००९मध्ये वॉशिंग्टनला झालेल्या एका कार्यक्रमादरम्यान आम्ही भेटलो. गेबला सदोष हात-पाय जन्मत:च लाभले, ज्यांची लांबी केवळ तीन इंच आहे. त्याच्या अंगठ्यांमध्ये हाडं नाहीयेत, तसंच त्याला नीट ऐकूही येत नाही. एवढं असूनही तो सतत कृतिशील राहतो. तो बेसबॉल, बास्केटबॉल, हॉकी खेळतो, त्याचबरोबर ड्रमही वाजवतो.

सिएटलजवळ वाढलेल्या गेबची जिद्द अदम्य आहे आणि तो करुणेचा सागर आहे. सध्या वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीत शिकत असलेला गेब वयाच्या सहाव्या वर्षीच बेसबॉल खेळायला लागला. एकदा त्यानं मित्रांबरोबर, कुटुंबीयांच्या साहाय्यानं माउंट रेनियर सर केला. तो स्वत: एवढी आव्हानं पेलत असताना शाळेतल्या इतर विद्यार्थांना प्रेरित करण्यासाठी तो त्याची 'CLEAR' भाषणं देत होता, 'CLEAR' म्हणजे C - Courage (धाडस), L - Leader (नेतृत्व), E - Excellence (उच्च दर्जा), A - Attitude (दृष्टिकोन), R - Respect (आदर). त्यानं आणि त्याच्या कुटुंबीयांनी अपंगाच्या

साहाय्यासाठी एक संस्था स्थापन केली. गेबच्या थक्क करणाऱ्या करुणेचं फळ म्हणजे 'गॅब्रिएल्स फाउंडेशन ऑफ होप' (http://www.gabeshope.org) ही संस्था अपंग व्यक्तींसाठी प्रेरणेबरोबरच शिष्यवृत्त्या आणि अर्थसाहाय्य देऊ करते.

गेबच्या करुणेच्या दृष्टिकोनात तुम्हाला शक्ती दिसते? त्यानं आपलं लक्ष स्वत:वरून काढून घेऊन ते इतरांवर केंद्रित केलं. त्यानं त्याच्या अपंगत्वाच्या आव्हानाचं रूपांतर करुणेच्या मोहिमेत करून स्वत:चं तसंच इतर अनेकांचं जीवन समृद्ध केलं.

मी जेव्हा अत्यंत गरीब प्रदेशांमध्ये प्रवास करतो तेव्हा तिथल्या लोकांच्या प्रतिसादानं मी अवाक होतो. तिथं मला अनेक स्त्री-पुरुष आणि मुलं भेटतात जी करुणेनं काठोकाठ भरलेली असतात. काही काळापूर्वीच कंबोडियात असताना मी माझ्या व्याख्यानावरून हॉटेलवर परतत होतो आणि तिथल्या उष्ण आणि दमट हवेत मला चक्कर येतेसं वाटत होतं. पूर्ण १-२ दिवस एसी चालू ठेवून झोपून जावं असं मला वाटत होतं.

"निक, निघण्यापूर्वी तू या मुलाला भेटशील का?" माझ्या यजमानानं विचारलं. "हा पोर दिवसभर दाराबाहेर उभा आहे, फक्त तुला भेटण्यासाठी."

तो मुलगा एकटा होता आणि बाहेर मातीतच बसकण मारून बसला होता. त्याच्याभोवती माशा घोंघावत होत्या. त्याच्या डोक्यावर एक जखम होती. त्याचा एक डोळा जणू बाहेर आल्यासारखा दिसत होता. त्याच्या अंगाला दुर्गंधी येत होती. तरीही त्याची नजर करुणा दर्शवत होती, माझ्यासाठीचं प्रेम आणि सहानुभूती त्यातून स्पष्ट होत होती.

तो पुढे झाला आणि त्यानं त्याचं डोकं माझ्या गालावर टेकवलं. त्याच्याकडे पाहून कळत होतं की तो कुपोषित होता. तो बहुधा अनाथ होता आणि खूप हालात जीवन कंठीत होता. तरीही त्याला मला सहानुभूती दाखवायची होती, कारण त्याच्या कल्पनेत मी दु:ख सोसत होतो. माझं मन हेलावलं, माझ्या डोळ्यांना धारा लागल्या. मी माझ्या यजमानाला विचारलं की, आपण या मुलासाठी काही करू शकतो का? त्यांनी मला शब्द दिला की ते त्याची काळजी घेतील, त्याच्या पोटापाण्याचं पाहतील आणि त्याला आसरा देतील. यजमानाचे आभार मानून मी आमच्या गाडीपाशी आलो तरी माझे डोळे वाहतच होते. उर्वरित दिवस मी दुसरा कसलाच विचार करू शकलो नाही. माझ्या पचनीच पडत नव्हतं की मला असा मुलगा भेटला होता ज्याची मला कीव वाटत होती, पण तो मात्र स्वत:च्या दु:खावर लक्ष केंद्रित न करता मला सहानुभूती दाखवत होता.

मला कल्पना नाही की तो मुलगा कोणत्या दु:खातून गेला होता किंवा त्याचं जीवन किती कठीण होतं. पण मी हे सांगू शकतो : त्याचा दृष्टिकोन विस्मयकारक होता, कारण स्वत:ला समस्या असूनही त्याच्याकडे दुसऱ्यांसाठी करुणा आणि सहानुभूती असणं हे केवढं मोठं वरदान आहे!

तुम्ही जेव्हा दु:खात असाल किंवा तुम्हाला स्वत:ची कीव वाटत असेल तेव्हा तुम्ही तुमचा दृष्टिकोन बदला आणि करुणेचा दृष्टिकोन अंगीकारा. आणखी कोणा गरजवंताला

तुमचा हात द्या. कोणाला आसरा द्या. कोणाला मार्गदर्शन करा. तुमच्या दु:खाचा, रागाचा किंवा वेदनेचा उपयोग दुसऱ्या कोणाचं दु:ख समजून घेण्यासाठी आणि ते हलकं करण्यासाठी करा.

४. क्षमाशीलतेचा दृष्टिकोन

कार्यसिद्धी होण्याच्या दृष्टीनं आवश्यक असा चौथा दृष्टिकोन म्हणजे 'क्षमाशीलतेचा दृष्टिकोन'. हा दृष्टिकोन सर्वांमध्ये उत्तम असू शकतो, पण तोच शिकायला सर्वांत कठीण आहे. माझ्यावर विश्वास ठेवा, मला त्याची कल्पना आहे. मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, मला हात-पाय न दिल्याच्या त्याच्या त्या घोडचुकीवरून, परमेश्वराला माफ करायला मी बालपणी तयार नव्हतो; मी संतापलेला होतो आणि त्याला दोषी ठरवत होतो. तेव्हा क्षमाशीलता माझ्या नजरेसमोर नव्हती.

माझ्याप्रमाणेच तुम्हालाही क्षमाशीलतेचा टप्पा गाठण्यापूर्वी संतापाचा आणि तिरस्काराचा कालावधी घालवावा लागेल. ते अत्यंत स्वाभाविक आहे, पण तुम्ही त्या भावनांना कवटाळून राहणं तुम्हाला परवडणारं नसेल, कारण त्या तुमच्या हृदयात घर करून राहिल्या, तर त्याचा तुम्हालाच सर्वाधिक त्रास सोसावा लागेल.

संताप या भावनेची रचना चिरकालासाठी केलेली नाहीये. एखाद्या कारप्रमाणे तुमचा देहही तुम्ही त्याच्यावर फार ताण दिलात तर बंद पडू शकतो. वैद्यकीय संशोधनानं सिद्ध झालंय की, मोठ्या कालावधीसाठी संताप आणि तिरस्कार या भावना जोपासल्या तर त्यामुळे शारीरिक आणि मानसिक ताण निर्माण होतात. त्याचा परिणाम म्हणून तुमची प्रतिकारशक्ती कमजोर होते आणि तुमचे महत्त्वाचे अवयव बंद पडतात. त्याचबरोबर दोष देण्याच्या स्वभावामुळे आणखी इतरही समस्या उद्भवतात. माझ्या हात-पाय नसण्याचा दोष कोणा दुसऱ्याचा असेल तोवर, मी माझ्या भविष्याची जबाबदारी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परमेश्वराला आणि माझ्या डॉक्टर्सना माफ करण्याचा आणि पुढे चालू पडण्याचा निर्णय एकदा मी विचारपूर्वक घेतल्यानंतर मला शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या बरं वाटायला लागलं, तसंच मला असंही वाटू लागलं की माझ्या उर्वरित आयुष्याची जबाबदारी मी स्वत:च्या खांद्यावर घेण्याचीही वेळ येऊन ठेपली आहे.

क्षमाशीलतेच्या दृष्टिकोनानं मला मुक्तता दिली. असं पाहा, तुम्ही जेव्हा जुन्या जखमा कुरवाळत बसता तेव्हा तुम्ही त्या जखमा देणाऱ्यांना बळ देता, पण तुम्ही जेव्हा त्यांना माफ करता तेव्हा तुम्ही त्यांच्याबरोबरचे बंध तोडता. आता ते तुमच्याशी जोडलेले राहू शकत नाहीत. त्यांना माफ करून तुम्ही त्यांच्यावर उपकार कराल असा विचार करत राहू नका, तुमच्या स्वत:च्या भल्यासाठी तुम्ही त्यांना माफ करा.

मला चिडवणाऱ्या आणि खिजवणाऱ्या सगळ्या मुलांना मी माफ केलं. अपराधी भावनेच्या टोचणीतून त्यांची मुक्तता करण्यासाठी मी ते केलं नाही तर संताप आणि

तिरस्काराच्या ओझ्यापासून स्वत:ची मुक्तता करण्यासाठी मी ते केलं. स्वत:वर माझं प्रेम आहे आणि मी मुक्त व्हावं अशी माझी इच्छा होती.

त्यामुळे तुमच्या भूतकाळातल्या तुमच्या गुन्हेगारांवर तुमचा माफीचा काय परिणाम होईल याचा विचार करू नका. त्यांना माफ करण्याचा तुमच्यावर होणारा परिणाम केवळ उपभोगा. एकदा तुम्ही क्षमाशीलतेच्या दृष्टिकोनाचा अवलंब केलात की तुमचा भार कमी होईल आणि मग तुम्ही तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा भूतकाळातल्या ओझ्याविना करू शकाल.

क्षमाशीलतेचं बळ हे तुम्हाला बरं करण्याच्या पलीकडचं आहे. नेल्सन मंडेलांना सत्तावीस वर्षांचा तुरुंगवास देणाऱ्यांना त्यांनी माफ केल्यावर त्यांच्या त्या दृष्टिकोनानं अवघं राष्ट्र बदललं आणि त्याचे पडसाद साऱ्या जगानं अनुभवले.

पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत युनियनमध्ये हे बळ छोट्या प्रमाणात मी अनुभवलंय. मी युक्रेनमध्ये असताना एका पॅस्टरनं त्याचं कुटुंब रशियात हलवलं, हिंसाचारानं प्रभावित असलेल्या क्षेत्रात चर्च सुरू करण्याच्या हेतूनं. त्या पॅस्टरच्या योजनेची बातमी पसरल्याबरोबर त्याला आणि त्याच्या पाच मुलांना गुंडाकडून धमक्या येऊ लागल्या म्हणून तो प्रार्थना करू लागला.

"परमेश्वरानं मला सांगितलं की, तिथं चर्च उभारण्याची जबर किंमत मला मोजावी लागेल, पण त्याचबरोबर काही विस्मयकारकही घडेल," तो म्हणाला.

धमक्या येऊनही पॅस्टरनं चर्च स्थापन केलं. सुरुवातीला फार थोडे लोक तिथं प्रार्थनेसाठी आले. चर्च स्थापन झाल्यानंतर बरोबर आठवड्यात त्याच्या एका मुलाचा खून झाला. दु:खी पॅस्टरनं पुन्हा प्रार्थना केली आणि परमेश्वराकडे मार्गदर्शनाची अपेक्षा केली. परमेश्वरानं त्याला चर्चबरोबर राहायला सांगितलं. मुलाच्या खुनानंतर तीन महिन्यांनी खुद्द पॅस्टरला एका भयावह मनुष्यानं रस्त्यात अडवलं.

"तुमच्या मुलाला ज्या माणसानं मारलं त्याला तुम्हाला भेटायचंय?" त्यानं विचारलं.

"नाही," पॅस्टर उत्तरला.

"नक्की? आणि त्याला तुमच्याकडे क्षमा मागायची असेल तर?"

"मी त्याला आधीच माफ केलंय."

"मीच तुमच्या मुलावर गोळी झाडली होती," म्हणताना त्याला हुंदका फुटला. "आणि मला तुमच्या चर्चमध्ये यायचंय."

पुढच्या काही आठवड्यांमध्ये इतक्या रशियन गुंडांनी चर्चमध्ये यायला सुरुवात केली की त्या भागातली गुन्हेगारीच संपुष्टात आली. हे आहे क्षमाशीलतेचं बळ. तुमच्याकडे क्षमाशीलतेचा दृष्टिकोन असेल तर त्यामुळे सर्व प्रकारच्या विस्मयकारक शक्तींना चालना मिळते. आणखी एक ध्यानात ठेवण्यासारखी बाब म्हणजे या दृष्टिकोनामुळे तुम्ही स्वत:लाही माफ करू शकता. मी ख्रिश्चन असल्यामुळे मला कल्पना आहे की परमेश्वर

त्यांना माफ करतो जो त्याची क्षमायाचना करतो, पण बरेचदा असं घडतं की आपण स्वत: मात्र आपल्या पूर्वीच्या चुकांसाठी, आपण घेतलेल्या चुकीच्या वळणांसाठी आणि सोडून दिलेल्या स्वप्नांसाठी स्वत:ला माफ करीत नाही.

आत्मक्षमा ही इतरांना बहाल केलेल्या क्षमेएवढीच महत्त्वाची आहे. मी चुका केलेल्या आहेत. तुम्हीही चुका केलेल्या आहेत. आपण लोकांना वाईट वागणूक दिलेली आहे. आपण त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. आपण सारेच जण चुका करतो. पण मोठेपण आहे ते एक पाऊल मागं जाण्यात, आपण योग्य केलं नसण्याचं स्वीकारण्यात, दु:खी झालेल्याकडे क्षमायाचना करण्यात, सुधारणा करण्याचा शब्द देण्यात, स्वत:ला माफ करण्यात, आणि पुढे चालू पडण्यात.

हा दृष्टिकोन तुम्ही जरूर चोखाळू शकता!

बायबल आपल्याला सांगतं की, आपण जे पेरतो तेच उगवतं. तुम्ही जर कटू, कोपिष्ट, स्वत:ची कीव करणारे आणि अक्षमाशील असाल तर तुम्हाला काय मिळेल असं तुम्हाला वाटतं? तशा तऱ्हेच्या आयुष्यात कोणता आनंद आहे? तर मग ती काळी आणि नकारात्मक मानसिकता झटकून टाका, सकारात्मकता अंगीकारा आणि कृतज्ञतेचा, कृतीचा, करुणेचा आणि क्षमाशीलतेचा दृष्टिकोन अवलंबा.

माझा दृष्टिकोन बदलण्यामधली शक्ती मी अनुभवलीय आणि मी तुम्हाला सांगू शकतो की, त्यामुळे माझं जीवन बदललं आणि मी अशी उंची गाठली ज्याची मी कल्पनाही केली नव्हती. तुम्हीही तसं करा, तुम्हालाही तोच अनुभव येईल.

सहा

निर्बाहू, परंतु निरुपद्रवी नव्हे

क्री डांगणावरचं माझं पहिलं आणि एकमेव द्वंद्व झालं ते आमच्या शाळेतल्या सर्वांत मोठ्या दांडगटाबरोबर, चकीबरोबर. त्याचं खरं नाव चकी नव्हतं, पण त्याचे केस नारिंगी होते, त्याच्या चेहऱ्यावर डाग होते आणि चकी नावाच्या भयावह चकीसारखे मोठाले कान होते, त्यामुळे त्याची खरी ओळख लपवण्यासाठी मी त्याचा उल्लेख चकी असा केलाय.

चकीनंच माझ्या हृदयात सर्वांत पहिल्यांदा खऱ्या भीतीचं बीजारोपण केलं. आपण सर्व जणच आयुष्यभर भीतीचा सामना करतो, खऱ्या अथवा काल्पनिक. नेल्सन मंडेला म्हणतात की, खरा वीर तो नव्हे जो भीती अनुभवीत नाही, तर तो जो तिच्यावर विजय मिळवतो. मी चकीला घाबरलो होतो निश्चितच, पण त्या भयावर विजय मिळवणं ही वेगळी बाब आहे. तेव्हा तुम्ही मला ते पटवून देऊ शकला नसता, पण तुमची आणि माझी भीती ही आपल्याला लाभलेली वरदानं आहेत. आपली पायाभूत भीती, जशी की आगीची, उंचावरून पडण्याची किंवा डरकाळ्या फोडणाऱ्या प्राण्यांची, म्हणजे आपल्या बचावाची आयुधं आहेत. त्यामुळे अशा भातीबद्दल धन्यता माना आणि त्यांना धरून राहा, पण त्यांना तुम्हाला धरू देऊ नका.

अतिभय चांगलं नाही. बरेचदा, विफल होण्याच्या, निराश होण्याच्या किंवा अस्वीकृत होण्याच्या भीतीनं आपण निष्क्रिय होतो. त्या भीतीचा सामना करण्याऐवजी आपण त्यांना शरण जातो आणि स्वत:वर मर्यादा घालून घेतो.

तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याआड तुमच्या भीतीना येऊ देऊ नका. त्यांच्याकडे तुम्ही त्याच नजेरनं पाहा जसे तुम्ही कुठल्या धोक्याच्या संकेताकडे पाहाल. त्या जाणवतील तेव्हा त्यांच्याकडे लक्ष द्या – निर्णय घ्या की, धोका खरा आहे की संकेत खोटा आहे. धोका जर खरा नसेल तर मनातली भीती झटकून टाका आणि आयुष्याची वाटचाल तशीच चालू ठेवा.

भयावर विजय मिळवून पुढे चालू राहणं मला चकीनं शिकवलं, पण तेही बालपणातल्या माझ्या पहिल्या आणि एकमेव द्वंद्वानंतर. शाळेतल्या जवळ-जवळ सर्व मुलांशी माझे मित्रत्वाचे संबंध होते, धटिंगणांशीही, पण चकी हा दांडगटांच्या कारखान्यातूनच थेट शाळेत आला होता जणू. तो मुलगा असुरक्षित होता आणि कोणावर तरी झडप घालण्यासाठी सतत शोध घेत असायचा. तो माझ्याहून उंच होता, पण तसं तर शाळेतले सर्व जणच माझ्यापेक्षा उंच होते.

तसा तर मी कोणासाठीच खरा धोकादायक नव्हतो. मी पहिलीत होतो आणि माझं वजन होतं अवघं बावीस पौंड आणि त्यातून मी व्हीलचेअरला खिळलेला. चकी माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा आणि आकारात तुलनेनं राक्षस.

एका मधल्या सुटीत तो मला म्हणाला, "मी पैज लावून सांगतो, तू माझ्याशी मारामारी करू शकणार नाहीस."

आमच्या भोवती मित्र होते त्यामुळे चेहऱ्यावर मी भीती दाखवली नाही. पण मला माझे त्या वेळचे विचार आठवत आहेत. मी माझ्या व्हीलचेअरमध्ये आहे आणि तरीही तो माझ्यापेक्षा दुप्पट उंच आहे. ही परिस्थिती माझ्यासाठी निश्चितच अनुकूल म्हणता येण्यासारखी नाहीये.

"पैजेवर सांगतो, ते शक्य आहे," मी बोलून गेलो.

याचा अर्थ असा नव्हता की मला मारामारीचा चांगला अनुभव होता. मी धार्मिक वातावरणातल्या कुटुंबातला होतो. मला मिळालेली शिकवण होती की हिंसा हे कशाचंच उत्तर नव्हतं, पण मी भेकड नव्हतो. माझ्या भावंडांबरोबर मी पुष्कळ कुस्ती करायचो. माझा धाकटा भाऊ अजून त्या वेळच्या माझ्या डावपेचांचं कौतुक करतो. आरोन माझ्याहून उंच आणि ताकदवान होण्यापूर्वी मी त्याला जमिनीवर लोळवायचो आणि माझ्या हनुवटीनं त्याचा हात जमिनीवर चेपवून ठेवायचो.

"त्या वेळी तू तुझ्या हनुवटीनं माझा हात मोडूही शकला असतास," तो म्हणतो, "पण मी तुझ्याहून उंच आणि ताकदवान झाल्यावर माझ्या हातानं तुझं कपाळ नुसतं दूर लोटायचो जेणेकरून तुझी हनुवटी निष्प्रभ व्हायची."

चकीच्या बाबतीत माझी तीच मोठी अडचण असणार होती. त्याच्याशी मारामारी करायला मी घाबरत नव्हतो, पण ती करायची कशी हा माझ्यापुढचा यक्षप्रश्न होता. टीव्हीवर किंवा चित्रपटांमध्ये मी बघितलेल्या कोणत्याही मारामारीत सगळे जण एकमेकांना ठोसे तरी देतात किंवा लाथा तरी मारतात आणि या डावपेचांसाठी लागणारी आयुधं माझ्याकडे मुळातच नव्हती.

पण चकीवर याचा थोडाच परिणाम होणार होता? "तू माझ्याशी मारामारी करू शकणार असशील तर ते सिद्ध कर!" त्याचं आव्हान.

"ठीक आहे, मोठ्या सुटीत ओव्हलवर भेट," मी आव्हान स्वीकारलं.

"ठीक आहे, भेटू," म्हणत चकी तिथून चालता झाला.

ओव्हल म्हणजे आमच्या क्रीडांगणाच्या मधोमध काँक्रीटीकरण केलेला अंडाकृती भाग होता. तिथं मारामारी करणं म्हणजे स्टेडियमच्या मधोमध प्रेक्षकांच्या गराड्यात मारामारी करणं होतं. ओव्हल हे आमचं प्रमुख व्यासपीठ होतं. तिथं जे काही घडतं ते तिथं राहत नाही, सर्वश्रुत होतं. तिथं जर मी माती खाईन तर माझी बेअब्रू होणार होती.

मोठ्या सुटीपर्यंतच्या सर्व तासांमध्ये मी दुपारच्या आव्हानानंच चिंताक्रांत होतो. हे आव्हान शाळाभर गाजलं होतं तरी त्याचा काही उपयोग झाला नव्हता. सर्वांना माझ्या डावपेचांविषयी कुतूहल होतं. मला मात्र त्याची सुतराम कल्पना नव्हती.

चकी माझी कणीक तिंबत असल्याचा चित्रपट माझ्या डोळ्यांपुढे सरकत होता. मी मनोमन प्रार्थना करीत होतो की मारामारी सुरू होण्यापूर्वी कोणा शिक्षकांना तिचा सुगावा लागावा आणि ती थांबवली जावी. पण ते नशिबात नव्हतं.

तो भयंकर क्षण समोर उभा ठाकला. मोठ्या सुटीची घंटा झाली. माझ्या मित्रांचा माझ्या व्हीलचेअरभोवती गराडा पडला आणि आमचा लवाजमा ओव्हलच्या दिशेनं सरकू लागला. अर्धी शाळा तिथं जमली होती. काहींनी त्यांचे डबे उघडलेले होते. काही जण पैजा लावत होते.

अर्थातच, तुमच्या कल्पनेप्रमाणं माझ्यावर कोणी पैज लावत नव्हतं.

"तू मारामारीला तयार आहेस?" इति चकी.

मी होकारार्थी मान हलवली, पण काय घडणार होतं त्याची मला कल्पना नव्हती.

पण गंमत म्हणजे चकीलाही त्याची कल्पना नव्हती. "हे आपण कसं करणार आहोत?"

"मला माहीत नाही," मी म्हणालो.

"तुला व्हीलचेअर सोडावी लागेल," त्यानं मागणी केली. "मी जमिनीवर आणि तू व्हीलचेअरमध्ये हे न्यायाचं होणार नाही."

अर्थात, चकीला भीती वाटत होती की मी त्याला व्हीलचेअरनं धडक देईन. हा माझ्या सरशीचा मुद्दा ठरला होता. मारामारीत मला गती नव्हती, पण मी वाटाघाटीत तरबेज होतो.

"मी व्हीलचेअर सोडली तर तुला तुझ्या गुडघ्यांवर उभं राहावं लागेल," मी म्हणालो.

तसंही व्हीलचेअरच्या मुलाला आव्हान देण्यावरून चकीला बोलणी खावी लागतच होती. त्यानं माझी मागणी मान्य केली. तो गुडघ्यावर उभा राहिला आणि मी व्हीलचेअर सोडली आणि अस्तन्या सरसावल्या (?). पण मी करणार काय होतो?

म्हणजे कोणी खांद्यांनी का द्वंद्व खेळतं?

आम्ही दोघं सराईत मल्लांप्रमाणे एकमेकांचा अंदाज घेत वर्तुळात फिरू लागलो. आमच्याभोवती मुलांचं कोंडाळं होतं. मला अजूनही वाटत होतं की चकी मारामारी सोडून देईल. म्हणजे हात-पाय नसलेल्या लहान मुलाला मारण्याएवढं हलकट कोण असू शकतं?

माझ्या वर्गमैत्रिणी ओरडत होत्या, "निक, तू त्याचा नाद सोड. तो तुला मारेल."

ते माझ्या डोक्यात गेलं. मला मुलींची कणव नको होती. माझा पुरुषी अहंकार दुखावला गेला. छाती पुढे करून मी चकीला सामोरा गेलो, जसं काही मी त्याच्या बुडावर लाथ मारणार होतो. त्यानं माझ्या छातीवर प्रहार केला आणि मी मागं कोसळलो, बटाट्याच्या पोत्यासारखा.

मला ब्रह्मांड आठवलं! यापूर्वी कधी मी मार खाल्ला नव्हता. ते खूप दुखलं, पण त्याहून दु:ख झालं ते अपमानाचं. माझ्याभोवती माझ्या मित्रांनी कोंडाळं केलं, ते घाबरले होते. मुलींनी किंकाळ्या फोडल्या आणि त्यांनी हातांनी डोळे झाकून घेतले. त्यांना ते दृश्य बघवलं नाही.

हा गडी खरोखरच मला वेदना देतोय, मला जाणीव झाली. मी पालथा पडलो आणि जमिनीला माझं कपाळ लावलं. मग खांद्याने व्हीलचेअरचा आधार घेत मी उभा राहिलो. उभं होण्याच्या माझ्या पद्धतीमुळे माझं कपाळ आणि माझी मान खूप बळकट झाली होती, ज्याचा प्रसाद चकीला मिळणार होता.

चकी मला धुवून काढणार होता याबाबत माझ्या मनात तिळमात्र संशय नव्हता. मारामारी किंवा पलायन हेच दोन पर्याय माझ्यापुढे होते आणि पलायनाचा पर्याय वास्तववादी नव्हता.

या वेळी अधिक वेगानं मी पुन्हा चकीवर धावून गेलो. पण मी काय करणार होतो याचा मी विचार करण्यापूर्वीच पहिल्या प्रहाराची पुनरावृत्ती झाली. पुन्हा मी जमिनीवर आडवा. या वेळी तर मी जमिनीवर आदळून उडालोही. बहुधा दोनदा!

माझं डोकं जमिनीवर दणकलं. माझ्या डोळ्यांपुढे अंधारी आली. एका मुलीच्या किंकाळीनं मी क्षणार्धात भानावर आलो. शिक्षकांची कुमक येण्याची मी मनोमन प्रार्थना केली. तुमच्या निकडीच्या वेळी मुख्याध्यापक कुठं असतात?

माझी दृष्टी स्वच्छ झाली. चकी दात काढत माझ्यावर झुकून उभा होता. तो विजयोन्मादाचं नर्तन करत होता.

आता हे अति झालं. आता मी याला संपवणार!

मी पलटी खाल्ली. कपाळाच्या आधारानं मी उभा झालो. शेवटच्या हल्ल्यासाठी मी तयार झालो. माझं रक्त तापलं होतं. या वेळी मी ज्या वेगात चकीच्या दिशेनं मुसंडी मारली त्यानं तो स्तंभित झाला. तो गुडघ्यावर मागं सरकू लागला. माझ्या छोट्या डाव्या पावलाचा वापर करून मी उसळी मारली, मी जणू मानवी तोफगोळा झालो होतो. माझं डोकं चकीच्या नाकावर आदळलं. तो मागं कोसळला. मी त्याच्यावर पडलो आणि लोळत त्याच्या अंगावरून जमिनीवर.

मी वर पाहिलं तर चकी तसाच उताणा पडून होता आणि त्यानं नाकावर हात धरलेले होते.

विजयी भाव जाणवण्याऐवजी मला अपराधी वाटत होतं. पुढे होत मी म्हणालो, "सॉरी, तू ठीक आहेस ना?"

"अरे, चकीच्या नाकातून रक्त येतंय," एक मुलगी किंचाळली.

"छे, शक्यच नाही."

पण खरोखरच, चकीच्या नाकातलं रक्त त्याच्या गुबगुबीत बोटांतून वाहत होतं. त्यानं हात बाजूला घेतले. ते रक्त त्याच्या चेहऱ्यावर आणि शर्टावर सांडलं.

अर्धी गर्दी माझ्या जयजयकार करीत होती, तर अर्ध्या गर्दीला चकीबद्दल वाईट वाटत होतं. शेवटी एका अपंगानं त्याचा पराभव केला होता. त्यानं मान गमावला होता. चकीचे दादागिरीचे दिवस संपले होते. त्यानं पुन्हा हातांनी नाक झाकलं आणि बाथरूमच्या दिशेनं धूम ठोकली.

खरंच, त्यानंतर पुन्हा कधीच मी त्याला पाहिलं नाही. शरमेनं बहुधा त्यानं शाळा सोडली असावी. चकी, तुला माझा संदेश मिळणार असेल तर मी तुझी माफी मागतो आणि आशा करतो की दादागिरीनंतरचे तुझे दिवस सुखासमाधानाचे जावोत.

मी स्वत:चा बचाव करू शकलो होतो याबद्दल मला अभिमान वाटत होता. पण माझ्या खांद्यावर मला अपराधीपणाचं ओझं जाणवत होतं. शाळा सुटल्यावर घरी गेल्याबरोबर मी आई-वडिलांपुढे गुन्ह्याची कबुली दिली. खूप मोठ्या शिक्षेची धास्ती माझ्या मनात घर करून होती. पण मी उगाच घाबरलो होतो. त्यांचा माझ्या सांगण्यावर विश्वासच बसला नाही! माझ्याहून उंच, मोठ्या आणि गबदूल मुलाला मी मारलं असल्याचं त्यांना पटलंच नाही, त्यांना ते अशक्यच वाटलं!

मीही त्यांना पटवून देण्याच्या भानगडीत पडलो नाही.

ही कथा ऐकताना लोकांना मजा वाटते आणि त्यातले काही भाग खरंच मजेशीर असले तरी ती सांगण्याच्या बाबतीतही माझ्या मनात संमिश्र भाव असतात, कारण हिंसेला माझा विरोध असतो. मला वाटतं की भीड म्हणजे लगाम लावलेली शक्ती. माझी पहिली – आणि एकमेव – मारामारी कायम माझ्या स्मरणात राहते, कारण तेव्हा मला शोध लागला की, जेव्हा समोरून प्रहार होतो तेव्हा मी माझ्या भीतीवर विजय मिळवू शकतो. विशेषत: त्या वयात स्वत:चा बचाव करण्याची ताकद माझ्यात असल्याची जाणीव मला खूप चांगली वाटली होती. मला वाटतं तुम्ही असं म्हणू शकता की, मी शांत व सहनशील असू शकतो, कारण मी माझ्यातील शक्तीचा अंदाज घेतला होता.

ना हात, ना पाय, ना भय

तुमच्याकडे उद्देशाची प्रबळ जाणीव असेल, तुमच्या आयुष्यातील शक्यतांविषयी प्रचंड आशा असेल, तुमच्या भविष्यावर तुमची श्रद्धा असेल, तुमच्या स्वत:च्या मूल्यांविषयी तुम्हाला कौतुक असेल, तसंच तुमचा दृष्टिकोनही उत्तम असेल; पण या सगळ्यांबरोबर तुमच्याकडे जर भय असेल तर ते तुम्हाला तुमची स्वप्नं साकारण्यापासून रोखू शकतं. हात-पाय नसण्याहूनही मोठी अपंगत्व असतात – त्यापैकी भय हे तर तुम्हाला निष्क्रिय करून टाकू शकतं. तुमच्या प्रत्येक निर्णयावर जर तुमच्या भयाचं नियंत्रण असेल तर तुमची वरदानं व्यक्त करणारं परिपूर्ण जीवन तुम्ही जगू शकणार नाही.

भय तुमचे पाय खेचेल आणि तुम्ही जे व्हावं असं तुम्हाला वाटत असेल त्यापासून तुम्हाला रोखेल. पण भय केवळ एक लहर आहे, एक भावना – ते खरं नसतं! तुम्ही कितीदा भ्यायला असाल कशाला तरी - दंतवैद्याकडे जाण्यासाठी, नोकरीच्या इंटरव्ह्यूला जाताना, शस्त्रक्रियेपूर्वी किंवा शाळेतल्या परीक्षेपूर्वी – पण तुम्ही हेच अनुभवलं असेल की, तो अनुभव तुम्हाला जेवढा भयकारी वाटला होता तेवढा बिलकूलच नव्हता.

चकीबरोबरच्या मारामारीत माझी चटणी होईल अशी मला भीती वाटली होती, पण प्रत्यक्षात काय घडलं ते पाहा! अनेकदा मोठी माणसंही बालसुलभ भीतीला बळी पडतात. लहान मुलांना जशी त्यांच्या खिडकीच्या काचेवर घासणारी फांदी ही त्यांना खायला येणारा राक्षस भासते तशीच भीती काही प्रसंगी मोठ्या माणसांनाही वाटते.

अन्यथा सामान्य असलेली माणसं भीतीनं थिजून गेलेली मी पाहिली आहेत. आणि ज्या भीतीविषयी मी बोलतोय ती भयपटामुळे वाटणारी किंवा झोपेत हादरे जाणवल्यामुळे वाटणारी नव्हे. असंख्य लोक अपयशाच्या भीतीनं, चुका करण्याच्या

भीतीनं, शब्द देण्याच्या भीतीनं, एवढंच नव्हे तर यशाच्याही भीतीनं हात-पाय गाळतात. भीती तुमच्या दिशेनं चालून येणं अटळ आहे, पण त्यांच्याशी संपर्क न ठेवणं तुमच्या हातात आहे. त्यांना तुम्ही त्यांच्या वाटेला लावून द्या आणि तुम्ही तुमचा मार्ग धरा. तुमच्यासाठी तो पर्याय खुला असतो.

मानसोपचारतज्ज्ञांनुसार बहुतेक भीती या त्या गोष्टींबाबतची माहिती झाल्याने निर्माण होतात. मनुष्यासाठी केवळ दोनच सहजप्रवृत्त भीती जन्मजात असतात : मोठ्या आवाजांची भीती आणि पडण्याची. मी पहिलीत असताना चकीकडून भरडला जाण्याची भीती वाटत होती, पण मी तिच्यावर विजय मिळवला. त्या वेळी मी निर्णय घेतला की धाडसी होईपर्यंत मी वाट पाहणार नाहीये - मी केवळ धाडस केलं, म्हणजे खरं तर धाडसाची बतावणी केली आणि शेवटी मी धाडसी ठरलो.

मोठेपणीदेखील आपण भयावह कल्पना करतो ज्या वास्तवाशी जुळत नाहीत. यातूनच प्रतीत होतं की, भीतीची व्याख्या 'False Evidence Appearing Real' (FEAR) अशी का केली जाते. आपण भीतींवर एवढं लक्ष केंद्रित करतो की त्या आपल्यासाठी खऱ्या होतात – आणि परिणामी आपण त्यांना आपल्यावर नियंत्रण करू देतो.

मायकल जॉर्डनसारखा तगडा आणि यशस्वी मनुष्य भीत असेल यावर विश्वास ठेवणं कठीण आहे. तरीही एनबीए हॉल ऑफ फेममध्ये त्याच्या समावेशाच्या कार्यक्रमात त्यानं प्रांजळपणे सांगितलं की, अधिक चांगला क्रीडापटू होण्यासाठी त्यानं त्याच्या भीतींचा कसा वापर केला. आपल्या भाषणाच्या समारोपात तो म्हणाला, "एक दिवस तुम्ही मला खेळताना पाहाल तेव्हा मी पन्नास वर्षांचा असेन. अरे हसू नका, हसू नका. नाही कधी म्हणू नका. कारण मर्यादा या भीतींप्रमाणेच बरेचदा काल्पनिक असतात."

जॉर्डनच्या जीवनशिक्षेपेक्षा त्याचा बास्केटबॉल चांगला असेल, पण त्याच्या मुद्द्यात तथ्य जरूर आहे. जॉर्डनचे नियम पाळा; भीती खऱ्या नसतात हे ध्यानात ठेवून त्यांना डावलून पुढे चला किंवा त्यांचा वापर करून घ्या. तुमच्या सर्वांत मोठ्या भीतींचा सामना करण्याची गोम आहे ती भीती ही खरी नसते हे जाणण्याची, मग ती भीती विमानात बसण्याची असो, अपयशाची असो किंवा नातं तुटण्याची असो. भीती ही केवळ एक भावना आहे आणि तुमच्या भावनेचा तुमचा प्रतिसाद तुम्ही नियंत्रित करू शकता. हा धडा मला माझ्या व्याख्यानांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच शिकावा लागला.

त्या वेळी मी खूप घाबरलेला आणि चिंताग्रस्त असायचो. मला कल्पना नसायची की माझ्या बोलण्यावर लोकांची प्रतिक्रिया कशी असेल. मला खातरीही वाटायची नाही की ते माझं ऐकूनही घेतील. सुदैवानं माझी पहिली भाषणं माझ्या बरोबरीच्या मुलांपुढ्यात झाली. ती मुलं मला ओळखत होती आणि आम्ही एकमेकांबरोबर स्वस्थ होतो. हळूहळू मी अधिक मोठ्या गटांमध्ये किंवा चर्चेसमधून बोलायला लागलो जिथल्या गर्दीत माझे मूठभर मित्र उपस्थित असत. कालांतरानं मी माझ्या भीतीवर आणि चिंतेवर विजय मिळवला.

अजूनही कधी-कधी मी भीती अनुभवतो जेव्हा मला हजारो लोकांपुढे किंवा लाखो लोकांपुढे बोलायचं असतं. चीन, साउथ अमेरिका, आफ्रिका किंवा जगातल्या अन्य भागांमधल्या दुर्गम प्रदेशांमध्ये मी जातो तेव्हा मला कल्पना नसते की स्थानिक लोकं माझं स्वागत कसं करतील. मला धास्ती वाटत असते की मी एखादा विनोद करेन, पण तिथल्या संस्कृतीत त्याचा अर्थ फारच निराळा होईल आणि त्यांच्या भावना दुखावल्या जातील. पण ही भीती ध्यानात ठेवून असा अडचणीचा प्रसंग मुळातच टाळण्यासाठी मी व्यासपीठावर जाण्यापूर्वी माझी भाषणं माझ्या दुभाष्यांना आणि माझ्या यजमानांना नजरेखालून घालायला सांगतो.

भीतींना माझ्या बळाचा स्रोत बनवणं आणि माझ्या निरनिराळ्या तयारींसाठी ध्यानाचं साधन बनवणं मी शिकलोय. भाषणाचा काही भाग विसरण्याची किंवा बोलताना काही गडबड करण्याची मला धास्ती वाटत असेल तर माझ्या प्रस्तुतीकरणाचा आढावा घेण्यात किंवा त्याच्या तालमी करण्यात लक्ष एकाग्र करण्यात मला तिचा उपयोग होतो. अनेक भीती त्या तऱ्हेनं उपयुक्त असतात. उदाहरणार्थ, कार अपघातात जखमी होऊ नये यासाठी सीट-बेल्ट वापरणं हा एक चांगला, उपयुक्त भीतीमधून घेतलेला निर्णय असतो. आजारपण टाळण्यासाठी आजाराच्या भीतीतून स्वच्छता राखणं ही एक चांगली भीती आहे.

तरीही अनेकदा आपण गोष्टींबाबतची माहिती झाल्याने निर्माण होणाऱ्या भीतींचा वारू उधळू देतो. आजाराच्या भीतीनं काळजी घेणं सोडून काही लोक अतिरेकी टोक गाठून स्वत:ला घरात कोंडून घेतात आणि बाहेर जाणं टाळतात. जेव्हा आपली भीती आपल्याला शक्य असणाऱ्या गोष्टी करण्यापासून किंवा आपल्याला शक्य असलेलं स्वत:ला बनण्यापासून रोखत असेल तेव्हा ती भीती साधारण असत नाही.

जर का? भीती

माझ्या एका मैत्रिणीच्या आई-वडिलांनी तिच्या लहानपणीच घटस्फोट घेतला. घटस्फोटानंतरही ती दोघं सतत भांडायची. आता ती मैत्रीण लग्नाची झालीय; पण लग्न करायची तिला भीती वाटते. "मला माझी अवस्था माझ्या आई-वडिलांसारखी करून घ्यायची नाहीये," ती म्हणते.

नातं टिकणार नाही या धास्तीमुळे कधीच नातं न जोडण्याची तुम्ही कल्पना करू शकता? ही भीती भयंकर आहे. अशा वेळी तुम्ही लग्नाचा विचार केवळ घटस्फोटाची पहिली पायरी असाच करू शकत नाही. टेनिसनची कविता आठवा. त्याचा आशय असा आहे की, 'कधीच प्रेम न करण्यापेक्षा प्रेम करून ते गमावणं हे निश्चितच बरं असतं'. कधीतरी, कसंतरी, कदाचित, कशानंही काहीतरी विपरीत घडू शकतं या धास्तीच्या टांगत्या तलवारीनं तुम्ही कधीच आनंददायी आणि परिपूर्ण जीवन जगू शकणार नाही. आपण सर्वांनी आपल्यावर वीज कोसळण्याच्या भीतीनं किंवा मलेरियाच्या डासांच्या भीतीनं बिछान्यातच पडून राहायचं ठरवलं तर आपलं जग फारच दु:खी असेल, नाही का?

असंख्य भेदरलेली माणसं 'का नाही?' याचा विचार करण्याऐवजी 'जर का?' याचाच विचार करीत राहतात.

मी अपयशी ठरलो तर?

मी पुरेसा चांगला नसेन तर?

ते मला हसले तर?

मला स्वीकारलं गेलं नाही तर?

माझी यशोमाला खंडित झाली तर?

अशा तऱ्हेचे विचार मी समजू शकतो. मोठा होताना मला अनेक मोठ्या भीतींचा सामना करावा लागला - अस्वीकाराची भीती, अपूर्णतेची भीती, परावलंबी असण्याची भीती. पण ती माझी केवळ कल्पना नव्हती – माझ्या देहाकडे सामान्य साधनं उपलब्ध नव्हती. पण माझे आई-वडील नेहमी मला सांगायचे की, मी माझ्या कमतरतांवर लक्ष केंद्रित न करता माझ्याकडे काय आहे आणि माझी स्वत:ची कल्पनाशक्ती वापरण्याचं धाडस करून मी काय निर्माण करू शकतो यावर ते केंद्रित करावं.

"मोठी स्वप्नं पाहा, निकी, आणि तुझ्या भीतींना त्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यापासून तुला रोखू देऊ नकोस," ते म्हणायचे, "तुझ्या भीतींना तू तुझं भविष्य घडवू देऊ नकोस. तुझं जीवन तू निवड आणि ते मिळवण्यासाठी झट."

आत्तापर्यंत मी जगभरातल्या एकोणीस देशांमधल्या वैविध्यपूर्ण श्रोतृवर्गापुढे बोललोय. मी माझे आशेचे आणि श्रद्धेचे संदेश स्टेडियम्समधून, शाळांमधून आणि चर्चेसमधून भल्या मोठ्या श्रोतृवर्गापर्यंत पोहोचवलेत. जर माझ्या आई-वडिलांनी मला माझ्या भीती ओळखून

त्यांना डावलून पुढे जाण्यासाठी मला उत्तेजन दिलं नसतं, तर हे मी कधीच करू शकलो नसतो.

भीती म्हणजे प्रेरणा

तुम्ही आणि मी कधीच मायकल जॉर्डनप्रमाणे खेळात प्रभुत्व गाजवू शकणार नाही. पण तुम्हीही त्यांच्याप्रमाणंच आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी आपल्या भीतीचा वापर प्रेरणेचं साधन म्हणून करून आपल्याला हवं तसं जीवन निर्माण करू शकता.

लॉरा ग्रेगरी ही माझी शाळेतली हुशार मैत्रीण. ती मनमोकळेपणाने माझ्याशी बोलू शकेल याविषयी माझ्या मनात खातरी असायची. ती कधी गुळमुळीत बोलायची नाही. एक दिवस तिनं मला विचारलं, "शाळेत तुला शिक्षकांचा साहाय्यक मदत करतो, पण घरी कोण तुझी काळजी घेतं?"

"अर्थातच, माझे आई-वडील," मी उत्तर दिलं. पण तिच्या मनात काय होतं हा माझ्यासाठी प्रश्नच होता.

"तुला ते चालतं?"

"माझ्या आई-वडिलांनी माझी काळजी घेणं म्हणतेस? अर्थातच, आणि माझ्यापुढे दुसरा काय पर्याय असू शकतो?"

"मला असं म्हणायचंय की, कपडे बदलणं, अंघोळ करणं, बाथरूमला जाणं या बाबतीत तुला संकोच वाटत नाही?" तिनं विचारलं. "आणि तुझ्या आत्मसन्मानाचं काय? अशी कामं तुझी तू करू शकत नाहीस हे तुला विचित्र वाटत नाही?"

लॉराला मला दुखवायचं नव्हतं. तिला सत्याची आस होती आणि माझ्या जीवनाच्या प्रत्येक पैलूविषयी माझ्या भावना काय आहेत हे तिला जाणून घ्यायचं होतं. पण तिनं संवेदनशील विषयाला स्पर्श केला. मोठा होत असतानाच्या सर्वांत मोठ्या भीतींपैकी माझी एक भीती होती ती माझ्या जिवलगांवर माझा पडणारा भार. माझ्या आई-वडिलांवर आणि भावंडांवरदेखील माझं अति विसंबून राहणं कधीच माझ्या मनापासून दूर राहिलं नव्हतं. अनेकदा घामाघूम होऊन मी झोपेतून जागा होई कारण माझ्या मनात विचार आलेला असे की, माझे आई-वडील मला सोडून गेलेत आणि माझी पूर्ण जबाबदारी आता त्यांनी आरोन आणि मिशेलवर सोडलीय.

ती भीती अगदी खरीखुरी होती. कधी-कधी परावलंबित्वाच्या कल्पनाचित्रांचा माझ्यावर भडिमार व्हायचा. लॉराच्या माझ्या आत्मसन्मानाच्या प्रश्नांमुळे, त्या भीतीनं छळला जाण्यापासून दूर जाऊन मी त्या भीतीमुळे प्रेरित होऊ लागलो. माझ्या जाणिवेत परावलंबित्वाचे प्रश्न कायमच तरंगत असायचे, पण त्या दिवसापासून मी ते जाणिवेत आणले आणि त्यांच्यावर आक्रमकतेनं विचार आणि तदनुसार कृती करण्याचं ठरवलं.

मी खरोखरच गांभीर्यानं त्यावर विचार केला तर मी केवढा आत्मनिर्भर होऊ शकेन? माझ्या जिवलगांवर माझा भार पडण्याच्या भीतीतून प्रेरित होऊन मी मोहीम हाती घेतली– जी नेमकी काय होती याची त्या क्षणी मला कल्पना नव्हती. त्या भीतीनं मला माझ्या मर्यादा ओलांडण्याच्या दिशेनं पुढे सरकण्यास प्रेरित केलं आणि नवी ऊर्जा दिली. मी स्वत:साठी बरंच करायला हवं होतं. पण कसं?

माझे आई-वडील कायम मला दिलासा द्यायचे की ते माझ्यासाठी कायम उपलब्ध होते आणि मला उचलण्यात, मला कडेवर घेण्यात, माझं सगळं करण्यात त्यांना कधीच अडचण वाटत नव्हती. पण मलाच स्वत:ला बरं वाटायचं नाही की मी स्वत:हून साधा पाण्याचा ग्लास घेऊन पाणीही पिऊ शकत नाही. माझं वय जसं वाढत गेलं तसं स्वाभाविकपणेच मला अधिक स्वातंत्र्यांची तसंच मला स्वत:कडे अधिक लक्ष देऊन स्वत:चं अधिक करण्याची गरज भासू लागली. माझ्या त्या अपेक्षांवर कृती करण्याची प्रेरणा मला माझ्या भीतीनं दिली.

कृतीसाठी प्रेरित करणाऱ्या विचारांपैकी एक प्रमुख विचार हा होता की, माझ्या आई-वडिलांच्या पश्चात मी माझ्या भावावर, आरोनवर जबाबदारी बनून राहणं. मला कायमच ती चिंता लागून राहिलेली असायची, कारण सामान्य जीवन जगण्यास कोणी पात्र असेल तर ती व्यक्ती म्हणजे माझा गरीब धाकटा भाऊ आरोन. परमेश्वर त्याचं देणं लागतो असं मला वाटायचं, कारण लहानपणापासूनच तो मला चिकटलेला असायचा आणि मला सतत मदत करायचा, माझी साथ करायचा. आरोनला हात-पाय होते तरी एकप्रकारे त्याच्यावर अन्याय झाला होता, कारण त्यानं माझी काळजी वाहणं ही त्याची जबाबदारी असल्याचं तो कायम समजायचा.

अधिक स्वावलंबी होण्याचा माझा निर्णय हा अन्य कोणत्या काळजीप्रमाणेच माझ्या टिकून राहण्याचा मुद्दा होता. लॉरानं मला जाणीव करून दिली की अजूनही मी इतर लोकांच्या करुणेवर आणि सोशिकतेवर अवलंबून होतो. मला कल्पना होती की मी त्यावर कायम अवलंबून राहू शकत नव्हतो. त्याचबरोबर मला आत्मसन्मानही राखायचा होता.

एक दिवस माझं स्वत:चं कुटुंब असावं यासाठी मी पूर्ण सक्षम आहे आणि माझ्या पत्नीनं मला कडेवरून फिरवू नये असं मला वाटत होतं. मला मुलं व्हायला हवी होती आणि मी चांगला पिता असावा, तसंच मी त्यांचं चांगलं पोषण करावं असंही मला वाटत होतं. पण यासाठी मी या व्हीलचेअरमधून बाहेर पडायला हवं, असा विचार माझ्या मनात ठाम झाला.

भय तुमचा शत्रू होऊ शकतो, पण मी त्याला माझा सखा केला. मी माझ्या आई-वडिलांकडे घोषणा केली की मला स्वत:ची काळजी घेण्याचे मार्ग शोधायचे आहेत. अर्थातच, प्रथम ते चिंताग्रस्त झाले.

“तसं काही करण्याची तुला गरज नाही. तुझी कायम काळजी घेतली जाईल हे आम्ही पाहू,” ते म्हणाले.

“मम, डॅड, तुमच्यासाठी आणि माझ्यासाठीही मी हे करणं आवश्यक आहे. म्हणून आपण तिघांचीही डोकी लढवू आणि काही मार्ग सापडतात का ते पाहू.”

आणि आम्हाला ते सापडलेही. आमच्या निर्मितिक्षम प्रयत्नांनी मला ‘स्विस फॅमिली रॉबिन्सन’ या चित्रपटाची आठवण करून दिली. एका निर्जन बेटावर अडकून पडलेलं कुटुंब अंघोळीसाठी, स्वयंपाकासाठी आणि जगण्यासाठी एकत्र येऊन विविध प्रकारची विस्मयकारक साधनं निर्माण करतात. मला कल्पना आहे की कोणीही मनुष्य हा बेट नसतो, विशेषत: हात-पाय नसलेला तर नाहीच नाही. मी कदाचित द्वीपकल्प किंवा संयोगभूमी असेन.

नर्स असलेली माझी आई आणि माझे हरहुन्नरी वडील यांनी प्रथम माझ्या अंघोळीची आणि शाम्पू लावण्याची पद्धत निर्माण केली. वडिलांनी शॉवरचे गोल नॉब्स काढून टाकून त्या जागी पट्टीच्या लिव्हर्स बसवल्या की ज्या मी खांद्यानं फिरवू शकेन. आईनं फूटपम्प असलेला सोप डिस्पेन्सर आणला जो डॉक्टर्स ऑपरेशनच्या वेळी वापरतात. त्यात बदल करून आम्ही त्यात शाम्पूबरोबर साबणाचीही सोय केली.

मग वडिलांनी इलेक्ट्रिक टूथब्रशसाठी भिंतीवर होल्डर बसवला जेणेकरून त्याचं बटण दाबून तो चालू करून मी स्वत: मागेपुढे होत माझे दात घासू शकेन.

माझे कपडे बदलण्याच्या समस्येवर वेलक्रोच्या पट्ट्या असलेल्या शॉर्ट्स आईनं शिवल्या ज्या मी सहज काढू किंवा घालू शकेन. शर्टची बटणं ही माझ्यासाठी कायमचीच समस्या असल्यामुळे मुळातच मी गळ्यातून घालायचे शर्ट वापरायचो.

माझ्या एका मोठ्या भीतीनं आम्हा तिघांना अशा मोहिमेवर पाठवलं होतं जी मला अधिक स्वावलंबी करण्यासाठी विविध मार्ग शोधताना आव्हानात्मक तशीच गमतीशीर वाटत होती. रिमोट कन्ट्रोल्स सेलफोन्स, कॉम्प्युटर कीबोर्ड्स आणि रिमोट गॅरेज डोअर ओपनर्स ही माझ्यासाठी वरदानं आहेत कारण मी ती पायानं चालवू शकतो. आमचे काही उपाय मात्र हायटेक नसून अगदी साधे होते. अनेक बटणं दाबण्यासाठी मी नाकाचा वापर करू लागलो. उंचावरची बटणं दाबण्यासाठी किंवा खिडक्या उघड-बंद करण्यासाठी मी मान आणि हनुवटीच्या चिमटीत गोल्फ क्लब धरायचो.

रेस्टरूम (शौचालय) वापरण्याचीही काही साधनं आम्ही शोधून काढली, पण अर्थातच त्याचे तपशील मी इथं देणार नाहीये. आमच्या काही पद्धती आणि साधनं तुम्ही यू-ट्यूबवरच्या व्हिडिओवर पाहू शकाल : http://www.youtube.com/watch?v=oDx1JWJ_WfA . निर्धास्त राहा, तिथं रेस्टरूमची दृश्यं नाहीयेत.

लॉरानं माझ्याशी बोलून माझा आत्मसन्मान जागृत केल्याबद्दल मी तिचा ऋणी आहे. तसंच परावलंबी असण्याची आणि कुटुंबीयांना भार असण्याची लहानपणीच मला वाटलेली

भीती याबद्दलही माझ्या मनात धन्यता आहे; कारण त्यातूनच मला स्वत:ला अधिक आत्मनिर्भर होण्याची प्रेरणा लाभली. अन्य लोक गृहीत धरतात ती नित्यकर्मंही आत्मसात करण्यानं माझा आत्मविश्वास वाढला, पण ते करण्यासाठी मी स्वत:ला कार्यरत केलं नसतं, तर काही नकारात्मक भावना मी सकारात्मक ऊर्जेत रूपांतरित केल्या नसत्या. तुम्हीही तसंच करू शकता. अपयशाच्या, अस्वीकाराच्या किंवा तत्सम भीतीनं निर्माण केलेली ऊर्जा वापरून सकारात्मक कृती करा की जी तुम्हाला तुमच्या स्वप्नांच्या अधिक निकट नेईल.

भीतीला बंदिस्त करा

काट्यानं काटा काढावा म्हणतात, अगदी तसंच तुम्हाला निष्प्रभ करणाऱ्या भीतींना तुम्ही भीतींनीच निष्प्रभ करू शकता. तुमच्या सर्वांत मोठ्या भीतीचा विचार करा. उदाहरणार्थ, असं समजा की तुमची भीती आहे 'मोठ्या श्रोतृवर्गापुढे उभं राहिल्यावर तुम्ही तुमचं भाषण विसरता याची'. मी ती समजू शकतो. आणखी थोडा पुढचा विचार करा, वाइटात वाईट काय होईल याचा. तुम्ही तुमचं भाषण विसराल आणि श्रोते तुमची हुर्यो करतील, आणि तुम्हाला व्यासपीठ सोडायला लावतील. ती प्रतिमा पाहिलीत? ठीक आहे. आता दुसरी परिस्थिती पाहा की तुम्ही उत्तम भाषण केलं आहे आणि श्रोतृवर्गानं तुम्हाला डोक्यावर घेतलंय.

आता तुम्ही तुमचे विचार दुसऱ्या प्रतिमेवर खिळवून ठेवा, म्हणजे दर वेळी भाषणाची तालीम करताना तुम्ही हुर्यो डावलून तुमच्या जयजयकाराच्या दिशेनं पुढे सरकाल. माझ्या बाबतीत ते खरं ठरतं, तसंच ते तुमच्या बाबतीतही खरं ठरेल.

भीतीपलीकडे जाण्याची आणखी एक पद्धत म्हणजे स्वत:च्या स्मृतींचा धांडोळा घ्या आणि असे अनुभव पाहा ज्यात तुम्ही चिकाटी दाखवून आव्हानांचा यशस्वी सामना केला आहे. उदाहरणार्थ, मी जेव्हा एखाद्या मोठ्या व्यक्तीला भेटायला जाताना धास्तावतो, जशी की ओपरा विन्फ्रे, तेव्हा मी माझी स्मृती चाळवतो आणि धाडसाची एक मात्रा घेतो.

ओपराला भेटायला तू घाबरत आहेस? ती तुझं काय करेल, तुझे हात-पाय तोडेल? थांब, मुळातच तू हाता-पायांविना जगभर फिरून पंचवीस वर्षं जिवंत राहिला आहेस. ओपरा, मी तुझ्यासाठी तयार आहे! मला आलिंगन दे!

भीतीला कवटाळलेला

मी लहान असताना सुईवाल्या डॉक्टरांची मला भीती वाटायची की जी त्या वेळी एकदम नैसर्गिक होती. शाळेतल्या गोवर, फ्लू किंवा कोणत्याही आजाराच्या लसीकरणाच्या वेळी मी आईपासून लपून राहायचो. एक अडचणीचा भाग असा होता की डॉक्टर्सना माझ्या अंगावर फार थोड्या जागा सापडायच्या जिथं ते सुई टोचू शकतील. इतर मुलांच्या बाबतीत ते हातांवर किंवा कमरेवर टोचू शकत. माझ्या काटछाट झालेल्या देहावर केवळ एकच जागा

होती ती माझ्या बुडाची आणि तेही जमिनीवर खूप खाली असल्यामुळे मला खूप वेदना होत. इंजेक्शन दिल्यानंतर दिवसभर मी चालू शकत नसे. माझ्या अपंगत्वामुळे माझ्या तारुण्याचा बरासचा चांगला काळ हा मी सुया टोचून घेणारं साधन म्हणून घालवला. इंजेक्शनच्या किंवा सुईच्या दर्शनानंही अनेकदा मला भोवळ आल्याचं सांगतात.

शाळेत असताना एकदा माझी पार्श्वभूमी तसंच मानवी शरीरशास्त्राविषयीही माहिती नसलेल्या दोन नर्सेसनी माझ्या दोन्ही खांद्यावर इंजेक्शन्स दिली, जिथं फार कमी प्रमाणात स्नायू आणि चरबी होती. ते फारच वेदनादायक होतं. दुखणं एवढं असह्य होतं की, मला जेरी नावाच्या माझ्या मित्राला माझी व्हीलचेअर चालवायला सांगावं लागलं, कारण मला घेरी यायला लागली होती. त्यानं व्हीलचेअरचा ताबा घेतला आणि माझी शुद्ध हरपली. मी व्हीलचेअरच्या काठावरून कलंडलो. जेरीला काही सुचेना म्हणून त्यानं व्हीलचेअर विज्ञानाच्या वर्गात नेली आणि शिक्षकांची मदत घेतली. सुयांविषयीचं माझं भय ठाऊक असल्यामुळे शाळेच्या लसीकरणाच्या कार्यक्रमाला जात असल्याचं आईनं आम्हा तिघाही भावंडांना सांगितलं नाही. ती म्हणाली की, आम्हाला नुसत्या तपासणीला ती नेत होती. ही सारी कथा आमच्या कुटुंबासाठी संस्मरणीय ठरली. मला पहिली कुणकुण लागली वेटिंगरूममध्ये. माझ्याच वयाची एक मुलगी एक्झॅमिनेशन-रूममध्ये गेली आणि आतून तिच्या किंकाळीचा आवाज आला.

"ऐकलंत?" मी आरोन आणि मिशेलला विचारलं, "ते आता आपल्याला इंजेक्शन देणार आहेत."

झालं, मी घाबरलो, सैरभैर झालो. मी अकांडतांडव सुरू केलं. आईला म्हणालो की, ते मला खूप झोंबतं, मला घरी घेऊन जा. तिघांत मीच ज्येष्ठ अपत्य असल्यामुळे दुसऱ्या दोघांनीही माझ्या आदर्शाची री ओढली. आम्ही तिघांनी आईला भंडावून सोडलं. आमची आई नर्स असल्यामुळे, अर्थातच तिच्याकडे दयामाया नव्हती. तिनं आमची बखोटी धरली आणि आम्हाला घेऊन ती एक्झॅमिनेशन-रूममध्ये गेली.

आमचे हातखंडे निरुपयोगी ठरत असल्याचं पाहून मी मार्ग बदलला. मी डॉक्टरांना विचारलं, "त्याऐवजी तोंडानं घेण्यासारखं काही तुमच्याकडे नाहीये का?"

"नाही बेटा."

आता दुसऱ्या योजनेची वेळ येऊन ठेपली. माझ्या पलायनात मदत करायला मी आरोनला सांगितलं. माझी योजना तयार होती. आरोन बेडवरून पडून सर्वांचं लक्ष वेधून घेणार होता आणि तेवढ्यात मी माझ्या व्हीलचेअरमधून उतरून सटकणार होतो. पण तेवढ्यात आई मला आडवी आली. ती संधी साधून मिशेलनं दाराकडे धाव घेतली. बाहेर एका नर्सनं तिला धरलं, पण ती निसटली. मला तिचा अभिमान वाटला!

आमच्या गोंधळानं अनेक नर्सेस तिथं गोळा झाल्या. दुर्दैवानं आमची योजना बारगळी. त्यातल्या दोघींनी मला चेपून ठेवलं. मी किंकाळ्या फोडू लागलो. डॉक्टर इंजेक्शन देण्यासाठी, तर मी ते टाळण्यासाठी धडपडत, झटत होतो. माझ्या किंकाळ्या एवढ्या कर्कश होत्या की जणू बाहेर असलेल्या कार्सचे अलार्मच वाजत होते.

आम्ही तिघंही भावंडं रडतच घरी गेलो.

माझ्या भीतीमुळे माझ्या वेदना वाढल्या होत्या. पण जर मी स्वेच्छेनं इंजेक्शन घेतलं असतं तर त्या निश्चितच कमी जाणवल्या असत्या. माझ्या भीतीवर मी नियंत्रण न ठेवल्यामुळे माझ्या वेदना दुणावल्या होत्या. पर्यायानं, एक दिवसाऐवजी मी दोन दिवस चालू शकलो नाही.

तात्पर्य, आमच्या कुटुंबाची ही कथा तुम्ही स्मरणात ठेवा. तुम्ही तुमच्या भीतींना तुमच्या कृतींना नियंत्रित करू दिलंत तर तुमच्या वेदना दुणावतील.

सात

अपयशाला तुमच्यात रुजू देऊ नका

तुम्ही सहज कल्पना करू शकाल असा माझा बालपणाचा काळानिळा इतिहास पडण्याचा आणि मोडतोडीचा होता. मी असंख्य वेळा टेबलावरून, बिछान्यावरून, जिन्यावरून वगैरे पडलोय. पडताना सावरण्यासाठी आवश्यक असणारे हात मला नसल्यामुळे मी त्यासाठी हनुवटीचा, त्याचबरोबर नाक आणि कपाळाचाही वापर करायचो. अनेकदा मी तोंड फोडून घेतलंय.

पण मी कधीच पडून राहिलो नाही. माझ्या या यशाचं सूत्र दाखवणारी एक जपानी म्हण आहे : 'सात वेळा पडा, आठव्यांदा उठा'.

तुम्ही अपयशी ठरता. मी अपयशी ठरतो. आपल्यातले भलेभलेही अपयशी ठरतात, तसेच उर्वरितही. जे पराभवातून उठत नाहीत त्यांच्यासाठी अपयश अंतिम ठरतं. आपण सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे जीवन हे काही पास-नापासाची परीक्षा नव्हे. ती एक प्रक्रिया आहे, प्रयत्नांची आणि चुकांची. जे यशस्वी होतात ते त्यांच्या चुकांमधून सावरतात, कारण ते त्यांच्या माघारीला क्षणभंगुर आणि शिकवणारे अनुभव समजतात.

मला माहीत असलेल्या प्रत्येक यशस्वी मनुष्यानं कधीना कधी घोडचुका केलेल्या असतात. पण नेहमी त्यांचं म्हणणं असतं की त्या चुकांचा त्यांच्या यशात फार मोठा वाटा होता. आपटी खाल्ल्यानंतर त्यांनी हार मानली नाही. उलट, त्यांना त्यांच्या समस्या उमगल्या. त्यांनी अधिक मेहनत घेतली आणि अधिक फलदायी उपायांचा शोध घेतला. ते पाच वेळा अपयशी ठरले असतील तर त्यांनी पाचही वेळा अधिक मेहनत घेतली. विन्स्टन चर्चिल यांनी त्याचा आशय व्यक्त करताना म्हटलंय, "जराही उत्साह न गमवता एका अपयशाकडून दुसऱ्या अपयशाकडे जात राहणं म्हणजेच 'यश' होय."

एखाद्या उत्कृष्ट बेसबॉलपटूला 'राखीव' म्हणून कामगिरी बजावावी लागली, तर तो त्याचा पराभव नसतो. त्याचप्रमाणे तुम्हीही तुमच्या अपयशानं खचून न जाता तुमच्या पराभवावर मात केली पाहिजे, कारण कोणतंही अपयश हे तुम्हाला कधीच पूर्णपणे पराभूत करू शकत नाही. तुम्ही जोपर्यंत मैदानावर राहाल आणि प्रयत्न कराल तोपर्यंत तुम्ही यशस्वीही होऊ शकता. पण यशासाठी आवश्यक ते करण्याची तुमची तयारी नसेल तर मात्र अपयश ही तुमची समस्या नसून, तुम्ही स्वत:च समस्या आहात हे जाणा. यश लाभण्यासाठी तुम्ही स्वत:ला पात्र समजलं पाहिजे आणि त्यानंतर ते घडण्यासाठी तुम्ही जबाबदारी घेतली पाहिजे.

माझ्या व्याख्यानांमध्ये अपयशाचं तत्त्वज्ञान सांगताना मी पोटावर पालथा पडतो आणि त्याच स्थितीत बोलत राहतो. मला हात-पाय नसल्यामुळे समोरच्यांना वाटत राहतं की मी स्वत:हून उभा राहू शकणार नाही.

माझे आई-वडील सांगतात की, वयाच्या दुसऱ्या वर्षीच मी स्वत:च्या स्वत: उभा राहायला शिकलो. मला उठवायला मदत व्हावी म्हणून ते मला उश्यांचा आधार द्यायचे. पण अर्थातच, ते मला माझ्या पद्धतीनं, कठीण मार्गानं करायचं होतं. उश्या वापरण्याऐवजी मी स्वत:च भिंत, खुर्ची, कठडा अशा कोणत्यातरी आधाराकडे जायचो, त्याला कपाळ लावायचो आणि इंचा-इंचानं वर सरकत उभा व्हायचो.

ती सोपी क्रिया नव्हती. पाहिजे तर तुम्ही तसं करून पाहा. जमिनीवर पालथं पडा आणि हाता-पायांचा वापर न करता गुडघ्यांवर उभं राहण्याचा प्रयत्न करा. सांगा, तुम्हाला कसं वाटतंय? पण दुसऱ्या प्रश्नांचंही उत्तर द्या. तुम्हाला कशानं बरं वाटेल, उठण्यानं की तसंच पडून राहण्यानं? उत्तर स्पष्टच आहे, कारण तुमची रचना पडून राहण्याकरिता, सरपटण्याकरिता झालेलीच नाही. तुमची निर्मिती पुन:पुन्हा उठण्याकरिता झालेली आहे, जोपर्यंत तुम्ही तुमची पूर्ण क्षमता वापरत नाही तोपर्यंत उठण्याकरिता.

माझ्या व्याख्यानांमध्ये मी जेव्हा माझ्या उठण्याचं प्रात्यक्षिक दाखवतो तेव्हा मी कुठल्यातरी आधाराकडे धाव घेतो. सहसा मी उंच व्यासपीठावरून किंवा डेस्क किंवा टेबलवरूनही बोलतो. एकदा एका शाळेत असंच व्याख्यान देत असताना मी उठण्याचं प्रात्यक्षिक दाखवणार तोच मी घसरून पडलो, कारण कोणीतरी ते टेबल पॉलिश केलं होतं. एकदम चकाचक! ते पॉलिश पुसण्याचा मी व्यर्थ प्रयत्नही केला. शेवटी मला कोणालातरी हात देण्यासाठी बोलवावं लागलं.

अशा एका मोठ्या कार्यक्रमात मोठी माणसंही होती ज्यात फ्लोरिडाचे गव्हर्नर जेब बुश आणि त्यांच्या पत्नी कोलंबा हेही होते. नेहमीप्रमाणे प्रात्यक्षिकासाठी मी पालथा पडलो. नेहमीप्रमाणे श्रोतृवर्ग शांत झाला.

"आपण सारे जणच अधूनमधून अपयशी ठरतो," मी म्हणालो, "पण अपयशी होणं हे पडण्यासारखंच असतं. उठण्यासाठी तुम्ही सतत प्रयत्नशील राहायला हवं आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा अखंडपणे चालू ठेवायला हवा."

आता मी माझ्या उठण्याची कसरत दाखवणार तेवढ्यात मागच्या खोलीतून एक स्त्री धावत माझ्याजवळ आली आणि म्हणाली, "थांबा, मी तुम्हाला उठण्याकरिता मदत करते."

"पण मला मदतीची गरज नाहीये," मी तोंडातल्या तोंडात पुटपुटलो. "हा माझा व्याख्यानाचा भाग आहे."

"खुळेपणा करू नका, मला तुम्हाला हात देऊ द्या." ती सोडायला तयार नव्हती.

"मॅडम मला खरंच तुमच्या मदतीची गरज नाहीये. मी त्यातून एक मुद्दा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतोय."

“ठीक आहे, राहिलं तर,” म्हणत ती उलटी फिरली.

श्रोतृवर्ग निश्चिंत झाला. जमिनीवरून नुसतं उठायला मला केवढे सायास पडतात ते पाहूनही किंवा नुसती कल्पना करूनही लोकांना वाईट वाटतं. माझ्या झटण्याशी ते जोडले जातात, कारण आपण सारे जणच कशाना कशासाठी झटत असतो. तुमच्या योजनांना जेव्हा खीळ बसेल किंवा तुम्ही कठीण समयातून जात असाल तेव्हाही तुम्हाला धाडस करावं लागतं. तुमचे यत्न आणि तुमच्या पीडा या मानवी जीवनाचाच भाग आहेत.

तुम्ही तुमच्या जीवनाचा उद्देश साकारलात, शक्यतांची आशा धरून असलात, आपल्या भविष्यावर तुमची श्रद्धा असली, आपल्या भीतींमुळे रोखलं जाणं तुम्ही नाकारलंत, आपलं मूल्य ठरवलंत आणि सकारात्मक दृष्टिकोन जर तुम्ही अवलंबलात तर तुम्ही अपयश आणि माघार पचवू शकाल. अपयशांना तुम्ही कधी अंतिम समजू नका, त्यांना तुम्ही मृत्यूशी जोडू नका, कारण वास्तव हे आहे की, तुमच्या झटण्यातच तुम्ही जीवन अनुभवताय. तुमचा डाव चालू आहे. आपण पेलत असलेली आव्हानंच आपल्याला अधिक बलशाली, उत्तम आणि यशासाठी तयार करू शकतात.

अपयशाचे धडे

आपल्या अपयशांकडे तुम्ही वरदान म्हणून पाहू शकता; कारण अपयशामधूनच संधी उपलब्ध होतात. तसं असेल तर माघार आणि अपयशांमधून तुम्हाला काय लाभ होऊ शकतात? अपयश देऊ शकतात असे किमान चार धडे मला सुचतात.

१) ते एक महान शिक्षक असतं.
२) ते चरित्र निर्माण करतं.
३) ते तुम्हाला प्रेरणा देतं.
४) ते तुम्हाला यशाचं महत्त्व शिकवतं.

ते एक महान शिक्षक असतं

होय, अपयश हे महान शिक्षक असतं. प्रत्येक जेता अपयशी ठरलाय. प्रत्येक अग्रणीनं दुसरं स्थान अनुभवलंय. रॉजर फेडरर कालातीत महान टेनिसपटू गणला जातो, पण तोही प्रत्येक गेम, सेट, मॅच जिंकत नाही. तो अनेकदा नेटमध्ये वाईट फटके मारतो. तो चुकीच्या सर्व्हिस करतो. प्रत्येक डावात त्याला जिथं डझनावारी वेळा बॉल टाकायचा असतो तिथं तो तो टाकू शकत नाही. अशा प्रत्येक चुकलेल्या शॉटनंतर त्यानं खेळणं सोडून दिलं तर तो निश्चितपणे अपयशी ठरेल. उलटपक्षी आपल्या चुकांमधून शिकत राहून तो डावात राहतो आणि म्हणूनच तो विजेता ठरतो.

फेडरर प्रत्येक शॉट अचूक मारून प्रत्येक गेम, सेट आणि मॅच जिंकण्याचा प्रयत्न करतो का? हो, अर्थातच तो तसा प्रयत्न करतो आणि तुम्हीही जे काही करीत असाल त्यात तसंच

करायला हवं. खूप मेहनत घ्या. खूप तालीम करा. मूलभूत बाबी शिका. स्वत:ची शर्थ करा, पण ध्यानात ठेवा की तुम्हाला अधूनमधून अपयशाला समोर जावं लागेल, कारण विजयाच्या मार्गावरच अपयशाचा पडाव असतो.

माझा धाकटा भाऊ अनेकदा माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळाबाबत माझी चेष्टा करतो, जेव्हा मला श्रोते मिळत नसायचे. शाळांना आणि संस्थांना मी विनंती करायचो की त्यांनी मला बोलण्याची संधी द्यावी, पण ते तिला मान द्यायचे नाहीत. कारण त्यांना वाटायचं की मी वयानं खूप लहान होतो, अननुभवी होतो किंवा फारच निराळा, असामान्य होतो. तो काळ निराशाजनक होता. पण मला कल्पना होती की,यशस्वी व्याख्याता होण्याचे प्रस्थापित मार्ग जाणण्यासाठी जे काही आवश्यक होतं ते मी शिकत होतो. आरोन हायस्कूलमध्ये असताना कोणी श्रोते मिळतात का याचा शोध घेत मला घेऊन तो गावभर फिरायचा. अनुभवासाठी मी मोफत बोलायचो. तरीही मला त्याची मोठी किंमत मोजावी लागायची. ब्रिस्बेनमधल्या जवळ-जवळ प्रत्येक शाळेत मला संधी मिळावी यासाठी मी प्रयत्न केले असतील. पण सुरुवातीला अर्थातच ती मानली गेली नाही, पण प्रत्येक नकार मला पुढच्या होकाराच्या दिशेनं खेचत राहिला.

"तू कधी सोडून देऊ शकत नाहीस?" आरोन मला विचारायचा.

मी हार मानली नाही, कारण दर वेळच्या नकारानं मला दु:ख व्हायचं. पण त्यातून मला कळलं की मला माझं असं काहीतरी गवसलं होतं. माझं वेड, माझी भावी कारकीर्द. मला खरोखरच व्याख्याता व्हायचं होतं; परंतु मला श्रोते लाभल्यानंतरही दर वेळी सगळं सुरळीत व्हायचं नाही. ब्रिस्बेनमधल्या एका शाळेत माझी सुरुवातच वाईट झाली. कशानं तरी मी विचलित झालो आणि मग मात्र रुळावर येता आलं नाही. मला घाम फुटला. मी पुन:पुन्हा तेच-तेच बोलायला लागलो. मला कुठंतरी तोंड लपवावं वाटत होतं. ते सारं एवढं वाईट होतं की मला वाटलं आता हे सगळीकडे पसरेल आणि माझ्या आयुष्यात पुन्हा कधीच मला कोणी बोलण्याची संधी देणार नाही. अखेरीस बोलण्याचा समारोप होऊन मी शाळा सोडली तेव्हा मला स्वत:ची खूप लाज वाटत होती. माझी कीर्ती मातीत मिळाली होती!

आपण स्वत:चेच सर्वोत्तम टीकाकार होऊ शकतो. त्या दिवशी तर मी निश्चितच होतो. पण त्या फसलेल्या प्रयोगानं मला माझ्या स्वप्नावर अधिक केंद्रित होण्यास मदत केली. माझ्या सादरीकरणात आणि शब्दफेकीत अधिक परिणामकारकता आणण्यावर मी मेहनत घेतली. एकदा तुम्ही स्वीकारलंत की अचूकता हे केवळ ध्येय आहे; मग अपयश हाताळणं तेवढं कठीण राहात नाही. चुकलेलं प्रत्येक पाऊल हे पाऊलच असतं, शिकलेला आणखी एक धडा आणि पुढच्या वेळी सुधारणा करण्याची आणखी एक संधी.

मला जाणीव झाली की, तुम्ही अपयशी ठरून हात टेकलेत की तुम्ही कधीच उभं राहू शकणार नाही. पण तुम्ही अपयशांमधून धडे घेतलेत आणि आपल्यापरीनं शर्थ करीत राहिलात, तर त्याची फळं तुम्हाला जरूर मिळणार– आणि तीही केवळ इतरांच्या

पोचपावतीची नव्हे, तर या जाणिवेच्या समाधानाची की तुम्हाला मिळालेल्या प्रत्येक दिवसाचं तुम्ही सोनं करीत आहात.

ते चरित्र निर्माण करतं

हे शक्य आहे का की अपयश तुम्हाला घडवू शकतं आणि यशासाठी तयार करू शकतं? होय! जे तुम्हाला उद्ध्वस्त करू शकत नाही ते तुम्हाला अधिक शक्तिशाली, अधिक एकाग्र, अधिक निर्मितिक्षम आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी अधिक निग्रही करू शकतं. यशस्वी होण्याची तुम्हाला घाई असू शकते आणि त्यात काही चूकही नाहीये, पण धीर हासुद्धा एक गुण आहे. अपयश निश्चितपणे तुमच्यात तो गुण विकसित करू शकतं. माझ्यावर विश्वास ठेवा, मी शिकलोय की माझं वेळापत्रक आणि परमेश्वराचं वेळापत्रक जुळेलच असं नाही. त्याचं स्वत:चं असं वेळापत्रक असतं आणि ते उलगडेपर्यंत आपण सर्वांनी त्याची वाट पाहायला हवी.

मी हा धडा शिकलोय तो माझा काका सॅम राडोयेव्हिच याच्या 'हिप्पो सायकल्स'च्या व्यवसायाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी मी त्याच्याबरोबर काम करू लागलो तेव्हा. २००६मध्ये आम्ही सुरुवात केली आणि आमच्या कंपनीनं अजून उचल खाल्लेली नाही, पण प्रत्येक अडचणीनंतर, प्रत्येक चुकीनंतर आम्ही अधिक काहीतरी शिकतोय आणि आमच्या ध्येयाच्या अधिक निकट पोहोचतोय. आमच्या व्यवसायाबरोबर आम्ही आमची चरित्रंही घडवतोय, याबद्दल काही शंकाच नाही. मी हेही शिकलोय की तुम्ही प्रयत्नांची शर्थ करीत असलात तरी तुम्ही हाती घेतलेल्या कार्यासाठी ते पुरेसं नसतं. काळ-वेळदेखील फार महत्त्वाची असते. आम्ही व्यवसायाला हात घातला तोच मंदी आली. आम्ही धीर धरणं, टिकून राहणं, योग्य वेळ आणि योग्य परिस्थिती येण्याची वाट पाहणं आवश्यक होतं.

अशीही वेळ येईल की जग तुमच्यामागून येऊन तुम्हाला गाठेपर्यंत तुम्हाला थांबावं लागेल. थॉमस एडिसन यांनी दहा हजार प्रयोगांनंतर यशस्वी बल्ब तयार केला. ते म्हणतात की, जी माणसं स्वत:ला अपयशी समजतात त्यांना कल्पनाच नसते की त्यांनी हात टेकण्याच्या वेळी ते यशाच्या किती निकट असतात. अपयशांमधून जाऊन, ते जवळ-जवळ तिथे पोहोचलेले होते; पण तरीही यशाला जोडलेले. पण काळ त्यांची बाजू घेण्यापूर्वीच त्यांनी प्रयत्न करणं सोडून दिलं.

पुढल्या कोपऱ्यापलीकडे काय असेल याची तुम्हाला कल्पना नसते. तिथं कदाचित तुमच्या स्वप्नांचं उत्तर असू शकतं. म्हणूनच तुम्ही कंबर कसून, पाय रोवून, धीर धरून झुंजत राहायला हवं. तुम्ही अपयशी ठरलात तर काय झालं? तुम्ही पडलात तर काय झालं? एडिसन असंही म्हणाले आहेत : "दूर केलेला प्रत्येक चुकीचा प्रयत्न म्हणजे आणखी एक पाऊल पुढे."

तुम्ही तुमची शर्थ केलीत की बाकी सारं परमेश्वर करेल आणि तुम्हाला जे मिळायचंय ते जरूर तुमच्या पदरात पडेल. जिंकण्यासाठी तुमचं चरित्र प्रबळ हवं, आणि जर तुमचं मन खुलं असेल तर प्रत्येक अपयश हे तुमच्यासाठी चरित्र घडवणारा अनुभव असू शकतो.

२००९मध्ये मी वेस्टलेक, कॅलिफोर्नियामधल्या ओक्स ख्रिश्चन स्कूलमध्ये बोललो. या छोट्या शाळेची ओळख फुटबॉलच्या मैदानावर मोठी आहे. अलीकडेच त्यांचा क्वार्टरबॅक, हा एनएफएलचा नामवंत क्वार्टरबॅक जो मोन्टाना याचा मुलगा होता. त्याचा बॅकअप होता तो प्रसिद्ध हॉकीपटू वेन ग्रेटझ्कीचा मुलगा आणि त्यांचा रिसीव्हर होता विल स्मिथ या नामवंत अभिनेत्याचा मुलगा.

त्यांच्या फुटबॉल टीमनं सलग सहा वेळा कॉन्फरन्स चॅम्पियनशिप्स जिंकल्या आहेत. मी तिथं बोललो तेव्हा मी त्या शाळेचे संस्थापक डेव्हिड प्राईस यांना भेटलो आणि मला जाणीव झाली की, ओक्स ख्रिश्चनचे क्रीडापटू चरित्रबळाचे धडे कुठून घेतात.

मूव्ही स्टार्स आणि स्टुडिओज पक्षकार असलेल्या हॉलीवूडमधल्या एका मोठ्या नामांकित लॉ फर्ममध्ये डेव्हिड अॅटर्नी होते. त्यानंतर ते एका उद्योजकासाठी काम करू लागले ज्याच्या मालकीची हॉटेल्स, रिसॉर्ट्स, गोल्फ कोर्सेस आणि कॅलिफोर्नियामध्ये पुष्कळ जमिनी होत्या. डेव्हिड व्यावसायिक व्यवस्थापनात निष्णात होते आणि अल्पावधीतच त्यांच्या लक्षात आलं की, गोल्फ कोर्सेस योग्य नफा देत नव्हते, कारण त्यांचं व्यवस्थापन गोल्फ खेळाडूंकडे होतं ज्यांना व्यवसायात विशेष गती नव्हती.

एक दिवस डेव्हिड आपल्या बॉसकडे गेले आणि त्याला म्हणाले की, त्याला एक गोल्फ कोर्स खरेदी करायचा होता.

"मुळात तू माझ्यासाठी काम करतोयस," बॉसनं प्रतिसाद दिला, "असं असताना मी तुला काही का विकू? दुसरं म्हणजे तुला गोल्फमधलं काही कळत नाही आणि तिसरं म्हणजे तुझ्याकडे पैसाही नाहीये!"

डेव्हिडना आपल्या बॉसला पटवणं सुरुवातीला जमलं नाही, पण त्यांनी हार मानली नाही. त्यांनी पिच्छा पुरवला. अखेरीस बॉस मान्य झाला आणि त्यानं डेव्हिडना हवा असलेला गोल्फ कोर्स दिला. पुढे स्वत:च्या मालकीच्या अथवा करारावर घेतलेल्या ३५० गोल्फ कोर्सेसपैकी डेव्हिड यांचा तो पहिला कोर्स होता.

त्यानंतर गोल्फ कोर्सच्या व्यवसायाला ओहोटी लागली तेव्हा डेव्हिड यांनी तो विकून टाकला. आता डेव्हिड देशभरातले विमानतळ खरेदी करतात, करारानं देतात, आणि त्यांचं व्यवस्थापन करतात. डेव्हिड अपयशातून काय शिकले? अर्थातच, धीर धरणं आणि चिकाटी. त्यांनी कधीच त्यांचं स्वप्न सोडून दिलं नाही. गोल्फच्या व्यवसायात मंदी आल्यावर त्यांनी खूप विचार केला आणि त्यांना जाणीव झाली की, त्यांचं खरं कौशल्य गोल्फ कोर्सच्या व्यवसायात नव्हतं, तर व्यवसायाच्या व्यवस्थापनात होतं. त्यामुळे त्यांनी ते कौशल्य केवळ वेगळ्या आखाड्यात नेलं.

डेव्हिड, जे आता 'लाइफ विदाउट लिंब्स'च्या बोर्डावर आहेत त्यांनी मला सांगितलं की, जेवढी मोठी आव्हानं तुम्ही पेलू शकाल तेवढी मोठी आपल्या चरित्राची शक्ती असते. "निक, तू जर हात-पाय घेऊन जन्माला आला असतास तर मला नाही वाटत की त्यांच्याविना एक दिवस तू जेवढा यशस्वी होशील तेवढा झाला असतास," डेव्हिड म्हणाले. "तुझ्यात एकदम झालेला नकारात्मतेकडून सकारात्मक बदल त्यांना दिसला नसता तर किती मुलं तुझी भाषणं ऐकायला थांबली असती?"

तुम्ही आव्हानांना सामोरे जाल तेव्हा हे शब्द लक्षात ठेवा. प्रत्येक बंद पथाला एक मोकळा पथ असतो. प्रत्येक अक्षमतेला एक क्षमता असते. तुम्हाला इथं पृथ्वीवर धाडलं गेलंय ते हेतुपूर्ततेसाठी. त्यामुळे तुम्ही अपयशाला तुम्हाला पटवू देऊ नका की जिंकण्यासाठी मार्गच नसतात. आम्हा इतर नश्वरांबरोबर जोवर तुम्ही श्वासोच्छवास करत राहाल, तोवर मार्ग जरूर असणार आहे.

मला धन्यता वाटते की मी अपयशी ठरलो आणि चिकाटी दाखवली. माझ्या आव्हानांनी मला अधिक धीराचा आणि जिद्दी बनवलं. माझ्या कामात आणि माझ्या खेळात ते गुण मला उपयुक्त ठरले. विरंगुळ्याचा माझा एक आवडता छंद आहे तो म्हणजे मासे पकडायला जाणं. मी केवळ सहा वर्षांचा असताना माझ्या आई-वडिलांनी मला पहिल्यांदा मासे पकडायला नेलं. मासा गळाला लागेपर्यंत ते माझी दांडी जमिनीत खोवून ठेवायचे किंवा होल्डरमध्ये अडकवायचे. मग मासा गळाला लागल्यानंतर जोपर्यंत माझ्या मदतीला कोणी येत नाही तोपर्यंत मी माझी दांडी हनुवटीत धरून ठेवायचो.

एक दिवस माझं नशीब चांगलं नव्हतं, पण सलग तीन तास मी तसाच तिथं तिष्ठत राहिलो. उन्हात मी करपलो, पण त्या दिवशी मासा पकडायचाच असा माझा निश्चय होता. माझे आई-वडील प्रवाहाबरोबर खालच्या अंगाला गेले होते आणि अखेरीस मासा गळाला लागल्याबरोबर मी माझ्या पावलाच्या बोटांनी दोरी हलवत राहिलो, आणि आई-वडिलांना हाका मारल्या. ते पळत आले आणि त्यांनी मासा पाण्याबाहेर काढला. तो माझ्या दुप्पट होता. पण मी निग्रहानं तिथं थांबलो नसतो आणि दोरीवरची पकड मी राखली नसती, तर तो आम्हाला मिळाला नसता.

अर्थातच, अपयशानं तुमच्या चारित्र्यात नम्रताही वाढते. हायस्कूलमधल्या अकाउंटिंगच्या क्लासमध्ये मी नापास झालो तो माझ्यासाठी नमवणारा अनुभव होता. मला धास्ती वाटली की आकड्यांशी लीला करण्यासाठी जे लागतं ते बहुधा माझ्यात नव्हतं, पण माझ्या शिक्षिकेनं मला प्रेरणा दिली आणि मला शिकवलं. मी शिकलो, खूप मेहनत घेतली, आणि काही वर्षांनंतर मी अकाउंटिंग आणि फायनान्शियल प्लॅनिंगमध्ये डबल डिग्री प्राप्त केली.

मी विद्यार्थी असताना मला तो नम्रतेचा धडा हवा होता. मला आवश्यक असलेलं व ते मला माहीत नसल्याचं कळण्यासाठी मी अनुत्तीर्ण होणं आवश्यक होतं. शेवटी नम्रतेनं मला

अधिक बलशाली बनवलं. लेखक थॉमस मर्टन म्हणतात, "नम्र मनुष्य अपयशाला घाबरत नाही. वास्तविक तो कशालाच घाबरत नाही, स्वत:लादेखील; कारण परिपूर्ण नम्रता परमेश्वराच्या शक्तीवर परिपूर्ण विश्वास देते. त्या परमेश्वराच्या, ज्याच्यापुढे दुसरी कोणतीही शक्ती निरर्थक असते आणि ज्याच्यासाठी अडथळा अस्तित्वातच नसतो."

ते तुम्हाला प्रेरणा देतं

हानी किंवा अपयशाला आपण निराशेनं किंवा माघारीनं प्रतिसाद देऊ शकतो. त्याकडे आपण शिकवणारा अनुभव किंवा अधिक चांगलं करण्यासाठीची प्रेरणा म्हणून पाहू शकतो. माझा एक मित्र जिममध्ये प्रशिक्षक आहे आणि बेंच प्रेस करणाऱ्यांना त्यांनी अपयश अनुभवायला सांगितल्याचं मी अनेकदा ऐकलंय. हे फारच प्रेरणादायक आहे, नाही का? पण त्यामागचं तत्त्व हे आहे की तुमच्यातला प्राण संपेपर्यंत तुम्ही व्यायाम करीत राहा, जेणेकरून पुढच्या वेळेला प्रयत्न करताना तुम्ही ती सीमा पार करा आणि स्वत:चं बळ आणखी वाढवा.

कोणत्याही क्रीडाप्रकारात आणि कामातही यशाची गुरुकिल्ली असते तालीम! तालमीला मी यशाप्रत जाणारं अपयश समजतो. मी तुम्हाला त्याचं उत्तम उदाहरण देऊ शकतो ज्यात माझा आणि माझ्या सेलफोनचा समावेश आहे. स्मार्ट फोन हे एक उत्तम संशोधन आहे असं तुम्ही म्हणाल, पण माझ्यासाठी ते स्वर्गातून आलेलं वरदान आहे. अनेकदा माझ्या मनात येऊन जातं की, मला विचारात घेऊन संशोधकांनी असं एक यंत्र निर्माण केलं ज्याचा वापर करून हात-पाय नसलेली व्यक्तीही केवळ फोन करणंच नव्हे, तर ई-मेल पाठवणं, मेसेज पाठवणं, संगीत ऐकणं, रेकॉर्डिंग करणं, हवामानाचा अंदाज घेणं, आणि जागतिक घडामोडी जाणून घेणं हे केवळ बोटांच्या स्पर्शानं करू शकते.

असं असूनही माझ्यासाठी स्मार्ट फोन परिपूर्ण नाहीच आहे, कारण माझी पायाची बोटं ज्यांनी मी फोन हाताळू शकतो ती माझ्या तोंडापासून आणि कानांपासून खूप दूर आहेत. अर्थात, मी स्पीकर वापरतो, पण खासगी संभाषण असेल तर ते अडचणीचं होऊन बसतं.

एकदा डायल करून झाल्यावर फोन कानाजवळ आणण्यासाठी मला एक पद्धत शोधावी लागली. त्या नव्या पद्धतीनं 'फ्लिप फोन' या संकल्पनेला एक नवा अर्थ बहाल केला तसंच यशातल्या अपयशात जखमी होण्याचे धडे दिले. पावलानं

फोन हवेत उडवून, खांद्यावर घेऊन हनुवटीनं धरून त्यावर बोलण्याची तालीम करण्यात मी आठवडा घालवला. (मुलांनो, घरी असा प्रयत्न करू नका!) या तालमीत मी असंख्य वेळा अपयशी ठरलो यात काही विशेष नाही. अनेकदा माझं तोंड फुटलं. आवतीभोवती कोणी नसताना मी ही तालीम करायचो, नाहीतर बघणाऱ्याला वाटलं असतं मी फोनच्या साहाय्यानं आत्महत्येचा प्रयत्न करतोय की काय. या साऱ्या तालमीत माझ्या चेहऱ्यावर

अनेक ठिकाणी मार लागला. तसेच अनेक हॅन्डसेट्सही कामी आले. हे सारं मला परवडणारं होतं, पण मला परवडणारं नव्हतं ते हार स्वीकारणं.

प्रत्येक मारासरशी माझा निश्चय अधिक दृढ होत होता आणि शेवटी मला ते जमलं! अर्थात, मला ते जमल्यानंतर अल्पावधीत ब्लू-टूथ हेडसेट्स आले जे तुमच्या कानांवरच विसावतात. आता माझी फ्लिप फोनपद्धत तंत्रज्ञानाच्या इतिहासात लुप्त झाली आहे, पण कधी-कधी कंटाळलेल्या मित्रांना विरंगुळा म्हणून मी ती सर्कस करून दाखवतो.

तुमच्या हानींकडे आणि कंटाळलेल्या अपयशांकडे तुम्ही प्रेरणेचा स्रोत म्हणून पाहावं असं मी तुम्हाला सांगेन. अडखळण्यात, पडण्यात, चुकण्यात कसलीच लाज नसते. परंतु तुमच्या चुकांमधून प्रेरणा घेत अधिक नेटानं प्रयत्न न करणं ही शरमेची बाब आहे.

ते तुम्हाला यशाचं महत्त्व शिकवतं

अपयशाची चौथी देणगी ही आहे की ते तुम्हाला यशाचं महत्त्व शिकवतं. आठवडाभर फोनचा मार खाल्ल्यानंतर मी जेव्हा फोन खांद्यावर घ्यायला शिकलो तेव्हा मला खूप धन्य वाटलं. एखादं इप्सित साध्य करण्यासाठी तुम्हाला जेवढी अधिक मेहनत करावी लागेल त्याच प्रमाणात यशाचं महत्त्व तुम्हाला जाणवेल. कितीदा तुम्ही मोठ्या यशांकडे मागं वळून पाहिलं आहे आणि विचार केला आहे की, आपल्या एवढ्या मोठ्या संघर्षानंतरचं हे यश केवढं गोड वाटतंय? मान्य करा, चढण जेवढी बिकट, त्याच तुलनेत शिखरावरून दिसणारं दृश्य अधिक विलोभनीय.

लहानपणी मला आवडणाऱ्या बायबलमधल्या गोष्टींपैकी एक होती जोसेफची, जो सर्वांचा लाडका आणि मानी मुलगा होता, पण त्याचे मत्सरी भाऊ त्याला गुलाम म्हणून विकतात. जोसेफसाठी फार मोठा कालखंड दुर्धर जातो. चुकीच्या आरोपात तो गुन्हेगार ठरतो, त्याला कारावास होतो. तसंच आपल्या विश्वासातल्या माणसांकडूनच त्याचा विश्वासघात होतो. पण जोसेफ हार मानीत नाही. कटुता किंवा अपयश त्याचा पराभव करू शकत नाही. सरतेशेवटी तो इजिप्तचा राजा होतो आणि आपल्या रयतेला सुखी करतो.

जोसेफचे संघर्ष आणि अखेरीस त्याचा राज्याभिषेक यातून घेण्यासारखे पुष्कळ धडे आहेत. त्यातला एक मी घेतला म्हणजे यश वेदनेशिवाय लाभेल असं नाही. जोसेफच्या संघर्षानं मला जाणीव करून दिली की, माझं जीवन इतर बहुसंख्य लोकांपेक्षा खूपच खडतर असलं तरी इतर अनेक जण असे आहेत ज्यांनी माझ्याहून अधिक भोगलंय. तरीही ते तगून राहिले आणि त्यांनी महानता मिळवली. मी पाहिलंय की परमेश्वराचं आपल्यावर प्रेम असलं तरी जीवन सुकर असण्याचा शब्द काही तो आपल्याला देत नाही. आणि शेवटी मला हेही जाणवलंय की, हालअपेष्टा, अग्निपरीक्षा देऊन जोसेफ त्यातून सुटल्यानंतर त्यानं त्याचा विजय महान आणि न्यायी राजा होऊन साजरा केला.

तुम्ही जेव्हा अगदी मनापासून आपलं ध्येय गाठण्याचा प्रयत्न करता आणि दरम्यान तुम्ही पुष्कळ सोसता तेव्हा यश लाभल्यानंतरची तुमची विजयाची भावना एवढी अद्भुत असते की तुम्हाला तिच्यावर मोठं व्हायचं असतं, बरोबर? मला तो अपघात वाटत नाही. मानवजात इथवर आल्याचं ते एक कारण असू शकतं. आपण आपले कष्टप्रद विजय साजरे करतो ते त्या प्रयत्नांमधूनही आपण टिकून राहतो म्हणून नव्हे, तर वृद्धिंगत होत राहणं आणि परिपूर्तीची अधिकाधिक उंची गाठणं हे आपल्या वृत्तीतच असल्यामुळे. ज्या काळात ध्येय गाठण्यासाठी परमेश्वर मला अधिकाधिक श्रम घ्यायला लावतो, माझ्या वाटेत नवनवे अडसर निर्माण करतो तेव्हा मला मनापासून वाटतं की, तो मला अधिक मोठ्या आणि चांगल्या दिवसांसाठी तयार करीत असतो. तो आपल्यापुढे आव्हानं उभी करतो, कारण त्याला कल्पना असते की आपण अपयशातून गेल्यावर मोठे होतो.

लहान वयात मला जे सोसावं लागलं - वेदना, असुरक्षितता, दु:ख, एकाकीपणा त्याकडे मागं वळून पाहताना मला दु:ख वाटत नाही. मला लीन आणि कृतज्ञ वाटतं, कारण मी ते अडथळे दूर केल्यानं माझं यश अधिक गोड झालं. अखेरीस, त्यांनी मला अधिक बळ दिलं आणि त्याहून महत्त्वाचं, इतरांशी जोडलं जाण्यासाठी मला अधिक तयार, साधनसमृद्ध केलं. मला वेदना झाल्या नसत्या तर वेदनेनं पीडित दुसऱ्या कोणाला साहाय्य करणं मला जमलं नसतं. अशा लोकांशी मी तेवढ्या चांगल्या तऱ्हेनं जोडला गेलो नसतो. पौगंडावस्था गाठली तोवर मी जी आव्हानं पेलली त्यांनी माझा आत्मविश्वास वाढवला. आत्मविश्वासाच्या त्या नव्या पातळीनं इतर मुलं माझ्याकडे आकर्षित झाली. माझ्याभोवती मित्र-मैत्रिणींचं मोठं कोंडाळं तयार झालं. आकर्षणाचा केंद्रबिंदू होणं मला आवडलं! मोठ्या समाधानात मी व्हीलचेअरमधून शाळेत वावरायचो.

अर्थातच, त्याची परिणती कशात झाली हे तुम्ही जाणताच – राजकारण. स्कूल कॅप्टनची निवडणूक लढवण्याचं धाडस मी केलं – मॅकग्रेगर स्टेट स्कूलच्या बाराशे विद्यार्थ्यांचं अध्यक्षपद म्हणा ना. क्वीन्सलॅन्डमधल्या सर्वांत मोठ्या शाळांपैकी एक असलेल्या शाळेची निवडणूक लढवणारा मी पहिला अपंग विद्यार्थी होतो. एवढंच नव्हे, तर शाळेच्या सर्वोत्तम क्रीडापटूविरोधात लढणारा पहिला विद्यार्थीही मीच होतो– मॅथ्यू मॅकके, जो आता ऑस्ट्रेलियातला प्रसिद्ध सॉकरपटू आहे. माझ्या वर्गमित्रांनी माझ्या नावाचं नामांकन केल्यानंतर मिसेस हर्ली या माझ्या शिक्षिकेनं मला प्रोत्साहन दिलं. विविधतेच्या आणि बहुसंस्कृतीच्या पायावर मी लढत दिली आणि निवडून आल्यास शाळेच्या क्रीडा महोत्सवात व्हीलचेअर शर्यती घेण्याचं मी जाहीर केलं.

ती निवडणूक मी एकतर्फी जिंकलो (मॅथ्यू, मला माफ कर). कुरिअर मेल न्यूजपेपरमधली क्लिप माझ्या आईकडे अजून जपून ठेवलेली आहे, जिच्यात माझा फोटो होता, माझा परिचय होता, आणि माझा उल्लेख 'कॅप्टन करेजस' असा केला होता. त्याच

वृत्तपत्रानं माझा संदेश छापला होता : ‘व्हीलचेअरवरच्या सर्व मुलांनो, मला असं वाटतं की तुम्ही सगळं करून पाहावं.’

बालपणाचं माझं घोषवाक्य नाइकच्या ‘जस्ट डू इट’ एवढं प्रसिद्ध नसेल, पण त्याचा मला स्वत:ला निश्चितच फायदा झाला. तुम्ही अपयशाचं तोंड पाहाल, कारण तुम्ही मनुष्य आहात. तुम्ही पडाल कारण मार्ग खडतर आहे. पण ध्यानात ठेवा की अपयश हा जीवनाच्या वरदानाचाच एक भाग आहे. त्यामुळे त्याचा वापरही आदरानं, त्याच्या प्रतिष्ठेनं करा. थांबू नकोस, दोस्ता. सारं काही करून बघ.

आठ

झुडपांमध्ये नवा चेहरा

मा झं कुटुंब ऑस्ट्रेलिया सोडून युनायटेड स्टेट्सला स्थायिक झालं तेव्हा मी बारा वर्षांचा होतो. एकही मित्र नसलेल्या ठिकाणी पुन्हा शून्यातून सुरुवात करायची यानं मी पुरता घाबरलेला होतो. विमान प्रवासात आम्ही भावंडं आमचे अमेरिकन उच्चार सुधारीत होतो जेणेकरून आमच्या नव्या वर्गमित्रांनी उच्चारांवरून आमची टर उडवू नये.

माझ्या विचित्र देहाच्या बाबतीत मी काही करू शकणार नव्हतो, पण मी माझे उच्चार सुधारू शकणार होतो. नंतर मला कळलं की बहुसंख्य अमेरिकन लोकांना ऑस्ट्रेलियन उच्चार आवडतात. काही वर्षांपूर्वीच 'क्रोकोडाइल डंडी' तिथं खूप गाजला होता. माझ्या वर्गमित्रांप्रमाणे उच्चार करण्याच्या नादात मुलींवर छाप पाडण्याच्या अनेक संधी मी गमावल्या.

माझ्या जीवनातला हा पहिला मोठा बदल होता आणि अमेरिकन असल्याचं भासवणं ही मी केलेली एकमेव चूक नव्हती. माझी नवी शाळा लिंडेरो कॅन्यन मिडल स्कूल ही सॅन्टा मोनिका पर्वतराजीच्या पायथ्याशी होती, सध्या मी राहतो तिथून फार लांब नाही. शाळा छान होती, पण सुरुवातीला मला तिथं जड गेलं. कोणत्याही मुलासाठी स्थलांतर करणं, जुने मित्र गमावणं आणि नवे मिळवणं हे सारं जडच जातं. नवा असण्याच्या सामान्य अडचणींबरोबरच माझं दिसणंही सामान्य नव्हतं. व्हीलचेअर असणारा आणि शिक्षकाची मदत घेणारा मी एकमेव विद्यार्थी होतो. आपल्याला तारुण्यपिटिका आहेत ही बहुसंख्य मुलांसाठी चिंतेची बाब असते त्यावरून माझ्या चिंतांची कल्पना करा.

तिकडे ऑस्ट्रेलियात आधी मेलबर्नच्या शाळेत आणि नंतर ब्रिस्बेनच्या शाळेत स्वीकारला जाण्यासाठी मी झगडलो होतोच. त्यांच्या सहवासात माझ्या राहण्यानं त्यांना काही अडचण होणार नाही हे माझ्या वर्गमित्रांना पटवण्यासाठी मी पुष्कळ ऊर्जा खर्च केली होती. आता पुन्हा एकदा मला तेच करायचं होतं, तिसऱ्यांदा.

स्वत:ला बदला

कधी-कधी आपण स्थित्यंतरांमधून जात असताना आपल्यावर त्यांचा काय परिणाम होत असतो याची आपल्याला कल्पना नसते. स्थित्यंतर केवढंही साधं घडलं तरी तुमच्या नेहमीच्या वातावरणातून बाहेर पडल्यानं तुमच्यावर तणाव, साशंकता आणि नैराश्य यांचा परिणाम होतोच. तुमच्याकडे उद्देशाची पक्की जाणीव असेल, तुमच्या आशा उंच असतील, तुमची श्रद्धा प्रबळ असेल, तुम्हाला स्वत:च्या मोलाची जाणीव असेल, तुमचा दृष्टिकोन

सकारात्मक असेल, आपल्या भीतींचा सामना करण्याचं धाडस तुमच्या ठायी असेल, तसंच अपयशातून उठून पुढे चालू पडण्याची क्षमताही तुमच्या अंगी असेल; पण जीवनातल्या अटळ बदलांचा सामना करताना तुम्ही जर उद्ध्वस्त झालात, तर तुम्ही कधीच पुढे सरकू शकणार नाही.

आपण नेहमीच बदलाला प्रतिकार करतो, पण खरंच, त्याच्याशिवाय जगणं कोणाला बरं आवडेल? आपले सर्वोत्तम अनुभव, आपली वृद्धी, आपल्याला लाभलेल्या चांगल्या गोष्टी बरेचदा स्थलांतरामुळे, नोकरी बदलल्यामुळे, शिक्षणाचा मार्ग बदलल्यामुळे किंवा अधिक चांगलं नातं जोडल्यामुळे लाभतात.

आपलं जीवन हे बालपणापासून सुरू होतं, पौगंडावस्थेकडून प्रौढावस्थेकडे जाऊन आपल्याला म्हातारपणाच्या टप्प्यावर नेणारा हा प्रवास असतो. न बदलणं अशक्य आणि नीरस असेल. कधी-कधी आपल्याला धीर धरावा लागतो. काही आपल्याला हवे असलेले बदल आपल्याला हवे तेव्हा घडतील असंही नाही. असे एकतर आपल्याला आव्हान देणारे किंवा आपलं दैनंदिन जीवन बिघडवणारे असे दोन प्रमुख बदल असतात. त्यातला एक आपण अनुभवतो, तर दुसरा आपल्यामध्ये घडतो. पहिल्यावर आपण नियंत्रण ठेऊ शकत नाही, पण दुसऱ्यावर आपण नियंत्रण ठेऊ शकतो आणि ते ठेवायला हवं.

युनायटेड स्टेट्सला स्थलांतरित होण्याच्या माझ्या आई-वडिलांच्या निर्णयात माझ्या मताला काही वाव नव्हता, जसा मी हाता-पायांविना जन्म घेतला होता तसाच. ती दोघं माझ्या प्रभावाबाहेर होती. पण माझ्या अक्षमतेप्रमाणंच, या स्थलांतराला मी कसं तोंड द्यायचं हे मी स्वत: ठरवू शकत होतो. मी ते स्वीकारलं आणि त्यातूनच जास्तीत जास्त लाभ घेण्याचा कसोशीनं प्रयत्न करण्याचं ठरवून टाकलं.

जीवनातल्या अनपेक्षित आणि नको असलेल्या बदलांचा सामना करण्याची तशीच क्षमता तुमच्याकडेही आहे. बरेचदा तुमच्या जीवनातल्या अनपेक्षित बदलांमुळे, जसं की आपल्या जवळच्या माणसाचा मृत्यू, नोकरी जाणं, एखादा मोठा आजार, अपघात यामुळे तुम्हाला जाणीवच होत नाही की पुढच्या कोपऱ्यावर जीवन पालटणारी घटना तुमची वाट पाहत आहे. अनपेक्षित किंवा नको असलेल्या बदलाशी समर्थपणे सामना करण्याची पहिली क्लृप्ती ही आहे की तो बदल तुम्ही पटकन ओळखला पाहिजे आणि तुम्हाला जाणीव झाली पाहिजे की, तुम्ही नव्या टप्प्यात, चांगल्या किंवा वाइटासाठी प्रवेश करीत आहात. त्याच्या केवळ जाणिवेनं मनावरचा ताण कमी होतो. अशा प्रसंगी विचार करा की, ठीक आहे, हे सारं नवं आहे. ते सुरुवातीला वेगळं भासेल, पण मी शांत राहायला हवं. गोंधळून जायला नको आणि सबुरीनं घ्यायला हवं. मला कल्पना आहे की, शेवटी त्यातून चांगलचं निष्पन्न होईल.

आम्ही युनायटेड स्टेट्समध्ये गेल्यानंतर, कशा-कशाप्रकारे आमचं जीवन बदलत होतं याचा विचार करायला मला पुष्कळ वेळ मिळत होता, पण तरीही कधी-कधी मी हरवत असे. कधी-कधी मला ओरडावसं वाटे, आता मला माझ्या खऱ्या जीवनात, माझ्या घरी जायचंय!

माफ कर, दोस्ता, पण तुलाही असे अनुभव येतील. पण आता जेव्हा मी माझ्या अनुभवांकडे मागे वळून पाहतो तेव्हा मला मजेशीर वाटतं, विशेषत: आता जेव्हा मला कॅलिफोर्नियात राहायला आवडतं. मी अशी आशा करतो की, तुम्हालाही माझ्याप्रमाणेच स्वत:वर हसण्याची संधी मिळेल. तुम्ही समजून घेतलं पाहिजे की, स्थित्यंतरांमधून जाताना निराश होणं किंवा क्रोधित होणं या स्वाभाविक भावना आहेत. स्वत:ला जुळवून घेण्यासाठी तुम्ही स्वत:ला थोडा वाव आणि वेळ द्या. त्यामुळे तुम्हाला छोटे धक्के पचवण्याची क्षमता लाभते. ते जणू नव्या शहरात स्थलांतरित होण्यासारखं असतं : तुमचा मार्ग शोधण्यासाठी, सवयीचं करून घेण्यासाठी आणि तुम्ही कुठं जुळवून घेऊ शकाल हे जाणण्यासाठी तुम्ही स्वत:ला वेळ द्यायला हवा.

अनपेक्षित तेच धरून चला

अमेरिकेतल्या पहिल्या काही आठवड्यांमध्ये मला सांस्कृतिक धक्क्याचा सामना करावा लागला. म्हणजे, शाळेच्या पहिल्याच दिवशी वर्गातली सगळी मुलं उठून जेव्हा निष्ठेची प्रार्थना एकसाथ म्हणायला लागली तेव्हाच मी प्रथम गोंधळलो. ऑस्ट्रेलियात आम्ही असं कधी करायचो नाही. मला वाटून गेलं की मी तिथं परका, उपरा होतो.

एक दिवस अचानक सगळे अलार्म्स वाजू लागले आणि आमच्या शिक्षकांनी आम्हाला बाकाखाली जायला सांगितलं! मला वाटलं की परग्रहवासीयांनी हल्ला केला आहे; पण तो केवळ भूकंपाच्या बचावाचा सराव होता. भूकंप?

अर्थातच, विना हाता-पायांचा असल्यामुळे मला विचित्र कटाक्ष, विचित्र प्रश्न आणि विचित्र मतं यांचाही सामना करावा लागला. मी माझी आन्हिकं कशी उरकत असेन याविषयीचं अमेरिकन मुलांचं कुतूहल मला अविश्वसनीय वाटलं. त्यांचे त्याविषयीचे प्रश्न थांबावेत म्हणून तरी भूकंप व्हावा, अशी मी प्रार्थना केली.

तसंच सतत वर्ग बदलत राहण्यालाही मला जुळवून घ्यावं लागलं. तिकडे ऑस्ट्रेलियात आम्हाला एकाच वर्गात सगळे विषय शिकवले जात. तिथं आम्ही कांगारूसारखं सतत उड्या मारत नसू. पण इकडे लिंडेरो कॅन्यन मिडल स्कूलमध्ये आम्ही बहुधा केवळ एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाणं एवढंच केलं.

जीवनातला हा मोठा बदल मी चांगल्या तऱ्हेनं अंगीकारत नव्हतो. मी नेहमीच चांगला विद्यार्थी होतो, पण माझ्या नव्या शाळेत मी पटकन मागं पडायला लागलो. त्यांच्या सहावीच्या वर्गात जागा नसल्यामुळे त्यांनी मला प्रगत अभ्यासक्रम कार्यक्रमात बसवलं,

पण माझे गुण घसरायला लागले. मागं वळून पाहताना मला समजतंय की तेव्हा मी तणावग्रस्त होतो. आणि तसा मी का नसणार होतो? माझं अख्खं जीवन एका पोतडीत बांधून जगाच्या दुसऱ्या टोकाला पाठवलं गेलं होतं.

आता आम्हाला स्वत:चं घरही नव्हतं. माझे वडील बाटाकाकांकडे काम करीत होते आणि आम्हाला आमचं घर मिळेपर्यंत आम्ही त्यांच्याच घरी राहत होतो. मला माझ्या आई-वडिलांचा सहवास फारसा लाभत नव्हता, कारण ती दोघंही नोकरीधंद्याच्या शोधात फिरत होती किंवा कामाला जात होती. आमच्यासाठी घर शोधत होती.

मला असह्य झालं होतं. मानसिक, भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या मी वैतागलो होतो. मधल्या सुटीत मी एकटाच पटांगणाच्या झुडपांमागे जाऊन बसायचो. पण माझी आवडती लपण्याची जागा होती संगीताच्या वर्गाची, जिथं मि. मॅककॅगान नावाचे संगीत शिक्षक होते.

मि. मॅककॅगान, जे अजून लिंडेरो कॅन्यनमध्ये शिकवतात, हे एक उत्तम शिक्षक आहेत. ते प्रचंड लोकप्रिय होते, जसं की एखादा रॉकस्टार. मला वाटतं, ते तेव्हा ८-९ वर्गांना शिकवायचे. त्यांचा भाऊ डफ हा ख्यातकीर्त बास गिटारिस्ट होता जो 'गन्स अन् रोझेस' आणि अन्य प्रसिद्ध रॉक बॅन्ड्समध्ये गिटार वाजवायचा. ऑस्ट्रेलियातून कॅलिफोर्नियात जाण्याचं ते आणखी एक महत्त्वाचं (अजब) निमित्त होतं. मला वाटायचं की, चांगलं कौटुंबिक जीवन सोडून आम्ही पॉप कल्चरच्या राज्यात येऊन पडलो होतो. आम्ही लॉस एंजेलिस आणि हॉलीवूडच्या उंबऱ्यावरच राहत असल्यामुळे स्टोअर्स किंवा मॉल्समध्ये आम्ही नियमितपणे मूव्ही स्टार्स आणि टीव्ही स्टार्सच्या संपर्कात यायचो. माझे अर्धे वर्गमित्र चंदेरी दुनियेची आस धरून तरी होते किंवा प्रत्यक्ष तिथं काम करीत होते. शाळा सुटल्यावर मी टीव्ही लावायचो तर माझ्या इतिहासाच्या वर्गातला एक चांगला मुलगा जोनाथन टेलर थॉमस मला सुप्रसिद्ध 'होम इम्प्रूव्हमेंट' या कार्यक्रमात दिसायचा.

एवढ्या तऱ्हांनी माझं जीवन बदललं होतं की ते सारं माझ्या अंगावर येत होतं. अतोनात परिश्रम घेऊन कमावलेला आत्मविश्वास मी गमावून बसलो. माझ्या ऑस्ट्रेलियन वर्गमित्रांनी मला स्वीकारलं होतं, पण इथं अमेरिकेत मी परका होतो; परक्या प्रदेशात, परक्या उच्चारांचा आणि परक्या देहाचाही. म्हणजे मला तरी तसं वाटायचं. मि. मॅककॅगानना कळलं की मी त्यांच्या संगीताच्या वर्गात लपायचो, मग त्यांनी मला बाहेर जाऊन मुलांमध्ये मिसळण्याचं प्रोत्साहन दिलं. पण मी प्रोत्साहित होतच नव्हतो.

माझा दृष्टिकोन आणि माझ्या कृती, ज्या मी बदलू शकत होतो त्यांच्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी मी त्या बदलाशी दोन हात करीत होतो ज्याच्यावर माझं नियंत्रण नव्हतं. खरंच मला जरा अक्कल असायला हवी होती. मी फक्त बारा वर्षांचा होतो, पण तोवर मी माझ्या कमजोरींवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी माझ्या क्षमतांवर लक्ष केंद्रित करायला शिकलो होतो. मला हात-पाय नसणं मी स्वीकारलं होतं आणि मी बऱ्यापैकी स्वावलंबी आणि आनंदी पोरगा होतो. पण या घटनेनं मला मोठ्या अडचणीत टाकलं.

तुम्हाला कधी जाणवलंय का की तुम्ही जेव्हा तुमच्या त्या मोठ्या स्थित्यंतराच्या काळातून जात असता तेव्हा तुमच्या संवेदना उंचावतात? तुमचा प्रेमभंग होतो तेव्हा नाही का प्रत्येक चित्रपट किंवा डीव्हीडी किंवा टीव्ही मालिका तुमच्यासाठीच जणू छुपा संदेश देत असते? रेडिओवरचं प्रत्येक गाणं तुमच्या हृदयाचेच सूर नाही का आळवत? त्या उंचावलेल्या भावना आणि संवेदना म्हणजे बहुधा बचावाची साधनंच असतात जेव्हा तुम्ही अचानकपणे अकल्पित परिस्थितीत सापडता.ती साधनं तुम्हाला धोक्याचे संकेत देतात, जे अत्यंत मौल्यवान असू शकतात.

मला अजून आठवतंय की, ऑस्ट्रेलिया सोडण्याच्या मुद्द्यावरून मला कितीही मन:स्ताप होत होता तरी पर्वतराजी न्याहाळण्यानं किंवा सूर्यास्ताच्या दर्शनानं माझं मन शांत व्हायचं. मला अजूनही वाटतं की कॅलिफोर्निया हे छान ठिकाण आहे, पण त्या वेळी ते मला अधिकच छान वाटायचं.

सकारात्मक असो वा नकारात्मक, पण बदल हा प्रभावी आणि भयावह अनुभव असू शकतो आणि म्हणूनच बहुधा आपली पहिली प्रतिक्रिया त्याला रोखण्याची असावी. कॉलेजमध्ये मी बिझनेस क्लासेस घेऊ लागलो. त्यात मी शिकलो की मोठमोठ्या कंपन्यांमध्ये असे अधिकारी नेमलेले असतात जे 'चेंज एजंट्स' असतात. त्यांचं महत्त्वाचं काम असतं ते बदल स्वीकारण्यात का-कू करणाऱ्या कर्मचाऱ्यांना धीर देण्याचं, त्यांना पटवण्याचं, वळवण्याचं; मग तो बदल म्हणजे कंपनीचं विलीनीकरण असो, नवी शाखा उघडणं असो किंवा व्यवसाय करण्याच्या पद्धतीतला बदल असो.

माझ्या स्वत:च्या कंपनीचा अध्यक्ष या नात्यानं मी शिकलोय की नवे मार्ग किंवा बदल यांच्याशी जुळवून घेण्याचा प्रत्येक कर्मचाऱ्याचा मार्ग निराळा असतो. नव्या अनुभवांनी उत्तेजित होणारी थोडी माणसं असणारच, पण बहुतेक जण त्यांना विरोध करतात कारण सद्य:स्थितीत ती सुखी असतात आणि बदलानं त्यांचं जीवन बिघडेल अशी धास्ती त्यांच्या मनात असते.

बदल निरोधक

प्रत्येकाला ठाऊक असतं की काहीच शाश्वत नसतं, काहीच सारखं नसतं, पण तरीही बाह्य घटना किंवा इतर माणसं आपल्याला आपल्या सोयीच्या क्षेत्रातून बाहेर काढतात तेव्हा आपण धास्तावतो किंवा आपल्याला असुरक्षित वाटू लागतं. मग आपण चिडतो किंवा तिरस्कारही करतो. लोक वाईट परिस्थितीत असले, वैवाहिक जीवनावरचं प्रश्नचिन्ह, नोकरी सुटणं किंवा धोक्याचं वातावरण, तरीदेखील बरेचदा ते नवा मार्ग चोखाळणं टाळतात, कारण त्यांना अकल्पितापेक्षा कल्पना असलेल्याशी सामना करणं सोयीचं वाटतं.

अलीकडेच मी फिजिओथेरपिस्ट आणि फिटनेस कोच असलेल्या जॉर्जला भेटलो. त्याला मी सांगितलं की, माझ्या पाठीची समस्या ठीक करायला हवी आहे, पण मी एवढा

व्यस्त आहे की व्यायाम करण्याची प्रेरणा मला मिळत नाहीये. जॉर्जची प्रतिक्रिया नमुनेदार होती : "हे बघ, तुझ्या पाठीच्या दुखण्याशी तुला जन्मभर सामना करायचा असेल तर तुला शुभेच्छा."

त्यानं मला चिडवलं. जॉर्जला माझ्या कपाळाचा प्रसाद द्यावा असं मला वाटून गेलं, पण मला उमजलं की तो मला आवश्यक ती प्रेरणा देत होता, मला वस्तुस्थितीची जाणीव करून देत होता की मी जर माझ्या जगण्याच्या पद्धतीत बदल करणार नसलो तर त्याच्या परिणामांसाठी मी तयार राहावं. तो मला सांगत होता की, मला तसं वाटत नसेल तर मी बदलू नये. पण मला बरं वाटायला लावण्यात मदत करू शकणारी एकच व्यक्ती होती आणि ती म्हणजे मीच.

जीवनपद्धती बदलण्याला विरोध करण्याच्या वाईट उदाहरणाचं मी एक उत्तम उदाहरण होतो. पण त्याहून खूप वाईट परिस्थितींमधली माणसंही त्यांच्या जीवनात आमूलाग्र चांगली सुधारणा करणाऱ्या कृतींनाही विरोध करतात. बरेचदा ते वाईट परिस्थिती सोडून द्यायला कचरतात, कारण त्याचा अर्थ असतो त्यांनी अपरिचित परिस्थितीत प्रवेश करणं. राष्ट्राध्यक्ष बराक ओबामांनी वैयक्तिक जबाबदारीचं महत्त्व पटवून देताना म्हटलंय : "आपण ज्या बदलाची आस धरून आहोत तो आपण स्वत:च आहोत. परंतु काही लोक प्रवाहाविरुद्ध पाय रोवून उभं राहतात, त्यात त्यांच्या बुडण्याचा धोका असला तरीही."

काही लोकांसाठी संधी टाळण्यापेक्षा जबाबदारी घेणं अधिक धास्तीचं वाटतं. जीवन जेव्हा तुमचा डाव उधळतं तेव्हा तुम्ही विश्वावर, तुमच्या पालकांवर किंवा तुमचं बिस्किट लाटणाऱ्या मुलावर खापर फोडा, पण अखेरीस दोषारोपांनी काहीच साध्य होत नाही. जीवनपथावरच्या कठीण वळणांशी जुळवून घेत सफाईदारपणे जगण्याचा एकमेव राजमार्ग म्हणजे जबाबदारी घेणं. माझ्या अनुभवांनी मला शिकवलंय की सकारात्मक बदल घडवण्यात पाच महत्त्वपूर्ण टप्पे असतात.

१) बदलाची आवश्यकता ओळखणं

दुर्दैवानं, पाऊल उचलण्यामागची गरज ओळखण्यात आपली दिरंगाई होते. आपण दिनचर्येत स्थिरावतो, मग ती तेवढी सोयीची नसली तरी, केवळ आळसातून किंवा धास्तीतून आपण क्रियेऐवजी निष्क्रियता निवडतो. बरेचदा नव्या योजनेची गरज ओळखण्यासाठी आपल्याला तेवढ्याच धक्कादायक कशाचीतरी गरज लागते. माझ्यासाठी तसा क्षण होता माझ्या आत्महत्येच्या प्रयत्नाचा. अनेक वर्षं मी तग धरून होतो, चेहऱ्यावर उसनं धारिष्ट्य धारण करून; पण आतून मी कृष्णविचारांनी पछाडलेला होतो की मी जर माझा देह बदलू शकलो नाही तर मी माझं जीवन संपवेन. परंतु मी स्वत:ला बुडवून मारण्याच्या बिंदूवर जेव्हा पोहोचलो त्या वेळी मी जाणलं की माझ्या सुखासाठी मी स्वत:च जबाबदारी पेलली पाहिजे.

२) कसल्या नव्याची कल्पना करणं

नेड नावाच्या माझ्या एका मित्रावर, आपल्या आई-वडिलांना त्यांच्या चाळीस वर्षं वास्तव्याच्या घरातून बाहेर पडून वृद्धाश्रमात जायला सांगण्याचा कटू प्रसंग ओढवला. त्याच्या वडिलांची तब्येत खालावली होती आणि त्यांची सेवा करण्यानं आणि चिंतेनं आईची अवस्थाही बिकटच होत होती. पण त्या दोघांनाही वृद्धाश्रमात जायचं नव्हतं. त्यांना त्यांच्या घरीच, जुन्या शेजाऱ्यांच्या सहवासातच राहायचं होतं. "आम्ही इथं सुखी आहोत. आम्ही कशासाठी तिकडे जाऊ?" ते म्हणत होते.

नेड वर्षभर त्यांचं मन वळवण्याचा प्रयत्न करीत होता. शेवटी घराजवळच्याच एका चांगल्या वृद्धाश्रमात भेट देण्यासाठी त्यानं त्यांचं मन वळवलं. त्यांच्या मनातली वृद्धाश्रमाची कल्पना होती, 'म्हातारे लोक जिथं मरण्यासाठी जातात असं थडग्यासारखं थंड आणि भयावह ठिकाण.' पण प्रत्यक्ष पाहिल्यावर त्यांना तिथं उलटं चित्र दिसलं, जिथं उत्तम वातावरण होतं आणि त्यांचे काही शेजारीही तिथं सुखी जीवन जगत होते. तिथं सर्व सोयी आणि उत्तम वैद्यकीय सुविधाही होत्या, जे त्याच्या आई-वडिलांसाठी खूपच सोयीचं आणि आवश्यक होतं.

याचि देही याचि डोळा वृद्धाश्रम पाहिल्यावर त्यांचं मत पालटलं. ते तिथं जायला राजी झाले. "ते एवढं छान असेल याची आम्हाला कल्पनाच नव्हती," ते नंतर म्हणाले.

तुम्ही जिथं आहात तिथून तुम्हाला जिथं जायचंय तिथं जाण्यात तुम्हाला अडचण असेल तर त्या ठिकाणच्या दर्शनानं तुमची अडचण काहीअंशी दूर होण्यात मदत होऊ शकते. याचा अर्थ ठिकाणाला भेट देणं किंवा नवं नातं चोखाळून पाहणं किंवा तुम्ही पत्करू पाहणार असलेल्या कारकिर्दीतील कोणाचंतरी निरीक्षण करणं. नव्या ठिकाणाचा पुरेसा परिचय झाल्यावर जुनं सोडणं सुकर जातं.

३) जुनं सोडून देणं

काही लोकांसाठी हा बिकट टप्पा असतो. पर्वताचा कडा तुम्ही चढत आहात अशी कल्पना करा. तुम्ही अर्ध्यावर पोहोचला आहात, पायथ्यापासून शेकडो फूट उंचीवर. तुम्ही एका छोट्या आधारापाशी पोहोचले आहात. तिथं भीती वाटत असते आणि तुम्हाला कल्पना असते की, जोराचा वारा किंवा वादळ आलं तर तुमचं काय होईल, पण तरीही तो आधार तुम्हाला थोडी सुरक्षिततेची भावना देतोच.

पण अडचण ही असते की, तुम्हाला पुढची चढण चढायची असली किंवा उलटं फिरत कडा उतरायचा असला तर तुम्हाला तो आधार सोडावा लागतो आणि दुसरी पकड शोधावी लागते. ती सुरक्षिततेची भावना सोडणं हे आव्हान असतं, कडा चढताना किंवा जीवनातला नवा मार्ग पकडताना. तसं करताना तुम्हाला जुनी पकड सोडून नवी शोधावी लागते. अनेक लोकं या टप्प्यावर थिजतात किंवा पाऊल टाकण्याचा प्रयत्न करतात, पण घाबरून ते नाद सोडून देतात. तुम्ही स्वत: अशा परिस्थितीत असाल तरी तुम्ही जुनी पकड सोडून देऊन नवी पकड धरावी. सोडा, पोहोचा, स्वत:ला उंचवा, एका वेळी एक पायरी!

४) स्थिरावणं

लोकांसाठी हा आणखी एक परीक्षेचा टप्पा असू शकतो. त्यांनी जुना आधार सोडून नवा पकडलेला असू शकतो, पण तिथं ते स्वस्थ होईपर्यंत त्यांना परतण्याचा मोह पडू शकतो. हा टप्पा, 'ठीक आहे, मी इथं पोहोचलोय, आता काय?' या स्वरूपाचा तो असू शकतो.

स्थिरावण्याची कळ तुमच्या डोक्यातल्या तऱ्हेतऱ्हेच्या विचारांच्या बाबतीत सावध राहण्यात आहे. 'अरे, मी हे काय करून बसलो?' सारखे विचार दूर ठेवून 'हा एक निराळाच अनुभव आहे!' सारख्या विचारांवर तुम्ही लक्ष केंद्रित करायला हवं.

अमेरिकेतल्या माझ्या पहिल्या काही दिवसांमध्ये मी स्वीकृतीच्या टप्प्याशी खूप झगडलो. माझ्या नव्या वातावरणाबाबतीत उलटसुलट विचार करीत, अनेक रात्री मी बिछान्यात तळमळत काढल्या. चिडवला जाण्याच्या किंवा नाकारला जाण्याच्या भीतीनं मी इतर विद्यार्थ्यांपासून लपून राहायचो. पण हळूहळू मला माझ्या नव्या घराच्या काही गोष्टी आवडायला लागल्या. त्यातली एक म्हणजे मला इथंही चुलत भावंडं होती, केवळ ती ऑस्ट्रेलियातल्या माझ्या चुलत भावंडांएवढी परिचित नव्हती. माझी अमेरिकन चुलत भावंडं एकदम चांगली निघाली. त्याशिवाय, थोड्या अंतरावर वाळवंट, समुद्रकिनारे आणि पर्वत होतेच.

हळूहळू मला जेव्हा वाटायला लागलं की कॅलिफोर्निया, यूएसए हे एवढं काही वाईट नाहीये. तेव्हाच माझ्या आई-वडिलांनी ऑस्ट्रेलियाला परतण्याचा निर्णय घेतला. पुढे, मोठा होऊन मी कॉलेजमधून बाहेर पडलो तेव्हा मी पुन्हा तडक कॅलिफोर्निया गाठलं. आता ते मला माझ्या घरासारखं वाटतं.

५) वाढत राहा

यशस्वी स्थित्यंतराचा हा सर्वोत्तम टप्पा आहे. तुम्ही झेप घेतलेली आहे आणि आता नव्या वातावरणात वाढण्याची तुमची वेळ आलेली आहे. मुळात वस्तुस्थिती ही आहे की बदलाशिवाय तुम्ही वाढूच शकत नाही. वाढीची प्रक्रिया तणावपूर्ण किंवा शारीरिक आणि भावनिकदृष्ट्याही दुखावणारी असली तरी वाढ त्या पात्रतेचीच असते.

माझ्या व्यवसायात मी ते पाहिलंय. काही वर्षांपूर्वी मला माझ्या कंपनीची पुनर्रचना करावी लागली. त्याचा अर्थ होता काही लोकांना जाऊ देणं. लोकांना काढून टाकणं मला बिलकूल आवडत नाही. मी हळवा आहे, मला ज्यांच्याविषयी काही वाटतं त्यांना वाईट बातमी देणाऱ्यातला मी नव्हे. ज्यांना मी चांगला ओळखतो आणि त्यांना मी मित्र समजतो अशांना मी नोकरीवरून काढून टाकीत असल्याची स्वप्नं मला अजून अधूनमधून सतावतात. पण मागं वळून पाहताना मला पटतं की, ते कठोर पाऊल मी उचललं नसतं तर माझी कंपनी कधीच वाढू शकली नसती. आम्हाला त्याची फळं मिळाली. त्याचा अर्थ असाही नव्हे की, ते लोक आमच्यामधून गेल्याचा मला आनंद वाटतो. अजूनही त्या लोकांची मला आठवण येते.

वाढती दु:खं याची द्योतक आहेत की तुम्ही नवी उंची गाठण्याच्या प्रयत्नात आहात. ती तुम्हाला आवडायला हवीत असं नाही, पण ध्यानात ठेवा की ती नेहमीच चांगले दिवस दाखवणाऱ्या बदलापूर्वी येतात.

जग बदलणं

माझ्या प्रवासांमध्ये या बदलाच्या प्रत्येक टप्प्यातल्या लोकांचा मला चांगलाच प्रत्यय आला. विशेषत: आधी उल्लेख केलेल्या २००८ मधल्या माझ्या भारतभेटीत. भारतातल्या सर्वांत मोठ्या आणि जगातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या लोकसंख्येच्या शहरात, मुंबईत मी गेलो होतो. पूर्वी बॉम्बे नावानं ओळखलं जाणारं हे शहर अरबी समुद्रावर भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असून ते देशाची आर्थिक आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून मिरवतं.

प्रचंड संपदा आणि बकाल दारिद्र्याचं घर असलेलं हे शहर ऑस्कर पुरस्कार मिळवलेल्या 'स्लमडॉग मिलिअनेअर' या चित्रपटामुळे प्रकाशझोतात आलं. तो चित्रपट केवढाही उत्तम असो, पण त्यानं मुंबईच्या झोपडपट्ट्यांचं आणि हिंदू-मुस्लीम बहुल परंतु ख्रिश्चनांची छोटी लोकसंख्या असलेल्या शहरातल्या देहव्यापाराचं दर्शन घडवलं.

असा अंदाज आहे की, मुंबईमध्ये पोटासाठी सुमारे पाच लाख स्त्रिया देहविक्रय करतात. पैकी बहुतेकांना नेपाळ, बांगलादेश आणि अन्य ग्रामीण भागांतून अपहृत करून आणलेलं असतं. अनेक स्त्रिया 'देवदासी' असतात ज्यांना नंतर वेश्या व्यवसायात ढकललं जातं. त्यांना झोपडीवजा घरांमध्ये ठेवलं जातं आणि दर रात्री त्यांना चार ग्राहकांना तरी संतुष्ट करावं लागतं. त्यांच्यामुळे अत्यंत वेगानं एड्स पसरवला गेला आणि त्यात लाखो लोकांचे बळी गेले.

एकदा तिथल्या दु:खाचं दर्शन घडवण्यासाठी आणि तिथल्या पीडितांशी बोलण्यासाठी मला एका वेश्यावस्तीत नेलं गेलं. 'बॉम्बे टीन चॅलेंज' संस्थेचे संस्थापक, रेव्हरंड के. के. देवराज यांनी मला निमंत्रित केलं होतं. त्यांची संस्था वेश्या व्यवसायातल्या पीडितांची सुटका करण्याचं आणि त्यांचं पुनर्वसन करण्याचं काम करते.

अंकल देव, जे एड्स अनाथांचं घर चालवतात, अन्नदानाचा कार्यक्रम राबवतात, वैद्यकीय केंद्र चालवतात, एचआयव्ही/एड्स क्लिनिक चालवतात तसंच अमली पदार्थांचं सेवन करणाऱ्या मुलांचं पुनर्वसन करणारा कार्यक्रम 'स्ट्रीट बॉइज्' राबवतात. त्यांनी माझा व्हिडिओ पाहिला होता आणि मला निमंत्रित केलं होतं. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांनी गुलामीच्या बेड्या तोडून देऊन त्यांच्या आश्रयस्थानी येण्याविषयी मी त्यांची मनं वळवावीत अशी त्यांची इच्छा होती. रेव्हरंड देवराज म्हणतात की, गुलामीत असलेली प्रत्येक स्त्री 'एक अनमोल आत्मा आणि मूल्यवान मोती' असते.

'बॉम्बे टीन चॅलेंज' मुंबईत एवढं उत्तम कार्य करतं की वेश्यांचे दलाल आणि मॅडम जे बहुतांशी हिंदू असले तरी अंकल देव आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना,की जे ख्रिश्चन आहेत,

त्यांच्याशी विचारविनिमय करू देतात. 'बॉम्बे टीन चॅलेंज' वेश्यांना सतत ख्रिश्चन धर्माचा अवलंब करून वेश्या व्यवसाय सोडण्याचा आग्रह धरत राहते तरी याला दलालांचा आक्षेप नसतो, कारण त्यांना हा शांततेकारी प्रभाव हवा असतो.

ही संस्था त्या गुलाम स्त्रियांच्या हृदयपरिवर्तनाचं काम हळूहळू चालू ठेवते. सर्वसाधारणपणे पळवली जाणारी मुलगी ही दहा ते तेरा वर्षांची असते. छोट्या-छोट्या गावांमधून भुरळ घालून त्यांना आणलं जातं आणि त्यातल्या बहुतेकशा अगदी भोळ्या असतात. मुलगी हुशार निघाली तर दलाल त्यांच्या आई-वडिलांना पटवतात. स्थानिक रोजगारापेक्षा पन्नासपट अधिक रोजगाराचं आमिष दाखवतात. अन्यथा, दु:खाची तशीच सर्वसाधारण बाब म्हणजे ते अशा मुली त्यांच्या आई-वडिलांकडून थेट विकतच घेतात. त्यांना ताब्यात घेऊन इच्छित ठिकाणी पोच करणारे दलाल हे या साखळीतले सर्वप्रथम गुन्हेगार असतात. मुली पुढल्या दलालांकडे गेल्या की ते त्यांना सरळ सांगून टाकतात की, त्यांना ते आवडो किंवा न आवडो, पण आता त्यांना त्यांच्यासाठी काम करावं लागेल.

आम्ही मुंबईत असताना 'बॉम्बे टीन चॅलेंज'नी सोडवलेल्या वेश्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्या दु:खदायक कहाण्या दुर्दैवानं फारशा निराळ्या नसतात. वेश्या होण्यास त्यांनी नकार दिला, तर त्यांची मारझोड केली जाते, त्यांच्यावर बलात्कार केला जातो आणि धड उभं राहता येईल एवढीही उंची नसलेल्या तळघरातल्या अंधारकोठड्यांमध्ये त्यांना डांबलं जातं. त्या त्यांना शरण जाईपर्यंत त्यांना उपाशी ठेवलं जातं, शिवीगाळ केली जाते आणि त्यांचं मतपरिवर्तन केलं जातं. एकदा त्या शरण आल्या की त्यांना वेश्यागृहात पाठवलं जातं जिथं त्यांना सांगितलं जातं की, त्यांना वेश्या म्हणून सातशे डॉलर्समध्ये खरेदी केलं गेलंय आणि ते कर्ज फेडण्यासाठी त्यांना तीन वर्षं तिथं काम करावं लागेल. सुटून आलेल्या वेश्यांनी आम्हाला सांगितलं की, तेवढ्या कालावधीत त्यांना शेकडो वेळा समागम करावा लागला आणि दर वेळेचा दाम होता दोन डॉलर्स.

बहुतेक वेश्यांना वाटतं की त्यांच्याकडे अन्य पर्याय नसतात. दलाल त्यांना सांगतात की, त्यांचं कुटुंब त्यांना पुन्हा स्वीकारणार नाही, कारण त्यांनी घराची अब्रू घालवली आहे. अनेकींना लैगिंक रोग जडतात किंवा वेश्या व्यवसायामुळे मुलं होतात. त्यामुळे त्यांना वाटतं की आता त्यांना जाण्यासाठी दुसरं कोणतं ठिकाणंच उरलेलं नाही.

या मुली किंवा स्त्रियांचं जीवन केवढंही भयंकर असलं तरी त्यात बदल करण्यात त्या कचरतात. श्रद्धेविना त्या आशा गमावतात आणि परिणामी माणुसकी. गुलामी आणि दारिद्र्यातून बाहेर पडणं त्यांना शक्य होत नाही. नवऱ्याकडून छळ होणाऱ्या स्त्रियांमध्येदेखील मानसोपचारतज्ज्ञांना सुटकेचा असाच विरोध दिसतो. त्या भीतीत आणि दु:खात राहतील, पण त्या भयावह वातावरणातून पळून जायला तयार होणार नाहीत, कारण त्यांना अपरिचिताची भीती वाटते. चांगल्या आयुष्याची कल्पना करण्याची क्षमता त्या हरवून बसलेल्या असल्यामुळे त्यांना ते दिसतच नाही.

तुम्हाला स्पष्ट दिसत असेल की या स्त्रियांनी त्यांच्या भयंकर जीवनापासून दूर पळून जायला हवं, पण तुम्हाला तुमची स्वत:ची परिस्थिती तेवढ्या स्पष्टपणे दिसते का? तुम्ही कधी वाईट परिस्थितीत अडकले आहात आणि नंतर तुम्हाला कल्पना आली आहे की, तुमच्या दृष्टिहीनतेमुळेच तसंच तुमच्यातल्या साहसाच्या अभावामुळे आणि अन्य कोणता पर्याय तुम्हाला न दिसल्यामुळे, तुम्ही त्या सापळ्यात फसलेले आहात.

बदल करण्यासाठी, तुम्ही प्रथम कल्पना केली पाहिजे की पलीकडे काय असेल. तुमची परमेश्वरावर श्रद्धा असायला हवी, मनात आशा असायला हवी आणि काहीतरी चांगलं शोधण्याच्या स्वत:च्या क्षमतेवर तुमचा भरवसा असायला हवा.

'बॉम्बे टीन चॅलेंज'नं जाणलंय की, गुलामीतल्या अशा स्त्रियांना बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही, कारण त्यांनी आशा गमावलेली असते, त्या एकट्या पडलेल्या असतात, त्या घाबरलेल्या असतात. काही जणी सांगतात की, त्या प्रेमास किंवा नुसत्या सामान्य वर्तणुकीस पात्र असल्याचाच त्यांना विश्वास वाटत नाही.

मी स्वत:च्या डोळ्यांनी मुंबईतल्या वेश्यागृहांमधील, झोपडपट्टीमधील दु:ख पाहिलं आहे. तसंच वेश्या आणि त्यांची मुलं ज्यांना ते 'चिमण्या' असं संबोधतात की जी रस्त्यावर जीवन कंठतात, यांच्यासाठी अंकल देव, त्यांचे मिशनरी सहकारी काम करतात अशा चमत्काराचा मी स्वत: साक्षीदार आहे.

त्यांनी मला घराघरातून फिरवलं. पहिल्या घरात मला एक वृद्धा भेटली ती तिथली 'मॅडम' होती आणि तिनं मला तिच्या वेश्यांना सुधारण्यासाठी उपदेश द्यायला सांगितलं.

तिनं मला चाळिशीतल्या एका स्त्रीची ओळख करून दिली. तिनं मला सांगितलं की, तिला तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी अपहृत करून या व्यवसायात टाकलं गेलं.

"मी माझं कर्ज फेडलं आणि तेराव्या वर्षी मी मुक्त झाले," ती म्हणाली. "प्रथमच मी रस्त्यावर गेले तिथं मला मारलं गेलं आणि माझ्यावर बलात्कार केला गेला. तरीही मी तशीच माझ्या घरी परतले, पण माझ्या कुटुंबीयांना आता माझ्याशी कसलंही देणंघेणं नव्हतं. मग मी इथं परतले आणि वेश्या व्यवसाय सुरू केला. नंतर मला दोन मुलं झाली, एक वारलं. दोन दिवसांपूर्वीच मला कळलं की मला एड्स झालाय, त्यामुळे मला दलालानं काढून टाकलंय. आता माझ्या पदरात एक पोर आहे आणि जायला कोणतंही ठिकाण नाहीये."

आपल्या दृष्टिकोनातून आपल्याला वाटेल की तिच्याकडे पर्याय होते, पण सूक्ष्मपणे विचार करता तसे ते तिच्याकडे नसल्याचंच भासतं. समजून घ्या की कधीतरी तुम्हाला बाहेर जाण्याचा मार्ग दिसत नाही, पण ध्यानात ठेवा की बदल नेहमीच शक्य असतो. तुम्हाला पर्यायी मार्ग सापडत नसेल तर मदत घ्या. अधिक चांगला दृष्टिकोन असलेल्या व्यक्तींचं मार्गदर्शन घ्या. तो मित्र असो, नातलग असो, समुपदेशक असो, सरकारी कर्मचारी असो; पण सुटकेचा मार्ग नसल्याच्या विचाराच्या सापळ्यात कधी फसू नका. सुटकेचा मार्ग कायम उपलब्ध असतो!

एक स्त्री केवळ वीस वर्षांची होती. मी तिच्यासाठी प्रार्थना म्हटली. आम्ही तिला सांगितलं की, तिनं वेश्यागृह सोडावं आणि 'बॉम्बे टीन चॅलेंज'च्या आश्रयगृहात जावं जिथं तिला वैद्यकीय सुविधाही लाभतील. एकदा आम्ही तिचे डोळे उघडल्यावर आणि तिला मार्ग दाखवल्यावर ती केवळ बदलायलाच तयार झाली नाही, तर तिला श्रद्धाही लाभली.

"तुमचं बोलणं ऐकून मला कल्पना आली की परमेश्वरानं मला एचआयव्ही/एड्समधून मुक्त केलं नाही, कारण मी आणखी काही स्त्रियांना येशूकडे आणावं," ती म्हणाली, "माझं असं माझ्याकडे काहीच उरलेलं नाहीये, पण मला कल्पना आहे की परमेश्वर माझ्यासोबत आहे."

तिच्या नजरेतल्या शांतपणानं आणि आशेनं माझा श्वास रोखला गेला. तिच्या श्रद्धेत ती खूपच रूपवान दिसत होती. ती म्हणाली की, तिला कल्पना होती की परमेश्वर तिला विसरला नव्हता आणि ती मृत्यूच्या दारापाशी उभी होती तरी तिच्यासाठी 'त्या'चा काही उद्देश होता. ती परिवर्तित स्त्री होती आणि तिनं तिचं दु:ख चांगल्यासाठीच्या बळात परिवर्तित केलं होतं. एवढ्या दारिद्र्यात, निराशेत आणि क्रौर्यातही ती परमेश्वरी प्रेमाचं आणि मानवी आत्मिक बळाचं लख्खं उदाहरण होती.

अंकल देव आणि त्यांच्या मिशनरी सहकाऱ्यांनी मुंबईतल्या वेश्यांना त्या नरकातून बाहेर पडायला प्रवृत्त करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधले आहेत. त्यांनी तिथल्या मुलांसाठी शाळा स्थापन केल्या आहेत आणि ते त्या मुलांची देखभालही करतात. तसंच ते त्यांना येशूची आणि त्यांच्यावरच्या त्याच्या प्रेमाची ओळख करून देतात. ती मुलं मग आपल्या आयांना सांगतात की, परमेश्वर त्यांच्यावरही प्रेम करतो आणि त्याही चांगल्या जीवनात प्रवेश करू शकतात. मी तुम्हाला प्रोत्साहित करू इच्छितो की, तुम्हीही बदलाला कवटाळा, तुमचं जीवनमान सुधारा तसंच दुसऱ्यांची जीवनं पालटणारं आणि ते सुधारणारं बळ व्हा.

नऊ

इतरांवर थोडाबहुत तरी विश्वास ठेवा

मी अकरा वर्षांचा असताना माझे आई-वडील मला ऑस्ट्रेलियाच्या गोल्ड कोस्टच्या समुद्रकिनाऱ्यावर घेऊन गेले होते. ती दोघं वाळूत येरझाऱ्या घालीत होती आणि मी वाळूत पाण्याकाठी लाटा पाहत, वारा खात होतो. उन्हाची झळ लागू नये म्हणून मी अंगावर मोठा टी-शर्ट घेतला होता.

इतक्यात, वाळूतून चालत एक तरुणी आली आणि माझ्याकडे पाहत स्मित करीत म्हणाली, "हे भारीच केलंयस तू!"

मला काय ते कळलं नाही. "म्हणजे?" मी तिला विचारलं.

"तुझे पाय एवढे गाडून घ्यायला तुला किती वेळ लागला?" तिनं विचारलं

तिला वाटलं होतं मी स्वत: माझे पाय वाळूखाली गाडले होते. वस्तुस्थितीची कल्पना नव्हती ना तिला. मी पण वेड पांघरलं आणि म्हटलं गंमत चालू ठेवू.

"पुष्कळ वेळ, विचार करू नका," मी म्हटलं.

त्यावर ती हसली आणि पुढे निघाली, पण मला कल्पना होती की कुतूहलामुळे ती पुन्हा एकदा मागं वळून पाहणार. म्हणून मीही तिच्या दिशेनंच बघत राहिलो. नेमकं तिनं वळून पाहताना मी उड्या मारून पाण्यात शिरलो.

ती काही बोलली नाही, तशीच शांतपणे निघून गेली.

मी लहान असताना असे प्रसंग मला आवडायचे नाहीत, पण हळूहळू मी इतरांना समजू लागलो. अगदी त्या तरुणीप्रमाणं मीही हे शिकलो की, प्रथमदर्शनी तुम्ही लोकांविषयी जे आडाखे बांधता त्यापेक्षा कधी-कधी त्यांची क्षमता खूप अधिक किंवा सरासरीपेक्षा कमीही असते.

लोकांना वाचण्याची, त्यांच्याशी संबंध जोडण्याची, त्यांच्यात मिसळण्याची, त्यांच्याठायी स्वत:ची कल्पना करण्याची तसंच कोणावर विश्वास टाकावा आणि आपण विश्वासार्ह कसं व्हावं याची कल्पना तुमच्या यशासाठी आणि आनंदासाठी फार महत्त्वाची असते. परपस्परसामंजस्य आणि विश्वास यांच्याविना नाती प्रस्थापित करण्याची कला अवगत नसलेले फारच थोडे लोक यशस्वी होतात. आपणा सर्वांनाच केवळ प्रेम करण्यासाठी कोणीतरी हवं असतं असं नव्हे, तर आपली स्वप्नं स्वीकारून त्यांच्या पूर्ततेमध्ये हातभार लावणारी मित्रमंडळी, गुरू, सल्लागार, आदर्श आणि समर्थकही आपल्याला हवे असतात.

समर्थकांची फळी उभी करायची झाल्यास प्रथम तुम्हाला त्यांच्यासाठी उभं राहावं लागतं. तुमचे जोडीदार तुम्हाला तशीच वागणूक देतील जशी तुम्ही त्यांना द्याल. त्यांच्या यशात तुम्ही खर्ची पडाल, त्यांना साहाय्य कराल, त्यांना प्रेरणा द्याल, त्यांना तुमची प्रांजळ मतं द्याल, तर तेही तुमच्यासाठी ते सारं करतील अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही. पण त्यांनी तसं केलं नाही तर तुम्ही पुढे सरका आणि तुमच्या संघात सामील होण्याची इच्छा असणाऱ्या दुसऱ्या कोणाचातरी शोध घ्या.

निसर्गानं आपण सामाजिक आहोत, पण तुम्हाला अपेक्षित असलेले संबंध तुम्हाला लाभत नसतील तर तुम्ही इतरांशी कसं वागता तसंच त्या नात्यांमध्ये तुम्ही काय ओतता आणि काय काढून घेता याचा तुम्ही विचार करीत नसणार. तुम्ही करीत असलेल्या घोडचुकांपैकी एक ही असू शकते की, केवळ स्वत:बद्दलची भीती, निराशा आणि आनंद सांगून तुम्ही नाती प्रस्थापित करू पाहता. वस्तुस्थिती ही आहे की, त्यांच्याबद्दल जाणून घेऊन, परस्परांमधले समान दुवे शोधून, परस्परांना फायदेशीर ठरणारे बंध शोधूनच तुम्हाला नाती प्रस्थापित करता येऊ शकतात.

नातं प्रस्थापित करणं हे बचत खातं उघडण्यासारखं आहे; तुम्ही त्यामध्ये काही टाकल्याशिवाय त्यातून काही मिळवण्याची तुम्ही अपेक्षा करू शकत नाही. समोरच्या व्यक्तीशी आपला रोख कसा आहे आणि काय जुळतंय आणि काय नाही हे नियमितपणे तपासूनच आपल्याला आपल्या संबंधांना जपावं लागतं.

आपण दुसऱ्यांशी कसे संबंधित आहोत?

हेतूची प्रबळ जाणीव, उंच आशा, पक्की श्रद्धा, आत्मप्रेम, सकारात्मक दृष्टिकोन, निर्भयपणा, प्रतिकारशक्ती आणि बदलावर प्रभुत्व तुम्हाला पुष्कळ दूरवर नेऊ शकतील, पण कोणालाही एकट्यानं मुक्काम गाठता येत नाही. माझ्यासाठी माझं स्वावलंबित्व फार महत्त्वाचं आहे. शक्य तेवढं स्वावलंबी होण्यासाठी मी पुष्कळ झटलो. तरीही मी माझ्याभोवतीच्या लोकांवर आपणा सर्वांप्रमाणेच अवलंबून आहे.

मला अनेकदा विचारलं जातं, "इतरांवर एवढं अवलंबून असणं खूप जड जात असेल, नाही?" त्यावर माझं उत्तर असतं, "तुम्हीच मला सांगा ना!" तुम्ही कबूल करा अथवा नका पण तुम्हीही इतरांवर तेवढंच अवलंबून असता जेवढा मी असतो. माझ्या काही कामांसाठी व्यवस्थापन आवश्यक असतं, पण या भूतलावर अशी कोणीही व्यक्ती नाहीये जिला इतरांची बुद्धी, त्यांचा दयाळूपणा किंवा त्यांच्या मदतीचे हात यांच्याशिवाय यशस्वी होता येईल.

आपणा सर्वांनाच साहाय्यक नाती लागतात. आपण सर्वांनीच सद्आत्म्यांशी संबंधित राहायला हवं. तसं करण्यासाठी आपण विश्वासार्हता सिद्ध करायला हवी. आपण समजून घ्यायला हवं की बहुतेक माणसं अभावितपणे स्वार्थातून कृती करतात. पण तुम्ही त्यांना

दाखवून दिलंत की तुम्हाला त्यांच्यात रुची आहे आणि तुम्ही त्यांच्या यशात खर्ची पडलात तर बहुतेक जण तुमच्या बाबतीतही तेच करतील.

दुवा साधणं

मी लहान असताना आई मला माझ्या व्हीलचेअरमधून खरेदीला किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी घेऊन जायची आणि तिची कामं होईपर्यंत मी लोकांचं, त्यांच्या चेहऱ्यावरल्या हावभावांचं निरीक्षण करायचो. या निरीक्षणावरून मी अंदाज बांधायचो की त्यांचं उपजीविकेचं साधन काय असू शकेल आणि त्यांचं व्यक्तिमत्त्व कसं असेल. अर्थात, माझे निष्कर्ष बरोबर होते की नव्हते हे मला कधीच कळलं नाही, पण मी देहबोलीचा, चर्चेवरच्या हावभावांचा आणि एकंदरच लोकांच्या निरीक्षणाचा विद्यार्थी झालो.

ही प्रक्रिया जाणिवेत होती, पण मागं वळून पाहताना मला जाणवतं की त्या वेळी मी नकळतपणे काही कौशल्यं आत्मसात करीत होतो. स्वत:चा बचाव करण्यात उपयोगी असणारे हात आणि पळण्यात उपायोगी असणारे पाय मला नसल्यामुळे मी कोणावर विश्वास टाकावा की नाही, हे मला अल्पावधित ठरवावं लागत असे. माझ्यावर हल्ला होईल असं मला जाणीवपूर्वक वाटत नसे, पण मी इतरांपेक्षा शारीरिकदृष्ट्या कमजोर असल्यामुळे लोकांच्या बाबतीत इतरांपेक्षा अधिक सावध होतो.

माझ्या भोवतालच्या लोकांच्या भावना, त्यांच्या लहरी आणि त्यांचे स्वर याबाबतही मी संवेदनशील असतो. हे विचित्र वाटेल, पण ते नैसर्गिक आहे. कोणी माझ्या व्हीलचेअरच्या आर्मरेस्टवर हात ठेवला की ते जणू आम्ही हातात हात मिळवल्यासारखं असतं. ती अशी जाणीव होऊन जाते की जणू आम्ही शारीरिक संबंध प्रस्थापित केला आहे, जसा की आम्ही हातात हात घेतला आहे किंवा आम्ही हस्तांदोलन करीत आहोत. माझे मित्र किंवा कुटुंबीय जेव्हा माझ्या व्हीलचेअरवर असा हात ठेवतात तेव्हा मला त्या उबेची आणि स्वीकृतीची जाणीव होते.

वक्त्याच्या नात्यानं मी लोकांशी जोडला जातो त्यात मला माझ्या हाता-पायांची उणीव जाणवते, तसंच काही फायदेही. वक्त्यांचा एक प्रमुख प्रश्न असतो तो बोलताना हातांचं काय करायचं, तो माझ्यासाठी उरतच ना. पण उलटपक्षी एखादा मुद्दा पटवून देताना, त्याच्यावर जोर देताना जे हातवारे करावे लागतात ते मी करू शकत नाही. मी माझ्या संवादासाठी हातांऐवजी डोळ्यांचा, नजरेचा वापर करतो तसाच माझ्या चर्येचाही.

नुकतीच माझी बहीण मला म्हणाली, "निक, तुला नजरानजर आवडते. समोरच्या व्यक्तीशी बोलताना तू थेट तिच्या नजेरत पाहतोस आणि त्यात एक गहिरेपणा असतो."

मिशेल मला चांगली ओळखते. मी इतरांच्या डोळ्यांत पाहतो, कारण ते त्यांच्या आत्म्याची खिडकी असतात. मला नजरानजर आवडते. मला लोकांमधलं सौंदर्य आवडतं

आणि बहुधा ते त्यांच्या नजरेत, डोळ्यांमध्ये असतं. आपणा सर्वांनाच इतरांमध्ये काही ना काही वैगुण्य सापडतंच, पण मी त्यांच्यातलं सोनं पाहण्याचा प्रयत्न करतो.

"संवाद खरा आणि गंभीर ठेवण्याचाही तुझा तो एक मार्ग असतो," मिशेल म्हणाली. "तू माझ्या मित्र-मैत्रिणींशी बोलतोस तेव्हा मी ते पाहते. तू समोरच्या व्यक्तीच्या अंतरातच शिरतोस आणि तू त्यांचं लक्ष एवढं वेधून घेतोस की तू बोललेला प्रत्येक शब्द ते शोषून घेतात."

लोकांच्या नजरेला नजर देऊन बोलायला, त्यांना प्रश्न विचारायला किंवा संवादासाठी समान मुद्दे शोधायला मी शिकलो. पाठदुखीमुळे आता ते शक्य होत नाही, पण तत्पूर्वी दुवा साधण्यासाठी मी लोकांना मला आलिंगन द्यायला सांगायचो.

लोकांना जवळ बोलावून त्यांच्याशी स्पर्श करताना मला वाटायचं की, त्यांना त्यामुळे माझ्या संगतीत स्वस्थ वाटेल, ती अवघडणार नाहीत. इतरांशी पोहोचणं, त्यांच्याशी दुवा जोडून घेणं, समान बाबी शोधणं ही नाती प्रस्थापित करणारी कौशल्यं सर्वांनी आत्मसात करायला हवीत. आपल्या भोवतालच्या लोकांशी आपण केवढे चांगले संबंध ठेवू शकतो हेही कौशल्यंच ठरवतात.

कौशल्य संच

'जनकौशल्य' ही संज्ञा पुष्कळ वापरली जाते. पण तिची चोख व्याख्या मांडली जात नाही. आपणा सर्वांनाच वाटतं की आपल्याकडे चांगली जनकौशल्यं आहेत, जसं प्रत्येकालाच वाटतं की तो/ती उत्तम चालक आहे. माझा भाऊ मला म्हणतो की, जनकौशल्याच्या बाबतीत मी प्रगतिपथावर आहे. तुम्हीही त्या बाबतीत प्रगतिपथावरच असायला हवं.

यश आणि आनंद मिळवण्यासाठी अत्यावश्यक कौशल्यं कोणी गृहीत धरू नयेत. तुम्ही मर्यादाहीन जीवन जगू शकाल, पण विश्वासार्ह नात्यांशिवाय तुम्ही जीवन जगू शकणार नाही. म्हणूनच तुम्ही आजूबाजूच्या लोकांशी कसे संबंध ठेवीत आहात याचं तुम्ही नित्यानं निरीक्षण करावं, मूल्यांकन करावं आणि ते विकसित करावं. मानसोपचारतज्ज्ञ म्हणतात की, विश्वासाचे बंध आणि परस्पर आधारावर बेतलेली नाती जोपासण्याची आपली क्षमता काही 'जनकौशल्यांवर' अवलंबून आहे. त्या क्षमता आहेत :

- भावना आणि मनाचा कल ओळखणं.
- समोरची व्यक्ती काय आणि कसं बोलत आहे ते लक्षपूर्वक ऐकणं.
- समोरच्या व्यक्तीच्या संकेतांचं मूल्यांकन करणं, समजून घेणं आणि त्यावर कृती करणं.
- गटाला दिशा देणं.
- इतरांशी पटकन दुवा साधणं.

- कोणत्याही परिस्थितीत प्रभावी आणि उत्साही असणं.
- धोरणी आणि विवेकी राहण्याची सवय ठेवणं.
- इतरांविषयीची पर्वा कृतीतून दाखविणं.

आता हे प्रत्येक कौशल्य आपण तपशीलवार पाहू.

वाचणं

देहबोली वाचणं, आवाजातला स्वर ओळखणं, चर्येवरचा आणि नजरेतला भाव जाणणं ही कौशल्यं सर्वांकडेच कमी-अधिक प्रमाणात असतात. किंबहुना आपल्या नकळत हे संकेत आपण टिपतो. बहुसंख्य लोक तर एवढंही ओळखू शकतात की, एखादी व्यक्ती खरोखर चिडलेली नसून ती बतावणी करतेय किंवा लक्ष वेधून घेण्यासाठी वेदनेचा देखावा करतेय. मानसोपचारतज्ज्ञ म्हणतात की, आपली ही कौशल्यं वयाबरोबर वाढतात तसंच स्त्रियांच्या बाबतीत ती अधिक विकसित असतात. मुलं असणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत ती अधिकच विकसित असतात हे ऐकून मला आश्चर्य वाटलं नाही. माझी आई मला पुस्तकासारखं वाचायची. मी आजारी, निराश किंवा दु:खी होण्यापूर्वीच आईला त्याची कल्पना असायची.

समजून घेण्यासाठी ऐकणं

"परमेश्वरानं तुम्हाला केवळ एक तोंड दिलंय पण दोन कानही दिले आहेत, ते तुम्ही जेवढं बोलता त्याच्या दुप्पट ऐकावं यासाठी," असं माझे आई-वडील सांगायचे तेव्हा त्यांना हाच संदेश अभिप्रेत होता. बरेचदा आपण समजून घेण्यासाठी ऐकत नाही. केवळ प्रतिक्रिया देण्यासाठीच बहुधा आपण ऐकतो. खरोखर जोडलं जाण्यासाठी तुम्ही केवळ शब्द ऐकणं महत्त्वाचं नसून त्या शब्दांमागच्या भावना जाणून घेणं महत्त्वाचं असतं. मी कोणी नातेसंबंधांवरचा तज्ज्ञ नाहीये, पण अनेक लोक याबाबतीत झगडत असलेली मी पाहत आलोय. स्त्रियांना भावार्थ पटकन कळतो आणि केवळ शब्दार्थांना महत्त्व देणाऱ्या पुरुषांच्या बाबतीत त्या खट्टू असतात.

ते घ्या आणि त्याच्याबरोबर चला

लक्षपूर्वक ऐकणं आणि निरीक्षण करणं हा एक भाग झाला आणि त्याहून महत्त्वाचं असतं ते ऐकलेल्याचं आणि पाहिलेल्याचं मूल्यांकन करणं आणि त्याबरहुकूम कृती करणं. हे योग्य प्रकारे करणारी मंडळी नातेसंबंध चांगले राखू शकतात तसंच आपल्या कामात ते उत्तम यश मिळवतात. तसं ते उत्तम बचाव कौशल्यही ठरू शकतं. न्यू यॉर्क टाइम्समध्ये एक बातमी छापून आली होती; इराकमध्ये गस्तीवर असलेल्या दोन अमेरिकी सैनिकांनी एक पार्क केलेली गाडी पाहिली ज्यात दोन तरुण मुलं बसली होती. बाहेर १२०० फॅ. तापमान होतं

तरी तिच्या खिडकीच्या काचा लावलेल्या होत्या. एका सैनिकानं दुसऱ्याला विचारलं की त्यांनी त्या तरुणांना पाणी देऊ करावं का? आणि त्यासाठी त्यातला एक कारच्या दिशेनं पुढे सरकला.

दुसऱ्या सैनिकानं सभोवती नजर फिरवली आणि त्याला धोक्याचा संकेत मिळाला, किंबहुना त्याला जे काही दिसलं त्यावरून त्याला धोका जाणवला. त्यानं पुढे जाण्याऱ्या सैनिकाला मागं हटायला सांगितलं. तो सैनिक उलटा फिरला नाही तोच कारमध्ये स्फोट झाला. दोन्ही तरुण ठार झाले. उलटा फिरलेला सैनिक जखमी झाला, पण बचावला.

नंतर दुसऱ्या सैनिकानं ती आठवण सांगताना सांगितलं की, पहिला सैनिक कारच्या दिशेनं सरकताना, "माझा देह थंड पडायला लागला, तुम्हाला तो धोका जाणवतो." अन्य काही संकेतांनी त्याला सावध केलं होतं. त्या सकाळी त्यांच्यावर एकदाही गोळीबार झाला नव्हता, जे असामान्य होतं, तसंच त्या वेळी रस्ते नित्यापेक्षा शांत भासत होते.

संवेदना, देहबोली आणि न जुळणारं काही वेगळेपण यांच्यावरून परिस्थितीच्या झटकन आकलनावर ते कसे विसंबून राहतात हे अनुभवी सैनिकांनी दाखवून दिलंय. हा गुण केवळ नातेसंबंधांच्या बाबतीतच नव्हे, तर आपल्या बचावासाठीदेखील फार महत्त्वाचा असतो.

आदर्श यजमान

योग्य वर्तणूक करणं आणि लोकांच्यात मिसळणं – चर्चमध्ये, क्लबमध्ये, सहलीत किंवा पार्टीत हे आणखी एक महत्त्वाचं जनकौशल्य आहे. तुम्ही जिथं असाल त्या ठिकाणाविषयी तुमच्या मनात आदर असायला हवा. परदेशात असताना मी माझ्या यजमानांच्या स्थानिक चालीरीती आणि परंपरांविषयी जाणून घेतो जेणेकरून माझ्या भाषणात श्रोतृवर्ग दुखावला जाऊ नये.

घरात जेवत असताना तुम्ही काही कृती करता ज्या काही परदेशांमध्ये तुम्ही करता कामा नयेत. काही देशांमध्ये ढेकर देणं असभ्यतेचं लक्षण असतं, पण उलटपक्षी काही ठिकाणी ती आचाऱ्यासाठी पोचपावती समजली जाते. काही ठिकाणी काही विषय तुम्ही टाळणंच हितकर असतं. जुने संघर्ष, राजकारण किंवा धर्म या गोष्टींवर काही ठिकाणी बोलणं म्हणजे, संवाद नव्हे तर विसंवादालाच आमंत्रण ठरतं.

पण इतरांशी जोडले जाण्यात तुम्हाला कायमच काही ना काही समान दुवे मिळू शकतात. वाढत्या सुज्ञपणानं मी शिकलोय की इतरांशी संवाद साधण्यासाठी, विशेषत: तुम्ही जेव्हा यजमानपदी असाल तेव्हा तोंडाला काम देण्याऐवजी कानांना कामाला लावणं हे अधिक महत्त्वपूर्ण असतं.

बंधक्षमता

इतरांशी संबंध प्रस्थापित करण्यात फक्त शब्दांचाच नाही, तर आपले हावभाव आणि आपली देहबोली यांचाही अंतर्भाव असतो. बरेचदा अन्य कोणी आपल्या व्यक्तिगत परिघात स्वत:ला लादत नाही तोपर्यंत आपल्याला स्वत:च्या स्थाननिश्चितीचं आकलन होत नाही. उदाहारणार्थ, जवळिकीनं बोलणारे बंध निर्माण करू पाहतात, पण प्रत्यक्षात लोक अशांना टाळतात. ही विभागणारी रेषा कठीण असते, कारण काहींना आपण आपल्या व्यक्तिगत परिघात प्रवेश देतो तर काहींना टाळतो. एकदा एका पार्टीत माझ्या एका मित्रानं माझ्याकडे खूप विचित्र कटाक्ष टाकला, कारण चौघांचा एक कंपू त्याचं लक्ष आपल्याकडे वेधण्यासाठी हात धुवून त्याच्यामागं लागला होता. आणि त्याची अवस्था अक्षरश: शिकारी कुत्र्यांनी वेढलेल्या कोल्ह्यासारखी झालेली दिसत होती.

वलय मोहीम

कोणाचं लक्ष वेधून घेणं माझ्यासाठी मामुली गोष्ट आहे, पण ते राखणं ही एक वेगळी बाब आहे. मी लोकांना भेटतो तेव्हा माझ्या देहदर्शनानं त्यांचं कुतूहल जागृत होतं, पण त्याकडे पाहत राहण्यात ती अवघडतात. ते अवघडलेपण दूर करण्यासाठी मी माझं व्यक्तिमत्त्व वापरतो. विशेषत: मुलं आणि तरुणांच्या बाबतीत मी माझ्या हात-पाय नसण्यावरच काहीतरी विनोदी बोलून माझ्या त्या स्थितीची आणि त्यावरल्या लोकांच्या प्रतिक्रियांची मला सवय असल्याचा संदेश देतो आणि ते मी केवळ स्वीकारलं नसून त्याची मला सवय झाल्याचंही स्पष्ट करतो. तुमच्या वलयामागचं मोठं रहस्य आहे ते हे की, संभाषणात तुम्ही समोरच्या व्यक्तीचं लक्षपूर्वक ऐकत आहात हे त्यांना जाणवलं पाहिजे.

धोरण विभाग

आपणा सर्वांनाच वाटतं की इतरांच्या बाबतीत आपलं वर्तन धोरणी आणि विचारी असतं, पण मला जाणीव आहे की त्या बाबतीत मी कधी-कधी कमी पडतो. आमच्या लहानपणी मी माझ्या धाकट्या भावावर दादागिरी करायचो याची अधूनमधून मला आठवण करून द्यायला त्याला आवडतं. आरोनला बरंच सहन करावं लागलं होतं. माझे आई-वडील घरी असले तरी त्याला माझी काळजी घ्यावी लागायची, कारण आम्ही एकत्रच असायचो. तो सांगू शकेल की अनेकदा माझ्या मागण्या अवाजवी असायच्या. उदाहरणार्थ, एकदा नाश्त्याच्या वेळी त्याचा मित्र फिल आमच्याकडे आला होता. त्यानं किचनमध्ये प्रवेश केल्यामुळे मी साहजिकच त्याला विचारलं की, नाश्त्याला ऑम्लेट चालेल का. त्यानंही आनंदानं होकार दिला.

मी ऑम्लेट करायला घेतलं. कसं ते पाहा. माझा आदेश सुटला. "आरोन, मला अंडी आणि फ्राइंग पॅन दे. हं आणि पॅन गॅसवर ठेव. मग अंडी फोडून पॅनमध्ये टाक आणि ऑम्लेट झाल्यावर मी पुढचं पाहतो."

आरोन वयानं आणि आकारानं वाढल्यावर माझी दादागिरी पेलवण्याचे मार्ग त्याला मिळाले. माझी दादागिरी अतिच व्हायला लागली की तो धमकवायला लागला की तो मला उचलून कपाटात ठेवेल आणि दार लावून घेईल. त्यामुळे मला धोरणाची कास धरावी लागली, नाहीतर मी माझं बरंचसं आयुष्य कपाटातच व्यतीत केलं असतं.

बोले तैसे चाले

बोलतील पुष्कळ, पण बोलल्याप्रमाणं कृती जराही करणार नाहीत अशी अनेक माणसं आपण पाहतो. तुम्ही उत्तम श्रोते असाल, सहृदयी असाल, संबंध राखणारे असाल, प्रभावी असाल, धोरणी असाल; पण प्रसंगी पाऊल पुढे टाकून तुम्ही जर लोकांसाठी काही करणार नसाल तर तुमच्या साऱ्या गुणांचं मोल फोल ठरेल. 'मला तुझ्याविषयी वाटतं' एवढं नुसतं बोलून भागत नाही. तुमची कृती तुमच्या बोलांहून मोठ्यांदा बोलते.

तुमच्या कामाच्या ठिकाणी याचा अर्थ हा होतो की, तुम्ही तुमचं काम करून यशसिद्धीकडे जाणं एवढंच पुरेसं नसतं, तर तुमच्याबरोबर काम करणाऱ्यांनाही तुम्ही त्यांच्या कामात मदत करून त्यांनाही आपल्याबरोबर यशसिद्धीकडे नेलं पाहिजे.

सूर जुळवणं

या जनकौशल्यांवर प्रभुत्व मिळवण्यासाठी तुम्ही स्वत:चे स्वार्थ, चिंता, हेतू थोपवून ठेवून तुमच्या भोवतीच्या लोकांचा विचार करायला हवा. याबाबतीत, केंद्रबिंदू होणं किंवा जगातली सगळ्यांत विनोदी व्यक्ती ठरणं नसतं तर लोकांशी त्यांच्या तत्त्वांवर जोडलं जाणं आणि त्यांनी त्यांच्या जीवनात तुमचं स्वागत करावं एवढं त्यांना तुमच्या बाबतीत निर्धास्त वाटावं हे असतं.

आपल्या नात्यांचा गहिरेपणा वेगवेगळ्या स्तरांवरचा असतो. आपण ज्यांच्याशी अल्पवेळासाठी संबंधित असतो (दुकानदार, वेटर्स, पोस्टमन वगैरे) त्यांच्यापासून ते ज्यांच्याशी आपण नित्य संबंधित असतो (शेजारी, कामाच्या ठिकाणी आपल्याबरोबर काम करणारे, आपले ग्राहक वगैरे) तिथपासून ते आपल्या जीवनाचा जे मोठा भाग असतात (आपले मित्र, पती/पत्नी, कुटुंबीय वगैरे) तिथपर्यंत. या प्रत्येक स्तरावर विविध प्रकारची जनकौशल्यं आवश्यक असतात, संबंध ठेवण्यासाठी आणि सुसंवाद राखण्यासाठी वेगळी क्षमता असणं आवश्यक असतं.

हात देणं

एक जनकौशल्य असं आहे जे दुर्लक्षिलं जातं, पण मला ते नित्य अनुभवास येतं; तुम्हाला आवश्यक असताना हात देण्याची तयारी आणि विचारण्याची विनम्रता. येशू, परमेश्वराचा पुत्र या भूतलावर क्वचितच एकटा वावरला. साधारणपणे तो त्याच्या एक किंवा अनेक

अनुयायांच्या सहवासात असायचा. तुम्हाला असं कधीच वाटू नये की तुम्हाला एकट्यानं मार्गक्रमण करावं लागेल. मदतीचा हात मागणं कमजोरीचं लक्षण नव्हे, उलट ते बळाचं चिन्ह आहे. बायबल म्हणतं, 'विचारा आणि तुम्हाला ते दिलं जाईल. शोधा म्हणजे तुम्हाला ते सापडेल. ठोठवा म्हणजे तुमच्यासाठी दार उघडलं जाईल. जो कोणी विचारेल त्याला लाभेल; जो कोणी शोधेल त्याला सापडेल; आणि जो कोणी ठोठवेल त्याच्यासाठी दार उघडलं जाईल.'

काही वर्षांपूर्वी, माझ्या फिरतीच्या मोठ्या वेळापत्रकामुळे माझी काळजी घेणारं कोणी नेमण्याचा माझा निर्णय झाला, जे मी टाळण्याचा फार काळ प्रयत्न करीत होतो. मी लहान असताना मला सिद्ध करून द्यायचं होतं की इतरांवर अवलंबून न राहता मी दिवसागणीक तरू शकतो. स्वावलंबी असणं माझ्यासाठी फार महत्त्वाचं होतं. माझ्या मन:शांतीसाठी आणि आत्मसन्मानासाठी मला कल्पना करणं आवश्यक होतं की गरज पडल्यास मी एकटा जगू शकतो.

परंतु, माझ्या वक्त्याच्या कारकिर्दीनं उचल खाल्ल्यावर मला जगभरातून जशी आमंत्रणं येऊ लागली तसं मला जाणवायला लागलं की स्वत:चं करण्यातच मी खूप ऊर्जा खर्च करीत होतो, विशेषत: रस्त्यावर मी जेव्हा बोलतो तेव्हा. खूप साऱ्या वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या लोकांशी बोलण्यासाठी मला पुष्कळ ऊर्जेची गरज भासते. अर्थातच, मी माझी काळजी घेणाऱ्यांची नेमणूक केली, मनात ही आशा ठेवून की भविष्यात मला माझी पत्नी, मुलं असतील आणि पुन्हा मी स्वावलंबी होईन.

तुमची काळजी घेणारं कोणी असेल तर तुमच्याकडे जनकौशल्यं नसणं हा पर्यायच उरत नाही. त्यांचा मोबदला जरी चांगला असला तरी तुम्हाला भरवणं, तुमची दाढी करणं, तुम्हाला कपडे घालणं, आणि तुम्ही आवडत नसलात तरी कधीतरी तुम्हाला उचलून घेणं हे सारं त्यांनी करण्याची अपेक्षा तशी गैरच. सुदैवानं, माझी काळजी घेणाऱ्यांशी माझे संबंध नेहमीच चांगले होते – कधी-कधी त्यांचा अंत पाहिला गेला तरी. २००५ पर्यंत माझी काळजी घेणारा हा पूर्ण वेळासाठी नव्हता. परंतु २००५मध्ये, चर्चमधल्या माझ्या बोलण्यावर प्रभावित होऊन क्रेग ब्लॅकबर्गनं माझ्याशी संपर्क साधला आणि क्वीन्सलॅन्ड किनाऱ्यावरच्या पाऊण महिन्यांच्या माझ्या दौऱ्यासाठी माझी काळजी घेण्याचा आणि माझा ड्रायव्हर आणि संयोजक होण्याचा त्यानं मला प्रस्ताव दिला. एका अनोळखी व्यक्तीबरोबर पाऊण महिना दौरा करणं मला विचित्र वाटत होतं, पण मी त्याची शहानिशा केली आणि त्याला नेमण्याचं निश्चित केलं. क्रेग माझ्यासाठी फारच उपयुक्त ठरला ज्यामुळे भाषणांसाठी आणि अन्य कर्तव्यांसाठी मी माझी ऊर्जा बचावू शकलो.

प्रचंड प्रवास असणारी माझी कारकीर्द घडवताना माझं स्वावलंबित्व सिद्ध करण्याच्या माझ्या निश्चयी प्रयत्नात मदत मागण्याला मी कमीपणा समजायचो, तशी मदत मागणं योग्य

असतानादेखील. तुम्ही तीच चूक करू नका. आपापल्या मर्यादा ओळखा. आपले आरोग्य आणि सुज्ञपणा राखा, केवळ मानवी आहे तेच करून, गरज भासेल तेव्हा आपला मदतीचा हात पुढे करून. पण ध्यानात ठेवा की दुसऱ्याकडून कशाची अपेक्षा करताना त्यांच्याविषयी विचार न करणं कृतघ्नपणाचं ठरेल. तुम्ही दुसऱ्याला जेवढं देता त्याहून अधिक काही दुसरा तुम्हाला देणं लागत नाही.

माझी काळजी घेणारे काही जण माझे मित्र, कुटुंबीय किंवा स्वयंसेवक होते, पण त्यातल्या बहुतेकांना मोबदला दिला गेला, कारण माझं व्यस्त वेळापत्रक पाहता त्यांचं काम कष्टाचं होतं. २००६ मधल्या अमेरिकेतल्या दौऱ्यांमध्ये मी अधिकाधिक मदतनीस नेमू लागलो. जॉर्ज नावाच्या एका स्वयंसेवकानं त्या दौऱ्यात माझा ड्रायव्हर आणि काळजी घेणारा होण्याच्या प्रस्ताव ठेवला, पण त्याची कार एकदम कामातून गेलेली, कर्कश आवाज करणारी आणि पायांशी भोक असणारी होती. मी अवाकच झालो. त्या कारमध्ये मला कधीच सुरक्षित वाटलं नाही, पण तो निष्ठावंत समर्थक होता आणि त्यानं माझी उत्तम काळजी घेतली.

माझ्या सध्याच्या मदतनिसांपैकी ब्रायनची २००८च्या उन्हाळ्यातल्या माझ्या युरोपियन दौऱ्यात चांगलीच परीक्षा पाहिली गेली. आठवडाभर भिरभिर फिरत सरतेशेवटी ट्रान्सिल्व्हेनियन आल्प्समधल्या 'लिटल व्हिएन्ना' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोमानियामधल्या टिमिसोरा येथील हॉटेलमध्ये आम्ही रात्री पोहोचलो. मला कल्पना होती की ते ठिकाण जगातलं एक संशयास्पद ठिकाण होतं. परंतु आम्ही एवढे थकलेले होतो की अशा गोष्टींचा विचार करण्याचं त्राण आमच्यात नव्हतं. आठवड्यात आम्हाला रात्रीची व्यवस्थित विश्रांती मिळालेली नव्हती, जी त्या दिवशी पूर्ण करण्याचा आमचा मानस होता. मला झोप येत नसल्यामुळे ब्रायननं मला 'जेट लॅग'वरची मेलाटोनिन कॅप्सुल दिली. पण मी ती अर्धीच घेतली कारण काही औषधं मला सोसत नाहीत; पण सुदैवानं मला गाढ झोप लागली.

काही दौऱ्यांमध्ये अतिथकव्यानं मी झोपेत उठून बसतो आणि समोर श्रोते असल्याचं समजून उपदेशाचे डोस सुरू करतो. त्या रात्री शेजारच्या खोलीत झोपलेल्या ब्रायनला मी जागं केलं कारण माझं प्रवचन सुरू झालं, तेही सर्बियनमध्ये!

अख्ख्या रोमानियाला मी जागं करण्यापूर्वी ब्रायननं मला जागं केलं आणि तेव्हा आमच्या लक्षात आलं की आम्ही दोघंही घामानं निथळत होतो. खोलीतला एसी बंद पडला होता. मग आम्ही सर्व खिडक्या उघडून टाकल्या आणि झोपलो.

तासाभरानं आम्ही पुन्हा जागे झालो. यावेळचं कारण होतं, प्रचंड आकाराचे ट्रान्सिल्व्हेनियन डास आम्हाला जिवंतपणी खात होते. खाजवण्यासाठी मला हात नव्हते. अशा वेळी मी नरकयातना भोगल्या.

ब्रायनच्या सल्ल्यानं, खाज कमी करण्यासाठी मी शॉवर घेतला. त्यानंतर, खाज कमी करण्यासाठी त्यानं माझ्या अंगावर औषध फवारलं. मी पुन्हा आडवा झालो, पण दहा मिनिटांनी मी पुन्हा ब्रायनचा धावा केला. त्यानं फवारलेल्या औषधाच्या अॅलर्जीनं माझं अंग जळत होतं.

मला शॉवरमध्ये न्यायला त्यानं घाई केली, त्यात त्याचा पाय घसरला, तो पडला आणि त्याचं डोकं भिंतीवर आपटलं.

आम्हा थकलेल्या जिवांना केवळ झोप हवी होती, पण त्या रात्री ती किती दुष्कर होती!

एसी चालू नसल्यानं मी ब्रायनला सांगितलं की, पॅसेजमधला एसी चालू असल्यामुळे मी तिथं झोपत आहे. मी त्याच्याकडे उशी मागितली. तो चक्रावला, पण त्यानं माझ्याशी हुज्जत घातली नाही.

ठरल्याप्रमाणं मी पॅसेजमध्ये झोपलो आणि गरज पडल्यास माझी हाक ब्रायनला ऐकू जावी म्हणून दार उघडं ठेवलं. तास-दोन तासात पुन्हा जाग. एक मनुष्य आमच्या रूममध्ये घुसून मोडक्यातोडक्या इंग्लिशमध्ये ब्रायनचा समाचार घेत होता. थोड्या वेळानं आमच्या लक्षात आलं की, ब्रायननं मला खोलीबाहेर पॅसेजमध्ये झोपवल्याच्या समजातून तो त्याच्यावर भडकला होता. मी स्वत:च्या मर्जीनं तिथं झोपलो होतो हे त्या कनवाळू इसमाला समजावताना आमच्या नाकीनऊ आले.

तो इसम निघून गेल्यावर आम्ही निमूट आपापल्या बिछान्यांवर झोपलो. पण दहा मिनिटांत ब्रायनचा सेलफोन वाजला. त्यानं तो उचलला तर त्याच्यावर तोफांची सरबत्ती झाली, आमच्या दौऱ्याच्या संयोजकाकडून. अर्थातच, त्या कनवाळू इसमाला आम्ही पटवून देऊ शकलो नव्हतो. त्यानं हॉटेलमध्ये तक्रार केली की, मला रात्रभर पॅसेजमध्ये झोपवलं गेलं होतं. हॉटेलनं संयोजकाला कळवलं आणि तो आता ब्रायनची पिसं काढीत होता.

आता तुम्हाला कळेल की सर्वसाधारणपणे आठवड्याच्या पाळीनं मी तीन मदतनीस का नेमतो. आता रोमानियातल्या त्या हॉटेलमधल्या प्रसंगावर ब्रायन आणि मी हसू शकतो, पण ते डास विसरायला आम्हाला थंड खोल्यांमध्ये कित्येक रात्री झोपून काढाव्या लागल्या.

आयुष्यात लवकर शिकाव्या लागलेल्या धड्यांपैकी एक होता तो हा की मदत मागणं ठीक असतं. तुम्हाला सगळे अवयव असोत अगर नसोत, तुमच्या जीवनात अशा वेळा येतीलच जेव्हा एकट्यानं मार्गक्रमण करणं तुम्हाला अशक्य असेल. होय, विनम्रता हे एक जनकौशल्य आणि तसंच परमेश्वरी वरदान आहे.

दुसऱ्याकडे, मग तो मदतनीस असो, आपला आदर्श असो, मित्र किंवा कुटुंबीय असो, मदत मागताना तुम्ही नम्र असणं आवश्यक असतं. दुसऱ्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याएवढं कोणी नम्र असेल तर लोकही त्याला स्वत:ची मदत आणि वेळ देण्यास तयार असतात. तुमच्याकडे सर्व उत्तरं तयार आहेत आणि तुम्हाला कोणाची गरज नाही असं तुम्ही भासवाल तर तुमच्यामागं कोणी उभं नसेल.

निर्वस्त्र आणि नि:शब्द

लहान असताना मला शिकवलं गेलं होतं की, सर्व सन्मान परमेश्वरचरणी पोहोचतो आणि मोठा झाल्यावर मला कळलंय की जे काही चांगलं माझ्याकडून घडतं ते माझ्याकडून नव्हे तर माझ्याकरवी घडतं. असं दिसतंय की परमेश्वराला असं वाटतं की अधूनमधून मला विनम्रतेचे धडे मिळत राहायला हवेत जेणेकरून लोकांपर्यंत पोहोचण्याची आणि त्यांच्याशी जोडला जाण्याची क्षमता मी कधी हरवू नये. ते धडे कधी-कधी कठीण असतात, तर कधीतरी मजेशीर.

२००२मध्ये मी ऑस्ट्रेलियातच राहत होतो जेव्हा माझा एक भाऊ नेथन पोल्याक माझ्याबरोबर अमेरिकेतल्या भाषणासाठी आला होता. कार्यक्रमाच्या आदल्या रात्री आम्ही तिथं पोहोचलो आणि जेट लॅगमुळे अति झोपलो.

सकाळी लवकर उठून मी बायबलचा क्लास घेण्याचं ठरवलं होतं, पण मला कोणी वेळेवर उठवलं नाही. शेवटी क्लास सुरू होण्यापूर्वी फक्त पंधरा मिनिटं आधी मी जागा झालो. आम्ही जवळच राहत असल्यामुळे वेळेवर आम्ही पोहोचू असं मला वाटलं. आम्ही क्लासच्या ठिकाणी पोहोचलो, पण मला प्रातर्विधी उरकावासा वाटला. विश्वास ठेवा पण मी ते स्वत:चं स्वत: करू शकतो. त्यातली सांगण्यासारखी मेख अशी आहे की, झिपरच्या जागी वेलक्रो वापरण्यामुळे ते थोडं सुकर झालंय. घाई असल्यानं नेथन माझ्या मदतीला आला. त्यानं मला उचलून स्वच्छतागृहात ठेवलं.

माझं उरकल्यावर तो निस्तरायला आला. निस्तरताना त्यानं माझी शॉर्ट टॉयलेट बोलमध्ये पाडली. आमच्यादेखत माझी अब्रू गरगरत वाहून चाललेली आम्ही पाहत राहिलो. तिकडं मला क्लास घ्यायचा होता आणि मी इथं नागवा उभा होतो. आम्ही दोघंही भेदरलेल्या नजरेनं एकमेकांकडे पाहत होतो. मग अचानक दोघंही खो-खो हसायला लागलो. आमचं हसणं थांबेचना. नेथनचं हसणं एवढं संसर्गजन्य आहे की तो हसायला लागल्यावर समोरचा हसायचा थांबू शकत नाही. मला खातरी आहे की, बाहेर आमचं हसणं ऐकणारे चक्रावून गेले असतील की तिथं आतमध्ये एवढं हसण्यासारखं काय चाललं असेल.

अवघडलेल्या स्थितीत सापडल्यावर हसायला मला माझ्या भावंडांनी शिकवलं आणि ही एक तशीच स्थिती होती. तसंच मदत करण्याची तयारी असणाऱ्याच्या खांद्याचा आधार घ्यायलाही त्यांनीच मला शिकवलं. तुम्हीही तसंच करावं असं मी तुम्हाला सुचवेन.

हातभार

एवढी वर्षं माझी काळजी घेणारे माझे मदतनीस खूपच चांगले होते, आणि माझ्याकडून दुसऱ्या कामावर गेल्यानंतरही ते माझे मित्र राहिले हे माझं भाग्य. त्यातले बहुतेक जण

मुळात माझे मित्र किंवा माझ्या व्याख्यानांमध्ये परिचय झालेले असतात आणि मग ते मला साहाय्य करतात. अधूनमधून त्यात खंड पडतो, पण तो मध्यंतरही मला चांगलाच वाटतो.

माझ्या संगतीत काही काळ घालवलेले लोक मला सांगतात की, मला हात-पाय नसल्याचं ते पटकन विसरतात आणि माझ्या अक्षमता निरर्थक ठरतात. ते उत्तमच आहे, छानच, पण अपवाद असतो जेव्हा ते माझी काळजी घेणारे होतात तेव्हा. मी तुम्हाला सांगू शकत नाही की किती वेळा मी माझ्या नव्या मदतनिसाकडे पाण्याचा ग्लास मागतो आणि तो तो माझ्या पुढ्यात धरतो. तो विचित्र कालावधी असतो जेव्हा तो ग्लासचा हात माझ्यापुढे धरतो, मी तो माझ्या हातात घ्यावा याची वाट पाहत. मग एका क्षणी त्याच्या चेहरा आरक्त होतो. "अरे बापरे! हे मी काय करतोय? हात नसलेल्या इसमापुढे मी ग्लास धरतोय, त्यानं तो घ्यावा म्हणून!"

"काही हरकत नाही," मी त्यांना सांगतो, "मला त्याची सवय आहे."

असंही शक्य असतं की तुम्हाला दिवसाचे चोवीस तास आणि आठवड्याचे सातही दिवस प्रशिक्षित मदतनिसाची गरज नसते. पण आपणा सर्वांनाच कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या मदतनिसाची गरज असतेच, आपल्या कल्पना बोलून दाखवण्यासाठी, आपल्याला ज्यानं प्रामाणिक सल्ला द्यावा असं कोणी किंवा असं कोणी जे आपल्यासाठी प्रेरक, आधारस्तंभ किंवा आदर्श असेल.

आपण सर्वज्ञानी नाही आणि आपण मदत घेऊ शकतो हे स्वीकारायला नम्रता आणि धाडस लागतं. मी आधी उल्लेख केलाच आहे की तुमच्याकडे उद्दिष्टाची मोठी जाणीव असेल आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचा तुमचा निश्चय असेल तर तुमचे पाय खेचणारे अनेक असतील. पण सुदैवानं अन्यही असतील – काही वेळा तुम्हाला अनपेक्षित असलेल्या ठिकाणी – तुम्हाला हातभार लावण्यासाठी किंवा योग्य सल्ला देण्यासाठी. त्यांच्यासाठी तुम्ही तयार राहायला हवं, कारण त्यांच्याशी जोडलं जाण्यानं तुमचं जीवन बदलू शकतं.

माझ्या जीवनावर प्रभाव पाडलेल्या मार्गदर्शकांचे तीन प्रकार पडतात : आधारस्तंभ, आदर्श आणि सहप्रवासी.

आधारस्तंभ या अशा व्यक्ती असतात ज्या तुम्हाला जायचं असतं तिथं असतात, पण त्या तुमच्या समर्थक आणि प्रेरकही असतात ज्या तुमच्यासारखीच स्वप्नं पाहतात आणि तुम्ही खरोखरच यशस्वी झालेलं त्यांना पाहायचं असतं. तुमचे पालक हे तुमचे नैसर्गिक आधारस्तंभ असतात, पण अन्य माणसंही असतात जी आयुष्यभर तुमच्यासाठी ती भूमिका जगतात. माझ्या अगदी सुरुवातीच्या आधारस्तंभांपैकी एक होता, माझा मामा, सॅम राडोयेव्हिच, जो अजून ऑस्ट्रेलियातच त्याची अतिशय छान पत्नी आणि मुले यांच्याबरोबर राहतो. त्याचं हृदय हरहुन्नरी माणसाचं आहे, निष्ठा वैज्ञानिकाची आणि दृष्टी प्रवासी

संशोधकाची आहे. सॅम मामा नव्या अनुभवांचं नेहमीच स्वागत करतो आणि मी लहान असताना तो मला नेहमीच भराऱ्या घ्यायला प्रोत्साहित करायचा. त्यानं मला सांगून ठेवलं होतं की जीवनातले खरे अडथळे तेच असतात जे आपण स्वत: तयार करतो. त्याच्या मार्गदर्शनानं आणि आधारानं मला माझ्या दृष्टीचा विस्तार वाढवण्याचं बळ दिलं.

मी असे अनेक लोक पाहिले आहेत जे जन्मभर पश्चातापाचं ओझं खांद्यावर बाळगून असतात, पण सॅममामानं कधीच मागं वळून पाहिलं नाही. तो जेव्हा चूक करेल तेव्हाही तो आयुष्याच्या प्रेमात असलेल्या मुलाप्रमाणे पुढच्या संधीच्या दिशेनं जाऊ लागेल.

मोटरसायकल्स आणि सायकल्सचं डिझायनिंग आणि वेल्डिंग करणं त्याला आवडतं, पण ते तो केवळ स्वत:साठीच करीत नाही. गरीब मुलं आणि तरुण, ज्यांना सायकल विकत घेणं परवडणार नाही, अशांना जुन्या सायकल्स कैद्यांकडून दुरुस्त करून देण्याचा कार्यक्रम सुरू करण्यात त्यानं व्हिक्टोरिया सरकारला साहाय्य केलं. त्या कार्यक्रमाद्वारे हजारो गरजूंना सायकल्स मिळाल्या.

सॅममामा नेहमीच मला पुढे डोळे लावून ठेवायला प्रेरित करीत आला. आणि माझा स्वत:वर जेवढा विश्वास नसायचा तेवढा तो माझ्यावर विश्वास ठेवायचा. मी तेरा वर्षांचा असताना त्यानं मला सांगितलं होतं, "निकोलस, एक दिवस तू राष्ट्राध्यक्ष, राजे आणि राण्यांशी हस्तांदोलन करशील." तेव्हाही त्याच्या मनात विश्वास होता की परमेश्वराकडे माझ्यासाठी मोठी योजना होती. आधारस्तंभ म्हणून जो उत्तम मनुष्य आहे!

आपल्या स्वत:च्या आधारस्तंभापर्यंत पोहोचा असं मी तुम्हाला सांगेन. पण ध्यानात ठेवा की खरे आधरस्तंभ तुम्हाला केवळ प्रोत्साहन देत नाहीत, तर तुम्ही जेव्हा भरकटत असाल तेव्हा ते तुम्हाला त्याची कल्पना देतील. त्यांच्या कौतुकाबरोबरच त्यांच्या टीका ऐकण्याचीही तुमची तयारी असायला हवी, कारण त्यांच्या मनात तुमचं भलं व्हावं असंच असतं याची तुम्हाला कल्पना असते.

माझा एक भाऊ डंकन युरिशिच हाही माझ्यासाठी आदर्शच. मी लहान असताना, मला बाथरूममध्ये घेऊन जायला कोणाला सांगायची मला भीती वाटायची. त्यावर त्यानं मला एक वाक्य लक्षात ठेवायला सांगितलं, "तुला जायचं असेल तेव्हा कोणालातरी त्याची कल्पना दे." केवळ तोच नव्हे तर माझी अन्य व्होयचिच भावंडंही माझ्यावर प्रेम करतात आणि मला मदत करतात असं नाही, तर डंकन आणि त्याची आई डॅनिल्का, यांनी मला माझ्या व्याख्यात्याच्या कारकिर्दीच्या आरंभीच्या काळात माझी बोलण्याची भीती घालवण्यात मला खूप मदत केली.

मेलबर्नमध्ये 'ऑस्ट्रेलिया हॉस्पिटॅलिटी ग्रूप' चालविणाऱ्या त्या कुटुंबानं मला सतत त्यांचं मौल्यवान मार्गदर्शन दिलं.

तुम्हाला जायचं असतं तिथंच आदर्श असतात, पण ते तुमच्या आधारस्तंभांएवढे तुमच्या जवळ नसतात. सर्वसाधारणपणे तुम्ही त्यांना दुरून पाहता आणि तुमची कारकीर्द

घडवण्यासाठी तुम्ही त्यांचं आचरण अभ्यासता, त्यांची पुस्तकं वाचता आणि आदर्श म्हणून त्यांच्या कारकिर्दीचा कित्ता गिरवता. बरेचदा हे लोक तुमच्या क्षेत्रातले नामवंत असतात, ज्यांच्या यशानं त्यांना नाव आणि सन्मान दिलेला असतो. माझे दीर्घकाळाचे आदर्श, ज्यांना भेटण्याची माझी तीव्र इच्छा होती ते म्हणजे रेव्हरंड बिली ग्रॅहम. ते स्वत: मार्क १६:१५ मधले शब्द जगले, जे माझ्यासाठी प्रेरक होते : 'साऱ्या विश्वात फिरा आणि सर्व प्राणिमात्रांना येशूच्या संदेशाची शिकवण द्या.'

तसंच व्हिक आणि एल्सि श्लॅटर, ज्यांना मी जवळ-जवळ दर वर्षी किमान एकदा तरी भेटतो. त्यांच्यासारख्यांसाठी आधारस्तंभ आणि आदर्श यांच्यामध्ये कोठेतरी स्थान असायला हवं. ते कायम मला अधिक चांगला ख्रिश्चन आणि मनुष्य होण्यासाठी प्रेरित करतात. ते ऑस्ट्रेलियात राहतात, पण त्यांनी दक्षिण प्रशांत महासागरातल्या दुर्गम कोपऱ्यांमध्ये पासष्टहून अधिक चर्चेस स्थापन केली आहेत. मिशनरी म्हणून वेगळेपणा सिद्ध करण्याच्या दृष्टीनं ते माझ्यासाठी आदर्श आहेत. ते शांतपणे आपलं कार्य करीत राहतात. कोणत्याही जाहिरातबाजीविना आणि कधीही बडेजाव न मिरविता अनेक लोकांसाठी त्यांनी बदल घडवून आणलाय.

एल्सिला पौगंडावस्थेत येशूनं दृष्टान्त दिला आणि तिला 'जाण्याची' सूचना दिली. एल्सिनं त्याचा अर्थ घेतला की, परमेश्वराची इच्छा होती की एक दिवस तिनं मिशनरी कार्य हाती घ्यावं. व्हिकशी तिचा विवाह झाल्यानंतर तो 'जनरल इलेक्ट्रिक'मध्ये नोकरीला होता, पण दोघांनी मिळून एक चर्च सुरू केलं आणि त्यांच्या पहिल्या मोहिमेची आखणी सुरू केली – पापुआ न्यू गिनी, दक्षिण प्रशांत महासागरातला एक छोटा देश जिथं ख्रिश्चॅनिटी विशेष पोहोचली नव्हती. देश छोटा होता तरी तिथली तीस लाखांची लोकसंख्या भयावह विविधता असलेली होती की तिथं सातशेपेक्षाही जास्त प्रकारच्या भाषा बोलल्या जायच्या.

व्हिक आणि एल्सि जगाच्या त्या भागाच्या प्रेमात पडले आणि आता ते ऑस्ट्रेलियाच्या उत्तर किनाऱ्यावर स्थायिक झाले आहेत. त्यांच्या त्या तळावरून ती दक्षिण प्रशांत महासागरातलं मिशनरी कार्य चालवितात. व्हिकनं स्वत: धर्मावर बरीच पुस्तकं लिहिली आहेत आणि त्याचबरोबर ती दोघं ज्या लोकांची सेवा करतात त्यांच्या भाषेत अनेक पुस्तकंही अनुवादित केली आहेत.

सहप्रवासी ओळखणं माझ्यासाठी खूप कठीण आहे, कारण माझ्या आयुष्यानं तसा अपारंपरिक मार्ग चोखाळला आहे. सहप्रवासी हे सर्वसाधारणपणे ज्येष्ठ, अनुभवी असतात किंवा सहकर्मचारी किंवा तुमच्यासारखीच ध्येये असणारे असतात, जे तुमच्या मार्गाच्या समांतर मार्गावरून मार्गक्रमण करीत असतात. ते प्रतिस्पर्धीही असू शकतात, पण मित्रत्व असलेले प्रतिस्पर्धी. संकुचित मनोवृत्ती न ठेवता मोठ्या हृदयाचं दर्शन घडवीत तुम्ही एकमेकांना प्रेरित करता, आधार देता.

विपुलतेवर तुमचा विश्वास असेल तर पुरेशा परमेश्वरी वरदानांवरही तुमचा विश्वास असेल – पुरेशी तृप्तता, पुरेसा आनंद आणि पुरेसं प्रेम – जे सर्वांसाठी पुरेसं असेल. तुम्हीही तोच दृष्टिकोन ठेवावा असं मी सुचवेन, कारण त्यामुळे तुम्ही इतरांसाठी खुले होता. तुम्ही जर असा विचार कराल जग हे असं ठिकाण आहे जिथं स्रोत पुरेसे नाहायेत आणि संधी मर्यादित, तर तुम्ही तुमच्या सहप्रवाशांना प्रतिस्पर्धी न समजता शत्रू समजाल जे तिथं असेल ते घेतील आणि तुमच्यासाठी काहीच मागं ठेवणार नाहीत. स्पर्धा निकोप असू शकते, कारण ती तुम्हाला प्रेरित करते आणि तुम्हाला कायमच असे लोक सापडतील ज्यांना तुम्हाला हवं तेच हवं असेल. तुमचं हृदय विशाल असेल तर तुम्ही विश्वास ठेवाल की इथं प्रत्येकासाठीच काहीना काही आहे ज्यामुळे स्पर्धा म्हणजे सर्वोत्तम ते प्राप्त करणं आहे आणि इतरांनीही तेच करावं यासाठी त्यांनाही प्रेरित करणं आहे.

विशाल हृदयामुळे तुम्ही तुमच्या सहप्रवाशाबरोबर बंधुभावानं आणि परस्पर आधाराच्या भावनेनं चालू शकता. जॉनी एरिकसन टेडा, जिनं माझ्यासारखाच जीवनप्रवास केलाय, तिच्या मैत्रीत मी हे शिकलो. आधी मी उल्लेख केल्याप्रमाणे, तिच्याशी परिचय होण्यापूर्वीच ती माझी आदर्श होती, मग ती माझी आधारस्तंभ झाली. अमेरिकेत स्थायिक होण्यात मला मदत करणारी, आता मला योग्य सल्ले देणारी आणि सहानुभूतीपूर्वक माझे म्हणणे ऐकणारी सहप्रवासीही आहे.

आणखी एक व्यक्ती जी सर्व तऱ्हेनं माझ्यासाठी उपलब्ध असते ती म्हणजे जॅकी डेव्हिसन; जी माझ्या पौगंडावस्थेत आमच्या घराजवळ राहायची. त्या विवाहित होत्या आणि त्यांना मुलं होती, पण माझ्या मनातलं काहीही ऐकण्यासाठी त्यांच्याकडे वेळ असायचा. त्या मला समवयस्क वाटायच्या, कारण त्या मला समजून घ्यायच्या. त्यांच्या कुटुंबांशी माझे घरोब्याचे, जिव्हाळ्याचे संबंध होते आणि त्यांच्या मुलांचा मी जणू थोरला भाऊच होतो. मी त्यांना अभ्यासात मदत करायचो किंवा नुसता त्यांच्या सहवासात असायचो.

२००२मध्ये माझं शैक्षणिक आणि वैयक्तिक जीवन अस्थिर झालं होतं. माझ्या जुन्या मैत्रिणीबरोबरचे माझे संबंध संपुष्टात आले होते आणि मी हळवा झालो होतो. मी सरळ जॅकीला गाठलं आणि तिला विचारलं की नक्की काय घडलं होतं. मी भडाभडा बोलत होतो आणि त्या हाताची घडी घालून, माझ्या बोलण्यात व्यत्यय न आणता, मला प्रतिसाद न देता, शांत चित्तानं केवळ ऐकत होत्या. अचानक माझ्या ते लक्षात आलं. मी त्यांना विचारलं, "मी काय करू? मला सांगा."

त्यावर त्या हसल्या आणि दोनच शब्द बोलल्या, "ईशस्तवन कर."

"त्याची स्तुती कशासाठी?" मी वैतागून विचारलं.

"निक, सांगते तेवढं कर."

मी जमिनीकडे पाहत विचार केला, 'बस्स. एवढंच? या इतरांपेक्षा कोणीतरी वेगळ्या आहेत.'

मग मला जाणीव झाली की त्या मला परमेश्वरावर विश्वास ठेवायला सांगत होत्या आणि 'तो' मला विसरला नसल्याची जाणीव करून देत होत्या. त्या मला सांगण्याचा प्रयत्न करीत होत्या की, मी मानवी शहाणपणावर श्रद्धा न ठेवता, परमेश्वरी शक्तीवर श्रद्धा ठेवावी. त्या मला 'त्याला' शरण जायला सांगत होत्या, माझ्या धन्यवादाला तो पात्र नसल्याचं मला वाटत होतं तरी. या दु:खातून मला जे वरदान लाभेल त्यासाठी त्या मला परमेश्वराला आगाऊ धन्यवाद द्यायला सांगत होत्या. त्यांची श्रद्धा प्रबळ होती आणि मी जेव्हा गोंधळलेला किंवा दुखावलेला असेन तेव्हा त्या मला आठवण करून देतात की, त्याच्याकडे आपणा सर्वांसाठी योजना आहे.

जीवन मार्गदर्शक

जीवन मार्गदर्शकांबरोबरचे संबंध साधे-सोपे नसतात. तुमचे मार्गदर्शक तुम्हाला वस्तुस्थितीची जाणीव करून देतील किंवा वेळ पडली तर तुमच्या पार्श्वभागावर दोन लाथाही घालतील. पण त्यांना तुमच्याविषयी एवढं वाटतं की तुम्ही काय करीत आहात, कोठे जात आहात, जे काही करीत आहात ते का, आणि पुढे काय वाढून ठेवलेलं असणार आहे याविषयी ते तुम्हाला विचार करायला लावतात. असे लोक तुमच्या आयुष्यात असणं आवश्यक असतं.

वक्ता होण्याचा आणि इतरांना श्रद्धा बाळगण्यासाठी प्रेरित करण्याचा मी निर्णय घेतला तेव्हा तो मी माझ्या मित्रमंडळींना आणि कुटुंबीयांना बोलून दाखवला. त्यापैकी काहींच्या माझ्या आई-वडिलांसह भुवया उंचावल्या. आमच्या अॅपोस्टोलिक ख्रिश्चन चर्चनं अनेक मिशनरीज तयार केलेत. त्यांनी अनेक अनाथालयं बांधली आहेत आणि असंख्य गरजूंच्या गरजा भागवल्या आहेत. मी माझ्या आई-वडिलांना जेव्हा सांगितलं की, जगभरातल्या चर्चेसमधल्या अन्य लोकांशी मला बोलायचंय तेव्हा त्यांच्या मनात माझ्या आरोग्याविषयी आणि परमेश्वराला माझ्या बाबतीत खरोखरच हे व्हायला हवंय का, याविषयी साशंकता निर्माण झाली.

मी त्यांचं ऐकलं, कारण मला कल्पना होती की त्यांना मी यशस्वी झालेलं पाहायचं होतं. तुम्हीही तुमच्या योजनांविषयी तुमच्या जिवलगांची मतं ऐकून घ्यावीत, विशेषत: तुमच्या यशस्वितेमध्ये त्यांची गुंतवणूक असावी असं तुम्हाला वाटत असेल तर. त्यांचा आदर राखा आणि त्यांच्या सल्ल्यावर आणि मार्गदर्शनावर सखोल विचार करा. ते तुम्ही स्वीकारू नका, पण ध्यानात ठेवा की त्यांना तुमच्याविषयी एवढं वाटतं की तुम्हाला ऐकायचं नसतं तेही तुम्ही ऐकावं.

मला माझ्या आई-वडिलांच्या काळजीचा आदर होता, पण मला वाटत होतं की परमेश्वर मला त्याच्या कार्यासाठी खुणावीत होता. मग मी एवढंच करायचं बाकी होतं की आज्ञाधारक राहून, धीर धरून प्रार्थना करायची की त्यांनाही माझ्यासारखंच वाटावं. ईशकृपेनं, केवळ माझ्या आई-वडिलांनीच नव्हे तर आमच्या चर्चनंही माझी इच्छा स्वीकारली. चर्चचे नेते माझ्या पाठीशी उभे राहिले आणि चर्चचा पहिला 'मिनिस्टर ऑफ इव्हँजेलिझम' म्हणून त्यांनी माझी नेमणूक केली.

याची काहीच खातरी देता येत नाही की तुम्ही भेटाल त्या प्रत्येकालाच तुमची मदत करायची असते. काही जण तुम्हाला नाउमेद करू पाहतील. तसं करताना त्यांच्या मनातही सद्हेतू असू शकतात किंवा त्यांच्या साशंकतेची चांगली कारणं असू शकतात. माझ्या आई-वडिलांची साशंकता रास्तच होती, पण मी प्रार्थना केली की त्यांच्या श्रद्धेनं त्यांच्या साशंकतेवर विजय मिळवावा.

आई-वडील आणि त्यांच्या वयात आलेल्या मुलांनी मतभेद स्वीकारून पुढे सरकलं पाहिजे. तुमच्या अन्य सुहृदांनाही हेच लागू होतं. तुम्ही तुमच्या मार्गावर मार्गस्थ झाल्यावर कदाचित तुम्ही चुकीचेही ठराल. पण तसंच योग्यही ठरू शकता. शेवटी, केवळ योग्य ठरणं महत्त्वाचं नसतं.

मी आणि माझे आई-वडील एकमेकांची मतं आणि निर्णय यांविषयी आदर बाळगतो याची मला धन्यता वाटते. परमेश्वरकृपेनं आमचं नातं परीक्षेत उत्तीर्ण झालं आणि आमच्या गहिऱ्या प्रेमाच्या आणि परस्पर आदराच्या साक्षात्कारानं आम्ही एकमेकांच्या अधिकच निकट आलो. आम्ही जर आमच्या भावना मोकळ्या केल्या नसत्या तर जे निष्पन्न झालं असतं ते कदाचित एवढं आनंददायी नसतं.

माझा तळ म्हणून मी माझ्या चर्चमध्ये नियमितपणे उपस्थित राहत होतो आणि तिथल्या तरुणांना परमेश्वरी संदेश देत होतो. पण मी अन्य चर्चेसमधून बोलत होतो, क्षेत्रविस्तार करण्याचा प्रयत्न करीत होतो. मला सांगायला आनंद वाटतो की, त्यापैकी अनेक तरुण परमेश्वरी मार्गावर अधिक पुढे सरकले आहेत आणि त्याबद्दल मी 'त्या'चे आभार मानतो.

अखेरीस, २००८मध्ये एके दिवशी मी अधिकृतरीत्या इव्हँजेलिस्ट झालो तेव्हा माझ्याबरोबर आणि माझ्यासाठी प्रार्थना करताना माझे आई-वडीलही चर्चमध्ये उपस्थित होते. त्या प्रसंगानं आमच्या परस्पर प्रेमानं आणि आदरानं नवी पातळी गाठली. माझ्या आई-वडिलांना एव्हाना कल्पना आली होती की परमेश्वरी बोलांचा प्रसार करण्यास मी कटिबद्ध आणि समर्पित होतो. चर्चमधल्या सर्वांसमक्ष माझ्या सर्व जिवलगांनी माझ्यासाठी केलेली प्रार्थना मी कधीच विसरणार नाही. मला आवर्जून सांगायचं आहे की, माझे आई-वडील माझे सर्वांत मोठे समर्थक आहेत आणि माझ्या जीवनातल्या महत्त्वपूर्ण निर्णयांच्या बाबतीत ते चुकीपेक्षा बरोबरच अधिक होते.

तुम्ही कधीच नाती गृहीत धरू नयेत, विशेषत: तुमच्या जवळच्या कुटुंबीयांबरोबरची नाती. तसं केलं तर त्याची फळं दीर्घकाळ टिकतात.

आता थोडा वेळ देऊन तुमची जनकौशल्यं, तुमच्या नात्यांचा दर्जा आणि त्यासाठी तुम्ही काय गुंतवणूक केलीत याचं मूल्यांकन करा. तुम्ही विश्वासार्ह आहात? तुमच्या सगळ्यात निकट असणाऱ्यांवर तुमचा विश्वास आहे? तुमच्या यशात गुंतवणूक करण्यास तयार असणारे लोक तुम्ही आकर्षित करीत आहात? त्यांना तुम्ही उचित सन्मान देत आहात? नात्यामध्ये तुम्ही त्याच प्रमाणात देत आहात ज्या प्रमाणात त्यातून काढून घेत आहात?

माझ्या कुटुंबीयांसमवेत मी मौजमजा करतो, हसतो त्या दर वेळी मला जाणीव होते की, अशा क्षणांसाठीच मी केवळ जगतो. मी आशा करतो की, कसंतरी मी त्यांना पटवून देऊ शकेन की ऑस्ट्रेलियन किनाऱ्यापेक्षा सॅन डिएगोचा किनारा अधिक चांगला आहे जेणेकरून ते नेहमीच माझ्याजवळ असतील. तुमच्या जिवलगांना तुम्ही शक्य तेवढं तुमच्याजवळ ठेवा, शक्य तेवढा काळ.

तुमच्या जीवनाच्या दर्जावर तुमच्या नात्यांच्या दर्जाचा पुष्कळ प्रभाव असतो, त्यामुळे त्यांचं मोल जपा. त्यांना गृहीत धरू नका. बायबल म्हणतं, 'एकापेक्षा दोन

चांगले, कारण त्यांना त्यांच्या कामाचा चांगला मोबदला मिळतो. एक जर का पडला तर दुसरा त्याला मदत करू शकतो. पण जो पडेल आणि त्याला मदत करणारं कोणीच नसेल तर त्याची कीव करा!'

दहा

समान-संधी तत्त्वाला कवटाळणारा

जो शुआ आणि रेबेका वायगेल हे लॉस एंजेलिसमध्ये पुरस्कारप्राप्त चित्रपट निर्माते प्रेरणादायी तसंच करमणूक करणारे चित्रपट निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असतात. त्यांचा माझा परिचय नव्हता पण माझी एक चित्रफीत पाहिल्यानंतर मला मुख्य भूमिकेत धरून एक काल्पनिक पटकथा तयार करण्याची त्यांना संधी मिळाली. ही पटकथा तयार करीत असताना विविध मार्गांनी माझ्याशी संपर्क साधण्याचा ती दोघं प्रयत्न करत होते, पण मी दौऱ्यावर असल्यामुळे आमचा संपर्क होत नव्हता. एका रविवारी वेस्टलोक व्हिलेजमधल्या चर्चमध्ये कायली नावाच्या त्यांच्या एका मित्राशी त्यांची गाठ पडली.

"सध्या तू काय करतोस?" त्यांनी कायलीला विचारलं.

"सध्या मी निक व्होयचिच यांचा मदतनीस आहे."

हे ऐकून स्वाभाविकच, जोशुआ आणि रेबेकाला धक्का बसला.

हे धक्कादायकच नव्हतं का? दोन समर्पित निर्माते अशा व्यक्तीवर पटकथा लिहीत होते जिला ते कधी भेटलेच नव्हते आणि नंतर त्या व्यक्तीचा शोध घेऊन तिच्याबरोबर चित्रपट तयार करण्याचा तिला प्रस्ताव देतात? हे जबरदस्तच आहे, नाही का? जणू स्वप्नपूर्तीच!

तुमची तयारी पक्की नव्हती म्हणून तुम्ही कधी एखादी उत्तम संधी गमावली आहे? दरवाजा उघडा असलेला न दिसल्यामुळे तुमच्याऐवजी दुसरं कोणीतरी तिथून सटकलेलं पाहून तुम्ही कधी निराश झाला आहात? त्या अनुभवांमधून शिका आणि कामाला लागा, दोस्तहो! वॉल्टर ख्रिस्लर, ख्रिस्लर कार कंपनीचा संस्थापक एकदा म्हणाला होता की, "बरेच लोक कुठंच पोहोचत नाहीत, कारण जेव्हा संधी त्यांचं दार ठोठावते तेव्हा ते परसदारी लवंग शोधत असतात.

आज मी असंख्य लोक पाहतो जे भविष्यात गुंतवणूक करण्याऐवजी लॉटरीची तिकिटं विकत घेतात. कष्टानं काम करून भविष्यात गुंतवणूक करा, स्वत:ला आपल्या ध्येयाला सर्मपित करा आणि झेपावण्यासाठी योग्य वाट पाहा."

तुम्हाला जर असं वाटत असेल की तुम्हाला बार टाकता येत नाही तर त्याचं कारण बहुधा तुम्ही बार भरलेला नसतो आणि तुम्ही चाप ओढण्याच्या तयारीतही नसता. स्वत:च्या यशाला तुम्हीच जबाबदार असता. सर्वोत्तम ते करण्यासाठी स्वत:ला तयार करून ती जबाबदारी उचला. तुम्ही योग्य ठिकाणी पोहोचाल तेव्हा संधी आपोआप येतील. तुमच्यावर जबाबदारी असेल किंवा तुम्ही मवाळ पक्षाचे नेते असाल तर तुम्हाला कोणी नृत्याचं आमंत्रण देईल, अशी अपेक्षा करू नका. स्वत:वर विश्वास ठेवा. (यापूर्वीच मी याचा उल्लेख

केलाय!) आपल्या आयुष्याच्या शक्यतांवर विश्वास ठेवा. या ग्रहावरच्या तुमच्या मूल्यावर विश्वास ठेवा. तुम्ही स्वत:च्या पंखांना पात्र समजत नसाल, तर तुम्ही कधीच जमीन सोडणार नाही.

घाम गाळा. हात मातीत माखू द्या. पुस्तकांचा फडशा पाडा. थॉमस एडिसन म्हणतो, संधी अनेकदा मुकल्या जातात, कारण त्या कामाच्या वेशात असतात आणि कामासारख्या दिसतात. जे पडेल ते करण्यासाठी तुम्ही तयार आहात?

मला कबूल करावं लागेल की वायगेल दाम्पत्यानं माझ्याशी पहिल्यांदा संपर्क साधला तेव्हा मी त्याकडे लक्ष दिलं नाही. बिचारा कायली माझ्यासाठी एवढा खूश झाला होता. तो त्याच्या चित्रपट निर्मात्या मित्राविषयी आणि माझ्यावरच्या त्यांच्या प्रकल्पाविषयी उत्साहात सांगायला लागला, "माझा एक मित्र आहे, तो तुझ्यावर चित्रपट काढणार... " एवढं बोलल्यावरच मी त्याचं बोलणं तोडलं.

"कायली मी एवढा व्यस्त आहे की तुझ्या मित्रांशी बोलायला मला वेळ नाहीये," मी तडकून बोललो.

मी पुष्कळ प्रवास केला होता आणि थकलेला होतो. त्यातून नुकताच एका चित्रपटाच्या प्रस्तावानं पोळला गेलो होतो. त्याची नुसती मोघम माहिती ऐकून एक महिना मी फार उत्साहात होतो. मग त्यांनी मला काही महिन्यांनी पटकथा पाठवली. त्यातून मला कळलं की, माझी भूमिका ही एका शिवराळ, तंबाखू चघळत राहणाऱ्या आणि दुसऱ्या माणसाच्या खांद्यावरल्या पोतडीत राहणाऱ्या एका माणसाची होती.

अशा प्रकारच्या भूमिकेनं मला माझ्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात किंवा शेवट करायचा नव्हता. मी नकार दिला. प्रत्येक संधी साधण्याच्या पात्रतेची नसते. तुमच्या दीर्घकालीन ध्येयांमध्ये तुमच्या मूल्यांना समाविष्ट करून तुम्ही त्यांच्याशी निष्ठावंत राहायला हवं. तुम्हाला कशा प्रकारचा ठसा उमटवायचाय? तुम्ही कसे स्मरणात राहायला तुम्हाला हवे आहात? मला माझ्या नातवंडांच्या हातात ती डीव्हीडी पडायला नकोय जिच्यात त्यांचे निक आजोबा सतत शिव्या घालत आहेत, त्यांच्या हनुवटीवरून तंबाखूची पिंक वाहते आहे आणि ते भणंगासारखे वावरत आहेत. या कारणांसाठीच मी त्या चित्रपट प्रस्तावाला नकार दिला.

चित्रपट निर्माण करण्याची कल्पना मला पसंत होती, पण माझ्या मूल्यांचा त्यासाठी बळी देऊन नव्हे. तुम्हालाही अशा तऱ्हेचा निर्णय घ्यावा लागेल. इच्छाशक्ती प्रबळ ठेवा. आपल्या तत्त्वांना चिकटून राहा आणि मी केली तशी चूक तुम्ही करू नका : मी ते पहिलं दार बंद केलं, त्याच्याबरोबर मी माझं मनही बंद केलं. म्हणूनच, कायलीनं जेव्हा वायगेल दाम्पत्याचा चित्रपटाचा प्रस्ताव माझ्यापुढे ठेवला तेव्हा मी जराही विचार न करता तो धुडकावून लावला. मला भविष्य दिसत नव्हतं, कारण मागची दृश्यं पाहण्याच्या आरशावर माझी दृष्टी होती. घोडचूक.

सुदैवानं वायगेल दाम्पत्य लगेच निराश झालं नाही. त्यांनी दुसऱ्या एका मित्राला माझ्या माध्यम संयोजकाला भेटायला सांगितलं. त्यानं त्यांची पटकथा वाचली, ती त्याला आवडली आणि ती तो माझ्याकडे घेऊन आला. ती वाचल्यानंतर मला जाणीव झाली की मी कायलीची माफी मागायला हवी. वायगेल दाम्पत्याची पटकथा आशेवर आणि पापमुक्तीवर आधारलेली होती, माझ्या हृदयातल्या विषयांवर.

आणि अशा चित्रपटाचा नायक माझ्यावाचून दुसरा कोण असू शकतो? विशेषत: जेव्हा त्यांच्या भूमिकेचं नावच होतं, 'विल, द लिम्बलेस मॅन'. चित्रपट सुरू होतो तेव्हा तो पिसाळलेला, नैराश्यानं ग्रासलेला, सर्कसमधल्या एका करमणुकीच्या कार्यक्रमाचा भाग असतो. पण मानवी दयाळूपणाच्या कृपेनं त्याला अधिक चांगल्या सर्कसमध्ये निमंत्रित केलं जातं जिथं तो थरारक खेळ करून प्रेक्षकांच्या गळ्यातला ताईत बनतो. मला जाणवलं की मी बुड हलवावं आणि कामाला लागावं. मी कायलीला धन्यवाद दिले आणि निर्मात्यांबरोबर भेट निश्चित करायला सांगितलं. मग सगळं गतीनं उलगडत गेलं. आम्ही भेटलो. एकमेकांशी जोडले गेलो. सही करण्याच्या जागेवर मी सही केली. अनेक अनुभवी कलाकारांनी या चित्रपटात भूमिका करण्याचं अगोदर कबूल केल्याचं ऐकून माझा उत्साह दुणावला.

या चित्रपटाचं अंदाजपत्रक आणि लांबीही मोठी नसल्यामुळे, माझी दृश्यं पुरी करण्यासाठी मला माझ्या वेळापत्रकातून केवळ आठवड्याचा कालावधी काढावा लागणार होता. या क्षेत्रात मला काही भविष्य आहे का हे पडताळून पाहण्यासाठी तुम्हाला चित्रपटाची परीक्षणं पाहावी लागतील. पण आशावादी चित्रपट तयार करणाऱ्या निर्मात्यांना प्रोत्साहित करण्यासाठी जो 'डोअरपोस्ट फिल्म प्रोजेक्ट' पुरस्कार असतो त्यात 'दि बटरफ्लाय सर्कस'ला एक लाख डॉलर्सचा पुरस्कार मिळाला. आमच्या या लघुपटाची (जो तुम्हाला http://www.thedoorpost.com इथं पाहायला मिळेल) निवड तशाच प्रकारच्या शंभर चित्रपटांमधून केली गेली होती. डोअरपोस्ट पुरस्कारामुळे त्या चित्रपटानं प्रचंड लक्ष वेधून घेतलं आणि आता वायगेल दाम्पत्य त्याचं पुऱ्या लांबीच्या चित्रपटात रूपांतर करण्याच्या विचारात आहे.

त्या प्रकल्पामध्येही मी झेपावण्याची शक्यता आहे. शेवटी फार थोडे कलाकार असू शकतील जे झेपावणाऱ्या, पोहणाऱ्या आणि अस्खलित ऑस्ट्रेलियन उच्चारात बोलणाऱ्या, हात-पाय नसलेल्या इसमाची भूमिका निभावू शकतील.

लाइट्स, कॅमेरा, अॅक्शन!

तुमच्या ध्येयांचा पाठपुरावा करण्यासाठी तुम्हाला कृती करायला हवी. मिळवा किंवा गमवा. चीत करा किंवा हरा. तुम्हाला हवं ते तुमच्याकडे नसेल तर तुम्हाला हवं ते निर्माण करण्याचा विचार करा. परमेश्वर तुम्हाला मार्ग दाखवील. जीवनभराची तुमची संधी, तुमच्या स्वप्नांचं प्रवेशद्वार उघडं आहे. तुमच्या उद्देशाकडे जाणारा मार्ग कोणत्याही क्षणी तुमच्यासमोर सादर

होईल. त्यासाठी तयार राहा. जे करावं लागणार असेल ते सारं करा. जे आवश्यक असेल ते सारं शिकून घ्या. कोणी तुमचं दार ठोठवायला येत नसेल तर तुम्ही स्वत: काही दरवाजे ओलांडा. एक दिवस तुम्ही तुमच्या मनातल्या जीवनात प्रवेश कराल.

स्वत:ला तिथं ठेवण्यास, त्या क्षणाला कवटाळण्यास उतावळे राहा. माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीला, माझी पाठदुखी सुरू होण्यापूर्वी, ज्याला मला मिठी मारायची आहे त्या सर्वांना मी ती देऊ करीत असे. आश्चर्य म्हणजे, मला मिठी मारायला, माझ्याशी दोन शब्द बोलायला लोक रांग लावायचे. मला आश्चर्य वाटायचं, कारण त्या रांगेतल्या प्रत्येक व्यक्तीकडे देण्यासारखं काहीना काही वेगळं असायचं, माझ्यासाठी उपहार ठरेल असं काहीतरी. संधींच्या बाबतीत तुम्हालाही असंच वाटायला हवं. जे सुरुवातीला सोनेरी भासत नसेल ते कदाचित तुमचा स्तर वाढल्यावर चमकू लागेल.

संधी निर्माण करा

तुम्ही मोठा उद्देश निर्माण केला असेल आणि तुमच्याकडे आशा, श्रद्धा, आत्मसन्मान, सकारात्मक दृष्टिकोन, धाडस, सहनशीलता, लवचीकता, उत्तम संबंध यांचा साठा असेल तरीही संधीची वाट पाहत नुसतं बसून राहणं भागणारं नसतं. मिळालेल्या प्रत्येक दोऱ्याचा वापर करून, तुम्ही चढू शकाल अशा सुंभाची बांधणी तुम्ही करायला हवी. काही वेळा तुम्हाला असा अनुभव येईल की, ज्या शिळेनं तुमच्या पुढ्यात पडून तुमची वाट रोखली होती तिनंच तुम्हाला अधिक उंचीवर जाण्यासाठी वाट तयार केलेली आहे. पण ती चढण चढून जाण्याचं धाडस आणि जिद्द तुमच्या अंगी असणं आवश्यक आहे.

'लाइफ विदाउट लिंब्स'च्या घोषवाक्यांपैकी एक आहे, 'दुसरा दिवस, दुसरी संधी.' आमचं घोषवाक्य केवळ भिंतीवर लावण्यासाठी नसून – दररोज ते जगण्याचा आमचा यत्न असतो. मानसोपचारतज्ज्ञ आणि नेतृत्व प्रशिक्षक असलेल्या डॉ. कारा बारकर यांनी हफिंग्टन पोस्टमधल्या ब्लॉगवर लिहिताना याचा वापर केला : "निक व्होयचिच यांनी दाखवून दिलंय की, या भूतलावरील जवळ-जवळ प्रत्येक व्यक्तीला ज्या परिस्थितीमध्ये अशक्य वाटेल अशा परिस्थितीत हृदय जागृत करणं, इतरांना प्रेरणा देणं शक्य असतं. व्होयचिच या वीराला संधी सापडते जिथं इतरांना मार्गाचा अंत दिसतो."

त्यांच्या शब्दांनी मी विनम्र होतो. मोठा होत असताना, कोणी माझा उल्लेख 'वीर' असा करेल किंवा मी कोणाला प्रेरणा देईन अशी कल्पना करणंही कठीण होतं. बाल्यावस्थेत मला जाणीव झाली की, माझ्याकडे जे नाही त्यावर रागावण्यानं किंवा मला जे करणं जमत नसेल त्यावरून चिडचिड करण्यानं लोक माझ्यापासून दूर जातात, पण इतरांची सेवा करण्याच्या संधी मी शोधू लागल्यावर ती माझ्याकडे आकर्षित होऊ लागली. वाट पाहत राहण्यापेक्षा पुढे सरकत राहणं आणि स्वत:ची संधी निर्माण करणं मी शिकलो, कारण एका

संधीतून सहसा दुसरी निर्माण होते. माझ्या प्रत्येक व्याख्यानात किंवा एखाद्या कार्यक्रमात किंवा जगाच्या एखाद्या नव्या भागाच्या भेटीत मला नवी माणसं भेटतात, नव्या संस्थांचा मला शोध लागतो, आणि मी नवी माहिती मिळवतो ज्यामुळे नव्या संधी माझ्यापुढे निर्माण होतात.

वेषांतर केलेल्या संधी

डॉ. बारकरनी योग्यच नमूद केलंय की, माझं लक्ष माझ्या शारीरिक आव्हानांवरून काढून घेऊन त्यांनी सादर केलेल्या वरदानांवर वेधलं तेव्हापासून माझ्या जीवनात आमूलाग्र असा चांगला बदल घडला. तुम्हीही तेच करू शकता. मी जर ओळखू शकलो की परमेश्वरानं मला बहाल केलेला देह अनेक तऱ्हांनी एक मौल्यवान उपहार आहे तर तुम्हीही तुमची वरदानं ओळखू शकाल की, जी वेषांतरात असतील. कदाचित त्यातच दडून राहिलेल्या तुमच्या एखाद्या गुणाला तुम्ही स्वत:ची कमजोरी समजत असाल.

हे सर्व दृष्टिकोनावर अवलंबून आहे. जीवनापासून लपून राहता येत नाही. तुम्ही मार खाल, पण कोमात जाण्याएवढा तुम्ही जोवर मार खात नाही तोवर तुम्ही निराश, दु:खी आणि संतप्त असाल : तिथं असायला हवा होतो, ते करायला हवं होतो. तरीही मी तुम्हाला नैराश्य आणि कटुता टाकण्याचा आग्रह करेन. तुम्ही लाटेखाली गाडले जाऊ शकाल किंवा तिच्यावर स्वार होऊन किनारा गाठू शकाल. त्याचप्रमाणे, तुमच्या जीवनातल्या आव्हानात्मक घटना तुम्हाला पायदळी तुडवू शकतात किंवा तुम्हाला डोक्यावर मिरवू शकतात. तुम्ही श्वास घेऊ शकत असाल तर त्याबद्दल मनात धन्यता बाळगा. त्या धन्यतेच्या बळावर मनातलं नैराश्य आणि कटुता झटकून टाका. प्रथम एक पाऊल टाका, मग दुसरं, गती मिळवा आणि तुमच्या आवडीचं जीवन निर्माण करा.

माझ्या शारीरिक पंगुत्वानं मला मुला-माणसांशी बोलण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी धारिष्ट्य गोळा करायला भाग पाडलं. आणि त्यामुळेच मी गणितातल्या माझ्या बलस्थानांवर लक्ष केंद्रित करू शकलो ज्यामुळे माझी व्याख्यानाची कारकीर्द यशस्वी झाली नसती तर मला गणितात ती साधता आली असती. मी बरेचदा असा विचार केलाय की, माझ्या अपंगत्वामुळे मी अनेकदा दु:खी झालो असलो तरी त्यांच्यामुळेच मला इतरांविषयी करुणा वाटते. त्याच न्यायानं, मी पाहिलेल्या अपयशांमुळे मला माझ्या यशांविषयी कौतुक वाटतं आणि जी माणसं झगडून अपयश पाहतात त्यांच्याविषयी मला सहानुभूती वाटते.

मूल्यमापन

सर्वच संधी एकसारख्या नसतात. या प्रकरणाच्या सुरुवातीला मी उल्लेख केलाय की ज्या चित्रपटाचा प्रस्ताव मी सुरुवातीला धुडकावला तो नंतर स्वीकारला. तुम्ही 'दि बटरफ्लाय

सर्कस' पहिलात तर तुम्हाला दिसेल की माझी भूमिका म्हणजेच बिलची भूमिका, सुरुवातीला प्रेरणादायी नसते. उलट, त्याच्या मनातल्या नैराश्यामुळे आणि कटुतेमुळे सुरुवातीला तो नकोसा असाच असतो. तरीही मी ही भूमिका स्वीकारली कारण बिल स्थित्यंतर करतो आणि त्याच्या दु:खावर आणि तिरस्कारावर मात करतो. सुरुवातीला बोचरा असणारा किडा जसा कालांतरानं देखण्या फुलपाखरात रूपांतरित होतो, त्याचप्रमाणं बिल हळूहळू त्याची साशंकता आणि अविश्वास टाकून देतो आणि अखेरीस एक पापमुक्त, प्रेमळ आणि प्रेरणादायी मनुष्य बनतो.

या ग्रहावरची माझी ओळख मला अशी हवी आहे. तुम्ही कसे ओळखले जायला हवे आहात? सुरुवातीच्या प्रकरणांमध्ये आपण पाहिलं की जीवनाला उद्देश असणं कसं महत्त्वाचं असतं. जेव्हा तुमच्या दिशेनं प्रस्ताव आणि संधी येतात किंवा तुम्ही स्वत:साठी त्या निर्माण करता तेव्हा तुम्ही स्वत:ला विचारलं पाहिजे, 'हे माझ्या उद्दिष्टाशी आणि माझ्या मूल्यांशी जुळणारं आहे?'

तुम्हाला तुमच्या स्वप्नांच्या आणखी एक पाऊल जवळ नेणारं काहीही चांगल्या संधीच्या पात्रतेस का उतरतं? त्यांचे अन्य काही प्रकार अर्थातच आहेत. तुमच्या मित्रांनी तुम्हाला काल रात्री मौजमजा करून कालापव्यय करायला नेलंही असेल. किंवा तुमच्या कामाची पूर्वतयारी करण्याऐवजी किंवा तुमचं ज्ञान वाढवणारं पुस्तक वाचण्याऐवजी तुम्ही व्हिडिओ गेमही खेळले असाल. तुम्ही निवडलेले पर्याय तुम्ही जगाल त्या जीवनाचा दर्जा ठरवतात.

विचारी असा. तुम्ही तुमचा वेळ आणि ऊर्जा कशी खर्च करता याचं मूल्यमापन करण्यासाठी उच्च दर्जाची मूल्यमापन पद्धती आणि कडक निकष विकसित करा. तुमचे पर्याय निवडण्याचा आधार त्या क्षणी तुम्हाला काय चांगलं वाटेल हा नसावा, तर तुमची अंतिम ध्येय गाठण्यामध्ये जे उपयुक्त असेल ते निवडण्याचा असावा. तुमची मूल्यं आणि तत्त्वं यांच्या निकषांवर त्यांचं मूल्यमापन करा. त्यासाठी मी निक आजोबांचा नियम वापरतो : माझ्या नातवंडांना या निर्णयाचा अभिमान वाटेल का? का त्यांना वाटेल की त्यांचा आजोबा अकाली वृद्ध झाला होता?

संधीचं आकलन करण्याची शिस्तशीर आणि औपचारिक प्रक्रिया तुम्हाला तयार करायची असेल तर कागद-पेन किंवा कॉम्प्युटर वापरून तुम्ही आकलन तक्ता तयार करा. तुमच्या समोर येणाऱ्या प्रत्येक संधीचे फायदे-तोटे लिहून काढा आणि तुमच्या जीवनासाठी तुम्ही निवडलेल्या मूल्यांच्या, तत्त्वांच्या आणि ध्येयांच्या तुलनेत त्यांचं मूल्यमापन करा. त्यानंतर, तुम्ही दरवाजा ओलांडल्यावर काय घडेल किंवा ते मिटून घेतल्यानं काय घडेल याची कल्पना करा.

एवढं करूनही तुम्हाला निर्णय घेणं कठीण जात असेल तर तुमचा तक्ता तुम्ही तुमच्या आधारस्तंभाला किंवा मित्राला दाखवा, ज्याचा तुमच्यावर विश्वास असेल आणि तुम्ही

यशस्वी झालेलं ज्याला पाहायचं असेल. त्यांच्याबरोबर त्याच्या फायदा-तोट्यांवर चर्चा करा आणि त्यांचं मूल्यांकन ऐकून घ्या. तुम्ही तुमचं मन मोकळं ठेवा, पण लक्षात ठेवा की सारी जबाबदारी तुमची आहे. ते तुमचं जीवन आहे. तुमच्या निर्णयाची फळं तुम्ही चाखाल किंवा त्याची किंमतही तुम्हीच मोजाल. त्यामुळे पर्याय सावधपणे, शहाणपणानं निवडा.

तुम्ही तयार आहात?

हे मूल्यमापन करताना वेळ हा महत्त्वाचा मुद्दा असतो. कधी-कधी, विशेषत: तुम्ही तरुण असताना आकर्षक प्रस्ताव तुमच्यापुढे येतात, पण वेळ कदाचित चुकीची असते. तुम्ही पात्र नसाल किंवा तुमची तयारी नसेल तर त्या प्रकारचा प्रस्ताव तुम्हाला नाकारावा लागेल, उदाहरणार्थ परवडणार नसणाऱ्या सफरीवर तुम्ही जाणार नाही. तिची किंमत फार मोठी असते. तिच्यातून सावरायला तुम्हाला पुष्कळ वेळ लागेल.

माझ्या व्याख्यानाच्या कारकिर्दीत सुरुवातीला मी केलेल्या घोडचुकांपैकी एक होती ती म्हणजे माझी तयारी नसताना एका मोठ्या श्रोतृवृंदासमोर बोलण्याचं निमंत्रण मी स्वीकारलं. असं नव्हतं की माझ्याजवळ बोलण्यासारखं काही नव्हतं, पण मी माझी तयारी नीट केली नव्हती. परिणामी, तरून जाण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास माझ्याकडे नव्हता.

त्या व्याख्यानात मी अडखळत, चाचपडत राहिलो. लोकांनी मला सहानुभूती दाखवली, पण मी खेळखंडोबा केला होता. अर्थात, मी अनुभवातून शिकलो, स्वत:ला सावरलं, आणि मला जाणीव झाली की मी तेच क्षण पकडावेत जे हाताळण्याची माझी तयारी असेल. याचा अर्थ असाही नव्हे की तुम्ही असा प्रस्ताव किंवा पर्याय निवडू नये ज्यामुळे तुम्ही स्वत:ला ताणून वृद्धिंगत व्हाल. कधी-कधी आपण आपल्या कल्पनेहून अधिक तयार असतो, म्हणून परमेश्वर आपल्याला हलका धक्का देतो ज्यामुळे आपण उत्तमरीत्या वेळ मारून नेऊ शकतो आणि आपल्या स्वप्नाप्रत मोठी झेप घेतो. 'अमेरिकन आयडॉल' हा टीव्ही शो त्याच कल्पनेवर आधारलेला आहे. प्रत्येक भागात अनेक स्पर्धक दबावाला बळी पडतात किंवा त्यांना जाणीव होते की ते अजून पुरेसे तयार नाहीयेत. पण अधूनमधून त्याच दबावाखाली आपल्याला कोणाचीतरी चमकदार कामगिरी बहरताना दिसते. काही जणांनी, उदाहणार्थ कॅरी अन्डरवूड, जेनिफर हडसन, ख्रिस डॉहर्टी आणि केली क्लार्कसन यांनी उत्तम कारकीर्द घडवली, कारण त्यांनी कष्ट केले, ते वाढले आणि मोठे होत गेले.

तुम्ही तुमचे पर्याय तोलून पाहायला पाहिजेत आणि काळजीपूर्वक विचार करायला पाहिजे की, कोणता पर्याय तुम्हाला तुमच्या ध्येयाप्रत घेऊन जाईल आणि कोणता तुमच्या पदरात अपयशाचं दान घालेल. मी आणि मला लाभलेल्या चित्रपटाच्या पहिल्या प्रस्तावाप्रमाणे तुम्हालाही काही संधी लाभतील ज्या तुम्हाला अल्पकालीन फायदा देतील, पण त्या तुमच्या दीर्घकालीन उद्दिष्टाशी जुळणाऱ्या नसतील. तुमचे आजचे निर्णय उद्या

तुमच्या मागून येतील. बरेचदा तरुण मंडळी प्रेमात पडतात, पण हा विचार करीत नाहीत की समोरची व्यक्ती दीर्घकाळासाठी त्यांना अनुरूप आहे की नाही. आपल्याला बरेचदा सूचित केलं जातं की इंटरनेटवर असताना सुरक्षितता केवढी महत्त्वाची आहे, मग ती आपली आर्थिक बाब असेल, आपलं सामाजिक स्थान असेल किंवा आपलं खासगी जीवन असेल. आपल्याला सावध केलं जातं आणि तुम्ही गृहीत धरलं पाहिजे की, तुम्ही कराल ती प्रत्येक कृती – तुम्ही असलेला प्रत्येक फोटो, तुम्ही पाठवाल ती प्रत्येक ई-मेल, तुम्ही लिहाल तो प्रत्येक ब्लॉग, तुमच्या वेबपेजवरचं तुमचं प्रत्येक मत – कधीना कधी सर्च इंजिनवर दिसेल आणि ती या भूतलावर बहुधा तुमच्याहून अधिक काळ टिकून राहील. तुम्ही ऑनलाइन टाकाल ते अविचारानं कराल तर तुमच्यामागं त्याचा ससेमिरा लागू शकतो हा विचार तुम्ही जसा करायला हवा, त्याचप्रमाणे आपल्यापुढे उभ्या राहणाऱ्या संधींचं मूल्यांकन करतानाही तेच तत्त्व लागू पडतं हे ध्यानात ठेवा. त्यांचे परिणाम दीर्घकालीन असतात – जे तुम्हाला मदत करू शकतात किंवा तुम्हाला दुखवू शकतात. अल्पकालीन फायदे आकर्षक भासू शकतात, पण त्यांचे दीर्घकालीन पडसाद कसे असतील?

एक पाऊल मागं टाका आणि संपूर्ण चित्रावर नजर फिरवा. लक्षात ठेवा की बरेचदा तुमची परीक्षा पाहिली जाते. पण प्रत्यक्ष जीवन ही परीक्षा नसते, ते खरंखुरं असतं, तिथं रोकडा व्यवहार असतो. तुम्ही दररोज घेता त्या निर्णयांचा प्रभाव तुमच्या संपूर्ण जीवनाच्या दर्जावर पडतो. काळजीपूर्वक मूल्यांकन करा, मग तुमच्या बुद्धीचा आणि मनाचा कल तपासा. तुमची बुद्धी एखाद्या बाबतीत साशंक असेल तर तिचं ऐका, पण तुमचं मन जर सांगत असेल की तुम्ही संधीवर झेप घालावी – आणि ती तुमच्या मूल्यांना आणि दीर्घकालीन ध्येयांना अनुरूप असेल – तर जरूर झेप घाला! अजूनही असे प्रसंग माझ्या जीवनात येतात की आलेली संधी पाहून मी उत्तेजित होतो आणि मला झेपावसं वाटतं. पण मग मी दीर्घ श्वास घेतो आणि केवळ बुद्धीचा वापर करून योग्य निर्णय घेण्याचा प्रयत्न करतो.

योग्य स्थान

तुम्ही तुमच्या क्षमतेनुसार परिपूर्ण तयारी केलेली असेल आणि तरीही तुमच्यासाठी दार उघडलं जात नसेल तर तुम्ही स्वत:चं आणि तुमच्या कौशल्यांचं स्थान बदलायला हवं. तुम्हाला जर वर्ल्ड चॅम्पियन सर्फर व्हायचं असेल तर अलास्का तुम्हाला उंच, मोठ्या लाटा देणार नाही, बरोबर? कधी-कधी संधी साधण्यासाठी तुम्हाला हलावं लागतं. काही वर्षांपूर्वी मला जाणीव झाली की, माझ्या व्याख्यानाच्या कारकिर्दीसाठी मला माझा श्रोतृवर्ग जागतिक पातळीवर विकसित करायचा असेल, तर मला ऑस्ट्रेलिया सोडून अमेरिकेत जायला हवं. ऑस्ट्रेलियावर माझं प्रेम आहे. माझे बहुसंख्य नातलग तिकडेच आहेत. परंतु अमेरिकेच्या तुलनेत तिथं दक्षिणेत संधी दुर्मीळ होत्या आणि पर्यायही थोडे.

अमेरिकेत आल्यानंतरही, संधी मिळवण्यासाठी मला झटावंच लागलं. त्या संदर्भात मी एक सर्वोत्कृष्ट कृती केली ती म्हणजे माझ्यासारखंच बोलण्याचं आणि इतरांना प्रेरणा देण्याचं वेड असलेल्या लोकांबरोबर मी जाळं तयार केलं. संशोधनानं सिद्ध केलंय की नोकरभरतीविषयी तरुणांना माहिती मिळते ती त्यांच्या मित्रांकडून किंवा सहकर्मचाऱ्यांच्या जाळ्याकडून. तुम्ही प्रेमाच्या शोधात असाल किंवा नोकरीच्या, गुंतवणुकीच्या, सेवा करण्याच्या, स्वत:चं कौशल्य दाखवण्यासाठी व्यासपीठाच्या किंवा कशाच्याही म्हणा, तर तुम्ही स्थानिक क्लब, व्यावसायिक गट, चेंबर ऑफ कॉमर्स, चर्च, संस्था इत्यादींशी जोडले जाऊन स्वत:साठी स्वत:च संधी निर्माण करू शकता. ट्विटर, फेसबुक, लिंक्डइन आणि प्लॅक्सोसारख्या सोशल नेटवर्किंग साइट्सनी जाळं निर्माण करणं खूपच सोपं केलंय. तुमच्या वर्तुळाचा परीघ जेवढा मोठा तेवढी तुमच्या स्वप्नासाठी दार उघडलं जाण्याची शक्यता मोठी.

तुम्ही स्वत:ला केवळ तुमच्या रुचीच्या क्षेत्रातल्या लोकांची, संस्थांची आणि वेबसाइट्सची मर्यादा घालून घेऊ नका. प्रत्येक जण कोणालातरी ओळखतो जो आणखी कोणाला तरी ओळखतो. त्यामुळे अशी कोणीही व्यक्ती शोधा जी स्वत:च्या स्वप्नाला समर्पित आहे, मग तिचं क्षेत्र तुमच्या क्षेत्राहून अगदी भिन्न असलं तरी चालेल. मला झपाटलेले लोक आवडतात, कारण ते संधींना चुंबकासारखे आकर्षित करतात.

उलटपक्षी, तुम्ही जर अशा समूहात असाल ज्यांना तुमच्या स्वप्नांशी देणंघेणं नाहीये किंवा तुमचं जीवन उंचावण्याच्या तुमच्या बांधिलकीमध्ये ज्यांना रुची नाहीये, तर माझा तुम्हाला सल्ला असेल की तुम्ही तो समूह सोडावा आणि दुसऱ्याचा शोध सुरू करावा. बार, नाइट क्लब्ज आणि व्हिडिओ आर्केड्समध्ये जीवन व्यतीत करणारे क्वचितच मोठे होतात.

तुमच्या मनातल्या संधी आणि पर्याय जर तुमच्याकडे चालून येत नसतील तर कदाचित तुम्हाला उच्च शिक्षणाच्या माध्यमातून वरची पातळी गाठणं आवश्यक असेल. एखाद्या कॉलेजमध्ये अथवा युनिव्हर्सिटीत तुम्हाला प्रवेश मिळत नसेल तर तो मिळेल त्या संस्थेतून शिक्षण घेत, प्रगती साधून हव्या त्या कॉलेजमध्ये अथवा युनिव्हर्सिटीत जाण्याच्या प्रयत्नाला लागा. तुम्हाला कल्पना नसते एवढ्या शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक अर्थसाहाय्य उपलब्ध असतं. त्यामुळे शैक्षणिक खर्चाची चिंता करू नका. तुमच्याकडे मुळातच डिग्री असेल आणि तुम्हाला पोस्ट ग्रॅज्युएशन करायचं असेल किंवा तुमच्या क्षेत्रातल्या संस्थेत प्रवेश मिळवायचा असेल, किंवा विविध माध्यमांमधून तुमच्या क्षेत्रातल्या लोकांशी तुम्हाला जोडलं जायचं असेल, आणि असं करताना जर तुम्हाला संधी लाभत नसेल तर तुम्ही अशा ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करा जिथं त्यांना तुम्ही किंवा तुम्हाला ती सापडेल.

उचित वेळ

अल्बर्ट आइनस्टाईन यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक अडचणीच्या मधोमध एक संधी असते. गेल्या मंदीमध्ये लक्षावधी लोकांनी नोकऱ्या गमावल्या, अन्य असंख्य लोकांनी आपापली घरं आणि बचती गमावल्या. अशा कठीण समयातून कोणती चांगली निष्पत्ती होऊ शकते?

मोठ्या, प्रथितयश कंपन्यांपैकी ज्या मंदीत सुरू झाल्या त्यांच्यापैकी काही आहेत ह्युलेट पॅकार्ड, रिग्ली, यूपीएस, मायक्रोसॉफ्ट, सीमॅन्टेक, टॉय्ज 'आर' अस, झिप्पो आणि डॉमिनोज पिझ्झा. या कंपन्यांचे संस्थापक ग्राहकसेवा देण्याचे नवे मार्ग शोधत होते, कारण मंदीमध्ये जुने मार्ग विफल ठरले. व्यवसाय करण्याची स्वत:ची दृष्टी निर्माण करण्याची संधी त्यांनी साधली.

२००६-२००९च्या मंदीनं अनेकानेक कुटुंबांवर आणि व्यवसायांवर नि:संशयपणे मोठा आणि टिकून राहणारा प्रभाव टाकला. पण नोकरीवरून कमी करण्यात आलेल्या असंख्य लोकांनी स्वत:चे व्यवसाय थाटले किंवा पुन्हा शिक्षण सुरू केलं किंवा आपल्या जीवनाच्या स्वप्नाचा पाठपुरावा सुरू केला, जसं की बेकरी थाटणं किंवा पुस्तक लिहायला घेणं, किंवा संगीतकलेची कास धरणं.

या मंदीत भरडले गेलेल्यांमध्ये हजारो पत्रकार होते. या मंदीनं त्यांच्या क्षेत्राला सर्वाधिक फटका दिला, कारण असंख्य व्यवसायांनी जाहिरातीसाठी आपल्या मोहरा त्यांच्याकडून क्रेग्सलिस्टसारख्या ऑनलाइन सेवांकडे वळवला. पूर्वीचे पत्रकार, ज्यांना आपल्या हिकमतीचा आणि सर्जनशीलतेचा अभिमान असतो, त्यांनी या धक्क्यातून स्वत:ला कसं सावरलं ते पाहणं मोठं रंजक आणि प्रेरणादायी आहे. मला परिचित असलेल्या काहींनी आपापल्या नव्या कारकिर्दी पब्लिक रिलेशन्स, नॉनप्रॉफिट व्हेंचर्स, वेब बेस्ड मीडिया आणि ब्लॉग्ज् आदी क्षेत्रांमध्ये सुरू केल्या. त्यापैकी मला आवडलेलं एक उदाहरण म्हणजे बंद होण्याच्या मार्गावर आलेल्या एका वर्तमानपत्राच्या संपादकानं 'आजारी' व्यवसायांच्या मालकांसाठी, त्यांचे व्यवसाय सावरण्यासाठी सल्ले देणाऱ्या केंद्राचं उपाध्यक्षपद स्वीकारलं. याला म्हणतात लिंबू देऊन सरबत बनवण्याचं तत्त्वज्ञान, जे दुसरंतिसरं काही नसून समस्येवर अश्रू ढाळत राहण्याऐवजी त्यावर उपाय शोधण्यावर लक्ष केंद्रित करणं होय. नकारात्मक परिस्थितीला सकारात्मक परिस्थितीत रूपांतरित करण्यासाठी तुम्ही लवचीक आणि निश्चयी असायला हवं. अमेरिकेतली एक मोठी रिटेल चेन आपल्या कर्मचाऱ्यांना शिकवते की ग्राहकांच्या तक्रारींकडे त्यांनी त्यांच्याशी संबंध सुधारण्यासाठी निमंत्रणं म्हणून पाहावं.

हे सारं चौकट बदलण्याशी निगडित आहे. माझं वेळापत्रक जेव्हा ढासळतं तेव्हा मी ते करतो. मी स्वत:ला स्मरण करून देतो, 'परमेश्वर त्याचा वेळ व्यर्थ घालवत नाही, याचाच अर्थ तो माझाही वेळ व्यर्थ घालवत नाही.' दुसऱ्या शब्दांमध्ये, जे होतं ते भल्यासाठी. माझा

त्यावर पुरा भरवसा आहे आणि तुम्हीही तो ठेवावा. तुम्हाला ते तत्त्वज्ञान पटलं, तर निश्चिंत व्हा. ते सिद्ध होताना मी पुन:पुन्हा अनुभवलंय.

घड्याळ्याच्या काट्यावर

काही वर्षांपूर्वीची एका विमानप्रवासातली घटना. एका विमानतळावर आमची फ्लाइट खोळंबली (त्यात काही विशेष नाही) आणि शेवटी आम्ही विमानात स्थानापन्न होऊन विमान धावायला लागलं, तेव्हा मला खिडकीतून दिसलं की इंजीनमधून धूर निघत होता. पटकन आगीचा बंब आला, आग विझवली गेली आणि आम्हा प्रवाशांना सांगण्यात आलं की त्या छोट्याशा आगीमुळे आम्हाला तातडीनं विमानातून उतरावं लागेल.

ठीक आहे, मी विचार केला. इंजिनामध्ये आग ही चांगली गोष्ट नव्हती. पण ती लागलेली असताना आम्ही हवेतल्याऐवजी जमिनीवर होतो ही जमेची बाजू होती. आमची फ्लाइट आणखी दोन तासांनी उशिरा निघेल अशी घोषणा झाल्यावर बऱ्याच प्रवाशांनी मोठ्यानं आणि कटुतेनं आपली नाराजी व्यक्त केली.

मीही वैतागलो होतो, पण दुर्घटना हवेत न घडता जमिनीवर घडली होती, ही माझ्यासाठी समाधानाची बाब असल्यामुळे मी शांत होतो.

अर्थात, माझं वेळापत्रक व्यस्त असल्यामुळे शांत राहणं माझ्यासाठीही कठीण जात होतं. लक्षात ठेवा, 'परमेश्वर वेळ व्यर्थ घालवीत नाही,' मी स्वत:ला आठवण करून दिली. थोड्याच वेळात आणखी एक घोषणा झाली : आमच्यासाठी दुसऱ्या गेटवर दुसरं विमान तयार होतं. चांगली बातमी!

आम्ही दुसऱ्या गेटवरच्या दुसऱ्या विमानात बसलो. थोड्या वेळानं मला जाणवलं की माझ्या शेजारची महिला मुसमुसत होती.

मी तिला विचारलं.

तिनं मला सांगितलं की, तिच्या पंधरा वर्षांच्या मुलीची शस्त्रक्रिया चुकली होती, तिचा जीव धोक्यात होता, आणि ती तिलाच भेटायला चालली होती. त्या माउलीला दिलासा देण्याचा मी प्रयत्न करू लागलो. फ्लाइटभर आम्ही बोलत होतो. एका छोट्या विनोदावर ती हसलीदेखील. तिला विमानप्रवासाची भीती वाटायची.

"तुम्ही माझा हात धरा हवं तर," मी तिला सांगितलं.

आम्ही मुक्कामी उतरलो तेव्हा मी तिला धीर देत राहिल्याबद्दल तिनं माझे आभार मानले. त्यावर मी तिला सांगितलं की, फ्लाइटच्या एवढ्या व्यापानंतर मला तिच्याशेजारी बसायला मिळाल्याबद्दल मला धन्यता वाटली होती.

परमेश्वरानं त्या दिवशी माझा वेळ व्यर्थ घालवला नव्हता. तो काय करीत होता याची त्याला कल्पना होती. त्या महिलेला तिच्या भीतीत आणि तिच्या दु:खात मी दिलासा द्यावा

म्हणून त्यानं मला तिच्याशेजारी बसवलं होतं. त्या दिवसाबद्दल मी जेवढा विचार करतो, तेवढा मी धन्य समजतो की त्या दिवशी तिचं ऐकणारे कान माझे होते.

सर्जनशील दृष्टी

आपल्या माणसाचं निधन, प्रेमभंग, आर्थिक फटका किंवा आजारपण यातून येणाऱ्या दु:खाला आणि नैराश्याला तुम्ही तुमच्यावर कुरघोडी करू दिलीत तर तुम्ही मोडून पडू शकता. अशा आव्हानांना समर्थपणे तोंड देण्याचा एक मार्ग म्हणजे, जीवन तुम्हाला मागं खेचतंय असं भासत असलं तरी कोणत्या बाबतीत तुम्ही पुढं जात आहात याविषयी जागरूक राहणं.

'दि बटरफ्लाय सर्कस'च्या सेटवर मी ग्लेनिस सिव्हर्सन या फोटोग्राफरला भेटलो. ती ओरलांडोमध्ये राहत असली तरी तिचे मित्र आणि दिग्दर्शक असलेल्या वायगेल दाम्पत्याच्या आमंत्रणावरून ती सेट फोटोग्राफर म्हणून तिथं आली होती. ग्लेनिस पुरस्कारविजेती फोटोग्राफर आहे आणि तिचे फोटो मासिकं, कंपन्या, वर्तमानपत्रं आणि वेबसाइट्सवर प्रसिद्ध होतात. ती नेचर आणि पोर्ट्रेट फोटोग्राफीही करते. फोटोग्राफीवर तिचं प्रेम आहे. ते तिचं वेड आहे. पण वीस वर्षांहून अधिक काळ ती विविध कंपन्यांमधून मनुष्यबळ विकास क्षेत्रात काम करीत होती. मंदीत तिची सुरक्षित नोकरी गेली. त्या आपत्तीचं रूपांतर संधीमध्ये करून तिनं गळ्यात कॅमेरा अडकवला. आता ती पूर्णवेळ फोटोग्राफर आहे.

"मी ठरवलं की, ते आत्ता जमेल नाहीतर कधीच नाही," ती म्हणाली.

उत्तम कथा, नाही का? ग्लेनिस हे अशा व्यक्तीचं जिवंत उदाहरण आहे, जिनं नकारात्मक घटनेचा वापर अधिक चांगलं जीवन देणाऱ्या संधीची निर्मिती करण्यात केला.

जबरदस्त! छानच!

पण थांबा, त्यात आणखीही आहे. पुरस्कार विजेती फोटोग्राफर ग्लेनिस, तिला फारसं दिसत नाही. कायद्यानं ती आंधळी आहे...

"बालपणापासूनच माझी दृष्टी अधू होती," ती म्हणाली, "वयाच्या पाचव्या वर्षी मला चश्मा लागला आणि वयोपरत्वे माझी दृष्टी अंधूकच होत गेली. मग १९९५मध्ये माझ्या डोळ्याच्या पडद्याच्या रोगाचं निदान झालं. त्यात पडद्याचा आकार बिघडतो आणि तो मृत होऊ लागतो. कालांतरानं मला डाव्या डोळ्यानं दिसेनासं झालं मला एकदम जवळचंच दिसत असल्यामुळे लासिक सर्जरी होण्यासारखी नव्हती. त्यामुळं एकच पर्याय होता, तो म्हणजे पडदा बदलणं."

२००४मध्ये तिची सर्जरी झाली. डॉक्टरनी तिला सांगितलं होतं की, तिच्या डाव्या डोळ्याची दृष्टी चश्म्याशिवाय २०/४० ने सुधारेल. "पण सर्जरीमध्ये जे-जे बिघडायला हवं होतं ते बिघडलंच, सुदैवानं माझा डोळा बचावला," ती म्हणाली, "सर्जरीनं माझी दृष्टी

बिघडली होती, त्यात माझ्या उजव्या डोळ्याच्या पडद्याला हॅम्रेज झालं. त्यामुळे त्या डोळ्यावर एक काळा डाग आहे.''

दोन्ही डोळे अधू झालेले, त्यात वीस वर्षांपासूनची नोकरी गेलेली. या अवस्थेत ग्लेनिसनं निराशेनं हात-पाय गाळले असते तर तिला कोणी दोष दिला नसता. ती रागीट आणि कटू होणं तुम्ही अपेक्षिलं असतं.

उलट, त्यातून ती झेपावली आणि आणखी वरच्या पातळीवर गेली आणि त्याबद्दल तिच्या मनात धन्यता आहे. ''मी स्वत:ला अक्षम समजत नाही. मी स्वत:ला सक्षम समजते, कारण जवळ-जवळ आंधळेपण असल्यानं मी अधिक चांगली फोटोग्राफर झालेय,'' ती म्हणाली.

आता तिला सूक्ष्म बारकावे दिसत नाहीत, पण त्यामुळे कमीपणा वाटण्याऐवजी तिला धन्यता वाटते की छोट्या गोष्टींचा कीस पाडण्यापासून ती मुक्त राहू शकते.

''माझी बहुतांश दृष्टी गमावण्यापूर्वी, मी पोर्टेट फोटोग्राफीमध्ये असताना व्यक्तीच्या देहाच्या प्रत्येक कोनावर, तिच्या प्रत्येक केसावर माझं लक्ष असायचं. माझं लक्ष चित्राच्या पूर्ण चौकटभर असल्यामुळे ते घट्ट वाटायचं. पण आता माझा रोख मनमोकळा असतो. मला काही जाणवतं, मी ते पाहते आणि क्लिक करते. माझं काम बहुतांशी सहजप्रवृत्त असतं आणि माझा जास्त संबंध लोकांशी आणि सभोवतालशी असतो.

१) ग्लेनिस म्हणते की, तिचे फोटो सदोष असतात, पण अधिक कलात्मक, लक्षवेधी! ''एका मुलीनं जेव्हा मी काढलेले तिचे फोटो पाहिले तेव्हा ती अक्षरश: रडली. म्हणाली, मी तिचे फोटो योग्य प्रकारे काढले होते,'' ती म्हणाली, ''आणि त्यापूर्वी कधी मी कोणाच्या भावनांना हात घातला नव्हता.''

२) तिच्या पोर्टेट आणि लॅन्डस्केप फोटोग्राफीसाठी तिला दहा आंतराष्ट्रीय पुरस्कार मिळालेत. तिच्या एका फोटोची निवड तर केवळ एकशे अकरा फोटोंसाठीच्या सोळा हजार प्रवेशिकांमधून झाली होती. फोर्ट कॉलिन्स, कोलोराडोमधल्या 'सेंटर फॉर फाइन आर्ट फोटोग्राफी'मधल्या चार प्रदर्शनांसाठी तिच्या फोटोंची निवड झाली होती.

तिच्या अंधत्वामुळे ग्लेनिसला तिची मनुष्यबळ विकास क्षेत्रातली नोकरी राखता आली नसती, पण मोनेट आणि बिथोवेनसारखे अनेक कलाकार त्यांच्या अक्षमतांवर मात करून फुलले, कारण त्यांनी त्यांचा वापर आपली कला वेगळ्या मार्गानं सादर करण्याच्या संधीमध्ये रूपांतरित करण्यासाठी केला. धन्यतेचा भाव मनी धारण केलेल्या ग्लेनिसनं मला सांगितलं की, आता बायबलमधली तिची आवडती उक्ती होती, 'आपण श्रद्धेवर जगतो, दृष्टीवर नव्हे.'

''आता ते शब्दश: माझं जीवन आहे. अर्थातच, मला बदल करावे लागले, तडजोडी कराव्या लागल्या. मला चिंता आहे ती पूर्ण अंधत्वाची. ते फार म्हणजे फारच भयावह वाटतं. याच्यावर कोणतंही माहितीपुस्तक नसतं.''

ती आता जीवनातल्या नव्या पथावर आहे, पण त्याला आयुष्यातलं विघ्न समजण्याऐवजी ती त्याला उपहार समजते. "पूर्वी मी खूप नियंत्रित आयुष्य जगायचे. पण आता मात्र मी आयुष्य दिवसागणीक जगण्याचा आणि प्रत्येक क्षणाचा आनंद लुटण्याचा प्रयत्न करते," ती म्हणाली, "तसंच, माझ्या डोक्यावर छत असल्याबद्दल, मी जिवंत असल्याबद्दल आणि सूर्य तळपत असल्याबद्दल मला धन्यता वाटते आणि मी उद्याची चिंता करीत नाही, कारण आपल्याला कल्पनाच नसते की उद्याचा दिवस आपल्यासाठी काय घेऊन येईल."

ग्लेनिस एक महान स्त्री आहे जी संधीला बिलगते, बरोबर आहे की नाही? ती मला प्रेरणा देते आणि मी आशा करतो की आपापल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी वेगळे मार्ग शोधण्यासाठी, सुज्ञपणे त्यांची निवड करण्यासाठी, आणि तदनंतर त्यावर कृती करण्यासाठी ती तुम्हालाही प्रेरित करेल.

अकरा

मजेशीर नियमावली

इं डोनेशियाच्या पाच शहरांचा दौरा, जिथं मी दिवसांत पस्तीस भाषणं ठोकणार होतो तो अर्धा पुरा झाला होता. म्हणजे मी अत्यंत थकलेला असायला हवा होतो. अशा अतिव्यस्त कार्यक्रमात कधी-कधी मी अतिउत्साही होतो आणि मला स्वस्थ राहता येत नाही. आम्ही जावाला जायला निघालो होतो आणि जकार्ताहून सेमारांगला जाणाऱ्या विमानात चढताना माझ्या अंगात बळ आलं.

माझ्याबरोबर प्रवास करणाऱ्या पाच लोकांपैकी एक होता माझा मदतनीस वॉन, जो आकारानं शक्तिशाली आणि आनंदी जीव होता. विमानातल्या हवाईसुंदरी त्याच्यावर फिदा झाल्याचं स्पष्टच दिसत होतं आणि त्यावरून आमच्यात चेष्टामस्करी चालू होती. त्यांनी आम्हाला प्रथम विमानात प्रवेश दिला, कारण मला विमानात शिरल्यावर व्हीलचेअरवरून उतरून चालत सीटवर जायचं होतं. तसा मी सीटवर जात असताना, अनेक दिवस मनात असलेली एक गंमत करण्याची ऊर्मी माझ्या मनात उसळली.

"वॉन, पटकन, बाकीचे कोणी येण्यापूर्वी मला उचल आणि डोक्यावरच्या लगेज कम्पार्टमेन्टमध्ये मी बसतोय का ते पाहा."

असं करण्याविषयी आम्ही अनेकदा बोललो होतो. मी तसा तिथं मावतो का हे पाहण्यासाठी वॉननं मला एकदा एका डिपार्टमेन्टल स्टोअरच्या रॅकमध्येही ठेवून त्याची चाचणी घेतली होती. तेव्हापासून मला टोपणनावही मिळालं होतं, 'कॅरी ऑन किड.'

डोक्यावरचं लगेज कम्पार्टमेन्ट उंच असल्यामुळे चौऱ्याहत्तर पौंड्सच्या मला वॉन उचलू शकेल का याची मला शंका होती, पण वॉननं ते लीलया जमवलं. तेवढ्या काळाकरिता मी निक व्होयचिचचा लुई व्हिटन झालो.

"ठीक आहे, आता दार लावून घे," मी वॉनला सांगितलं, "आणि बाकीचे प्रवासी आल्यावर काय होतं त्याची आपण वाट पाहू."

वॉननं माझ्या डोक्याखाली उशी सरकवली आणि दार लावून घेतलं. हवाईसुंदरींनी आमचे उपद्व्याप पाहिले होते आणि त्या आपापसात खिदळत होत्या. आम्ही सगळेच शाळकरी मुलांसारखे गालातल्या गालात हसत असल्यामुळे आम्ही पकडले जातो की काय असं आम्हाला वाटत होतं.

एक वयस्क प्रवासी जेव्हा मी असलेल्या लगेज कम्पार्टमेन्टला हात घालू लागला तेव्हा हवाईसुंदरींना आणि माझ्या सहकाऱ्यांना हसू आवरणं खूप कठीण गेलं. त्यानं दार उघडलं आणि तो उडालाच.

मी डोकं बाहेर काढलं आणि त्याला म्हणालो, "महाशय, दार उघडण्यापूर्वी ते तुम्ही ठोठवलं नाहीत!"

सुदैवानं ते गृहस्थ सज्जन होते आणि त्यांच्यासह आम्ही सर्व जण पोट धरधरून हसलो. त्यानंतर त्याच अवस्थेत प्रवाशांनी माझ्याबरोबर त्यांचे असंख्य फोटो काढले आणि हो, हवाईसुंदरींनीही. आणि नंतर चेष्टेनं वॉन मला धमकावत राहिला की तो आता मला तिथंच ठेवेल.

रस्त्यावरील अनियमितता

पहिल्या दहा प्रकरणांमधून मी तुम्हाला स्वत:चा हेतू शोधण्यासाठी, आशादायी राहण्यासाठी, आत्मविश्वासासाठी, चांगला दृष्टीकोन राखण्यासाठी, धाडस बाळगण्यासाठी, चिकाटी वापरण्यासाठी, बदलावर प्रभुत्व मिळवण्यासाठी, सुदृढ नाती निर्माण करण्यासाठी आणि आपल्या स्वप्नांजवळ घेऊन जाणाऱ्या संधींवर कृती करण्यासाठी प्रोत्साहन आणि सल्ले देऊ केले.

आता तुम्ही जरा सर्किटपणा करावा असं मला वाटतं. माझ्यासारखाच!

हे अर्थातच मजेशीर आहे; पण तुम्ही मजेशीर वागावं असंच मला वाटतं. मी मजेशीर नियमावलीचा निर्माता आहे, जी सांगते की या ग्रहावरच्या प्रत्येक जिवंत आणि श्वासोच्छवास करणाऱ्या व्यक्तीनं दिवसातून किमान एकदा काहीतरी मजेशीर करण्यासाठी तयारक असावं, मग ते स्वप्नाचा पाठपुरावा करताना मजेशीर दिसण्याचा धोका पत्करणं असेल किंवा त्यातून केवळ निखळ आनंद मिळवणं असेल.

माझी मजेशीर नियमावली माझ्या एका आवडत्या उक्तीमधून जन्माला आली. 'अपूर्णता म्हणजे सौंदर्य, वेड म्हणजे विद्वत्ता आणि पुरेपूर कंटाळवाणं असण्याऐवजी पुरेपूर मजेशीर असणं कधीही बरंच.'

या उक्तीची लेखिका माझी आदर्श म्हणता येणार नाही, पण मर्लिन मन्रोनं जेव्हा हे शब्द उच्चारले तेव्हा तिच्या डोक्यात काहीतरी असणारच. अर्थातच, मीही मानतो की अपूर्णता म्हणजे सौंदर्य, का नाही मी तसं मानणार? तसंच तुम्हालाही निर्विवादपणे कबूल करावं लागेल की वेड म्हणजे विद्वत्ता – अशा अर्थी की जो कोणी धोके पत्करतो तो काहींच्या नजरेत खुळा तर काहींच्या नजरेत विद्वान असतो. आणि हो, मलाही वाटतं की पुरेपूर रटाळ असण्याऐवजी पुरेपूर मजेशीर असणं कधीही बरंच.

या पुस्तकातल्या अन्य कोणत्याही धड्यावर तुम्ही प्रभुत्व मिळवाल, पण तुम्ही जर काही धोके पत्करायला तयार नसाल किंवा तुमच्या विद्वत्तेवर शंका घेणाऱ्यांकडून सर्किट म्हटलं जाण्याचा धोका पत्करायला तयार नसाल तर तुम्ही जे मिळवण्याची स्वप्नं पाहत असाल ते तुम्ही कधीच मिळवू शकणार नाही. आणि कृपा करून, स्वत:साठी आणि या ग्रहासाठीही

तुम्ही खेळकर असा. स्वत:वर हसायला आणि आनंदी राहायला विसरू नका जेणेकरून तुमचा प्रवास आनंददायी राहील.

मी स्वत:ही इतरांप्रमाणेच व्यस्त वेळापत्रकात स्वत:ला अडकवून घेत केवळ काम, काम अन् काम, करमणूक नाही अशा जीवनशैलीचा अवलंब करण्याच्या अपराधाचा दोषी आहे. यशस्वी धर्मप्रसारक आणि प्रेरणादायी व्याख्याता होण्यास मी कटिबद्ध होतो. माझं वक्तृत्व सुधारण्यासाठी मी शक्य ती सर्व व्याख्यानाची आमंत्रणं स्वीकारत सुटलो होतो. आठ वर्षांच्या अखंड आणि अथक दौऱ्यांनंतर मी आता निवड करू लागलोय. मला आता अधिक संतुलन हवं आहे.

आपण सहज 'एके दिवशी' विचारसरणीच्या सापळ्यात अडकतो.

एके दिवशी माझ्याकडे पुष्कळ पैसा असेल ज्यामुळे मला जीवनाचा आनंद लुटता येईल.

एके दिवशी मी माझ्या कुटुंबासमवेत अधिक वेळ खर्च करू शकेन.

एके दिवशी मला स्वस्थ व्हायला वेळ मिळेल आणि मला करायचंय ते मी करेन.

मजेशीर नियमावलीच्या आधारानं मी तुम्हाला सल्ला देईन की दोन्ही आघाड्यांवर स्वच्छंद विहार करण्याचं स्वातंत्र्य घ्या.

पहिली आघाडी : मजेशीर धोका : शंकासुरांच्या आणि नकाराधिपतींच्या शेजारून निघून जात आपली स्वप्नं जगण्यासाठी झेपावण्याची तयारी ठेवा. कोणी तुम्हाला हसतील. तुमची प्रतिक्रिया असावी : होय, मी मजेशीर आहे. तुम्हाला जे आवडतं ते करणं अशा लोकांना मजेशीर वाटेल ज्यांच्याकडे तुमची दृष्टी आणि तुमचं वेड नसेल. त्यांच्या बोलांनी तुम्ही तुमचं स्वप्न दूर ठेवू नका. उलट, त्यांच्या बोलांचा वापर तुम्ही शिखर गाठण्यासाठी करा.

दुसरी आघाडी : मजेशीर गंमत : आपलं जीवन आणि आपली माणसं यांचा आनंद लुटण्यासाठी वेळ काढा. हसा, प्रेम करा, मजा करा ज्यामुळे इतरही आनंदी राहतील. जीवन गंभीर आहे असं तुम्हाला वाटत असेल तर मृत्यूची कल्पना करा! या धन्य जीवनात तुम्ही तेवढेच गंभीर राहा जेवढं आवश्यक असेल, पण शक्य तेवढं खेळकर राहण्याचीही संधी साधा.

मजेशीर धोका

बालपणीच दृष्टी आणि ऐकण्याची शक्ती गमावूनही नामवंत सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका झालेल्या हेलन केलर म्हणतात की, "सुरक्षित जीवन असं काहीही नसतं. ते निसर्गात अस्तित्वात नसतं.... जीवन एक तर धाडसी कृत्य असतं किंवा काहीच नसतं." म्हणजे, धोका हा जीवनाचा केवळ एक भाग नसतो. तोच जीवन असतो. तुमच्या स्वास्थ्याचा टापू आणि तुमची स्वप्नं यांच्या दरम्यानच्या भागातच जीवन असतं. तो टापू

थरारक असतो, पण तिथंच तुम्हाला तुमच्या स्वत:चा शोध लागतो. कार्ल वॉलेंडा, अतिउंचीवरील तारेवरून चालणाऱ्या कुटुंबाचा प्रमुख, यानं अचूकपणे सांगितलंय : "धास्तीत असणं म्हणजे जगणं असतं, बाकी सारं वाट पाहणं असतं."

प्रत्येक स्कायडायव्हरला, पॅराग्लायडरला आणि पक्ष्याच्या पिलाला ठाऊक असतं की काठावरची पहिली पावलं भयावह असतात, पण त्यांना उडायचं असेल तर त्यांना तिथं जावंच लागेल. स्वीकारा – प्रत्येक दिवस हा तुमचा शेवटचा असू शकतो, म्हणजे केवळ बिछाना सोडणंही जुगार असतो. पराभव स्वीकारण्याची तुमची तयारी नसेल तर तुम्ही विजेते होऊ शकत नाही. पडण्याचा धोका पत्करल्याशिवाय तुम्ही साधे उभेही राहू शकत नाही.

जन्मापासूनच माझं दैनंदिन जीवन जुगार आहे. मी स्वावलंबी होऊ शकेन की नाही याविषयी शंका होत्या. माझ्या आई-वडिलांची समस्या तर दुप्पट होती, कारण त्यांचं पंगू पोरगंही थरारामागं जाणारं होतं. मी कायम स्वत:ला धोक्यात घालणारा होतो. कारण मला कधीच स्वस्थपणे कोपऱ्यात बसून राहणारा मुलगा व्हायचं नव्हतं. मी स्केटबोर्डिंग केलं. मी सॉकर खेळलो. मी पोहलो. मी सर्फिंग केलं. मी माझा अधू देह अग्निबाणासारखा झोकून दिला. ते सारं मजेशीर होतं!

सूर मारणं

२००९च्या पानझडीच्या काळात मी ते करण्याच्या प्रयत्न केला जे माझ्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचं मला सांगितलं गेलं होतं. मी समुद्रात डायव्हिंगला गेलो. तुमच्या कल्पनेप्रमाणंच मला अत्यंत मजा वाटली. ते उडण्यासारखंच होतं. असा प्रयत्न आम्ही तीन वर्षांपूर्वी केला होता, पण त्या वेळी मला माझ्या प्रशिक्षकानं स्कुबा गीअर घालून स्विमिंग पूलच्या केवळ काठाकाठानं पाण्याच्या पृष्ठभागावर फिरायला दिलं होतं. मला वाटतं त्याला माझ्या सुरक्षेपेक्षा स्वत:च्या विम्याची काळजी असावी. त्याला भीती वाटली असावी की त्याला कारण द्यावं लागलं असतं की निक नामक इसमाला शार्क कसा काय घेऊन गेला.

या वेळचा माझा प्रशिक्षक, फेलिप अधिक खुल्या मनाचा होता. तो दक्षिण अमेरिकेतल्या कोलंबियाजवळच्या एका बेटावर डायव्हिंगचा प्रशिक्षक आहे. कार्टाजेना-जवळच्या राष्ट्रीय अभयारण्य असलेल्या मुकुरा बेटावरच्या पुंटा कारो रिसॉर्टच्या मालकांनी मला तिथं व्याख्यानासाठी निमंत्रित केलं होतं. मी तिथं स्कुबा-डायव्हिंगसाठी गेल्यावर फेलिपन मला एकच प्रश्न विचारला, "तुम्हाला पोहता येतं?"

माझं पोहणं सिद्ध केल्यावर फेलिपनं मला लगेचच स्कुबा-डायव्हिंगचे धडे दिले. आम्ही काही खुणा निश्चित केल्या जेणेकरून पाण्याखाली मी त्याच्याशी संवाद साधू शकेन. खांदे हलवून किंवा डोकं हलवून मी त्याला सांगू शकेन की मला त्याची मदत हवी आहे. मग त्यानं

मला किनाऱ्यालगत चाचणीसाठी नेलं, जिथं आम्ही आमच्या खुणा पडताळल्या आणि उपकरणं तपासली.

"ठीक आहे, आता आपल्याला खोल पाण्यात जायला हरकत नाही."

फेलिपन मला कमरेला धरलं आणि स्वत:च्या फ्लिपर्सच्या साहाय्यानं पोहत तो मला समुद्रतळावरल्या इंद्रधनुषी दुनियेत घेऊन गेला, त्यात मला सोडून दिलं आणि तो माझ्यावर तरंगत राहिला. त्याला एकदाच माझा बचाव करावा लागला जेव्हा एक पाचफुटी मोरे ईल एका खडकातल्या फटीतून माझ्या दिशेनं आला. मी कुठंतरी वाचलं होतं की, या मांसाहारी जलचरांच्या अणकुचीदार दातांवर बॅक्टेरिया असतात. त्यामुळे मी फेलिपला मला अधिक सुरक्षित भागात घेऊन जायला सांगितलं.

त्या अनुभवानं मला एका वेगळ्याच विश्वाचं दर्शन घडलं. तो अनुभव मजेशीर, धोका पत्करण्याजोगा होता का, हा प्रश्न तुमच्या मनात येऊ शकतो. नि:संशयपणे हो! आपल्या स्वास्थ्याच्या कक्षेबाहेर जाण्यानं तुम्हाला ताकदीनिशी मोठं होण्यास वाव मिळतो. तुम्हालाही असंच काहीतरी धाडसी करावसं वाटतंय ना? मग ते तुम्ही करावं असं मी सांगेन. पाण्याची खोली मोजा, आपल्या जीवनाला एका नव्या पातळीवर घेऊन जा. मग ती पाण्याखाली असली तरीही. डॉल्फिन्सच्या जोडीनं पोहा. गरुडांबरोबर उड्डाण करा. पर्वत चढून जा. गुहेचा अंतर्भाग अभ्यासून या. निकसारखी मजा करा!

आणि हो, मजेशीर धोका आणि मूर्खासारखा धोका यात अंतर आहे. मूर्खासारखे धोके तसेच असतात, विचारही करण्यासारखे नसतात. तुम्ही असा धोका कधीही पत्करू नये ज्याच्यात तुम्ही जेवढं मिळवण्याची शक्यता असेल त्याहून अधिक गमावण्याची असेल. परंतु मजेशीर धोका पत्करणं म्हणजे असा धोका पत्करणं जो असल्यापेक्षा अधिक मजेशीर भासेल. कारण :

१) तुम्ही स्वत:ची तयारी केलेली असेल.

२) तुम्ही शक्य तेवढा धोका कमी केलेला असेल.

३) काही चुकलं तर तुमच्याकडे पर्यायी योजना तयार असेल.

धोक्याचे प्रकार

युनिव्हर्सिटीत 'फायनान्शियल प्लॅनिंग अॅन्ड इकॉनॉमिक्स' शिकताना मी धोक्याची तीव्रता कमी करण्याविषयी शिकलो. जीवनाप्रमाणं व्यावसायिक विश्वातही साधारणपणे असंच समजलं जातं की तुम्ही पूर्णपणे धोका टाळू शकत नाही, पण गाळात उतरण्यापूर्वी त्याची खोली तपासून त्याची तीव्रता कमी करू शकता, मग त्या गाळाचा प्रकार कोणताही असो.

जीवनात दोन प्रकारचे धोके असतात. यत्न करण्याचा धोका आणि यत्न न करण्याचा धोका. म्हणजेच, धोका कायमच असतो, मग तुम्ही तो कोणत्याही प्रकारे टाळण्याचा किंवा स्वत:ला त्याच्यापासून सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करा. कल्पना करा की तुम्हाला कोणा

मुलीचा हात मागायचाय. तिला विचारणं हा जुगारच आहे. तुम्हाला नकार मिळू शकतो. पण तुम्ही प्रयत्नच केला नाहीत तर ती छान मुलगी कदाचित तुम्हाला होकार देण्याचीही शक्यता आहेच. तिथून पुढे तुम्ही सुखी संसार करण्याचीही शक्यता आहे. लक्षात ठेवा की, तुम्ही विचारण्याचा धोका पत्करल्याशिवाय तुम्हाला तुमचा सुखी संसार मिळणार नाहीये. मग काय दोस्ता, ते फासे फेकण्याच्या पात्रतेचं आहे की नाही?

कधीमधी तुम्ही पराभूत व्हाल. पण तुम्हाला यश मिळेपर्यंत पुन:पुन्हा उठून प्रयत्न करण्यातच खरी शान आहे!

जगण्यासाठी, ताकदीनिशी पोहोचण्याची तुमची तयारी हवी. चांगलं जगण्यासाठी कृती करण्यापूर्वी नफा-तोट्याची जाण करून नियंत्रण मिळवणं तुम्ही शिकलं पाहिजे. तुमच्या बाबतीतली किंवा तुमच्याभोवती घडणारी प्रत्येक गोष्ट नियंत्रित करणं तुम्हाला शक्य होणार नाही. त्यामुळे तुम्हाला कशावर नियंत्रण ठेवता येईल त्यावर लक्ष केंद्रित करा, मूल्यांकन करता येईल त्या प्रत्येक शक्यतेचं मूल्यांकन कर आणि त्यानंतर निर्णय घ्या.

कधीतर तुमचं मन आणि तुमची बुद्धीही कागदावर यश अंधूक दिसत असलं तरीही तुम्हाला धोका पत्करायला सांगेल. तुम्ही अपयशी ठराल; पण तुम्ही कदाचित यशस्वीही व्हाल. पण मला नाही वाटत की तुम्ही मागं वळून पाहाल आणि प्रयत्न केल्याबद्दल पश्चात्ताप पावाल. मी स्वत:ला वक्ता आणि धर्मप्रसारकाबरोबरच व्यावसायिकही समजतो. गेली काही वर्षं मी काही धंदे केले आहेत. अनेक आंत्रप्रनेअर्सची पुस्तकं मी वाचली आहेत, आणि त्यामध्ये धोक्याचं एक प्रकरण असतंच. व्यावसायिकांची प्रतिमा 'धोका पत्करणारे' अशी असली तरी यशस्वी व्यावसायिक धोका पत्करण्याच्या बाबतीत खरंतर तरबेज नसतात; तर धोक्यांची तीव्रता कमी करून किंवा ते नियंत्रित करून पुढे सरकण्यात ते तरबेज असतात, काही धोके उरणारच याची त्यांना कल्पना असतानाही.

माझे मजेशीर नियम

तुमच्या जीवनातल्या धोक्यांशी तुम्हाला सामना करता यावा यासाठी मी धोक्याच्या व्यवस्थापनाबाबतीतले 'निकचे मजेशीर नियम' सादर केले आहेत. तुमच्या स्वत:च्या जबाबदारीवर, तुम्ही ते वाचा.

१) *पाण्याची खोली तपासा*

एक पुरातन आफ्रिकन म्हण आहे की, कोणीही नदीची खोली दोन्ही पायांनी तपासत नाही. तुम्ही नव्या नात्याचा, स्थलांतराचा, नव्या नोकरीचा किंवा घराला नवा रंग देण्याचाही विचार करीत असाल, तर प्रत्यक्ष पाऊल उचलण्यासाठी तुम्ही त्याची चाचणी घेऊन बघा. तुम्ही काय करत आहात याची चांगली कल्पना आल्याशिवाय उडी मारू नका.

२) *तुमच्या हातच्या माहितीनिशी पुढे सरका*

याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही कधी नवी माणसं किंवा नवे अनुभव चोखाळू नयेत; त्याचा अर्थ एवढाच आहे की तुम्ही तुमचा धोका गृहपाठ करून कमी करू शकता. संधीच्या प्रत्येक अंगावर तुमचं नियंत्रण आहे असं तुम्हाला वाटल्यानंतर तुम्ही पाऊल टाकायला हरकत नाही. तुम्हाला सगळं काही ठाऊक नसलं, तरी तुम्हाला काय ठाऊक नाही याची तुम्हाला कल्पना असायला हवी – आणि बरेचदा ते पुरेसं असतं.

३) *घड्याळावर नजर ठेवा*

बरेचदा केवळ योग्य वेळी मैदानात उतरल्यामुळे तुमची धोक्याची पातळी उतरू शकते. हिवाळ्याच्या ऐन भरात तुम्ही आइस्क्रीमचं दुकान उघडणार नाही, बरोबर? चित्रपट क्षेत्रात उतरण्याचा पहिला प्रस्ताव माझ्यासाठी नव्हताच मुळी, काही महिन्यांनंतरची भूमिकाही योग्य होती आणि वेळही. अनेकदा धीर धरणं लाभाचं ठरतं. त्या काळात शांत राहायला घाबरू नका. झोपण्यापूर्वी ते लिहून काढा आणि उठल्यावर पुन्हा वाचा. गंमत पाहा, सकाळी ते वेगळं भासेल. मी अनेकदा ते केलेलं आहे. संधीच्या काठावर उभं राहून तुम्ही विचार करा की ती वेळ योग्य आहे का, किंवा त्याहून योग्य वेळ तुम्हाला लाभू शकते.

४) *दुसरं मत घ्या*

बरेचदा, आत्ताच मला काहीतरी करायला हवं या विश्वासातून आपण वाजवीपेक्षा मोठे धोके पत्करतो. फसव्या क्षेत्रात तुम्ही प्रवेश करताय असं तुम्हाला वाटलं तर एक पाऊल मागं घ्या, तुमच्या विश्वासातल्या व्यक्तीला फोन करा, आणि परिस्थितीचं मूल्यांकन करायला सांगा, कारण त्या वेळी तुमच्या विचारांवर तुमच्या बुद्धीपेक्षा तुमच्या भावनांचा पगडा अधिक असण्याची शक्यता असते. यासाठी इथं मी काकाकडे आणि ऑस्ट्रेलियात वडिलांकडे जातो. अनेकांच्या समितीमध्ये शहाणपण वास करतं. धोका मोठा असेल तर तुम्ही एकांडे शिलेदार असू नये.

५) *अदृश्य परिणामांसाठी तयार रहा*

आपल्या कृत्याचे नेहमीच, होय नेहमीच अदृश्य परिणाम असतात, विशेषत: ते जे आपल्या मर्यादा पारखतात. सगळ्याच प्रतिक्रिया तुम्हाला आधी दिसू शकत नाहीत, त्यामुळे सर्वांगानं विचार करावा आणि अदृश्यासाठी तयार राहावं. मी एखाद्या व्यवसायाचा विचार करतो तेव्हा खर्चाचा अंदाज वाढवतो आणि नफ्याचा कमी करतो. त्यामुळे मध्ये वाव तयार होतो, जो मला तेव्हा उपयोगी पडू शकतो जेव्हा तो व्यवसाय मला अपेक्षित नफा देणार नाही. आणि सारंच सुरळीत झालं तर ज्यादाच्या पैशानं माझं काहीच वाईट होणार नाही.

मजेशीर गंमत

एअरपोर्टवर लगेज जिथून येतं तिथं उडी मारून लगेजबरोबरच पट्ट्यावरून येण्याचा तुम्ही कधी विचार केला नाहीत अशी बतावणी करण्याचा विचारही करू नका. अर्थातच, मी मजेशीर इसम असल्यामुळे मी ते केलंय.

आम्ही व्याख्यानाच्या दौऱ्यावर आफ्रिकेत होतो. एअरपोर्टवर लगेजची वाट पाहून मी कंटाळलो होतो म्हणून मी कायली या माझ्या मदतनिसाला सांगितलं की, मला लगेजच्या 'कॅरूजल'वर राइड हवी आहे.

त्यानं माझ्याकडे, 'डोकंबिकं फिरलंय की काय तुझं?' या अर्थाचा एक कटाक्ष टाकला.

पण ते क्षणापुरतं. त्यानं मला उचललं आणि एका भल्यामोठ्या सॅमसोनाइटशेजारी ठेवलं. माझा लगेजप्रवास सुरू झाला. डोळ्यावर गॉगल असलेल्या अवस्थेत एखाद्या पुतळ्याप्रमाणे मी टर्मिनलमधून फिरलो. लोक माझ्याकडे डोळे बारीक करून पाहत होते, माझ्याकडे बोटं दाखवत होते, काही जण हसत होते ज्यांना मी खरोखर मनुष्य आहे की मनुष्याच्या आकाराची डफेलबॅग आहे अशी शंका वाटत होती. शेवटी मी लोडिंग एरियात पोहोचलो जिथं एका आफ्रिकी कंपूनं माझं हसत स्वागत केलं.

"गॉड ब्लेस यू!" सारे जण एका सुरात ओरडले.

लोडिंग एरियातले आफ्रिकन कर्मचारी समजू शकले की मोठ्यांनाही कधी-कधी लहानांसारखं वागावंस वाटतं. मुलांमध्ये तारुण्य कधी फुकट जात नाही. ती ते प्रत्येक मिनिट उपभोगतात. तो तारुण्यसुलभ आनंद राखण्यासाठी आपण साऱ्यांनी शक्य ते सारं करावं. तुमचं जीवन एकसुरी असेल तर वैतागू नका. उलटं मागं फिरा आणि ते करा ज्यानं तुम्हाला बालपणात आनंद दिला होता. उड्या मारा, पारंब्यांवर झोके घ्या, सैरावैरा धावा. मोठेपणाला थोडा विश्राम द्या.

प्रत्येक क्षण उपभोगा. अधूनमधून मी काहीतरी करतो ते केवळ गंमत म्हणून. मी तुम्हाला तसंच जगायला सांगेन, परमेश्वरानं आपल्याला बहाल केलेले सारे उपहार उपभोगण्यासाठी.

मजेशीर आयुष्य जगणं म्हणजे आशा आणि शक्यता यांच्या दुव्यावर जगणं, परमेश्वराच्या हेतूला आणि त्याच्या योजनेला कवटाळणं. म्हणजेच, मजेशीर नियमावलीचा दुसरा भाग म्हणजे मौज करणं, अनपेक्षित वर्तणूक करणं, आणि मर्यादा उल्लंघणं. म्हणजेच सफरीचा आनंद लुटणं, वरदानांना कवेत घेणं, आणि नुसतं जगण्याऐवजी जीवनाचा आनंद पुरेपूर लुटणं.

माझ्या व्याख्यानात अनेकदा मी व्यासपीठाच्या काठावर उभा असतो, जसाकाही कोणत्याही क्षणी मी खाली कोलमडेन. मग मी श्रोत्यांना सांगतो की तुमचा जेव्हा स्वत:वर आणि आपल्या निर्मात्यावर विश्वास असेल तेव्हा काठावर जगणं ही तेवढी वाईट कल्पना नसते. ही केवळ बडबड नाहीये. जीवनाच्या प्रत्येक बाबतीत, काम असो वा खेळ, मी

स्वत:ला तसाच ढकलत असतो. अशात जेव्हा काम आणि खेळ एक होऊन जातात तेव्हा मला फारच मजेशीर भावना अनुभवास येते. तुम्हीदेखील ती भावना अनुभवण्याचा प्रयत्न करा.

स्टंटमन

'दि बटरफ्लाय सर्कस' या चित्रपटासाठी मी माझी पहिली भूमिका स्वीकारली तेव्हा मला कल्पना नव्हती की मीच माझे स्वत:चे स्टंट्स करेन. पण माझे स्टंट्स माझ्याहून चांगल्याप्रकारे दुसरं कोण करू शकेल? असं नाही की हात-पाय नसणारे असंख्य स्टंटमन कामाच्या शोधात आहेत.

मला मजा वाटली. माझा एक देशबंधू रसेल क्रो जर चित्रपटात स्वत:च कसरती करतो तर मी का करू नयेत? तरीही, रसेलला कधी कोणा जॉर्ज नावाच्या आडदांडानं हवेत फेकलं नाहीये. 'दि बटरफ्लाय सर्कस'मधल्या त्या आडदांड पैलवानाची भूमिका खरा स्टंटमन आणि कलाकार असलेल्या मॅट ऑलमेननं साकारली. चित्रपटातल्या एका महत्त्वपूर्ण दृश्यात जॉर्ज मला उचलतो आणि एका डबक्यात फेकतो. मॅट त्या दृश्याच्या बाबतीत मनानं साशंक होता. मी तर त्याच्याहून साशंक असायला हवा होतो.

कॅलिफोर्नियाच्या हाय डेझर्टमधल्या सान माब्रिएल पर्वतराजीतल्या एका खऱ्या ओहोळामधल्या खऱ्या डबक्यात आम्ही ते दृश्य चित्रित केलं. पाणी थंड होतं, पण ती खरी मोठी समस्या नव्हती. त्या दृश्यात अपघातानं मी खरंच डबक्यात पडून बुडतो, पण पुन्हा पाण्याच्या पृष्ठभागावर येत मी माझं पोहण्याचं कौशल्य सिद्ध करतो.

मी वाचल्याच्या आनंदात जॉर्ज एवढा वेडा होतो की तो पुन्हा मला पाण्यातून उचलतो आणि पाण्यातच फेकतो, जवळ-जवळ स्वत:च तो मला बुडवतो.

जॉर्जला धास्ती वाटत होती की दृश्य चित्रित होत असताना तो मला खूप जोरात आणि खूप दूर फेकेल. पहिल्या काही प्रयत्नांमध्ये तो भीत-भीत मला फेकत होता, कारण पाण्याची खोली फक्त पाच फूट होती. दिग्दर्शक जोशुआ वायगेलनी त्याला मला जोरात फेकायला सांगितलं आणि मी टोरपेडोसारखा सुटलो! आता मी तळावर आपटेन या भीतीनं मी माझ्या पाठीची कमान केली आणि त्याचा खरोखरच फायदा झाला. या खेपेला मी पाण्याच्या पृष्ठभागावर आलो तेव्हा त्यात बिलकूल अभिनय नव्हता. मी जेव्हा हवा खायला पाण्यावर आलो तेव्हा सर्वांनाच आनंद झाला, विशेषत: मॅटला.

त्याहून धोक्याची दृश्यं होती ती अतिउंचावरून सूर मारण्याची. ती उंची होती तीनमजली इमारतीएवढी. तिथं उंचावर मी आधाराच्या पट्ट्यांमध्ये जखडलेल्या अवस्थेत लटकत होतो. अर्थात, व्यावसायिक स्टंट संयोजकांद्वारे ते सारं जमवलं जात असल्यामुळे धोक्याची पातळी खूप उतरत होती. त्यांनी माझ्या सुरक्षेची उत्तम काळजी घेतल्यामुळे माझी भीती चेपली जाऊन ती दृश्यं देताना मला मजा आली.

वस्तुस्थिती ही आहे की अधूनमधून शारीरिक धोके पत्करण्यानं, मग ते रॉक क्लाइम्बिंग असो, सर्फिंग किंवा स्नोबोर्डिंग. तुमची ऊर्जेची पातळी वाढते आणि तुमच्यात अधिक जिवंतपणा येतो. अनेक लोक त्यांच्या आवडत्या क्रीडाप्रकारात शारीरिक धोके पत्करतात, मग ते कदाचित त्यांच्यातल्या बाल्याला वाव देण्यासाठी मजेशीर भासण्याचा धोका पत्करणंही असू शकतं.

जीवनासाठी खेळा

मानसोपचारतज्ज्ञ आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर प्ले'चे संस्थापक, ब्राउन म्हणतात की, क्रीडा मानवाच्या रचनेचा अविभाज्य घटक आहे आणि खेळण्याच्या आपल्या नैसर्गिक वृत्तीकडे दुर्लक्ष करणं हे झोप टाळण्याएवढंच धोकादायक असू शकतं. डॉ. ब्राउन यांनी देहदंडाची सजा असलेल्या कैद्यांचा आणि खुन्यांचा अभ्यास केला आणि त्यांना कळलं की त्या साऱ्या जणांच्या बालपणात खेळाच्या सामान्य पद्धतीचा अभाव होता. ते म्हणतात की, क्रीडेच्या विरुद्ध काम नसतं, तर तो तणाव असतो. म्हणजेच क्रीडेकडे बचावाचं कौशल्य म्हणून पाहिलं जावं.

डॉ. ब्राउन यांच्या मते धोकादायक, शारीरिक कसरतींचे खेळ मुला-माणसांमध्ये त्यांची सामाजिक, आकलनविषयक, मानसिक आणि शारीरिक कौशल्यं विकसित करतात. डॉ. ब्राउन यांचं म्हणणं आहे की, आपण विरंगुळ्यासाठी वेळ बाजूला न काढता, काम आणि खेळ एकत्र मिसळावेत.

मी अशा असंख्य व्यक्तींना ओळखतो ज्यांनी त्यांचं तारुण्य पत आणि पैसा मिळवण्यात खर्च केलं आणि उतारवयात त्यांना जाणीव झाली की त्यांनी आनंद न उपभोगलेल्या प्रवासाच्या अंतिम टप्प्यात ते आहेत. ते तुम्ही स्वत:च्या बाबतीत होऊ देऊ नका. स्वत:चा बचाव करण्यासाठी तुम्हाला जे काही करावं लागेल ते करा, पण शक्य होईल तेवढं तुम्हाला जे आवडतं ते जरूर करा!

आपली दिनचर्या आणि आपली उपजीविका सांभाळण्यात आपण एवढे गुरफटून जातो की आपण आपल्या दैनंदिन जीवनाच्या दर्जाकडे दुर्लक्ष करतो हे भयावह आहे. 'संतुलन' ही अशी गोष्ट नाहीये की जी तुम्ही 'कधीतरी' साधू शकता. त्यामुळे, तुम्हाला वेळ-काळ-ठिकाण याचं भान विसरायला लावण्यासारखं काहीतरी करायला, खेळायला तुम्ही कधी विसरू नका.

संशोधनानं सिद्ध केलंय की आपल्या आवडत्या कृत्यामध्ये, मग ते चित्र काढणं असो, कोणता क्रीडाप्रकार असो, कोणता छंद असो, 'हरवून' जाणं हे या भूतलावर आपण खऱ्या 'आनंदा'प्रत पोहोचण्याच्या जवळपासचंच असतं. मी अनेकदा त्या वाहवलं जाण्याच्या स्थितीत असतो, जेव्हा मी मासे पकडतो, जो माझ्या मनाला शांती देणारा क्रीडाप्रकार आहे.

मासे पकडण्यासाठी माझ्या आई-वडिलांनी पहिल्यांदा मला वयाच्या सहाव्या वर्षी नेलं. माझ्या आईनं मला गळाची दांडी दिली जिच्या दोरीला मक्याचे तुकडे लावलेले होते. तिनं गळ पाण्यात टाकला आणि मी दोरी माझ्या डाव्या पावलाच्या बोटांमध्ये धरून ठेवली. मी जणू निश्चयी, करारी झालो होतो.

मला वाटत होतं की माझा धीर माशापेक्षा जास्त असेल. कालांतरानं त्यांना मक्याचा चावा घ्यावाच लागेल, कारण मोठा मासा गळाला लागल्याशिवाय मी मैदान सोडणार नव्हतो. माझा धीर कामी आला. दोनफुटी माशानं माझ्या मक्याचा चावा घेतला आणि तो ते घेऊन पळायला लागल्याबरोबर माझ्या बोटांमधली दोरी ओढली जाऊ लागली आणि तिथं मला काचायला लागलं. त्या वेळी माशाला जाऊ देण्याऐवजी मी वेगळीच शक्कल लढवली. मी सरळ त्या दोरीवर बसलोच. दोरीच्या ओढीनं माझं बूड झोंबायला लागलं.

"मी मासा पकडला. आई, माझे कुल्ले झोंबतायत, मला मासा मिळालाय!" मी आरोळी ठोकली.

जवळ-जवळ माझ्या उंचीएवढ्या माशापासून माझी सुटका करायला माझे आई-वडील आणि भावंडं धावत-पळत माझ्यापाशी आले. त्या दिवसभरात पकडले गेलेल्या माशांमध्ये माझाच मासा सर्वांत मोठा निघाला आणि त्यामुळे अर्थातच माझी पार्श्वपीडा सार्थकी लागली. त्या दिवसानंतर मी मात्र आयुष्यभरासाठी फिशिंगच्या गळाला लागलो.

आता मी केवळ हातात धरण्याचा गळ वापरीत नाही, तर फिरकी असलेला गळ वापरतो त्यामुळे आता माझ्या बुडाला मासेमारी सोसावी लागत नाही.

माशानं चावा घेतला तर गळाची दांडी हनुवटी आणि खांद्यामध्ये पकडून ठेवण्याएवढा मी आता सशक्त आहे. गळाची दोरी मी दातांमध्ये धरून ठेवतो आणि योग्य वेळी तिला ढील देतो.

संगीत कल

तुम्हाला वाटत असेल की मासे पकडणं हा माझ्यासाठी भलताच विरंगुळा होता. तर नुसता विचार करा की लोकांची प्रतिक्रिया काय असेल जेव्हा मी त्यांना सांगतो की, शाळेच्या वाद्यवृंदात मी केवळ ड्रमरच नव्हतो, तर म्युझिक कंडक्टरही होतो! अर्थात, ते वास्तव आहे. माझ्याकडे ठेका आहे, दोस्ता. अगदी बालवयातच मला ठेका आत्मसात झाला.

दर रविवारी रात्री चर्चमध्ये मी माझ्या पुढ्यात विविध जाडीचे स्तवनग्रंथ मांडायचो आणि चर्चमध्ये गायन सुरू झाल्यावर त्या स्तवनग्रंथांवर मी माझ्या डाव्या पावलानं ताल धरायचो. माझ्या एका चुलतभावापासून माझ्यापर्यंत आमच्या परिवारातली अनेक मुलं चर्चबॅन्डमध्ये ड्रमर झाली. माझ्याकडे ठेक्याची नैसर्गिक जाण एवढी होती की माझ्या दोन काकांनी मला रोलॅन्ड ड्रम मशीन घेऊन दिलं. या यंत्रानं कमालच केली. मी एकटा, हात-पाय नसलेला तालबहाद्दर आर्केस्ट्रा झालो. स्नेअर ड्रम आणि बास ड्रमनं सुरुवात करून शेवटी मी क्लोज्ड

आणि हाय हॅट्सपर्यंत पोहोचलो. चर्चमधले पिअॅनिस्ट, ऑर्गनिस्ट आणि ड्रमर्स मला साथ करीत आणि मला बॅन्डचा सदस्य असल्याची भावना देत. अजूनही मी ड्रम मशीनची सुधारित आवृत्ती वाजवतो, ज्यासाठी मी मॅक कीज प्रोग्रॅम वापरतो, ज्यामुळे मला त्यावर सिंथेसायझर आणि गिटारही वाजवता येते. संगीत हे माझ्या आत्म्यासाठी मलम आहे. ऐकताना अगर वाजवतानाही, स्वराच्या लहरींमध्ये मी तासन्तास बुडून जातो.

शाळेतल्या संगीताच्या तासांमुळे मला त्याची गोडी लागली. माझ्या जीवनातलं संगीताचं शिखर मी तेव्हा गाठलं जेव्हा आमच्या शाळेतला अख्खा ऑर्केस्ट्रा शब्दश: माझ्या खांद्यावर घेतला होता. ऐकायला मजेशीर वाटतंय ना?

आमच्या संगीत शिक्षिका आजारी असल्यामुळे आमच्या तालमी होत नव्हत्या, ज्यामुळे आमच्या साठ वाद्यांच्या ऑर्केस्ट्राचं संयोजन करण्याची जबाबदारी मी माझ्या खांद्यावर घेतली. आम्ही सादर करणार होतो ती सर्व गाणी मला येत होती, त्यामुळे आमच्या संगीतकारांसमोर उभं राहून माझे खांदे हलवत मी त्यांचं दिग्दर्शन केलं. इथं मी थोड्या आगाऊपणानं सांगू इच्छितो की त्या वेळी त्यांनी फारच चांगलं वाजवलं असं मला वाटलं.

मजेशीर निष्कर्ष

आपल्यापैकी बहुतेक लोकांना जराही कल्पना नसते की, परमेश्वरानं आपल्यासाठी प्रत्येक दिवसाकरिता, महिन्याकरिता, वर्षाकरिता अथवा जीवनभराकरिता काय योजून ठेवलेलं आहे. पण आपणा सर्वांकडेच मुक्तपणे आणि मजेशीर उत्साहानं आपली समृद्धी वाढवण्याची, आपल्या उद्देशाचा, छंदाचा आणि आनंदाचा पाठपुरावा करण्याची क्षमता असते. या एकाच प्रकरणात मी माझ्या विविध मजेशीर उपद्व्यापांचे दाखले दिले आहेत, जसे की विमानाच्या लगेज कम्पार्टमेन्टमध्ये बसणं, विमानतळावरच्या लगेज कॅरूजलवरून फिरणं, स्कुबा डायव्हर आणि स्टंटमन होणं, किंवा मच्छीमार, ड्रमर आणि संगीत संयोजक होणं. आता तुमच्यासाठी माझा प्रश्न आहे. अपूर्ण असलेला मी, माझ्या मर्यादा वाढवून जर माझं जीवन एवढं पूर्णपणे आनंदी करू शकतो, तर तुमचं काय?

परमेश्वराच्या थोरवीसाठी जगा आणि कणभरही ऊर्जा किंवा तुमच्या एकमेवाद्वितीयत्वाचा गंधही मागं सोडू नका. मजेशीर राहण्याचं धाडस करा म्हणजे तुम्ही मजेशीररीत्या आनंदी राहाल.

बारा

दातृत्व ही तुमची मोहीम असू द्या

मी वीस वर्षांचा असताना मला अपरिचित असलेल्या व्यक्तीनं आयोजित केलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या दोन आठवड्यांच्या व्याख्यानाच्या दौऱ्याला जाण्याचा मी निर्णय घेतला. माझे आई-वडील माझ्या निर्णयावर नाराज होते, कारण त्यांना माझे आरोग्य, सुरक्षा आणि होणारा खर्च याविषयी चिंता वाटत होती.

तुम्ही याची कल्पना करू शकता? जॉन पिंगोनं माझ्या पहिल्या काही व्हिडिओजपैकी एक पाहिला होता आणि आपल्या देशातल्या गरिबातल्या गरीब प्रदेशातल्या गरजवंत लोकांसाठी मी व्याख्यान द्यावं ही त्यानं स्वत:ची मोहीम बनवली. त्यानं स्वत:हून डोझा डिओ चर्चेसच्या जाळ्याच्या माध्यमातून चर्चेस, शाळा आणि अनाथालयं यांमध्ये माझ्या व्याख्यानाचं आयोजन केलं.

मी त्याच्या देशात यावं यासाठी जॉननं मला पत्र लिहिलं, मेल केली आणि फोनही केला. त्याच्या चिकाटीनं आणि उत्साहानं मी प्रभावित झालो. मी मोठा होत असताना परिस्थितीमुळे आणि माझ्या भविष्यानं जेव्हा मला मन:स्ताप होत असे तेव्हा शांती लाभण्यासाठी मी प्रार्थनेव्यतिरिक्त काय करीत असे, तर दुसऱ्या व्यक्तीसाठी काहीतरी करीत असे. मी स्वत:च्या आव्हानांवर जेवढा अधिक विचार करीत असे तेवढा माझा मन:स्ताप वाढत असे, पण मी जेव्हा माझं लक्ष दुसऱ्याच्या गरजा भागवण्याकडे वळवत असे तेव्हा त्यानं माझ्यात नवी ऊर्जा निर्माण होत असे आणि कोणीही एकटं भोगत नसतं याची जाणीव होत असे.

देण्यासारखं तुमच्याकडे पुष्कळ असो वा थोडं, एक लक्षात ठेवा की दयाळूपणाची लहान-लहान कृत्यंसुद्धा मोठ्या देणग्यांएवढीच प्रभावी असतात. केवळ एका जिवात जरी तुम्ही बदल घडवलात, तरी तुम्ही मोठी सेवा बजावलेली असेल, कारण साध्या दयाळूपणानं घटनांच्या मालिकेला सुरुवात होते. ज्यामुळे तुमच्या पहिल्या कृतीचे परिणाम काही पटींनी मोठे होतात. असं किती वेळा झालंय की कोणीतरी तुमच्याकरिता काहीतरी चांगलं केलंय आणि त्यामुळे धन्यतेच्या भावनेनं तुम्ही अन्य कोणासाठीतरी बदल्यात काहीतरी केलंय? मला असं वाटतं की, या तऱ्हेनं प्रतिसाद देणं ही आपल्याला लाभलेली परमेश्वरदत्त देणगी आहे.

मी तुम्हाला सांगितलंय की, मी निराशेच्या गर्तेत असताना माझ्या शाळेतल्या एका मुलीच्या प्रेमळ बोलांनी माझ्यात कसा आत्मविश्वास संचारला. तिनं दिलेल्या प्रोत्साहनामुळे मीही विचार केला की देण्यासारखं काहीतरी माझ्याकडेही असू शकतं आणि आता मी

परमेश्वरप्रेमाचा संदेश देताना जगभरातील गरजवंतांना प्रेरणा देण्याचं कार्य करतो. त्या मुलीनं माझ्याशी दाखवलेला दयाळूपणा अनेकानेक पटींनी मोठा झालाय. त्यामुळे तुम्ही जर मला सांगाल की तुमच्याकडे अधिक असतं तर तुम्ही अधिक केलं असतं, तर मी तुम्हाला सांगेन की तुम्हाला शक्य असेल तेवढंच तुम्ही आत्ता करा, आणि दररोज करा. तुम्ही देऊ शकाल असा केवळ पैसाच नसतो. परमेश्वरानं तुम्हाला जे काही दिलंय ते इतरांना उपयोगी होईल अशा तऱ्हेनं वाटा. तुमच्याकडे सुतारकी किंवा अन्य तत्सम कौशल्य असेल, तर ते तुमच्या चर्चला, मानवतावादी संस्थेला, हैती किंवा दुसऱ्या कुठल्या ठिकाणी देऊ करा. ते शिवणकाम असो वा गायन, अकाउंटिंग असो वा ऑटो रिपेअरिंग. तुमची कौशल्यं वृद्धिंगत करण्याचे अनेक मार्ग असतात.

हाँगकाँगमधल्या एका विद्यार्थ्यानं काही दिवसांपूर्वी मला ई-मेल केली ज्यातून दिसून येतं की आपण सर्व केवढेही वयस्क, गरीब अथवा श्रीमंत असलो तरीही आपण बदल कसा घडवून आणू शकतो.

> 'मी अत्यंत सुदैवी जीवन जगतो, तरीही माझ्या जीवनात काही वेळा अशा आल्या जेव्हा मी स्वत:ला व्यर्थ समजलो आणि मी घाबरलो. मी हायस्कूलमध्ये जायला घाबरत होतो, कारण वरच्या वर्गातले विद्यार्थी तुमच्याशी कसे वागतात याच्या काही कहाण्या मी ऐकल्या होत्या. मग शाळेतल्या पहिल्या दिवशी मी इतर विद्यार्थ्यांबरोबर माझ्या 'कृतीमध्ये मानवता'च्या तासाला बसलो जिथं आमच्या उत्तम शिक्षकानं आम्हाला सांगितलं की आम्ही स्वत:ला वर्ग न समजता कुटुंब समजावं.
>
> 'कालांतरानं आम्ही पुष्कळ शिकलो. १९९४ मधलं रवांडा हत्याकांड किंवा डार्फूर, सुदान येथील सध्या चालू असलेलं हत्याकांड यासारख्या जगातल्या अन्य भागातल्या ठळक घटना शिकलो. माझ्या वर्गानं आणि मी तेव्हा ती भावना अनुभवली जी तोपर्यंत कधी अनुभवली नव्हती : उत्कटता. डार्फूरमधल्या लोकांना काय भोगावं लागत आहे हे जाणून घेऊन त्यांना मदत करण्याची उत्कटता. चौदा वर्षांच्या पोरांकडून जग काही अपेक्षा करणार नसलं तरी आम्ही कसा बदल घडवू शकतो हे जगाला दाखवण्याचा एक मार्ग आम्हाला सापडला.
>
> 'डार्फूरमध्ये काय घडत आहे हे दाखवणारा एक कार्यक्रम आम्ही सादर केला. आम्हाला अशी उत्कटता लाभली ज्यानं आमचा आत्मा आणि ऊर्जा प्रज्वलित झाली. त्यामुळे आम्ही अनपेक्षित ते करू शकलो आणि डार्फूरमधल्या गरजू लोकांसाठी साधनसामग्री पाठवण्याएवढा पैसा उभा केला.'

एका लहान मुलाकडून ते शहाणपणाचे शब्द होते, नव्हे काय? इतरांची सेवा करण्याची उत्कटता ही परमेश्वराची सर्वोत्कृष्ट देणगीच नव्हे काय? मला खातरी वाटते की

डार्फूरमधल्या ज्या लोकांना यांची साधनसामग्री मिळाली असेल त्यांना प्रत्येक लहान-मोठ्या वस्तूविषयी धन्यता वाटली असेल.

परमेश्वराची असीम शक्ती यातून दिसून येते की, इतरांसाठी काही करण्याची आपली इच्छा असेल, तर आपल्या क्षमतेएवढीच आपली उपलब्धताही महत्त्वाची आहे. आपण इतरांसाठी काही करतो तेव्हा परमेश्वर आपल्याकरवी काम करीत असतो. चांगल्या कृत्यासाठी एकदा तुम्ही स्वत: उपलब्ध झालात की तुम्ही कोणाच्या क्षमतांवर विसंबून राहाल? परमेश्वराच्या! बायबल म्हणतं, 'मी साऱ्या गोष्टी ख्रिस्ताकरवी करू शकेन; जो मला बळ देतो.'

तुम्हाला स्वत:साठी जे हवं असेल ते दुसऱ्यासाठी करा. तुम्ही जर करुणेच्या छोट्या कृतींची दैनंदिन सवय लावून घेतलीत, तर तुम्हाला स्वत:च्या दु:खांपासून आणि नैराश्यापासून दिलासा लाभेल आणि तुमचं आत्मिक बळ वाढेल. दातृत्वातून किंवा दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यातून तुम्हाला लाभ होण्याची तुम्ही अपेक्षा ठेवू नये, पण चांगल्या कृत्यांची विस्मयकारक फळं मिळतात.

बिनशर्त दातृत्वाचा मी समर्थक आहे, कारण त्यानं परमेश्वराचा सन्मान होतो आणि त्याचे आशीर्वाद अनेक पटींनी वाढतात. तरीही माझा विश्वास आहे की तुम्ही दुसऱ्यांचं केलंत की तुम्हालाही आशीर्वादाची प्राप्ती होते. त्यामुळे तुम्हाला मित्र नसेल, तर तुम्ही मित्र व्हा. तुमचा दिवस वाईट गेला असेल, तर दुसऱ्याचा दिवस

चांगला करा. तुमच्या भावना दुखावल्या असतील तर दुसऱ्यांच्या भावनांवर फुंकर घाला. तुम्हाला कल्पनाच नसते की दयाळूपणाच्या एका छोट्याशा कृतीनं तुम्ही या जगात केवढा मोठा बदल घडवून आणू शकता. छोट्या तरंगांमधून मोठ्या लाटा निर्माण होऊ शकतात. मला चिडवलं गेल्यावर मी निराश झालेला पाहून ज्या माझ्या वर्गमैत्रिणीनं मला सांगितलं की मी छान दिसतो, त्यानं केवळ माझ्या दु:खावर फुंकर घातली नाही, तर तिनं एक ठिणगी पेटवली जिनं माझी कारकीर्द आणि जगभरातल्या लोकांपर्यंत पोहोचण्याची माझी मोहीम प्रज्वलित केली.

साहाय्याची उत्कटता

इतरांच्या लाभाकरिता तुम्ही केवढं करू शकता याची चिंता करू नका. तुम्ही फक्त पुढे व्हा आणि ध्यानात ठेवा की दयाळूपणाची छोटी कृत्यं खूप मोठी होतात आणि कल्पनेपलीकडे सबल होतात. हाँगकाँगमधल्या विद्यार्थ्यांप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत जाण्याची माझी इच्छा दिवसेंदिवस वाढीस लागत होती. त्याविषयी मी जेवढा अधिक विचार करीत होतो तेवढा जॉन पिंगोकडून मी अधिक ऐकत होतो.

प्रस्तावित दौऱ्यासाठी मी तीन आठवडे प्रार्थना केली. त्यानंतर मला खरोखर वाटू लागलं की मी जायलाच हवं. मला अमर्याद प्रेरणा देऊ करायची होती आणि साऱ्या जगापर्यंत

पोहोचण्याच्या दृष्टीनं मला हे पहिलं योग्य पाऊल वाटत होतं. मला दक्षिण आफ्रिकेविषयी फारशी माहिती नव्हती आणि मी माझ्या आई-वडिलांशिवाय तेवढा दूर कधी प्रवास केला नव्हता. माझ्या वडिलांचे काही मित्र तिथं होते आणि त्यांच्याशी बोलणं झाल्यावर त्यांची साशंकता फिटली नाही. त्यांनी वडिलांना सांगितलं की, गंभीर गुन्हे ही तिथं मोठी समस्या असून अनेकदा प्रवाशांवर हल्ले होतात, त्यांना लुटलं जातं किंवा त्यांना मारूनही टाकलं जातं.

"निक, ते सुरक्षित ठिकाण नाहीये," वडील म्हणाले. "तू त्या जॉन पिंगोला ओळखतही नाहीस. तो तुला देशभर फिरवील यावर तू का विश्वास ठेवावास?"

माझ्यासारख्या दुराग्रही स्वभावाच्या तरुणाचे आई-वडील असूनही त्यांचे केस फार पिकलेले नाहीत हे आश्चर्यच आहे. पण अन्य कोणाही पालकांप्रमाणेच त्यांना माझी काळजी वाटते. त्यातून माझ्या पंगुत्वामुळे त्यांना वाटतं की माझ्या सुरक्षेविषयी त्यांनी विशेष जागरूक राहायला हवं. पण मला माझ्या मार्गानं जाण्याची प्रचंड इच्छा होती, मला बोलावणं आलं होतं आणि मला धर्मप्रसारक आणि प्रेरणादायी वक्ता या माझ्या कारकिर्दीची मुहूर्तमेढ रोवायची होती.

दक्षिण आफ्रिका दौऱ्याची शक्यता जेव्हा मी पहिल्यांदा त्यांना बोलून दाखवली तेव्हा त्यांची चिंता होती माझ्या आरोग्याची आणि आर्थिक स्थैर्याची. मी माझ्या उत्पन्नातून नुकतंच एक घर खरेदी केलं होतं आणि त्यांचं म्हणणं होतं की, विश्वभ्रमंती करण्याऐवजी मी प्रथम माझं गृहकर्ज फेडून टाकावं.

त्यांची काळजी अधिकच वाढली जेव्हा मी त्यांना सांगितलं की, १) मी जेव्हा आफ्रिकेत असेन त्यादरम्यान माझ्या बचतीमधले वीस हजार डॉलर्स तिथल्या अनाथालयांना देणगीस्वरूपात देण्याचा माझा मानस होता, आणि २) मला माझ्या भावाला माझ्याबरोबर न्यायचं होतं.

मागं वळून पाहताना आज मी समजू शकतो की त्यांना माझ्याविषयी वाटलेली काळजी योग्य होती. पण माझा निश्चय झाला होता. बायबल म्हणतं, 'कोणाजवळ भौतिक मत्ता असेल आणि कोणी गरजू बंधू दिसला तरी त्याच्याविषयी त्याला करुणा वाटत नसेल तर त्याच्यात परमेश्वराचं प्रेम कसं वास करेल?' इतरांची सेवा करीत मला माझ्या श्रद्धेवर कृती करायची होती. मी अक्षम असलो तरी माझ्या श्रद्धेमुळे मी स्वत:ला सक्षम समजत होतो आणि मी असंही समजत होतो की, माझ्या उद्देशपूर्तीच्या दिशेनं पावलं उचलण्याची वेळ आली होती.

मी सुरक्षित राहीन हे अजून माझ्या आई-वडिलांना मला पटवून द्यायचं होतं. माझ्याबरोबर जाण्याच्या कल्पनेनं माझा भाऊही प्रथम उत्साही नव्हता. किंबहुना मी पहिल्यांदा त्याला विचारलं तेव्हा त्यानं तिथल्या हिंसेच्या बातम्यांवरून नकार दिला आणि तो असंही म्हणाला की, त्याला सिंहाचं भक्ष्य व्हायचं नव्हतं. मी त्याला पटवत राहिलो,

सिंहाविषयीची वस्तुस्थिती समजावण्याचा प्रयत्न करत राहिलो. माझ्या दोन चुलतभावांचीही मी नेमणूक केली होती, पण त्यातला एक गळाला. मग मात्र आरोनला वाटलं की, मला दौऱ्यावर जाता यावं यासाठी त्यानं माझ्याबरोबर येणं हे त्याचं कर्तव्य होतं. मी आणि माझ्या आई-वडिलांनी या दौऱ्यासाठी प्रार्थना केली आणि मग त्यांनी मला हिरवा कंदील दाखवला. त्यांची माझ्याविषयीची चिंता दूर झाली नव्हती, पण त्यांचा विश्वास होता की परमेश्वर माझी देखभाल करेल.

विश्वसेवा

मोठ्या प्रवासानंतर आम्ही दक्षिण आफ्रिकेत पोहोचलो तेव्हा आमचे यजमान सांगितल्याप्रमाणे विमानतळावर उपस्थित होते. जॉन पिंगो वयानं मोठे म्हणजे माझ्या आई-वडिलांएवढे वयस्क नाही, तरी विशीतले असतील असं मी धरून चाललो होतो. ते निघाले एकोणीस वर्षांचे, म्हणजे त्या वेळच्या माझ्या वयाहून एक वर्षानं लहान.

आम्ही विमानतळावर भेटलो तेव्हा माझा भ्रमनिरास झाला. मला वाटून गेलं की ही कल्पना वाटली तेवढी चांगली दिसत नाही. सुदैवानं जॉन प्रगल्भ आणि परिपक्व निघाला आणि त्यानं मला दारिद्र्याचं आणि आवश्यकतेचं असं दर्शन घडवलं जे मी तत्पूर्वी कधी घेतलं नव्हतं. त्यानं मला सांगितलं की, माझा व्हिडिओ पाहून त्याला कशी प्रेरणा मिळाली. पण मलाही जाणवलं की, त्याची कहाणीही लक्षवेधक होती आणि श्रद्धेप्रति त्याच्या समर्पित कृतीपुढे मी नतमस्तक झालो.

दक्षिण आफ्रिकेतल्या रिपब्लिक ऑफ ऑरेंज फ्री स्टेटमधल्या एका पशुपालन केंद्रावर तो लहानाचा मोठा झाला. लहान वयात तो वाईट संगतीत होता, पण पुढे तो उत्तम ख्रिश्चन झाला आणि आता तो छोट्या वाहतूक कंपनीचा मालक होता. त्याचं जीवन बदलण्यात त्याला साहाय्य केल्याबद्दल आणि त्याच्या डोक्यावर हात ठेवल्याबद्दल तो परमेश्वराचा ऋणी होता.

त्याच्या देशात मी श्रद्धेविषयी आणि प्रेरणादायी बोलावं याबाबतीत तो एवढा निश्चयी होता की चर्चेस, शाळा, अनाथालयं आणि तुरुंगामधल्या माझ्या दौऱ्यासाठी पुरेसा पैसा उभा करण्यासाठी त्यानं स्वत:ची कारही विकली. त्यानंतर केप टाउन, प्रिटोरिया, जोहान्सबर्ग आणि त्या दरम्यानच्या अन्य मुक्कामी मला नेण्यासाठी त्यानं आपल्या आत्याची निळी व्हॅन वापरली.

आमचं वेळापत्रक भरगच्च होतं आणि बरेच दिवस आम्ही दिवसाचे केवळ पाच ते सहाच तास झोपू शकलो. पण त्या दौऱ्यानं मला ज्या लोकांशी, ठिकाणांशी आणि वस्तूंशी भेट घडवली त्यानं माझं जीवन कायमस्वरूपी पालटलं. त्यामुळे मला आकलन झालं की माझ्या उर्वरित जीवनात मी काय करणार आहे. जगभर मी माझा श्रद्धेचा आणि प्रेरणेचा संदेश देणार आहे.

आरोनचा आणि माझा समज होता की ऑस्ट्रेलियातल्या बालपणात आणि कॅलिफोर्नियातल्या छोट्या वास्तव्यात आम्ही थोडं जग पाहिलं होतं. पण या दौऱ्यात आम्हाला जाणवलं की आम्ही जणू जंगलात हरवलेल्या ललना होतो. ती जाणीव पक्की झाली जेव्हा आम्ही विमानतळावरून जोहान्सबर्गच्या रस्त्यांवरून प्रवास करीत होतो. एका चौकात आरोनला एक पाटी दिसली, 'स्मॅश अॅन्ड ग्रॅब एरिया'.

आरोननं ड्रायव्हरला म्हणजे जॉनला त्याचा अर्थ विचारला.

जॉन म्हणाला, "म्हणजे या भागात ते तुमच्या कारच्या काचा फोडतात आणि तुम्हाला लुटून पोबारा करतात."

आम्ही गाडीचे दरवाजे लॉक केले आणि शोधक नजरेनं सभोवती पाहू लागलो. आम्हाला दिसलं की तिथल्या घरांच्या कुंपणांच्या भिंती उंच होत्या आणि त्यांच्यावर काटेरी तारांचं कुंपण होतं. पहिल्या दोन दिवसांत आम्हाला भेटलेल्या लोकांपैकी काहींकडून आम्हाला कळलं की, त्यांना लुटण्यात आलं होतं. पण मग आम्हाला कळलं की ज्या भागांत गरिबी आणि गुन्हेगारी या समस्या आहेत अशा अन्य भागांहून दक्षिण आफ्रिका ही अधिक धोकादायक नव्हती

वस्तुत: आरोन आणि मी दक्षिण आफ्रिकेच्या आणि तिथल्या लोकांच्या प्रेमात पडलो. या देशाच्या एवढ्या समस्या होत्या तरी आम्हाला दक्षिण आफ्रिकन नागरिक आशेनं आणि आनंदानं भरलेले भासले. आम्ही तिथं पाहिली तेवढी गरिबी आणि नैराश्य किंवा एवढा अनाकलनीय आनंद आणि अढळ श्रद्धाही अन्य कोठे पाहिली नव्हती.

तिथली अनाथालयं हृदय पिळवटणारी आणि त्याचबरोबर प्रेरणादायीही होती. आम्ही अशा एका अनाथालयाला भेट दिली जिथं कचराकुंडीत किंवा बागेतल्या बाकावर सोडून दिलेली मुलं राहत होती. त्यातली बहुतेक मुलं आजारी आणि कुपोषित होती. त्यांचा आमच्यावर एवढा प्रभाव पडला की दुसऱ्या दिवशी आम्ही त्यांच्यासाठी पिझ्झा, कोल्ड्रिंक्स, खेळणी वगैरे भेटी घेऊन गेलो. मुलांना त्यामुळे अत्यानंद झाला.

पण त्याचबरोबर उघड्या जखमा घेऊन फिरणारी मुलं, एड्समुळे मरणाच्या पंथाला लागलेली मुलं-माणसं, अन्नपाण्यासाठी वणवण फिरणारे भिकारीही आम्ही पाहिले. ते सारं एवढ्या जवळून पाहणं, पीडेतल्या मानवांच्या डोक्यावर घोंघावणारा आजार आणि मृत्यू अनुभवणं, आणि त्यांना दिलासा देण्याकरिता मी काय करू शकतो तर केवळ प्रार्थना म्हणू शकतो हा खडबडवून जागं करणारा अनुभव होता. एवढं दारिद्र्य आणि भोग मी कधी पाहिले नव्हते. मी अनुभवलेल्यापेक्षा ते एवढं भयंकर होतं की माझं जीवन मला त्याच्यापुढे लाडाकोडातलं वाटलं. परस्परविरोधी भावनांचा कल्लोळ माझ्या मनात उसळला. करुणेचा पाझर फुटला, ज्यामुळे त्वरित कार्य हाती घेऊन शक्य तेवढ्यांना त्या नरकातून बाहेर काढावं असं मला वाटलं, त्याचबरोबर एवढ्या दु:खाच्या अस्तित्वाबद्दल आणि त्याच्या अटळतेबद्दल मनात क्रोधही निर्माण झाला.

आमच्या वडिलांनी अनेकदा सर्बियातल्या त्यांच्या बालपणाचा उल्लेख केला होता जेव्हा त्यांना रात्रीच्या जेवणासाठी केवळ थोडं पाणी, थोडी साखर आणि ब्रेडचा एक तुकडा मिळत असे. त्यांचे वडील, म्हणजे माझे आजोबा व्यवसायानं न्हावी होते. ते सरकारी केशकर्तनालयात कामाला होते, पण कम्युनिस्ट पक्षात प्रवेश करण्यास त्यांनी नकार दिल्यावर त्यांना तिथून काढून टाकण्यात आलं. कम्युनिस्टांच्या सततच्या दबावामुळे त्यांना स्वत:चं दुकान चालवणंही दुष्कर झालं. वर्षातून एक-दोन वेळा त्यांना बिऱ्हाड हलवावं लागायचं, कारण त्यांची धार्मिकता त्यांना हातात शस्त्र धारण करू देत नव्हती आणि स्थलांतराशिवाय लष्करभरती टाळण्याला पर्याय नव्हता. टीबी होऊन ते काही काम करण्याजोगे राहिले नाहीत तेव्हापासून माझ्या आजीनं शिवणकामाच्या जोरावर आपल्या सहा मुलांना वाढवलं.

दक्षिण आफ्रिकेतल्या गरिबीच्या आणि दु:खांच्या दर्शनानं माझ्या वडिलांच्या कुटुंबांसंबधित हलाखीच्या कथांना वेगळा अर्थ प्राप्त झाला. तिथं मी भुकेनं व्याकूळ होऊन रडणारी पोरं आणि मरणाऱ्या आयांच्या मृतप्राय डोळ्यांमध्ये साक्षात मृत्यूचं दर्शन घेतलं. आम्ही भेट दिलेल्या झोपडपट्ट्यांमधल्या झोपड्या म्हणजे खोल्या नव्हत्या, तर मोठी कपाटंच होती म्हणाना, आणि त्यांतही पाण्याचे नळ नव्हते. एका तुरुंगात मी व्याख्यान दिलं तिथलं ख्रिस्ती देऊळ कैद्यांनी ओसंडून वाहिलं. तिथं आम्हाला ऐकायला मिळालं की अनेक कैदी खटल्याची वाट पाहत खितपत पडले होते. त्यांपैकी बहुसंख्यांचा गुन्हा काय होता तर ते कोणाचे पैसे देणं लागत होते, अशांचे पैसे ज्यांचं वजन एवढं होतं की ते त्यांना तुरुंगात धाडू शकत होते. तिथं आम्ही एका कैद्याला भेटलो ज्याला दहा वर्षांची कैद सुनावली गेली होती, का? तर तो कुणाचं दोनशे डॉलर्स देणं लागत होता. त्या दिवशी कैदी आमच्यासाठी गायले आणि त्या आडबाजूच्या ठिकाणी त्यांच्या स्वरात आनंद जाणवत होता.

बदल घडवणं

दक्षिण आफ्रिकेत मी पूर्णत: विश्वासानं गेलो होतो की त्या मोठ्या प्रदेशात मी बदल घडवून आणेन; पण उलट दक्षिण आफ्रिकेनंच माझ्यात बदल घडवून आणला.

तुम्ही जेव्हा स्वत:मधून आणि स्वत:च्या विवंचनांमधून बाहेर पडून दुसऱ्यांना हात द्याल तेव्हा त्यानं तुमच्यात बदल घडेल. तुम्ही विनम्र व्हाल. तुम्हाला प्रेरणा लाभेल. कधी नव्हे एवढी आणि कशाहूनही अधिक तुम्हाला ही भावना होईल की तुमच्याहून खूप खूप मोठ्या कशाचेतरी तुम्ही भाग आहात. एवढंच नव्हे तर तुम्हाला हेही जाणवेल की कोणाचे तरी जीवन अधिक सुधारण्यासाठी तुम्हीही वाटा उचलू शकता. तुम्ही केलेल्या प्रत्येक गोष्टीनं तुमच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो.

दक्षिण आफ्रिकेतल्या वास्तव्यातल्या पहिल्या काही दिवसांनंतर माझ्या लक्षात आलं की, त्याच्या देशात मी माझा आशेचा आणि प्रेरणेचा संदेश द्यावा यासाठी जॉन पिंगो एवढा

आग्रही का होता? मी पाहिलं होतं त्याहून खूप जास्त त्यानं पाहिलं होतं. माझं अस्तित्व आत्मकेंद्री आणि स्वार्थी होतं, मला जाणवलं; कारण हात-पाय नसलेला मुलगा कल्पनाच करू शकला नाही की अन्य कोणी त्याच्याएवढं भोगत असतं.

त्या दौऱ्यानंतर मला स्टोअरमध्ये पुन्हा कधीच तसं वाटलं नाही जसं आधी वाटायचं. आमच्या घराशेजारच्या स्टोअरमधल्या अन्नधान्याची विपुलता दक्षिण आफ्रिकेत मी पाहिलेल्या अनाथांच्या आणि झोपडपट्टीवासीयांच्या कल्पनेपलीकडची होती. एअर कंडिशन्ड ऑफिसमध्ये मी बसलेला असताना किंवा कोणी मला थंड पेय दिल्यावर आजही मला तो दक्षिण आफ्रिकेतला दौरा डोळ्यांपुढे उभा राहतो आणि मला या गोष्टी फाजील लाड वाटतात, कारण तिथल्या लोकांना तेही दुर्लभ आहे.

आरोन, जो आता ऑस्ट्रेलियात गणित आणि विज्ञानाचा शिक्षक आहे, अजून आमच्या त्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यातल्या वास्तवाच्या दर्शनावर बोलतो. काही दृश्यं पाहून आम्ही दु:खी झालो होतो, पण तेवढीच अन्य दृश्यं पाहून आम्ही चकितही झालो होतो. आमचं एकमत आहे की तो आमचा सर्वोत्तम दौरा होता. आम्ही दोघे घरी परतलो तेव्हा आमच्या मनामध्ये प्रश्न घर करून होते, इतरांची दु:खं हलकी करण्यासाठी आपण काय करू शकतो? *आपला वाटा उचलण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता? लोक एवढं भोगतात हे पाहिल्यानंतर मी पुन्हा कधी तीच जीवनशैली कशी अवलंबू शकेन?*

मदतीची गरज असलेलं कोणीतरी शोधण्यासाठी तुम्ही मोठा प्रवास करण्याची आवश्यकता नाही. किंबहुना, दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यानंच आम्हाला जाणीव करून दिली की आमच्या समाजातच, आमच्या देशातच असे कित्येक लोक आहेत. तुमचा वेळ किंवा तुमची कौशल्यं देऊ करण्यासाठी तुम्हाला अनेक ठिकाणं सहज मिळू शकतील, जशी की तुमची स्थानिक चर्चेस, हॉस्पिटल्स, अमेरिकन रेड क्रॉस, साल्व्हेशन आर्मी, धर्मशाळा, अन्नछत्रं वगैरे. तुम्ही ज्या कशाचा वाटा उचलाल त्यानं फरक पडेल, मग तो पैशांच्या, वेळेच्या, साधनांच्या किंवा तुमच्या मित्रांच्या जाळ्याच्या स्वरूपात असो.

माझी मोहीम सुरू करण्याचा माझा उत्साह दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यामुळे एवढा वाढला की त्याच दौऱ्यात मी माझ्या बचतीचा मोठा भाग, वीस हजार डॉलर्स, देणगी स्वरूपात दिला आणि त्याच दौऱ्यात जमवलेला आणखी वीस हजार डॉलर्सचा निधीही त्याच्याबरोबर दिला. अनाथ मुलांसाठी भेटवस्तू, खाण्याचे पदार्थ, अंथरुणं-पांघरुणं, पुस्तकं वगैरे खरेदी करण्यासाठी आम्ही दिवसचे दिवस तिथं खर्च केले. सेवाभावी संस्थांना देणग्या देऊन आम्ही अनाथालयांमध्ये टीव्ही आणि डीव्हीडीज दिल्या. माझ्या हिशेबानं वीस हजार डॉलर्स ही रक्कम पुष्कळ होती, पण आता वाटतं की देण्यासारखी आणखी रक्कम माझ्याकडे असायला हवी होती. काही ठिकाणच्या काही जिवांचं भलं करण्याची मला संधी मिळाल्यानं कधी नव्हे ते एवढी परिपूर्णतेची भावना माझ्या अनुभवास आली. दक्षिण आफ्रिकेतून मी परत आल्यानंतर माझ्या बचत खात्यातलं पुज्य पाहून आईला

फारसा आनंद झाला नाही, पण त्या दौऱ्यामुळे माझं जीवन कल्पनेपलीकडे समृद्ध झाल्याचं तिला जाणवलं.

गर्भावस्थेतील चमत्कार

दक्षिण आफ्रिका दौऱ्यातला सर्वांत भावुक आणि अविस्मरणीय अनुभव मला एका चर्चमधल्या व्याख्यानाच्या वेळी आला. शेकडो आजारी, अपंग आणि मरणासन्न लोकांनी तिथं चमत्कारानं बरं होण्यासाठी रांग लावली होती. माझ्या अपंगत्वावर सहसा मी विनोद करतो आणि व्याख्यानाच्या ठिकाणचं वातावरण हलकं करतो. पण या चर्चमध्ये कोणीही हसत नव्हतं. ते तिथं विनोदासाठी जमलेले नव्हते. ते तिथं बरं होण्यासाठी आले होते. त्यांना चमत्कार हवा होता.

दररोज रात्री ते तिथं येतात. कोणी मानेला पट्टा लावलेला, कोणी कुबड्यांवर चालत आलेली, कोणी व्हीलचेअरवर आणि त्यांच्या मनी अपेक्षा असते ती चमत्काराची. एड्स झालेल्या दोन पुरुषांना गाद्यांवर ओढत आणलेलं होतं. काही जण चार-चार, पाच-पाच तास चालत तिथं आले होते. चर्चच्या मागच्या अंगणात अनेक कुबड्या आणि व्हीलचेअर्स होत्या, बरं झाल्याचा दावा करणाऱ्यांनी तिथंच सोडून दिलेल्या. सामान्य आकारापेक्षा, सूज येऊन दुप्पट झालेल्या पायाच्या एका माणसाशी मी आणि आरोन बोललो. त्याला खूप वेदना होत होत्या, पण चमत्कारानं बरं होण्याच्या आशेनं तो चर्चपर्यंत चालत आला होता.

वेदना दूर करण्याची शक्ती हवी असं प्रत्येकालाच वाटत असतं. मी स्वत:तरी चमत्कारानं मला हात-पाय मिळावेत यासाठी प्रार्थना केल्या होत्या. पण माझ्या प्रार्थनांना कधीच प्रतिसाद मिळाला नाही आणि त्या चर्चमध्ये आम्ही ज्यांना भेटलो त्यांच्यापैकी बहुसंख्य लोकांचा अनुभवही तसाच होता. पण त्याचा अर्थ असा नव्हे की चमत्कार घडू शकत नाही. मी एवढ्या विविध प्रकारच्या श्रोतृवृंदाशी बोलू शकलो आणि माझे प्रेरणेचे आणि श्रद्धेचे बोल ऐकवू शकलो हे पाहता एक दिवस कदाचित माझं जीवनही चमत्कार समजलं जाईल. सर्बियन वंशाच्या या ऑस्ट्रेलियन ख्रिश्चन तरुणाला कोस्टा रिका, कोलंबिया, इजिप्त आणि चीन यांसारख्या देशांच्या सरकारी नेत्यांकडून व्याख्यानाची निमंत्रणं मिळणं हाही चमत्कारच नव्हे काय? कॉप्टिक चर्चचे पोप शेनुडा तृतीय, शाही इमाम शेख महंमद सय्यद तंतावी, त्याचबरोबर 'चर्च ऑफ लॅटर डे सेन्ट्स' यांच्याशी माझी मुलाखत झालेली आहे. माझं जीवन हे या वस्तुस्थितीचा पुरावा आहे की आपण स्वत:वर घालून घेतलेल्या मर्यादांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मर्यादा नसतात!

मर्यादाहीन जीवन म्हणजे देण्यासारखं काहीतरी तुमच्याकडे असतं, काहीतरी असं ज्यामुळे दुसऱ्यांचा भार हलका होऊ शकतो याची जाण असणं. थोडासा दयाळूपणा आणि थोडेसे डॉलर्स यांनीही मोठा प्रभाव पडू शकतो. २०१० मधल्या हैतीमधल्या भीषण भूकंपानंतर अमेरिकन रेड क्रॉसनं त्वरित मदतीची मोहीम हाती घेतली. सेलफोनवर 'हैती'

टाइप करून ९०९९९ला मेसेज पाठवून दहा डॉलर्सची देणगी पाठवण्याची त्यांनी व्यवस्था केली.

आता पाहा, दहा डॉलर्स ही यत्किंचित रक्कम होती आणि मेसेज करायलाही श्रम पडत नाहीत. देणगीचा हा छोटा उपक्रम होता, पण ती देणाऱ्यांपैकी एक जर तुम्ही असाल तर तुम्ही फार मोठा बदल घडवून आणला आहात. मी शेवटच्या वेळी तपासलं तेव्हा रेड क्रॉसच्या माहितीनुसार तीस लाखांहून अधिक लोकांनी मेसेज करून दहा डॉलर्सची देणगी दिली होती. परिणामी, हैतीमधल्या पीडित जनतेला मदत करण्यासाठी रेड क्रॉसकडे तीनशे वीस लाख डॉलर्सहून अधिक रक्कम जमा झाली.

इतरांच्या भल्यासाठी तुम्हाला आवडेल ते तुम्ही करा

आज माझी 'लाइफ विदाउट लिंब्स' ही सेवाभावी संस्था विविध प्रकारच्या दहा सेवाभावी संस्थांना अर्थसाहाय्य करते, ज्यांच्यामध्ये अॅपोस्टोलिक ख्रिश्चन चर्च फाउंडेशनचाही समावेश होतो, जे जगभरात मिशनरी पाठवतं, अनाथालयं आणि चर्चेसचंही कामकाज बघतं, ज्यामध्ये आधी मी उल्लेख केलेल्या बॉम्बे टीन चॅलेंजचाही समावेश होतो. 'जॉनी अॅन्ड फ्रेन्ड्स' या संस्थेबरोबरही आम्ही काम करतो जी संस्था गरजूंना व्हीलचेअर्स पुरवते.

तुम्हाला ज्याची आवड असेल ते तुम्ही निवडा आणि दुसऱ्याचं भलं करा. तुम्ही टेनिस खेळता? बाइक चालवता? नृत्य आवडतं? तुमच्या आवडीच्या छंदाचं रूपांतर तुम्ही जनहितामध्ये करा. तुमच्या स्थानिक वायएमसीएसाठी टेनिस स्पर्धा भरवा. 'बॉइज अॅन्ड गर्ल्स' क्लबसाठी नाइट राइड आयोजित करा किंवा गरजूंसाठी कपडे खरेदी करण्याकरिता नृत्याची स्पर्धा आयोजित करा.

हिलरी लिस्टरला सेलिंग आवडतं. वयाच्या सदतिसाव्या वर्षी ती ग्रेट ब्रिटनच्या प्रदक्षिणेचा प्रयत्न करणार आहे. 'हिलरीज ड्रीम ट्रस्ट' ही तिची संस्था अपंगांना सेलिंग शिकवते, त्यासाठी तिनं ही चाळीस दिवसांची सफर आखली आहे. तिला विश्वास वाटतो की सेलिंगमुळे अपंगामध्ये आत्मविश्वास वाढू शकतो.

सेलिंगच्या औपचारिक शक्तीवरचा हिलरीचा विश्वास तिच्या स्वानुभवावर आधारलेला आहे. मेंदूतल्या विकारामुळे वयाच्या पंधराव्या वर्षापासून ती आपले हात-पाय वापरू शकत नाही. ऑक्सफर्डची डिग्री असलेली ही अपंग तरुणी तिच्यासाठी खास तयार केलेल्या बोटीनं सेलिंग करते जिच्यात बोटाच्या नियंत्रणासाठी तीन स्ट्रॉज वापरलेले आहेत आणि 'ओढा आणि सोडा' हे तंत्र वापरलंय. तीनपैकी एका स्ट्रॉनं सुकाणूवर नियंत्रण राहतं, तर दुसऱ्या दोनांमुळे ती बोटीला दिशा देऊ शकते. इंग्लिश खाडी पार करणारी आणि ब्रिटनभोवती प्रदक्षिणा मारणारी ती पहिली अपंग व्यक्ती ठरली.

वेळेला एक व्यक्ती

दक्षिण आफ्रिकेतल्या आमच्या विस्मयकारक अनुभवानंतर दोन वर्षांनी मला इंडोनेशियातून व्याख्यानासाठी निमंत्रण आलं. हे निमंत्रण पर्थमधल्या, 'हानहान' टोपण नावाच्या व्यक्तीकडून ई-मेलनं आलं. हा इसम चिनी वंशाचा होता आणि ऑस्ट्रेलियातल्या इंडोनेशियन चर्चेसच्या समूहाचा पॅस्टर होता.

त्याची ई-मेल आल्यानंतर मी हानहानला फोन लावला आणि त्याच्या प्रस्तावावर आम्ही अनेक तास चर्चा केली. त्यानं मला सांगितलं की, इंटरनेटवरच्या माझ्या व्हिडिओज आणि डीव्हीडीजमुळे इंडोनेशियात मी सुपरिचित आहे. दर आठवड्याच्या शेवटी हजारो लोकांसमोर व्याख्यान देण्याच्या दौऱ्याचं आयोजन करण्याचा त्याचा मानस होता. या प्रस्तावावर मी आणि माझ्या आई-वडिलांनी प्रार्थना म्हटली आणि

मला पाठवण्यास ते साशीर्वाद तयार झाले.

जगाचे विविध प्रांत पाहणं, बहुरंगी आणि बहुढंगी लोकांना भेटणं, त्यांची संस्कृती आणि त्यांच्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेणं याचा मला कधीच कंटाळा येत नाही. हानहाननं माझ्यासाठी फारच व्यस्त वेळापत्रक तयार केलं होतं जे माझ्यासाठी चिंतेची बाब होतं. त्यातून त्यांनी माझ्यासाठी नेमलेल्या मदतनिसाला इंग्लिश येत नव्हतं. माझं पोट बिघडलं तेव्हा भाषेचा अडथळा फारच मोठा होऊन बसला. त्याला इंग्लिश येत नसल्यामुळे आणि खाणाखुणा करण्यासाठी मला हात आणि बोटं नसल्यामुळे आमची, म्हणजे खरं तर माझी खूपच पंचाईत झाली.

माझ्या यजमानांनी माझा तेविसावा वाढदिवस साजरा करण्यासाठी खूप विचारपूर्वक पार्टी ठेवली, पण त्या दिवशी मी आणि पोट त्याच्यासाठी तयार नव्हतो. एकवेळ तर माझ्या पोटात एवढ्या कळा उठल्या की मला देव आठवला. पण बरं झालं, त्यामुळे मला क्रूसावरचा येशू डोळ्यांपुढे दिसला आणि माझ्या कळा मंदावल्या. मग मी देवाचे आभार मानले आणि पार्टीचा आनंद घेऊ लागलो. दुसऱ्या दिवशी माझ्यावर डॉक्टरी इलाज झाले आणि ऑस्ट्रेलियात परतण्यापूर्वी मी ठणठणीत बरा झालो.

काही वर्षांनंतर पुन्हा इंडोनेशियातल्या व्याख्यानांच्या दौऱ्यासाठी हानहाननं मला निमंत्रण दिलं. त्या खेपेला मी स्वत:चा मदतनीस बरोबर नेला आणि कायम बाटलीबंद पाणी वापरलं. पा चोक्रो नावाच्या व्यावसायिकानं पाच शहरांमधल्या चाळीस हजार लोकांसाठी स्टेडियममध्ये माझी व्याख्यानं आयोजित केली होती. त्या व्याख्यानांचं टीव्हीवरही प्रक्षेपण झालं. एका रविवारी चर्चमध्ये माझी तीन व्याख्यानं झाल्यावर आम्ही विश्रांती घेतली, कारण संध्याकाळी पुन्हा तीन व्याख्यानं होती. मी थकलेला आणि भुकेला होतो त्यामुळे जवळच्या एका चायनीज रेस्तराँमध्ये आम्ही पोटपूजेसाठी गेलो. काही स्थानिक नेते आणि आमच्या दौऱ्याचे प्रायोजक आमच्याबरोबर होते. माझा मदतनीस व्हॉन यानं मला उचलून आतमध्ये नेलं.

रेस्तराँ साधंच होतं. आम्ही बसलो नाही तेवढ्यात रेस्तराँच्या दारातून माझ्याकडे पाहत एक स्त्री आली आणि रडत-रडत माझ्याशी काहीतरी बोलायला लागली. मला तिची दया आली. ती काय बोलत होती ते मला कळत नव्हतं, पण ती मला खुणावत होती आणि तिला मला मिठी मारायची होती. परंतु, तिच्या बोलण्यानं स्थानिक लोकांना वाईट वाटल्याचं दिसत होतं. त्यांनी मला सांगितलं की, ती स्त्री, ईस्थर, झोपडपट्टीत वाढली होती. ती तिच्या दोन भावंडांबरोबर आणि आईबरोबर कचऱ्याच्या डंपिंगग्राउंड जवळ राहते आणि ती रोज त्या कचऱ्यात खाणं शोधतात आणि भंगाराचा माल निवडून तो विकतात. परमेश्वरावर तिची नितांत श्रद्धा होती, पण तिच्या वडिलांनी त्यांना सोडल्यानंतर ती निराश झाली आणि तिनं आत्महत्येचा विचार केला. तिला वाटलं की आता तिच्या जीवनात अर्थ उरला नव्हता.

तिनं ज्या दिवशी आत्महत्येचा विचार केला त्याच दिवशी तिनं परमेश्वराची प्रार्थना केली आणि त्याला सांगितलं की, ती आता चर्चमध्ये येऊ शकणार नाही. त्याच दिवशी तिच्या पॅस्टरनं चर्चमध्ये माझी एक डीव्हीडी दाखवली. अर्थात, ती काळ्या बाजारातली होती, बेकायदा बनवून विकलेल्या एक लाख पन्नास हजारांपैकी एक.

एवढ्या मोठ्या प्रमाणात माझ्या डीव्हीडीज काळ्या बाजारात तयार होऊन विकल्या जातात हे मला हानहानकडून प्रथम कळलं तेव्हा माझी प्रतिक्रिया होती, "त्याची चिंता करू नका, परमेश्वराचं नाव घ्या." डीव्हीडींच्या विक्रीतून होणाऱ्या फायद्यापेक्षा माझे संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यात मला अधिक स्वारस्य होतं. काळ्या बाजारातही परमेश्वर आपलं काम करीत होता, जे ईस्थरकडून शाबीत होईल. दुभाष्याकरवी ईस्थरनं मला सांगितलं की, माझी डीव्हीडी पाहून प्रेरित होऊन तिनं वैफल्य दूर केलं. तिनं हेतू शोधण्याचं ठरवलं आणि आशा राखायचं ठरवलं. तिनं विचार केला की निक जर परमेश्वरावर विश्वास ठेवू शकतो, तर तीही ठेवू शकते. तिनं नोकरीसाठी प्रार्थना केली आणि सहा महिने उपास केला. आम्हा दोघांना एकत्र आणणाऱ्या त्या रेस्तराँमध्येच तिला नोकरी मिळाली.

तिची कहाणी ऐकल्यानंतर मी तिला मला मिठी मारू दिली आणि तिला तिच्या पुढच्या योजना विचारल्या. तिनं ठरवलं होतं की, तिचं उत्पन्न अल्प होतं आणि तिला दिवसाचे चौदा तास काम करावं लागत होतं तरी ती मुलांची मंत्री होण्यासाठी तयारी करणार होती. बायबल कॉलेजमध्ये भरती होण्याचा तिचा मानस होता. सद्य:स्थितीत ते कसं शक्य होणार होतं याची तिला कल्पना नव्हती, तरीही. ती त्याच रेस्तराँमध्ये राहत होती आणि जमिनीवर झोपत होती, कारण राहण्यासाठी जागा घेणं तिला परवडणारं नव्हतं.

हे ऐकून मला एवढा धक्का बसला की अक्षरश: मी खुर्चीवरून पडणारच होतो. आता तिथं जेवणं मला रुचणारं नव्हतं. ती तरुणी तिथंच झोपत होती याची मी कल्पनाही करू शकत नव्हतो. राहण्यासाठी दुसरं ठिकाण पाहण्याचा मी तिला सल्ला दिला आणि मुलांची मंत्री होण्याच्या तिच्या स्वप्नासाठी तिला शुभेच्छा दिल्या.

आमच्यामध्ये एक गृहस्थ पॅस्टर होते. ईस्थर कामावर परतल्यावर त्यांनी मला सांगितलं की, तिथलं बायबल कॉलेज खूप महागडं होतं आणि त्याची प्रवेश परीक्षा फारच थोडे जण उत्तीर्ण होतात आणि त्या परीक्षेसाठीसुद्धा एक वर्ष थांबावं लागतं.

माझ्यापुढे खाणं आलं, पण माझी भूक गेली होती. जमिनीवर झोपलेल्या त्या तरुणीचं दृश्य माझ्या डोळ्यांपुढे येत होतं. बाकीचे लोक खाण्यासाठी प्रार्थना म्हणत असताना मी ईस्थरसाठी प्रार्थना म्हणत होतो. माझ्या प्रार्थनेला त्वरित प्रतिसाद मिळाला. माझ्या शेजारी प्रार्थना करीत बसलेल्या पॅस्टरनी मला सांगितलं की, मी जर ईस्थरसाठी सिक्युरिटी डिपॉझिट भरलं, तर ते त्यांच्या चर्चमध्ये तिच्या राहण्याची व्यवस्था करतील. मी त्यांना विचारलं की चर्चचं भाडं तिला भरता येईल का, त्यावर पॅस्टरनी मला होकार दिला. मग मीही तयार झालो. ही सुवार्ता ईस्थरच्या कानावर घालण्यासाठी मी अधीर झालो होतो, पण ती आमच्या टेबलपाशी येण्यापूर्वीच आमच्यातल्या एका व्यावसायिकानं घोषणा केली की डिपॉझिट ते स्वत:च भरतील.

मी त्यांना सांगितलं की माझा वाटा मीच उचलेन, पण त्यांच्या दातृत्वाचं कौतुक करायला मी विसरलो नाही.

त्यानंतर, पलीकडे बसलेले एक गृहस्थ उद्गारले, "मी बायबल कॉलेजचा अध्यक्ष आहे आणि याच आठवड्यात मी ईस्थरला प्रवेश परीक्षा द्यायला सांगतो, आणि ती जर त्यात उत्तीर्ण झाली तर तिला शिष्यवृत्तीही मिळवून देईन."

परमेश्वराची योजना माझ्या डोळ्यांपुढे उलगडत होती. प्रवेश परीक्षेत ईस्थरला पैकीच्या पैकी गुण मिळाले. नोव्हेंबर २००८मध्ये ती बायबल कॉलेजमधून ग्रॅज्युएट झाली. आता ती इंडोनेशियातल्या सर्वांत मोठ्या चर्चमध्ये मुलांच्या मंत्रालयात युवा संचालक आहे आणि आपल्या समाजात अनाथालय स्थापण्याची तिची योजना आहे.

या पुस्तकभर मी तुम्हाला हेतूच्या शक्तीविषयी सांगतोय. ईस्थरची कहाणी ही त्या शक्तीचा पुरावा आहे. या तरुणीकडे हेतूची जाणीव आणि परमेश्वरावर श्रद्धा याव्यतिरिक्त काहीही नव्हतं. तिच्या हेतूनं आणि श्रद्धेनं शक्तिशाली चुंबकीय श्रेत्र निर्माण केलं ज्यानं मला आणि तिच्या स्वप्नपूर्तीची इच्छा असलेल्या अन्य लोकांना आपल्याकडे खेचून घेतलं.

उद्देश आणि श्रद्धेची शक्ती

ईस्थरच्या हेतूच्या प्रबळ जाणिवेपुढे, चांगल्या जीवनासाठीच्या तिच्या अगम्य आशेपुढे, परमेश्वरावरील तिच्या श्रद्धेपुढे, तिच्या आत्मप्रेमापुढे, तिच्या सकारात्मक दृष्टिकोनापुढे, तिच्या निडरपणापुढे, चिकाटीपुढे, धोके पत्करण्याच्या तिच्या तयारीपुढे, आणि इतरांसाठी काही करण्याच्या तिच्या मानसिकतेपुढे मी नतमस्तक आहे.

ईस्थरची विस्मयकारक कहाणी मला प्रेरणा देते. मी आशा करतो की तुम्हालाही तसचं वाटावं. सदर पुस्तक लिहिण्यामागचा माझा उद्देश आहे तुमच्यामध्ये श्रद्धेची आणि आशेची

ज्योत प्रज्वलित करणं, जेणेकरून तुम्हालाही मर्यादाहीन जीवन जगता यावं. तुमची परिस्थिती बिकट असू शकते. तुमच्यासमोर आरोग्याची किंवा नातेसंबंधी आव्हानं असू शकतात. पण तुमच्याकडे जर हेतूची जाणीव, आपल्या भविष्यावर श्रद्धा आणि कधीही हार न मानण्याचा निश्चय असेल तर तुम्ही कोणताही अडथळा पार करू शकता.

ईस्थरनं ते केलं. तुम्हीही ते करू शकता. मी लहानाचा मोठा होत असताना माझं अपंगत्व म्हणजे दूर करता न येणारा भार वाटत होता, पण माझी ती अक्षमताच अनेकानेक मार्गांनी वरदान ठरली, कारण मी परमेश्वरी पंथ अनुसरायला शिकलो.

तुम्हालाही अनेक संकटांना सामोरं जावं लागेल, पण तुम्ही जाणीव ठेवली पाहिजे की जिथं तुम्हाला असमर्थता जाणवेल, तिथं परमेश्वर प्रबळ आहे. त्यानं मला अक्षमतेकडून सक्षमतेकडे नेलं आणि इतरांना त्यांच्या आव्हानांशी सामना करण्यात मदत व्हावी म्हणून माझे अनुभव आणि माझी श्रद्धा त्यांना देऊ करण्याची तीव्र इच्छा माझ्या मनात पेरली.

मला जाणवलं की माझा हेतू माझ्या झगड्यांना अशा धड्यांमध्ये रूपांतरित करण्याचा होता जे परमेश्वराचं मोठेपण दाखवतात आणि इतरांना प्रेरणा देतात. त्यानं मला इतरांचं वरदान होण्याचं वरदान दिलं. आपली वरदानं उत्साहात इतरांमध्ये लुटा आणि विश्वास बाळगा की तुम्ही जे कराल ते अनेक पटींनी वृद्धिंगत होईल. सर्व बाबतीमध्ये परमेश्वर त्यांच्यासाठी सर्वोत्कृष्ट कार्य करतो जे त्याच्यावर प्रेम करतात. त्याचं तुमच्यावर प्रेम आहे आणि माझंही तुमच्यावर प्रेम आहे.

ख्रिश्चनांना अनेकदा सांगितलं जातं की आपण पृथ्वीवरचे 'परमेश्वराचे हात आणि पाय आहोत.' मी ते शब्दश: घेतलं तर मी एकटा पडल्यासारखं मला वाटेल. त्यामुळे मी ते आध्यात्मिक अंगानं घेतो. शक्य तेवढ्या लोकांना माझ्या समर्थनानं आणि माझ्या उदाहरणानं संदेश देत मी त्याची सेवा बजावतो. माझं ध्येय आहे आपणा सर्वांवरचं येशूचं प्रेम दाखवणं. त्यानं आपल्याला जीवन दिलंय ते आपण एकमेकांना आपली वरदानं द्यावीत म्हणून. यानं मी आनंदित होतो आणि तुम्हीही यानं आनंदित व्हावं. मी आशा करतो की या पुस्तकातून मी सांगितलेल्या कहाण्या आणि संदेशांनी तुम्हाला तुमचा हेतू शोधण्यात, तुमची आशा बाळगण्यात, श्रद्धा बाळगण्यात, स्वत:वर प्रेम करण्यात, सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्यात, निर्भय राहण्यात, बदल स्वीकारण्यात, विश्वासार्ह राहण्यात, संधीसाठी खुले राहण्यात, धोके पत्करण्यास तयार राहण्यास आणि इतरांसाठी दातृत्व बाळगण्यात तुम्हाला साहाय्य आणि प्रेरणा लाभेल.

कृपया माझ्या संपर्कात राहा आणि तुमच्या कहाण्या आणि पुस्तकावरील तुमचे विचार मला पाठवा, त्यासाठी Nickvujicic.com , lifewithoutlimits.org किंवा AttitudeIsAltitude.com वापरा.


ध्यानात ठेवा, तुमच्या जीवनासाठी परमेश्वराचा खरोखर मोठा उद्देश आहे! ते विनामर्यादा जगा!

प्रेम आणि श्रद्धा यांच्यासह,
निक

◆

छायाचित्रे

चॉकलेट कित्ती छान होतं! थँक्स, आई!





माझा सर्वात आवडता फोटो (वय सहा महिने) आनंदी, आत्मविश्वास आणि मिश्कील – बरोबर? माझं स्वच्छंदी अज्ञान त्या वयात माझ्यासाठी दैवी देणगीच होती. कारण मी इतरांपेक्षा वेगळा होतो आणि माझ्यापुढे पुष्कळ आव्हानं उभी ठाकलेली होती याबाबत मी अनभिज्ञ होतो.



वय वर्ष २½, ड्रायव्हिंगचे धडे आणि माझ्या पहिल्या गाडीचा परिचय. स्वत:ला सांभाळा, लोकहो!



माझ्या सर्वांत आवडत्या स्थळांपैकी एक, जिथं मी माझ्या लाडक्या कार्स आणि ट्रक्सनी खेळायचो. निरभ्र क्वीन्सलॅन्डमधील वाळू मला प्रिय होती आणि वयाच्या तिसऱ्या वर्षी मी सागरकिनाऱ्यावरच्या लाटांच्या तरंगांशी ओळख वाढवू लागलो.



माझा आणि माझ्या भावाचा आवडता गेम होता 'बॅटलशिप'. कधीकधी मी माझे कृत्रिम हात वापरायचो, पण अंतिमत: असं स्पष्ट झालं की त्या हातांविनाच मी माझी बहुतेक सर्व कामं अधिक सफाईनं करू शकत होतो.

जोनी एरेक्सन – टाडा. हिच्या म्हणण्याप्रमाणं, "आपणा सर्वांनाच चाकं असतात." खास बनवून घेतलेली माझी व्हीलचेअर वापरताना मला विशेष मुक्ततेची भावना जाणवते.



मोहीम फत्ते: २००३मध्ये वयाच्या एकविसाव्या वर्षी ग्रिफिथ युनिव्हर्सिटीमधून फिनानशिअल प्लॅनिंग ॲन्ड अकाउंटिंगमध्ये मी डबल ग्रॅज्युएशन केलं.





२००९मध्ये ॲनाहाइम एंजल स्टेडिअमवर ५५,००० लोकांसमोर जाण्यापूर्वी मी माझ्या आईवडिलांबरोबर (डुश्का आणि बोरिस)



माझा भाऊ आरोन आणि त्याची सहचारिणी मिशेल यांच्याबरोबर



माझी सुंदर बहीण मिशेल हिच्याबरोबर समुद्रकिनारी



स्कुबा डायव्हिंगचा थरार अनुभवण्यासाठी प्रथमच पाण्यात उतरण्यापूर्वी माझ्या प्रशिक्षकाकडून हातांचे संकेत समजावून घेताना, जबरदस्त अनुभव!





हवाईमध्ये बोधना हॅमिल्टनसमवेत सर्फिंगचा अद्भुत अनुभव. मी माझा तोल सांभाळण्यासाठी धडपडत असताना ती माझ्याबरोबर लीलया सर्फिंग करत होती.

...आणि किनाऱ्यावरची मंडळी जल्लोशात बुडाली.

घानामधल्या श्रोत्यांसमोर उभा राहिल्यावर माझ्या हातांच्या तळव्यांना (?) घाम फुटला.






जगभरात कुठेही प्रवास करताना श्रद्धा, आशा, प्रेम आणि धाडस यांच्या साहाय्यानं प्रतिकूलतेवर मात करून आपली स्वप्नपूर्ती करण्यासाठी मला भेटणाऱ्या सर्वांना मी प्रेरणा देतो. या पोरांनी मला आनंदानं हवेत उंचावलं. २००२ मध्ये दक्षिण आफ्रिकेत केलेला दौरा मी कदापि विसरणार नाही.

कोणत्याही समूहासमोर, कुठेही, कोणत्याही आकाराच्या लोकांसमोर जाण्यात,मुलांबरोबर खेळण्यात, त्यांच्या सहवासात असण्यात मला अजूनही मजा वाटते. मुलांच्या सहवासात राहिल्यानं मला नेमस्तराहण्यास मदत मिळते. विशेषत: कोलंबियातल्या मुलांच्या सहवासात, ज्यांना फुटबॉल खेळायला खूप आवडतं.






हा मी माझा सन्मानच समजतो की माझ्या जीवनात मला अनेक प्रेरणादायी लोकांना भेटण्याची संधी लाभली. मी कधीच विसरू शकत नाही की जेनेटनं तिच्या ओळखीच्या लोकांना कसं प्रोत्साहित आणि प्रेरित केलं. काही लोक म्हणतील की, ती आपली कॅन्सरसोबतची लढाई हरली. पण मी असे म्हणेन की, तिचा स्वर्गातला प्रेमळ पिता तिचं थकलेलं शरीर घरी घेऊन गेला. तिनं काहीच हरवलं नाही, पण आपल्या हृदयात ती घर करून गेली.पण तरीही तिनं दाखवून दिलं की, दुर्बलतेमध्येही आपण बल प्राप्त करू शकतो.



आणि हा मी इते!!!

आवर्जून वाचावे असे काही

ध्रुवीय प्रदेशातील (-१.७ से.) जगातील सर्वांत थंड पाण्यात आणि
पाचही महासागरात पोहण्याचे विविध विक्रम करणारा
पहिला साहसवीर लुईस गॉर्डन पगची
रोमहर्षक जीवनकहाणी त्याच्याच शब्दांत...



"It is better to have read a great work of another culture in translation than never to have read it at all."

- Henry Gratton Doyle

माझा असा विश्वास आहे की, माझ्या जीवनात कोणत्याही मर्यादा नाहीत आणि तुमच्याही जीवनात तसेच घडावे असे मला वाटते; मग तुमच्या पुढ्यात कोणतीही आव्हाने का असेनात. आपला सहप्रवास सुरू होण्यापूर्वी क्षणभर थांबा! तुम्ही स्वत: तुमच्या जीवनाला काही मर्यादा घातल्या आहेत का, अथवा अन्य कोणी त्या घालण्यास तुम्ही अनुमती दिली आहे का, याचा विचार करण्यासाठी. आता विचार करा की त्या मर्यादांपासून मुक्तता लाभल्यास तुम्हाला कसे वाटेल? काहीही अशक्य नसल्यास तुमचे जीवन कसे असेल?

– निक वोयचिच,
'लाइफ विदाऊट लिमिट्स'मधून







www.mehtapublishinghouse.com